अहवाल क्रमांक : १७४

सत्यमेव जयते

# पंचायती राज समिती
# (२०१७-२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

### महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या सातारा जिल्हा परिषदेच्या सन २०१२-२०१३ च्या लेख्यांवरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत

# अठ्ठाविसावा अहवाल

(सदर अहवाल दिनांक     जून, २०१९ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०१९

# पंचायती राज समिती
# (२०१७-२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या सातारा जिल्हा परिषदेच्या सन २०१२-२०१३ च्या लेख्यांवरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत**

# अठ्ठाविसावा अहवाल

# पंचायती राज समिती
## (सन २०१७-२०१८)

**समिती प्रमुख**

(१) श्री.सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री.बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
(३) श्री.चरण वाघमारे, वि.स.स.
(४) श्री.रणधीर सावरकर, वि.स.स.
(५) ॲड.राहुल कुल, वि.स.स.
(६) श्री.आर.टी.देशमुख, वि.स.स.
(७) डॉ.देवराव होळी, वि.स.स.
(८) *** रिक्त
(९) डॉ.सुधाकर भालेराव, वि.स.स.
(१०) श्री.सुधाकर कोहळे, वि.स.स.
(११) श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.
(१२) श्री.किशोर पाटील, वि.स.स.
(१३) श्री.राजेश क्षीरसागर, वि.स.स.
(१४)श्री.तुकाराम काते, वि.स.स.
(१५) श्री.राहुल बोंद्रे, वि.स.स.
(१६) श्री.भारत भालके, वि.स.स.
(१७) प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स.
(१८) श्री.दिलीप सोपल, वि.स.स.
(१९) श्री.राहुल मोटे, वि.स.स.
(२०) श्री.दीपक चव्हाण, वि.स.स.
(२१) श्री.प्रविण दरेकर, वि.प.स.
(२२) *** रिक्त
(२३) श्री.विक्रम काळे, वि.प.स.
(२४)श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.
(२५)श्री.अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री.बाळाराम पाटील, वि.प.स.
(२७)श्री.श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
(२८)श्री.दत्तात्रय सावंत, वि.प.स.
(२९) * श्री.किशोर दराडे, वि.प.स.
(३०) ** श्री.निलय नाईक, वि.प.स.
(३१) ** श्री.निरंजन डावखरे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री.जितेंद्र भोळे, सचिव (कार्यभार)
(२) श्री.विलास आठवले, सह सचिव (२) (का.)
(३) श्री.प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(४) श्री.मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी
(५) श्री.नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी.

* श्री.किशोर दराडे, वि.प.स. यांची मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक ४ डिसेंबर, २०१८ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

** श्री.निलय नाईक, वि.प.स. व श्री.निरंजन डावखरे, वि.प.स. यांची मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक १ मार्च, २०१९ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

*** डॉ.सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स. व प्रा.डॉ.तानाजी सावंत, वि.प.स. यांचा दिनांक १६ जून, २०१९ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त

## पंचायती राज समिती
## (सन २०१५-२०१६)

**कार्यकारी समिती प्रमुख**

१. *श्री.प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री.अनिल गोटे, वि.स.स.
३. श्री.विकास कुंभारे, वि.स.स.
४. श्री.भिमराव तापकीर, वि.स.स.
५. श्री.आर.टी.देशमुख, वि.स.स.
६. श्री.उन्मेश पाटील, वि.स.स.
७. श्री.समीर कुणावार, वि.स.स.
८. श्री.राजेंद्र नजरधने, वि.स.स.
९. श्री.कृष्णा गजबे, वि.स.स.
१०. श्री.अनिल बाबर, वि.स.स.
११. श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१२. श्री.हेमंत पाटील, वि.स.स.
१३. श्री.राजाभाऊ वाजे, वि.स.स.
१४. ॲड.के.सी.पाडवी, वि.स.स.
१५. श्री.बसवराज पाटील, वि.स.स.
१६. श्री.अमित झनक, वि.स.स.
१७. श्री.राहुल मोटे, वि.स.स.
१८. श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
१९. श्री.दीपक चव्हाण, वि.स.स.
२०. श्री.अनिल तटकरे, वि.प.स.
२१. श्री.संदीप बाजोरिया, वि.प.स.
२२. श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स.
२३. श्री.चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.
२४. **रिक्त
२५. **रिक्त

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री.विलास आठवले, उप सचिव
(३) श्री.सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी.

* सन २०१५-२०१६ या वर्षासाठी गठीत करण्यात आलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या पंचायती राज समितीवर मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजीपासून श्री.प्रकाश भारसाकळे, वि.स.स. यांची ''कार्यकारी समिती प्रमुख '' म्हणून नामनियुक्ती केली आहे.

** सन्माननीय समिती प्रमुख श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. व श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांचा दिनांक ८ जुलै, २०१६ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त

## पंचायती राज समिती

## (सन २०१५-२०१६)

**समिती प्रमुख**

१. श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री.प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

३. श्री.अनिल गोटे, वि.स.स.

४. श्री.विकास कुंभारे, वि.स.स.

५. श्री.भिमराव तापकीर, वि.स.स.

६. श्री.आर.टी.देशमुख, वि.स.स.

७. श्री.उन्मेश पाटील, वि.स.स.

८. श्री.समीर कुणावार, वि.स.स.

९. श्री.राजेंद्र नजरधने, वि.स.स.

१०. श्री.कृष्णा गजबे, वि.स.स.

११. श्री.अनिल बाबर, वि.स.स.

१२. श्री.भरतशेठ गोगावले, वि.स.स.

१३. श्री.हेमंत पाटील, वि.स.स.

१४. श्री.राजाभाऊ वाजे. वि.स.स.

१५. ॲड.के.सी.पाडवी, वि.स.स.

१६. श्री.बसवराज पाटील, वि.स.स.

१७. श्री.अमित झनक, वि.स.स.

१८. श्री.राहुल मोटे, वि.स.स.

१९. श्री.सुरेशभाऊ लाड, वि.स.स.

२०. श्री.दीपक चव्हाण, वि.स.स.

२१. श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

२२. श्री.अनिल तटकरे, वि.प.स.

२३. श्री.संदीप बाजोरिया, वि.प.स.

२४. श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स.

२५. श्री.चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्री.विलास आठवले, उप सचिव

(३) श्री.प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)

(४) श्री.सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी.

**प्रस्तावना**

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा अठ्ठाविसावा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता समिती दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा.सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी केले. समिती पध्दतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती सहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Legislature) या समितीला "Mini Legislature" सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत नि:पक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो. परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पध्दतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय, योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय, योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकष्टया सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुध्दा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा.सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने ए एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारुन संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुध्दा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुसऱ्या सदस्यांनी माहिती विचारण्याची पध्दत जोपासली आहे. या पध्दतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करुन आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करुन विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्यादृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाईदेखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्दयांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे.

थोडक्यात, समिती पध्दती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पध्दतीचे स्थान व महत्त्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृध्दिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णयदेखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचनादेखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाईदेखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचाऱ्यांना जरबदेखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करुन ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारुन घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणी पुरवठ्यची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करुन काही चांगल्या बाबींचे समर्थन करुन संबंधितांना प्रोत्साहितदेखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २०१२-१३ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन व सन २०१३-१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१७-१८ साठी गठीत झालेल्या समितीने सातारा जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने सातारा जिल्हा परिषदेस दिनांक ११, १२ व १३ एप्रिल, २०१८ रोजी भेट देऊन डॉ. कैलास शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरीता गठीत झालेल्या समितीने सातारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्दयांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक १६ जानेवारी २०१९ रोजी जिल्हा परिषद, सातारा संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या, प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्री.श्यामलाल गोयल, अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, श्री.राजगोपाल देवरा, प्रधान सचिव, वित्त विभाग, श्री.असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री.रा.वा.पानसे, सचिव (प्र.स.), जलसंपदा विभाग, श्री.चं.प्र.जोशी, सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, डॉ.सुवर्णा खरात, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.कि.पां.वडते, उप सचिव, महसूल विभाग, श्री.म.रं.शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, श्री.अ.अ.कपोले, उप सचिव, जलसंपदा विभाग, श्री.अ.मा.लुंडबे, अवर सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, श्रीमती एम निलीमा केरकेट्टा, मुख्य कार्यकारी अधिकारी, खादी व ग्रामद्योग मंडळ, श्री.परमेश्वर बाबर, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, श्री.संभाजी लांगोरे, उप आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे तसेच श्री.प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक लेखा निधी संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

लेख्यांवरील लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या सातारा जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्दयांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०१७-२०१८ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक २० जून २०१९ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन तो किरकोळ दुरुस्तींसह संमत केला.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २० जून २०१९.

**सुधीर पारवे,**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

## अनुक्रमणिका


| अ.क्र. (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | परिच्छेद क्रमांक (४) | पृष्ठ क्रमांक (५) |
|---|---|---|---|---|
| (१) | एक | ग्रामपंचायतनिहाय मुद्रांक शुल्क अनुदान वाटपाच्या विनियोगाबाबत (सन २०१२-१३). | ३.१५/३४ | १ |
| (२) | दोन | सागवानी बेंच खरेदी व वाटपाबाबत (सन २०१२-१३). | ३.११८ | ११ |
| (३) | तीन | संगणक खरेदीबाबत (सन २०१२-१३) | ३.११९ | २० |
| (४) | चार | इको फ्रेंडली पॉलिमर बेंच खरेदीबाबत (सन २०१२-१३) | ३.१२२ | २६ |
| (५) | पाच | १) प्राथमिक आरोग्य केंद्र, विंग, ता.कराड संरक्षक भिंत बाधणे<br>२) येरळवाडी-बनपुरी रस्ता सुधारणा करणेबाबत<br>३) गारळेवाडी चाफ्याचा मळा रस्ता दुरुस्ती करणे ता.खटाव<br>(सन २०१२-१३). | ३.२७१/९०<br>३.२७२/९५<br>३.२७३/९७ | ३१ |
| (६) | सहा | साठवण बंधारा वडुज तामखडी, ता.खटाव (सन २०१२-१३) | ३.४२८/५ | ३६ |
| (७) | सात | अभिकरण शुल्क वसुली केली नसल्याबाबत (सन २०१२-१३) | ३.५१६/१८ | ४१ |
| (८) | आठ | प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना, शिंगणापूर पाणीपट्टी वसुलीबाबत (सन २०१२-१३) | ३.५१८/२१ | ४४ |
| (९) | नऊ | सन २०१२-२०१३ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी (सन २०१२-१३). | ३.१०७२/३२ | ४८ |
| (१०) | दहा | सन २०१२-२०१३ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी (सन २०१२-१३). | ३.१०७२/२३ | ५६ |
| (११) | अकरा | लेखापरीक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणेबाबत<br>(सन २०१२-१३). | | ६० |
| (१२) | बारा | सर्वसाधारण शिफारशी | | ८२ |
| (१३) | | **परिशिष्ट (अ)**<br>**शासनाचे आदेश, शासन निर्णय व परिपत्रके** | | ८५ |
| (१४) | | **परिशिष्ट (ब)**<br>**समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त** | | ११७ |

प्रकरण एक

## जिल्हा परिषद, सातारा

## ग्रामपंचायतनिहाय मुद्रांक शुल्क अनुदान वाटपाच्या विनियोगाबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.१५/३४ (सन २०१२-१३) :**

जिल्हा परिषदेने मुद्रांक शुल्क अनुदान रक्कम रुपये २५,८५,९२०/- ग्रामपंचायतींना वाटप केली आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत :

१) शासनाकडून सन २०११-१२ व सन २०१२-१३ करीता रक्कम रुपये ६,१०,००,०००/- इतकी प्राप्त रक्कम व त्रिशंकु क्षेत्रामध्ये झालेल्या स्थावर मालमत्तेच्या खरेदी-विक्री पोटी देय मुद्रांक शुल्क जिल्हा निधीत जमा करण्यास मान्यता घेतली आहे. तसेच उप कार्यकारी अभियंता धोम पाटबंधारे विभाग, सातारा यांनी जिल्हा परिषदेस देय उपकारातून ग्रामपंचायतीकडून येणे असलेली पाणीपट्टी वसूली केल्याचे कळविले आहे. त्यामुळे मुद्रांक शुल्क अनुदानातून विकास कामावर खर्च झाल्याची खात्री होत नाही. यास्तव वरील अनुदानाबाबत गट विकास अधिकारी यांचे अनुदान उपयोगिता प्रमाणपत्र तसेच ग्रामपंचायत नमुना नंबर ७ पावतीआधारे योग्य खर्चाची खात्री होणे आवश्यक आहे.

२) उपरोक्त नमूद केल्यानुसार पाणीपट्टी थकबाकी रकमेबाबत पाणीपुरवठा खात्याकडील दिनांक २० फेब्रुवारी, २००७ चे पत्र उपलब्ध नाही, तसेच ग्रामपंचायतीकडून किती रक्कम प्राप्त झाली व अद्याप देणे किती आहे, याचा ताळमेळ घेतला नाही. तरी याबाबत ताळमेळ घेणे आवश्यक आहे.

३) प्रमाणक क्रमांक ९७ अन्वये रक्कम रुपये १६,१२,३५६/- ही रक्कम त्रिशंकु क्षेत्रामध्ये झालेल्या स्थावर मालमत्तेच्या खरेदी-विक्री पोटी समायोजित केली असून त्याबाबत सविस्तर तपशील उपलब्ध नाही. सदर तपशील प्राप्त करणे व सक्षम प्राधिकाऱ्याच्या परवानगीबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सातारा यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

१) सन २०१२-१३ या वित्तीय वर्षामध्ये ग्रामपंचायतींना मुद्रांक शुल्क अनुदान वितरणासाठी जिल्हा परिषदेच्या स्वनिधी अंदाजपत्रकामध्ये रक्कम रुपये ६,१०,००,०००/- तरतूद करणेत आली आहे. सदर तरतुदीमधून त्रिशंकु क्षेत्रामध्ये झालेल्या खरेदी विक्री व्यवहारापोटी प्राप्त झालेले मुद्रांक शुल्क अनुदान रक्कम रुपये १६,१२,३५४/- जिल्हा परिषदेच्या स्वनिधीमध्ये जमा करून घेणेत आलेले आहे. तसेच जिल्हा परिषदेस देय असणाऱ्या पाणीपट्टी उपकरामधून पाटबंधारे विभागाने ग्रामपंचायतीकडील येणे पाणीपट्टी थकबाकीची रक्कम वसूल करून घेतली आहे. सबब जिल्हा परिषदेचे उत्पन्न बुडू नये या उद्देशाने जिल्हा परिषदेकडील आदेश क्र.ग्रापं-४-सीआर-वशि-४०९३/२०१२, दिनांक १० जानेवारी, २०१३ अन्वये पाणीपट्टी थकबाकीदार ग्रामपंचायतींना देय असणाऱ्या मुद्रांक शुल्क अनुदानामधून रक्कम रुपये ९,७३,५६६/- वसूल करून घेऊन जिल्हा परिषदेच्या स्वनिधीमध्ये जमा करणेत आलेली आहे. अशी एकूण रक्कम रुपये २५,८५,९२०/- जिल्हा परिषदेच्या स्वनिधीमध्ये जमा करणेत आलेली आहे. जिल्हा परिषदेकडील आदेश क्र.ग्रा.पं.-४-सीआर-वशि—३७२७-२०१२ दिनांक १८ फेब्रुवारी, २०१३ अन्वये उर्वरित रक्कम रुपये ५,८४,१४,०८०/- संबंधित ग्रामपंचायतींना वाटप करणेकामी पंचायत समितीकडे वित्तप्रेषणाने वर्ग करणेत आलेली आहे. सदर अनुदान ग्रामपंचायतींना मिळालेबाबत व सदर अनुदान विकास कामावर खर्च केलेबाबतचे गट विकास अधिकारी यांचे विनियोग दाखले दप्तरी ठेवण्यात आले आहेत.

२) पाटबंधारे मंडळाकडील दिनांक २२ फेब्रुवारी, २००७ चे पत्र उपलब्ध करून ठेवणेत आले आहे. पाटबंधारे मंडळास ग्रामपंचायतींकडील किती पाणीपट्टीची रक्कम प्राप्त झालेली आहे व अद्याप किती येणे बाकी आहे या बाबतचा ताळमेळ पाटबंधारे विभागाशी घेणेत आला आहे.

३) सह.जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी, सातारा यांचेकडून दरमहा प्राप्त झालेल्या देय मुद्रांक शुल्क अनुदानाच्या नमुना "अ" पत्रकानुसार त्रिशंकू भागातील खरेदी-विक्री व्यवहारापोटी सन २०१२-१३ मध्ये मुद्रांक शुल्कापोटी प्राप्त झालेले अनुदान रक्कम रुपये १६,१२,३५६/- प्रमाणक क्र.९७ अन्वये जिल्हा निधीमध्ये जमा करून घेणेत आले आहेत. सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या नमुना "अ" तपशीलानुसारच रक्कम जमा केल्याने वेगळयाने परवानगीची आवश्यकता नाही.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :**

सातारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ११ एप्रिल, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेची स्वत:ची नळ योजना आहे काय, जिल्हा परिषदेने प्रादेशिक नळ योजनेची पाणीपट्टी वसूल केलेली आहे किंवा कसे, याबाबत समितीस माहिती देण्यात यावी.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सातारा जिल्ह्यामध्ये दोन त्रिशंकू भाग आहेत. त्यांपैकी एक भाग गोडवली हा सातारा शहराच्या बाजूला आहे. दुसरा भाग सोनगीरवाडी व सिद्धनाथवाडी हा असून हा भाग वाई तालुक्यामध्ये आहे. या दोन गावांमध्ये जे मुद्रांकांचे व्यवहार होतात, तो मुद्रांक निधी जिल्हाधिकारी यांच्याकडून जिल्हा परिषदेला प्राप्त होतो. हा निधी त्या भागातील एका स्थानावर खर्च होतो. तसेच जिल्हा परिषदेला पाटबंधारेच्या सेसची रक्कम मिळत असते. परंतु जलसंपदा विभागाने या भागातील ग्रामपंचायतीकडून येणे असलेली पाणीपट्टीच्या रकमेतून ती रक्कम कपात करून जिल्हा परिषदेला पाठविली. अशा प्रकारे जलसंपदा विभागाने सन २००७ मध्ये २३.५२ लाख रूपये जिल्हा परिषदेच्या उत्पन्नातून कमी केले. जिल्हा परिषदेला अशा पद्धतीच्या ग्रामपंचायतींकडून जे येणे आहे, परंतु या ग्रामपंचायतीला मुद्रांक शुल्कातून जे देणे लागते, तो ग्रामपंचायतीचा हिस्सा जिल्हा परिषदेने सन २०१२-२०१३ पर्यंत वसूल केलेला आहे.

यावर समितीने विचारणा केली की, ही पाणीपट्टी पाणीपुरवठा योजनेची आहे की, इरिगेशनची आहे, ग्रामपंचायतीने रक्कम वसूल न केल्यामुळे ती रक्कम मुद्रांक शुल्काच्या निधीतून जिल्हा परिषदेने कपात केलेली आहे, असे करता येते काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सन २०१२-२०१३ पर्यंत असे झालेले आहे. त्यानंतर असे झालेले नाही. तद्नंतर समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषदेला अशा प्रकारे मुद्रांक शुल्काची रक्कम कपात करण्याचे अधिकार आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, जिल्हा परिषदेने यासंदर्भातील कागदपत्रे तपासली होती. परंतु यासंदर्भात स्पष्ट शासन निर्णय मिळाला नाही. सन २००६-२००७ पासून ही रक्कम वसूल होत होती. त्यावेळी अशा प्रकारचा निर्णय कोणी घेतला व कोणत्या स्तरावर घेतला, त्याबाबतची माहिती घेऊन समितीला सादर करतो.

यावर समितीने विचारणा केली की, हा विषय सन २००६-२००७ पासूनचा आहे. परंतु आपण या प्रश्नाचे उत्तर आतापर्यंत तयार केलेले नाही. निर्णय घेण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहेत काय, हा निर्णय तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घेतला की, शासनाचे आदेश होते, यासंदर्भात उत्तरामध्ये माहिती दिलेली नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सन २००६-२००७ पासून जिल्हा परिषदस्तरावर निधी गोळा केला जातो. हा निर्णय कोणत्या पातळीवर घेण्यात आला होता, याची माहिती घेऊन समितीस सादर करण्यात येईल.

यावर समितीने विचारणा केली की, हा विषय अतिशय गंभीर आहे. समिती चर्चा करीत असलेल्या अहवालानुसार हा मुद्रांक शुल्काचा विषय सन २०१२-२०१३ मधील आहे. आपण समिती येण्यापूर्वी यासंदर्भात माहिती घेणे आवश्यक होते. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माहिती दिली की, हा प्रश्न सातारा जिल्ह्यातील दोन भागांमध्ये आहे. एक बाब अशी आहे की, मुद्रांक शुल्क आलेला त्रिशंकु भाग विकसित झाला की, नाही.

यावर समितीने विचारणा केली की, त्रिशंकू भागामध्ये ज्या नोंदण्या झाल्या असतील त्याच्या मुद्रांक शुल्काची रक्कम जिल्हा मुद्रांक शुल्क विभागाने आपल्याकडे सादर केली. या भागातील वसूल होणाऱ्या पाणीपट्टीचे पैसे ग्रामपचांयतीला किंवा आपल्याला द्यायचे होते. परंतु आपण त्या ग्रामपंचायतीला देय असलेल्या रकमेतून पैसे कपात केले. यासंदर्भात ग्रामसभेचा ठराव पाहिजे होता. ग्रामपंचायतीला अगोदर पैसे दिले गेले पाहिजे होते व ग्रामसभेची मंजुरी घ्यायला हवी होती, त्यानंतर जिल्हा परिषदेने निर्णय घेणे गरजेचे होते. शासनाने मुद्रांक शुल्क कपात करण्याचे जिल्हा परिषदेला अधिकार दिले असतील तर आपल्याला त्या अधिकाराचा वापर करता येत होता. अन्यथा आपण तसे करू शकत नाही. यामध्ये जिल्हा परिषदेतील संबंधित अधिकाऱ्याने अवैधपणे काम केलेले आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, हा प्रश्न दोन भागांमध्ये आहे. त्रिशंकू भागामध्ये येणारा २५ लाख रूपयांचा निधी त्रिशंकू भागामध्ये खर्च झाला नाही. २५ लाख रूपयांपैकी १६ लाख रूपये त्रिशंकू भागातील मुद्रांक शुल्काचे आहेत आणि ९ लाख रूपये त्रिशंकू भागाव्यतिरिक्त इतर ग्रामपंचायतीमधून पाणीपट्टीची वसूल झालेली रक्कम आहे. १६ लाख रूपयांमधून बीजीच्या मान्यतेने व स्टँडिंग कमिटीच्या मान्यतेने बांधकामे मंजूर करून पूर्ण केलेली आहेत. उर्वरित ९ लाख रूपये त्रिशंकू भागातून वसूल केलेली पाणीपट्टीची रक्कम नाही, तर अशा ८१ ग्रामपंचायती असून त्यांना पाटबंधारे विभागाला पाणीपट्टी देणे लागत होती व अशा ग्रामपंचायतींकडून ती रक्कम जिल्हा परिषद स्तरावर वसूल केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी मुद्रांक शुल्क वसूल करण्याचा अधिकार कोणत्या पातळीवर घेण्यात आला, याबाबतची सविस्तर माहिती घेऊन समितीसमोर सादर करण्यात येईल.

यावर समितीने मत व्यक्त केले की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी यामध्ये दुसरा प्रश्न तयार केला की, त्रिशंकू भागामध्ये पाण्याची व्यवस्था केली आणि म्हणून कपात करणे आवश्यक होते. ग्रामपंचायतनिहाय मुद्रांक शुल्क जमा होतो. जिल्हा परिषदेकडे यादी येत असते. याचाच अर्थ कोणत्या ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये बांधकामे झालेली आहेत व नोंदणी झालेली आहे, याची माहिती जिल्हा परिषदेकडे आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, हा प्रश्न दोन भागांमध्ये आहे. वसूल झालेली ९ लाख रूपयांची रक्कम केवळ त्रिशंकू भागातील पाणी पट्टीचे नाही. इतर ८१ ग्रामपंचायती आहेत. सातारा तालुक्यात गोडवली व वाई तालुक्यामध्ये सोनगिरवाडी आणि सिद्धनाथ वाडी हे त्रिशंकू भाग आहेत. ही वसुली इतर ग्रामपंचायतीच्या पाणीपट्टीची आहे. जलसंपदा विभागाने जिल्हा परिषदेच्या पाटबंधारे सेसच्या रकमेतून ही रक्कम कपात केलेली आहे. याचाच आधार घेऊन जिल्हा परिषदेने त्यावेळी हा निर्णय कोणत्या स्तरावर घेतला, याची माहिती सद्या उपलब्ध नसल्यामुळे याबाबतची माहिती घेऊन ती समितीला सादर करण्यात येईल. सन २०१२-२०१३ मध्ये याबाबत हरकत घेण्यात आली होती व तेव्हापासून ही वसुली थांबलेली आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, कोणत्या अधिकाऱ्याच्या आदेशानुसार हा निधी कपात करण्यात आला, याचे उत्तर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यापेक्षा मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्याकडून समितीस मिळायला पाहिजे. तसेच यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समिती येण्यापूर्वीच उत्तर तयार ठेवायला पाहिजे होते. त्यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कोण होते, हे पैसे कपात करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे होते. ही माहिती जिल्हा परिषदेकडूनच प्राप्त झालेली आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, यासंदर्भात दोन भाग आहेत. हा निर्णय कोणत्या स्तरावर घेण्यात आला, सर्वसाधारण सभा आणि स्थायी समिती यांची मान्यता घेऊन सन २००६-०७ मध्ये निर्णय घेण्यात आला असून त्याबाबतची माहिती समितीला सादर करण्यात येईल.

यावर समितीने माहिती दिली की, पाटबंधारे विभागाला परस्पर पैसे कपात करून घेण्याचा अधिकार आहे का, मुद्रांक शुल्कच्या उप कराच्या माध्यमातून मिळणाऱ्या पैशातून ग्रामपंचायत विविध कामांचे नियोजन करीत असते. त्यावेळी सदरहू ग्रामपंचायतीच्या हक्काचे पैसे कपात करण्यात आले, ते वापरण्यात आले आहेत. अशा प्रकारे ग्रामपंचायतीचे पैसे कपात करण्यापूर्वी कायदेशीर बाबी न तपासता पैसे कपात करण्यात आले आहेत. तद्नंतर समितीने विचारणा केली की, ग्रामपंचायतीचे अधिकार जिल्हा परिषदेने कसे वापरले, सदरहू प्रकरणीची नस्ती सन २०१२-२०१३ मध्ये सादर करताना कायदेशीर बाबी तपासण्याची जबाबदारी कोणाची होती, सदरहू प्रकरणी शासनाच्या नियमावलीनुसार कार्यवाही करण्यात आली नाही.

सदरहू प्रकरणी चुकीच्या पद्धतीने कार्यवाही करण्यात आली आहे. मागील अधिकाऱ्याने चुकीचे काम केले म्हणून पुढील कालावधीत त्यानुसार कार्यवाही करणे उचित नाही. सदरहू प्रकरणी जबाबदारी निश्‍चित केली पाहिजे. पाणीपट्टीची रक्कम मुद्रांक शुल्क अनुदानातून कपात करण्यात यावी, असे संबंधित ग्रामपंचायतीने प्रस्तावित करणे आवश्यक आहे. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत यांनी पाणीपट्टी थकबाकीदार ग्रामपंचायतींना देय असणाऱ्या मुद्रांक शुल्क अनुदानातून चुकीच्या पद्धतीने कार्यवाही करून रक्कम कपात केली आहे.

तद्नंतर समितीने मत व्यक्त केले की, सदरहू कार्यवाही मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना थांबवता येणे शक्य होते. यावर तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, ग्रामपंचायतीनुसार मान्यता घेऊन आदेश दिले त्यानुसार पाणीपट्टीची रक्कम वर्ग करण्यात आली आहे. यावर समितीने विचारणा केली की, सदरहू ग्रामपंचायतींना मुद्रांक शुल्क अनुदान रकमेचा हिस्सा देण्यात आला होता का, ग्रामपंचायतीने ठराव केला व त्याला मान्यता मिळाली ही बाब नियमानुसार योग्य आहे काय, यावर तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, सदरहू अनुदानातून रक्कम कपात करून उर्वरित रक्कम ग्रामपंचायतीला वर्ग करण्यात आली आहे. तद्नंतर समितीने विचारणा केली की, सदरहू अधिकार मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना आहे का, अशा प्रकारे रक्कम कपात करण्याचा अधिकार आहे, हे का तपासले नाही, यावर तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, पाणीपट्टी देताना कपात करावयास नको होती. पाटबंधारे विभागाने कपात न करता रक्कम देणे अपेक्षित होते परंतु त्यांनी रक्कम कपात करून ग्रँट दिलेली आहे.

यावर समितीने विचारणा केली की, पाटबंधारे विभागाने रक्कम कपात केल्यानंतर रक्कम कशा प्रकारे वर्ग केली, ग्रामपंचायतीला अनुदानाची संपूर्ण रक्कम अदा न करता जिल्हा परिषदेच्या स्तरावरुन पैसे कपात करून परस्पर पाटबंधारे विभागाला वर्ग करण्यात आले आहेत. यावर तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, पाटबंधारे विभागाने परस्पर पाणीपट्टी रक्कम कपात करून उर्वरित ग्रँट जिल्हा परिषदेला दिली आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, ग्रामपंचायतीला १०० टक्के अनुदान वर्ग करणे आवश्यक होते. पाटबंधारे विभागाने पाणीपट्टी वसूल करण्यासंदर्भात चूक केली असून तो विषय शासनाकडे सादर करण्यात येईल. पाटबंधारे विभागाने जिल्हा परिषदेच्या उपकरातून परस्पर रक्कम कपात केली आहे. ग्रामपंचायतीकडून पाटबंधारे विभागाला येणे असलेली रक्कम जिल्हा परिषदेला मिळणाऱ्या उपकराच्या उत्पन्नातून कपात करता येत नाही. त्यावेळी पाटबंधारे विभागाने पाणीपट्टीची रक्कम कपात करून जिल्हा परिषदेला उर्वरित रक्कम वर्ग केली व जिल्हा परिषदेकडून ग्रामपंचायतीला रक्कम वर्ग करताना त्यातून पाणीपट्टीची रक्कम कपात करून उर्वरित रक्कम वर्ग केली आहे. सदरहू प्रकरणी चुकीची कार्यवाही झाली आहे, ही वस्तुस्थिती आहे.

यावर समितीने माहिती दिली की, पाटबंधारे विभाग व जिल्हा परिषद यांनी स्वतंत्रपणे ग्रामपंचायतीची पाणीपट्टीची रक्कम कपात केली आहे. अशा प्रकारे ग्रामपंचायतीला मुद्रांक शुल्कातून मिळणाऱ्या अनुदानाच्या रक्कमेतून येणी कपात करण्याचा अधिकार नाही. तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी दिलेल्या उत्तरामुळे उप प्रश्नांमध्ये वाढ झाली आहे. अधिकार नसताना जिल्हा परिषदेचे पैसे पाटबंधारे विभागाने कपात केल्यामुळे जिल्हा परिषदेने ग्रामपंचायतीच्या हिश्श्याचे पैसे कपात केले आहेत. सदरहू प्रकरणी लेखापरिक्षकांनी काढलेला आक्षेप बरोबर आहे. ग्रामपंचायतीची संमती घेऊन त्यांचेकडून नमुना ७ ची पावती घेऊन रक्कम वसूल केली असती तर सदरहू प्रकरणीची प्रक्रिया योग्य झाली असती. ग्रामपंचायतीला पैसे वर्ग न करता कपात करण्यात आले आहेत. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचेकडे ग्रामपंचायतीच्या मुद्रांक शुल्काच्या अनुदानातून रक्कम कपात करण्यासाठी नस्ती सादर केली. त्यावेळी योग्य कार्यवाही करणे अपेक्षित होते.

यावर संचालक, स्थानिक निधी लेखा संचालनालय यांनी माहिती दिली की, सदरहू लेखा आक्षेपामध्ये दोन विषय आहेत. पाटबंधारे विभागाने ग्रामपंचायतीला देय असलेल्या मुद्रांक शुल्क अनुदानातून वसुलीची रक्कम कपात केली आहे. अशा प्रकारे रक्कम कपात करून घ्यावी अथवा करु नये, याबाबतचा उल्लेख नियमांमध्ये नाही.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, ग्रामपंचायतीकडे पाटबंधारे विभागाची पाणीपट्टीची रक्कम प्रलंबित होती. ग्रामपंचायतीने सदरहू रक्कम पाटबंधारे विभागाला दिली नाही. पाटबंधारे विभागाकडून जिल्हा परिषदेला देण्यात येणाऱ्या सेसमधून ग्रामपंचायतीकडून येणी असलेली पाणीपट्टीची रक्कम कपात करून उर्वरित रक्कम जिल्हा परिषदेला वर्ग केली. सदरहू रक्कम कपात केल्यामुळे जिल्हा परिषदेला कमी सेस प्राप्त झाला. त्याचा शोध घेतल्यानंतर निदर्शनास आले की, ग्रामपंचायतीने पाणीपट्टीची रक्कम पाटबंधारे विभागाला न दिल्यामुळे त्यांनी ती रक्कम सेसमधून कपात करून उर्वरित रक्कम जिल्हा परिषदेला वर्ग केली. त्यामुळे जिल्हा परिषदेकडून ग्रामपंचायतीला मुद्रांक शुल्क अनुदानाच्या देय रक्कम देताना पाणीपट्टीची रक्कम पाटबंधारे विभागाने जिल्हा परिषदेच्या सेसमधून कपात केलेली मुद्रांक शुल्क अनुदानाच्या रकमेतून कपात करून उर्वरित रक्कम ग्रामपंचायतीला वर्ग केली.

यावर समितीने मत व्यक्त केले की, सदरहू पाणीपट्टी प्रकरणी ग्रामपंचायतीने सहकार्य केले नसते तर ग्रामपंचायतीवर सक्तीची कारवाई करता येणे शक्य होते. मुद्रांक शुल्क अनुदानाची संपूर्ण रक्कम ग्रामपंचायतीला वर्ग करून पुन्हा ग्रामपंचायतीकडून पाणीपट्टीची रक्कम घेणे आवश्यक होते. तसेच ग्रामपंचायत ही स्थानिक स्वराज्य संस्था असून ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेला रक्कम कपात करून घेण्याकरिता संमती देण्याचा अधिकार आहे. ज्यावेळी पाटबंधारे विभागाकडून नदीमध्ये पाणी सोडण्यात येते त्यावेळी ग्रामपंचायतीकडे पैसे नसतील तर पाणीपट्टीची रक्कम जिल्हा परिषदेकडून त्यांना प्राप्त होणाऱ्या रकमेतून कपात करण्यास अनुमती देता येते. सदरहू प्रकरणी ग्रामपंचायतीकडे त्यावेळी पैसे नसतील तर त्यांनी अशा प्रकारे अनुमती दिली असेल तर पाणीपट्टीची रक्कम कपात करता येते. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, समितीने सांगितलेल्या पद्धतीने ग्रामपंचायतीने अनुमती दिली होती का, ही बाब तपासून माहिती सादर करण्यात येईल.

यावर समितीने निदेश दिले की, सदरहू विषयी स्पष्टता नसल्यामुळे जलसंपदा व वित्त विभागाच्या सचिवांची साक्ष आयोजित करण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

ग्रामपंचायतीच्या अनुदानातून जिल्हा परिषदेला पैसे कपात करण्याचा अधिकार नाही, परंतु जलसंपदा विभागाने ग्रामपंचायतीच्या अनुदानातून रक्कम कपात केल्या प्रकरणी जलसंपदा व वित्त विभागाने कोणते अभिप्राय दिले आहेत ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सन २०१२-१३ या वित्तीय वर्षामध्ये ग्रामपंचायतींना मुद्रांक शुल्क अनुदान वितरणासाठी जिल्हा परिषद स्वनिधी अंदाजपत्रकामध्ये रक्कम रुपये ६,१०,००,०००/- तरतूद करणेत आली होती. यामध्ये जिल्हा परिषदेस देय असणाऱ्या पाणीपट्टी उपकरामधून पाटबंधारे विभागाने रक्कम रुपये २३.५२ लक्ष परस्पर वसूल करून घेतले बाबतचा मुद्दा पंचायत राज समितीच्या सातारा जिल्हा परिषदेच्या भेटी दरम्यान उपस्थित करणेत आला आहे. याबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम १४६ अन्वये जिल्हा परिषदेस पाणीपट्टी उपकरापोटी रक्कम प्राप्त होते. सदर देय असलेल्या रक्कमेमधून धोम पाटबंधारे विभाग सातारा यांनी पत्र क्र. धोपावि/दका-२/१५३६/०७ दिनांक २० फेब्रुवारी, २००७ अन्वये ग्रामपंचायतीकडील थकीत पाणीपट्टी रक्कम रुपये २३.५२ लक्ष परस्पर समायोजित केली असलेचे कळविले आहे.

तथापि महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाकडील निर्णय क्र. पापद. २००६ (३९६/०३) सिंव्य (धो) दिनांक ३१ जुलै २००६ (**परिशिष्ट १.१**) मधील (४) ग्रामपंचायतीने वापरलेल्या पाण्याची वसूली जिल्हा परिषदेने जलसंपदा विभागाकडे जमा करावी. जिल्हा परिषदेने ही रक्कम जलसंपदा विभागाकडे न भरल्यास सदरची रक्कम ग्रामविकास विभागाने शासन स्तरावर जलसंपदा विभागाकडे जमा करावी असे नमूद आहे. तरी पाटबंधारे विभागाने ग्रामपंचायतीकडील थकीत पाणीपट्टीची रक्कम जिल्हा परिषदेस देय असणाऱ्या पाणीपट्टी उपकराच्या रक्कमेमधून वसूल करून घेतलेली आहे ही वस्तुस्थिती आहे.

सन २००६-२००७ ते सन २०१२-१३ या कालावधीत संबंधीत ग्रामपंचायतींना देय असणाऱ्या मुद्रांक शुल्क अनुदानामधून रक्कम रुपये २०.०६ लक्ष वसूल करून जिल्हा परिषदेच्या स्व:निधी मध्ये जमा केलेली आहे. सन २०१३-१४ पासून ग्रामपंचायतीला देय असणाऱ्या मुद्रांक शुल्क अनुदानातून वसुली बंद करणेत आलेली आहे.

वस्तुस्थिती पहाता, ग्रामपंचायतीकडील पाणीपट्टीपोटी वसूल करावयाची रक्कम पाटबंधारे विभागाने थेट जिल्हा परिषदेला देय असणाऱ्या पाणीपट्टी उपकरातून वसूल केलेचे दिसून येत आहे. त्यामुळे वसूल केलेल्या पाणीपट्टीमुळे जिल्हा परिषदेचे उत्पन्न कमी होवू नये म्हणून सदरची रक्कम संबंधित ग्रामपंचायतींना देय असणाऱ्या मुद्रांक शुल्क अनुदानामधून वसूल करून जिल्हा परिषदेच्या स्वनिधीमध्ये जमा करणेबाबतचा निर्णय जिल्हा परिषदेने घेतला आहे अशाप्रकारे संबंधीत ग्रामपंचायतींना देय असणाऱ्या मुद्रांक शुल्क अनुदानामधून कपात करणेचा अधिकार जिल्हा परिषदेस असल्याचे दिसून येत नाही.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**१) जलसंपदा विभागाचे अभिप्राय :-** ग्रामपंचायतींना शासनाकडून देय अनुदानातुन जलसंपदा विभागामार्फत कोणतीही रक्कम कपात केलेली नाही, तथापी या विभागाच्या सिंचन/ बिगर सिंचन पाणीपट्टीच्या वसूली समवेत २० % स्थानिक कराची रक्कम (Local Cess) जमा होत असते व ती रक्कम जिल्हा परिषदेला देय असते. जलसंपदा विभागाच्या प्रकल्पातून ग्रामपंचायतींना पिण्याच्या पाण्याचे आरक्षण ठेवले जाते व त्यापोटी पाण्याचे देयक संबंधीत ग्रामपंचायती जलसंपदा विभागाकडे रोखीने जमा करीत नाहीत. त्यामुळे ही रक्कम जिल्हा परिषदेस देय असणाऱ्या स्थानिक कराच्या रक्कमेतून समायोजीत करून उर्वरीत स्थानिक कराची रक्कम जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यात येते.

**२) वित्त विभागाचे अभिप्राय :-** अप्राप्त

**३) ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (वित्त-३) ग्रामपंचायतींना देय असणाऱ्या मुद्रांक शुल्क अनुदानामधून कपात करणेचा अधिकार जिल्हा परिषदेस नाही.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सातारा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीस ग्रामपंचायतनिहाय मुद्रांक शुल्क अनुदान वाटपाच्या विनयोगाबाबतचा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माहिती दिली की, जलसंपदा विभागाकडून ग्रामपंचायतींनी जी पाणीपट्टीची रक्कम भरावयाची असते ती रक्कम जलसंपदा विभागाकडे भरणा करण्यात आली नाही. जलसंपदा विभाग जिल्हा परिषदेला लोकल सेस देत असते. तो सेस देत असताना जलसंपदा विभागाने ग्रामपंचायतीची जी रक्कम भरणा केलेली नाही ती रक्कम वजा करून जलसंपदा विभागाने जिल्हा परिषदेला पैसे दिलेले आहेत. जिल्हा परिषदेने ज्यावेळी हे पैसे कमी मिळाल्यामुळे ग्रामपंचायतीला जो मुद्रांक शुल्क मिळत असतो त्या मुद्रांक शुल्कामधून ही रक्कम वसूल केली आहे. अशा प्रकारची वस्तुस्थिती आहे.

यावर समितीने विचारणा केली की, परंतु अशा प्रकारची वसुली करता येत नाही, अशा प्रकारचा आक्षेप होता. ज्या ग्रामपंचायतीच्या मुद्रांक शुल्काचे विनियोजन ग्रामसभा करीत असते त्या ग्रामपंचायतीला पैसे न देता परस्पर जिल्हा परिषदेने कपात केली आहे. त्यासाठी जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेची मंजुरी देखील घेण्यात आलेली नाही. जिल्हाधिकाऱ्यांमार्फत जिल्हा परिषदेला मुद्रांक शुल्क मिळत असते. त्यामुळे अशा प्रकारे रक्कम परस्पर कपात करण्याचे अधिकार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना शासनाकडून देण्यात आलेले होते काय, यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, ग्रामपंचायतीने इव्हॅल्युएशनद्वारे अशा प्रकारचे एक स्वत: दायित्व घेतलेले आहे की, जर पाणी पुरवठा झाला तर विशिष्ट रक्कम देण्यात येईल. त्यामुळे ही जबाबदारी ग्रामपंचायतीने स्वत: घेतलेली आहे. हा विषय प्रत्येक ठिकाणी येत आहे. ग्रामसभा असा ठराव करीत असतात की, जर पाणी पुरवठा झाला तरच पाणीपट्टी भरण्यात येईल. त्यामुळे हे दायित्व ग्रामसभेच्या मान्यतेने करण्यात आलेले आहे. यासाठी शासन खर्च करीत असते.

यावर समितीने निदेश दिले की, यासाठी शासनाने निदेश काढले पाहिजेत की, ज्या ग्रामपंचायतीकडे थकीत पाणीपट्टी असेल त्या ग्रामपंचायतीच्या मुद्रांक शुल्काच्या रकमेतून पैसे जिल्हा परिषद स्तरावरुन कपात करण्यात येतील. परंतु अशा प्रकारचे निदेश काढण्यात आलेले नाहीत. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी माहिती दिली की, यामध्ये पहिला विषय असा होता की, ग्रामसभेने ही लायबिलीटी घेतली होती.

यावर समितीने विदित केले की, ज्यावेळी योजना तयार होते त्यावेळी करार करण्यात येत असतो. करारामध्ये लिहिले जाते की, पाणीपट्टी भरण्यात येईल. एखादया योजनेचे बांधकाम होईपर्यंतचा करारनामा वेगळा असतो. ग्रामपंचायतीचा जो प्रस्ताव जिल्हा परिषद स्वीकारीत असते त्या कराराला शासन मान्यता देत असते. जसे की, मुख्यमंत्री पेयजल योजनेमधील सर्व प्रस्तावांना शासन मान्यता देत असते. शासनाची अंतिम मान्यता असल्याशिवाय खालच्या स्तरावर कोणतीही कार्यवाही होत नसते. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या पाणीपट्टीची वसुली शिल्लक असेल तर ती वसुली मुद्रांक शुल्कामधून वसूल करण्यात यावी, अशा प्रकारचा शासन निर्णय जलसंपदा किंवा वित्त विभागाने काढला होता काय तसेच जिल्हा परिषदांना अशा प्रकारचे अधिकार देण्यात आलेले आहे काय, परस्पर कपात केल्यामुळे हा विषय उपस्थित झालेला आहे.

यावर प्रधान सचिव, वित्त विभाग यांनी खुलासा केला की, या प्रकरणामध्ये जिल्हा परिषदेने वसुली का केली, असा प्रश्न आहे. जिल्हा परिषदेचा जो येणे निधी आहे, त्या निधीमधून जलसंपदा विभागाने कपात केलेली आहे. ज्या ग्रामपंचायतीमुळे ही वसुली केली आहे त्या ग्रामपंचायतीच्या मुद्रांक शुल्कामधून ही रक्कम जिल्हा परिषदेने वसूल केली आहे. यावर समितीने मत व्यक्त केले की, अशा प्रकारची कपात करण्याचा अधिकार जिल्हा परिषदेला देण्यात आलेला नाही.

यावर प्रधान सचिव, वित्त विभाग यांनी खुलासा केला की, ग्रामपंचायतीने जलसंपदा विभागाला देय असलेली २३ लाख रुपयांची रक्कम जिल्हा परिषदेने कपात करून घेतली आहे. जिल्हा परिषदेची येणे रक्कम जलसंपदा विभागाने कपात करून घेतली आहे. म्हणून जिल्हा परिषदेने ज्यांना ही रक्कम देय आहे, त्यांच्याकडून वसूल केली आहे. परंतु त्याबाबत जलसंपदा विभागाचा दिनांक ३१ जुलै, २००६ चा शासन निर्णय आहे. त्यांनी असे म्हटलेले आहे, की देय रक्कम जिल्हा परिषदेने द्यावी. जिल्हा परिषदेच्या पातळीवर अशा प्रकारची कारवाई होत नसेल तर ग्रामविकास विभागाने ती कारवाई करावी. परंतु ती वसुली कोणत्या निधीमधून करण्यात यावी, याबाबत स्पष्ट आदेश त्यामध्ये नाहीत. अशा प्रकारची वसुली सन २०१२-१३ पासून बंद झालेली आहे. परंतु सन २०११-१२ या वर्षामध्ये अशा प्रकारची वसुली झालेली आहे. त्यामुळे जी झालेली चूक आहे, त्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, ज्यावेळी एखादे धोरण ठरविण्यात येते त्या धोरणाची अंमलबजावणी होते किंवा नाही, हे पाहण्यासाठी ही समिती स्थापन करण्यात आलेली आहे. त्यामुळे जर अशा प्रकारे विभागाने अशा गोष्टींकडे डोळेझाक केली तर या समितीला काहीच अर्थ राहणार नाही. ज्या ठिकाणी चूक झाली असेल ती चूक विभागाने मान्य केली पाहिजे. यामध्ये दोन विषय आहेत. एकीकडे जिल्हा परिषदेच्या मंजुरीशिवाय अशा प्रकारची कपात करण्यात येत आहे. जर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या खात्यामध्ये विशिष्ट निधी जमा झाल्यानंतर तो निधी विड्रॉल करण्यासाठीचे अधिकार मुख्याधिकाऱ्यांना नाहीत. जो पर्यंत सक्षम समितीची यासाठी मंजुरी मिळत नाही तो पर्यंत वित्त प्रेशन देता येत नाही.

ही परस्पर वसुली करीत असताना जिल्हा परिषदेचा ठराव घेण्यात आला होता का, किंवा नियमानुसार यासाठी ठराव होता काय, अशा प्रकारचा ठराव करण्यात यावा, अशा प्रकारचीच जिल्हा परिषदेची अट असते. त्यावेळी तो खातेप्रमुख अशा प्रकारचा ठराव करता येत नसल्याची बाब जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून देतो काय, धोरणाची निश्चिती वरिष्ठ पातळीवरुन करण्यात येत असते. परंतु त्या धोरणाची अंमलबजावणी होते किंवा नाही, याची तपासणी देखील वरिष्ठ पातळीवरुन करणे गरजेचे असते. जलसंपदा विभागाचे हे पैसे ग्रामपंचायतीला थेट द्यावयाचे नसतात. जलसंपदा विभागाची पाणीपट्टी जिल्हा परिषदेच्या खात्यावर जमा होत असते. त्यामध्ये ग्रामपंचायतीचा हिस्सा नसतो. मुद्रांक शुल्कामध्ये ग्रामपंचायतीचा हिस्सा आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, जलसंपदा विभागामध्ये ग्रामपंचायतीचा हिस्सा राहत नाही, ही बाब योग्य आहे. परंतु जिल्हा परिषदेला ते उत्पन्न मिळत असते. यावर समितीने माहिती दिली की, त्यामुळेच ग्रामपंचायतीची वसुली जलसंपदा विभागाच्या पैशामधून करावयाची नाही असा तो विषय आहे. ग्रामपंचायतीचे केवळ मुद्रांक शुल्क वसूल करावयाचे असते. यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, जलसंपदा विभागाकडून जिल्हा परिषदेला जे लोकल सेसचे येणे उत्पन्न आहे, त्या येणे रकमेमधील रक्कम कमी मिळाली. काही ग्रामपंचायतींनी त्यांच्या पाणीपट्टीची रक्कम भरणा केली नाही. सचिव महोदयांनी सांगितल्याप्रमाणे ग्रामपंचायतींनी ठराव केलेला असतो. त्याशिवाय निविदा देखील होत नसते. परंतु ती जबाबदारी ग्रामपंचायतींनी पार पाडलेली नाही. त्यामुळे जिल्हा परिषदेचे उत्पन्न कमी झाले. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी असा निर्णय घेतला की, मुद्रांक शुल्काच्या रकमेमधून ही रक्कम वसूल करण्यात यावी. त्यावेळी सदरहू लेखा आक्षेप उपस्थित करण्यात आला होता. त्यानंतरच्या काळात अशा प्रकारची वसुली करणे बंद झालेले आहे.

यावर समितीने आक्षेप घेतला की, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी परस्पर अशा प्रकारचा निर्णय घेतला आहे. तद्नंतर समितीने विदित केले की, पाणीपट्टी उपकर विषयाच्या बाबतीत आणि जलसंपदा विभागाने परस्पर कपात केलेल्या रकमेबाबतच्या शासन निर्णयाचा या ठिकाणी उल्लेख करण्यात आला. परंतु त्या शासन निर्णयामध्ये मुद्रांक शुल्काच्या रकमेतून कपात करावी असा उल्लेख नाही. तरी सुद्धा कपात करण्यात आली. ग्रामपंचायतीला जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून मुद्रांक शुल्क मिळते आणि ती रक्कम ग्रामपंचायती विकास कामांवर खर्च करते. समितीच्या दौऱ्याच्या वेळी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी या संदर्भातील बाब त्याच वेळी स्पष्ट केली असती तर हा प्रश्न त्याच वेळी निकाली निघाला असता. सन्माननीय सदस्य प्रा.विरेंद्र जगताप यांनी अमरावती जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी गैरव्यवहार केल्यानंतर सुद्धा त्यांना पाठीशी घालण्याचे काम होत असल्याचे निदर्शनास आणून दिले. वास्तविक पाहता अशाप्रकारे दोषी व्यक्तीला पाठीशी घालणे चुकीचे आहे. या ठिकाणी मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग केल्यामुळे त्यांच्यावर सुद्धा योग्य ती कारवाई करावयास पाहिजे.

यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी विदित केले की, जलसंपदा विभागाला ग्रामपंचायतीकडून येणे असलेली रक्कम मिळाली नाही म्हणून त्यांनी जिल्हा परिषदेला द्यावयाच्या रकमेतून उक्त रक्कम कपात केली. परिणामी यामध्ये जिल्हा परिषदेचे नुकसान झाले. जिल्हा परिषदेला उपकराचे जे पैसे मिळतात ते ग्रामपंचायतीचे नसतात. ते जिल्हा परिषद स्तरावरीलच असतात. जिल्हा परिषदेला उपकराचे जे पैसे मिळणार होते ते जलसंपदा विभागाने कपात केले. कारण ग्रामपंचायतीने पाणीपट्टीची थकीत रक्कम दिली नव्हती. त्यामुळे जलसंपदा विभागाने ग्रामपंचायतीकडील थकीत पाणीपट्टीची रक्कम जिल्हा परिषदेला देय असलेल्या पाणीपट्टी उपकराच्या रकमेतून वसूल केली, ही वस्तुस्थिती आहे. जिल्हा परिषदेला पाणीपट्टी उपकराची जी रक्कम देय होती, त्यातून जलसंपदा विभागाने ग्रामपंचायतीच्या थकीत पाणीपट्टीची रक्कम कपात केली.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, जलसंपदा विभागाचा आणि ग्रामपंचायतींचा कुठेही संबंध येत नाही. जर ग्रामपंचायतींनी रितसर मंजुरी दिली असती आणि जलसंपदा विभागाबरोबर या संदर्भात करारनामा केला असता तर सदरहू रक्कम ग्रामपंचायतींना देय आहे. टंचाई परिस्थितीमध्ये मोठमोठ्या धरणाचे पाणी नळ योजनेसाठी सोडण्यात येते. अशा परिस्थितीत ग्रामपंचायतींवर पाणीपट्टीची आकारणी होत नाही. आपण एवढेच स्पष्ट करावे की, या संदर्भात ग्रामपंचायत आणि जलसंपदा विभागामध्ये करारनामा झाला होता काय, यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, ग्रामपंचायतीचे पाणीपट्टीपोटी जे दायित्व होते ते त्यांनी जमा केले नाही म्हणून जलसंपदा विभागाने जिल्हा परिषदेला देय असलेल्या पाणीपट्टी उपकराच्या रकमेतून ग्रामपंचायतींच्या दायित्वाची रक्कम कपात केली.

यावर समितीने विचारणा केली की, वास्तविक पाहता ग्रामपंचायतींबरोबर करारनामा केला असेल तरच थकीत रक्कम कपात करावयास पाहिजे होती. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, जिल्हा परिषदेच्या उपकराची रक्कम वरिष्ठ स्तरावरुन कपात झाली आहे. कारण अनेक ग्रामपंचायतींनी त्यांच्या पाणीपट्टीची रक्कम दिली नव्हती. सन्माननीय सदस्यांचा प्रश्न कार्यपद्धती व अधिकारांच्या बाबतीत तंतोतंत बरोबर आहे. सातारा जिल्हा परिषदेने २०१२ पासून अनुदान कपात करणे बंद केले आहे. कदाचित तत्कालीन अधिकाऱ्यांची कार्यपद्धती चुकली असेल, परंतु त्यांचा हेतू चुकीचा नव्हता. त्यांनी अशा प्रकारची कार्यवाही करताना विहित कार्यपद्धती अवलंबिली नाही, त्यांनी यासाठी शासनाची परवानगी घ्यावयास पाहिजे होती.

यावर समितीने विचारणा केली की, नळ योजनेचा स्त्रोत धरणातून घेतला असेल तर जलसंपदा विभागाशी करारनामा करण्याचा संबंध येणार नाही. यासाठी जलसंपदा विभागाच्या केवळ ना-हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता राहील. जलसंपदा विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र घेताना, आम्हाला पाणीपट्टी वसुली देय राहील अशी अट कदाचित अंतर्भूत केली नसेल. जेवढ्या व्यक्तिगत पाणीपट्टी योजना सुरु आहेत त्यामध्ये पिण्यासाठी १५ टक्के राखीव पाणीसाठा प्रत्येक धरणात ठेवला आहे. याचाच अर्थ जलसंपदा विभागाने वसुली करावी असे कुठेही नमूद नाही.

यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीचे मी समर्थन केले. जलसंपदा विभागाची जिल्हा परिषदेचे पैसे कपात करण्याची जी कार्यवाही आहे त्या बाबत वित्त विभागाचे सचिव खुलासा करतील. परंतु जिल्हा परिषदेने जी कार्यवाही केली त्यामध्ये त्यांचा दुसरा कोणताही वेगळा हेतू नव्हता.

तद्नंतर सचिव, जलसंपदा विभाग यांनी खुलासा केला की, पाण्याचा वापर केला म्हणजे पाणीपट्टी आकारणी होईल. ग्रामपंचायत असो किंवा अन्य कोणतीही स्थानिक स्वराज्य संस्था असो, त्यांनी पाणी वापर केला असेल तर पाणीपट्टीची रक्कम वसूल केली जाते. यावर समितीने विचारणा केली की, मुळात लोकांना पाणी देताना ग्रामपंचायत मूल्यांकन करते. आपण १५ टक्के राखीव साठ्यातून पाणी दिले की अतिरिक्त पाणी साठ्यातून पाणी दिले, यावर सचिव, जलसंपदा विभाग यांनी खुलासा केला की, पिण्यासाठी जे पाणी वापरले आहे त्यातून पाणीपट्टी वसूल केली आहे. शासनाने सेक्टरवाईज जे पाणी वाटप ठरवून दिले आहे त्यानुसार पाणी वाटप केल्यानंतर त्याची पाणीपट्टी भरावीच लागते. यावर समितीने विचारणा केली की, नळ योजनेसाठी पाणी वापरल्यानंतर जलसंपदा विभागाला कोणाकडून पाणीपट्टी वसूल करणे अपेक्षित आहे, यावर सचिव, जलसंपदा विभाग यांनी खुलासा केला की, जर ग्रामपंचायतीने पाणी वापरले असेल तर ग्रामपंचायतीकडून पाणीपट्टी वसूल करणे अपेक्षित आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली, विभागाने ना हरकत प्रमाणपत्र देताना अशी प्रकारची अट अंतर्भूत केली आहे काय, यासाठी शासनाची परवानगी घेतली आहे काय, जलसंपदा विभागाने ही कपात कशाच्या आधारे केली आहे, यावर सचिव, जलसंपदा विभाग यांनी खुलासा केला की, पाण्याचा वापर केल्यामुळे ग्रामपंचायतींना पाणीपट्टीची रक्कम भरावीच लागते.

तद्नंतर समितीने विदित की, उदाहरणार्थ एखाद्या कंपनीला किंवा उद्योगाला आकारणी करून पाणी वापर करण्याची मंजुरी दिली असेल तर त्यांना पाणीपट्टी देय आहे. परंतु ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या स्त्रोतांसाठी जलसंपदा विभागाने परवानगी दिली असेल तर त्या ग्रामपंचायतींकडून वसुली करणे अपेक्षित नाही. यासंदर्भात विभागाने शासन निर्णय सादर करावा.

यावर सचिव, जलसंपदा विभाग यांनी खुलासा केला की, पाणी वापराच्या आधारावर पाणीपट्टीचे देयक दिले आणि त्यानुसार वसुली करणे आवश्यक आहे. यावर समितीने विदित केले की, ग्रामपंचायतीने पाणीपट्टीची मागणीच केली नसेल तर ग्रामपंचायतींकडे पाणीपट्टीच्या रकमेची मागणी कशी करता येईल. वास्तविक पाहता असे प्रश्न संपूर्ण राज्यात वारंवार उपस्थित होत राहतील. त्यामुळे यामध्ये दुरुस्ती करणे गरजेचे आहे. नदी-काठावरील ज्या योजना आहेत त्या संदर्भातील धोरणामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. समितीच्या सदस्यांनी सांगितल्यानुसार करारनामा करीत असताना करारनाम्यात पाणीपट्टी घेण्याचा उल्लेख नाही. विभागाच्या सचिवांनी सांगितले की, या संदर्भात शासन स्तरावरुन परवानगी घेणे आवश्यक होते. परंतु शासनाची परवानगी घेण्यात आली नाही. अशा प्रकारची कार्यवाही करण्यामागे जिल्हा परिषदेचा हेतू चांगला होता असेही त्यांनी मान्य केले आहे. राज्यात अनेक पाणी पुरवठा योजना आहेत. अनेक ठिकाणी मुद्रांक शुल्कातून रक्कम कपात करण्यात येते. वास्तविक पाहता ती रक्कम अन्य विकास कामावर खर्च करण्यासाठी मिळावयास पाहिजे होती, परंतु ती रक्कम न मिळाल्यामुळे ते विकास कामांपासून वंचित राहत आहेत. अशा परिस्थितीत विभागाला या विषयामध्ये सुस्पष्टता आणण्यासाठी योग्य ती मार्गदर्शक तत्त्वे निर्गमित करणे आवश्यक आहेत. अशा बाबी भविष्यात होणार नाहीत म्हणून योग्य ती काळजी घेणे आवश्यक आहे. जलसंपदा विभाग, वित्त विभाग, ग्राम विकास विभागाच्या सचिवांनी सर्वसहमतीने मार्गदर्शक तत्त्वे निर्गमित करून, अशी प्रकरणे पुन्हा होणार नाहीत याची दक्षता घ्यावी. विभागाच्या सचिवांचे तांत्रिकदृष्ट्या म्हणणे बरोबर आहे की, शासनाची परवानगी न घेता परस्पर पैसे खर्च केले जात असतील तर ते योग्य नाही. योग्य कार्यपद्धती अवलंबिली असती तरी ही रक्कम विकास कामांवर खर्च करता आली असती. समितीच्या मते आजच्या एकंदर चर्चेच्या अनुषंगाने विभागाने या संदर्भातील परिपूर्ण मार्गदर्शक तत्त्वे निर्गमित करावीत.

यावर सचिव, जलसंपदा विभाग यांनी विदित केले की, आजही ग्राम विकास विभागाचे दिनांक ३ जून, २००४ रोजीचे परिपत्रक अस्तित्वात आहे. त्यामध्ये नमूद आहे की, ग्रामपंचायतीकडून पाणीपट्टीची रक्कम अपेक्षित आहे. ग्रामपंचायतीकडे थकबाकी नाही असे प्रमाणपत्र जिल्हाधिकाऱ्यांना द्यावयाचे आहे. ते प्रमाणपत्र दिल्यानंतरच जिल्हाधिकारी त्यांना अनुज्ञेय असलेला उपकर वितरित करतात. ग्रामपंचायतीकडे पाणीपट्टीची थकबाकी असल्यास त्यांना देय असलेल्या अनुदानातून रक्कम वसूल करण्याबाबतचे परिपत्रिक आजही अस्तित्वात आहे. यावर समितीने विदित केले की, समिती सचिवांच्या मताशी सहमत आहे. परंतु ही पाणीपट्टी शेतकऱ्यांकडून जी वसुली करण्यात येते त्याबाबतची आहे. यावर सचिव, जलसंपदा यांनी खुलासा केला की, करारनामा केलेला नसला तरी पाणी वापरासाठी देयक दिले जाते. जर विहित कालावधीत पाणीपट्टीची रक्कम जमा केली नाही तर दंडनीय दराने पाणीपट्टीची आकारणी केली जाते. तद्नंतर समितीने विचारणा केली की, जलसंपदा विभागाच्या स्त्रोताबाहेर अतिरिक्त मागणी असल्यास ना-हरकत प्रमाणपत्र दिले जाते. यावर सचिव, जलसंपदा विभाग यांनी खुलासा केला की, सोर्स बघून कार्यवाही केली जात नाही. यासाठी सोर्स आरक्षित केला जातो. प्रत्यक्ष पाणी वापरासाठी देयक दिले जाते व त्यापोटी रक्कम भरणे अपेक्षित आहे.

तद्नंतर समितीने विदित केले की, सातारा जिल्ह्यातील किती प्रकरणांत अशा प्रकारची वसुली करण्यात आली आहे, जिल्हा परिषदने त्यांच्याकडे पाणीपट्टीची मागणी केली होती काय, समितीचे स्पष्ट मत आहे की, जिल्हा परिषदेने जी कार्यवाही केली आहे ती पूर्णत: चुकीची आहे. समितीला हे मान्य आहे की, नगर परिषदेचा पाण्याचा स्त्रोत असताना जलसंपदा विभागाच्या मालकीचे पाणी सोडण्याची गरज पडली तर नगर परिषदेकडे रक्कम जमा करावी लागेल. जर शासनाने रक्कम माफ करण्याचा निर्णय घेतला तर ती रक्कम सुद्धा भरण्याची गरज पडणार नाही. यावर सचिव, जलसंपदा विभाग यांनी खुलासा केला की, आता पाणीपट्टीची रक्कम महामंडळाकडे सुपूर्द करून त्यातूनच त्यांनी देखभाल व दुरुस्तीचा खर्च करावा, असा शासनाने निर्णय घेतला आहे.

यावर समितीने निदेश दिले की, थकबाकी असलेल्या ग्रामपंचायतींच्या बाबतीत विभाग धोरण राबवित आहे. परंतु ज्या ग्रामपंचायती नियमितपणे पाणीपट्टी भरत आहेत त्या ग्रामपंचायतींच्या बाबतीत विभाग काय निर्णय घेईल, तसेच या सर्व विषयाच्या बाबतीत स्पष्टता आली पाहिजे. या विषयी स्पष्ट मार्गदर्शक तत्वे तयार केली पाहिजेत. कुठेही संदिग्धता राहता कामा नये. जिल्हाधिकाऱ्यांकडून मुद्रांक शुल्काच्या माध्यमातून जी रक्कम मिळते त्यामध्ये सुस्पष्टता आणली पाहिजे. अशी प्रकरणे भविष्यात होणार नाहीत याची दखल विभागाने घ्यावी. तसेच सदरहू रक्कम विकास कामांसाठी वापरता येईल, या दृष्टीने कार्यवाही करावी व तशा प्रकारच्या सुधारणा कराव्यात.

## अभिप्राय व शिफारशी

सन २०१२-२०१३ मध्ये जिल्हा परिषदेने मुद्रांक शुल्क अनुदान रक्कम रुपये २५,८५,९२०/- ग्रामपंचायतींना वाटप केली याबाबत पुढील प्रमाणे आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. शासनाकडून सन २०११-२०१२ व सन २०१२-२०१३ करीता रक्कम रुपये ६,१०,००,०००/- एवढी प्राप्त रक्कम व त्रिशंकु क्षेत्रामध्ये झालेल्या स्थावर मालमत्तेच्या खरेदी विक्री पोटी देय मुद्रांक शुल्क जिल्हा निधीत जमा करण्यास मान्यता घेतली होती. मुद्रांक शुल्क अनुदानातुन विकास कामावर खर्च झाल्याची खात्री होत नाही. गटविकास अधिकारी यांचे अनुदान उपयोगिता प्रमाणपत्र तसेच ग्रामपंचायत नमुना नं.७ पावती आधारे योग्य खर्चाची खात्री होणे आवश्यक आहे. पाणीपट्टी थकबाकी रकमेबाबत दिनांक २० फेब्रुवारी, २००७ चे पत्र उपलब्ध नाही तसेच ग्रामपंचायतीकडून किती रक्कम प्राप्त झाली व अद्याप देणे किती आहे याचा ताळमेळ घेणे आवश्यक आहे. रुपये १६,१२,३५६/- ही रक्कम त्रिशंकु क्षेत्रामध्ये झालेल्या स्थावर मालमत्तेच्या खरेदी विक्री पोटी समायोजित केली असून त्याबाबतचा तपशिल उपलब्ध नाही.

उपरोक्त लेखा आक्षेपाच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने घेतलेल्या साक्षीदरम्यान असे निदर्शनास आले की, सातारा जिल्ह्यामध्ये दोन त्रिशंकू भाग आहेत. त्यापैकी एक भाग गोडवली हा सातारा शहराच्या बाजूला आहे. दुसरा भाग सोनगीरवाडी व सिद्धनाथवाडी वाई तालुक्यामध्ये आहे. या दोन गावांमध्ये होणाऱ्या मुद्रांकाच्या व्यवहाराचा निधी जिल्हाधिकाऱ्यांकडून जिल्हा परिषदेला प्राप्त होतो हा निधी त्या भागातील एका स्थानावर खर्च होतो. जिल्हा परिषदेला ग्रामपंचायतीकडून जे येणे आहे व ग्रामपंचायतीला मुद्रांक शुल्कातून जे देणे लागते तो ग्रामपंचायतीचा हिस्सा जिल्हा परिषदेने सन २०१२-२०१३ पर्यंत वसूल केलेला आहे. जिल्हा परिषदेला अशाप्रकारे मुद्रांक शुल्काची रक्कम कपात करण्याचा अधिकार आहे किंवा कसे याबाबत शासन निर्णयामध्ये स्पष्टता नसल्यामुळे सन २००६-२००७ पासून ग्रामपंचायतीकडून जिल्हा परिषदेने रक्कम वसुल केली होती. सदर वसुली त्रिशंकू भागातील पाणीपट्टीची नसून इतर ग्रामपंचायतीच्या पाणीपट्टीची आहे. जिल्हा परिषदेच्या पाटबंधारे विभागाने पाटबंधारे सेसच्या अनुदानाच्या रकमेतून येणे असलेली रक्कम कपात केलेली आहे. मुद्रांक शुल्काच्या उपकराच्या माध्यमातून मिळणाऱ्या पैशातून ग्रामपंचायत विविध कामांचे नियोजन करीत असते त्यामुळे सदरहू ग्रामपंचायतीच्या हक्काचे पैसे कपात करून ते वापरण्यात आले आहेत. अशाप्रकारे ग्रामपंचायतीचे पैसे कपात करण्यापूर्वी कायदेशीर बाबी न तपासता पैसे कपात करण्यात आले आहेत. प्रस्तुत प्रकरणी कायदेशीर बाबी तपासण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांची होती. शासनाच्या नियमावलीनुसार कार्यवाही करण्यात आली नाही. पाणीपट्टीची रक्कम मुद्रांक शुल्क अनुदानातून कपात करण्यात यावी असे संबंधित ग्रामपंचायतीने प्रस्तावित करणे आवश्यक होते. तथापि, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी पाणीपट्टी थकबाकीदार ग्रामपंचायतींना देय असणाऱ्या मुद्रांक शुल्क अनुदानातून चुकीच्या पद्धतीने कार्यवाही करून रक्कम कपात केली आहे. ग्रामपंचायतीची संमती घेऊन त्यांचेकडून नमुना ७ ची पावती घेऊन रक्कम वसुल केली असती तर सदरहू प्रकरणीची प्रक्रिया योग्य झाली असती ग्रामपंचायतीला पैसे वर्ग न करता कपात करण्यात आले आहेत. अशाप्रकारे रक्कम कपात करून घ्यावी अथवा करून नये याबाबतचा उल्लेख नियमांमध्ये नाही. सदरहू पाणीपट्टी प्रकरणी ग्रामपंचायतीने सहकार्य केले नसते तर ग्रामपंचायतीवर सक्तीची कारवाई करता येणे शक्य होते. मुद्रांक शुल्क अनुदानाची संपूर्ण रक्कम ग्रामपंचायतीला वर्ग करून पुन्हा ग्रामपंचायतीकडून पाणीपट्टीची रक्कम घेणे आवश्यक होते. तसेच ग्रामपंचायत ही स्थानिक स्वराज्य संस्था असून ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेला रक्कम कपात करून घेण्याकरीता संमती देण्याचा अधिकार आहे. तसेच जलसंपदा विभागाच्या दिनांक ३१ जुलै, २००६ रोजीच्या शासन निर्णयानुसार देय रक्कम जिल्हा परिषदेने द्यावी. जिल्हा परिषदेच्या

पातळीवर अशा प्रकारची कारवाई होत नसेल तर ग्रामविकास विभागाने ती कारवाई करावी. परंतू ती वसुली कोणत्या निधीमधून करण्यात यावी याबाबत आदेशामध्ये स्पष्टता नाही. त्यामुळे जिल्हा परिषदेकडून वसुलीबाबत चूक झाल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. जिल्हा परिषदेच्या तत्कालिन अधिकाऱ्यांनी चुकीची कार्यपद्धती अनुसरली आहे अशा प्रकारची कार्यपद्धती अनुसरत असताना शासनाची परवानगी घेणे आवश्यक होते. त्यामुळे समिती याप्रकरणी तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

यासंदर्भात समितीचे असे मत आहे की, **राज्यामध्ये थकबाकी असलेल्या ग्रामपंचायतीच्या बाबतीत ग्रामविकास विभाग धोरण राबवित आहे. तथापि, नियमितपणे पाणीपट्टी भरणा करणाऱ्या ग्रामपंचायतीच्या बाबतीत सुस्पष्ट ठोस निर्णय घेण्यात यावा तसेच जिल्हाधिकाऱ्यांकडून मुद्रांक शुल्काच्या माध्यमातून जी रक्कम मिळते त्यामध्ये स्पष्टता व सुसूत्रता आणण्यात यावी व भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होणार नाही व सदरहू रकमेचा विकास कामांसाठी विनियोग करता येईल याद्दष्टीने ग्रामविकास विभागाने सर्व संबंधितांना कडक स्वरुपाच्या सुचना देऊन त्याअनुषंगाने तात्काळ कार्यवाही करावी अशी समिती शिफारस करीत आहे व उपरोक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.**

# प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, सातारा

## सागवानी बेंच खरेदी व वाटपाबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.११८ (सन २०१२-१३)**

प्राथमिक शाळेतील इयत्ता ६ वी ते ७ वी च्या वर्गासाठी बेंच खरेदी पोटी रक्कम रुपये ३४,८४,६१८ /- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१) बेंच खरेदी प्रक्रिया करणेपूर्वी शाळानिहाय मागणी करून घेणेत आलेली नाही.

२) ज्या शाळांना बेंचेस वाटप केले त्याबाबत तालुकानिहाय गट शिक्षणाधिकारी यांचेमार्फत झालेबाबत विनियोग दाखले उपलब्ध केले नाहीत.

३) सदर बेंचेस तालुका स्तरावर वितरीत केलेबाबत गट शिक्षणाधिकारी यांची स्वाक्षरी घेणेत आलेल्या नाहीत.

४) सदर खरेदीबाबत प्रशासकीय मान्यता तांत्रिक मान्यता व पुरवठा आदेश एकाच दिवशी घेणेत आलेले आहेत.

५) सदर बेंचेसची तपासणी न करता संबंधीत शाळांना वाटप केल्याचे दिसून येते.

६) सदर साहित्य पुरवठा आदेशातील अटीनुसार वेळीच मिळाल्याबाबत गट शिक्षणाधिकारी यांचेकडील डिलीव्हरी चलनावर दिनांक नमूद नाही. त्यामुळे वेळीच पोहोचल्याची खात्री करता आली नाही.

७) पुरवठादार - मे. ॲम्बेसियस ब्लाईड इंडस्ट्रिज को-ऑपरेटिव्ह प्रोड्युस सोसायटी लिमिटेड असून सदरचा करारनामा महालक्ष्मी इंडस्ट्रीज कबनूर तालुका हातकणंगले यांच्या नावाने केल्याने करारनाम्यात विसंगती दिसून येते.

८) पुरवठादार मे. महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ, फोर्ट, मुंबई हे आहेत. करारनामा जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळात तर्फे श्री. सानप यांनी केलेले आहे. तथापि, रक्कम प्राप्त झाल्याची पोहोच दत्त विजय एंटरप्रायजेस गेट क्रं. ५ लक्ष्मी औद्योगिक वसाहत रोड, ॲटो असेंब्लीजवळ, कोल्हापूर प्रोप्रायटर, सौ. सुवर्णा उदय दंडगे यांनी दिलेली आहे. म्हणजेच योग्य पुरवठादारास रक्कम पोहोच झालेली नाही. विसंगती बाबत खुलासा करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सातारा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सदर खरेदी महाराष्ट्र शासन अंगीकृत उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई - ३२ यांचेमार्फत करण्यात आली आहे. सन २०१२-१३ जिल्हा परिषद सेस मधून तरतूद रक्कम रुपये ३६,८९,०००/- सागवानी बेंच खरेदी व वाटप तालूकास्तर करण्यासाठी एवढी आहे. त्यास स्थायी समिती ठराव क्रमांक १३६ दिनांक १६ जानेवारी, २०१६ अन्वये प्रशासकीय व मुख्य कार्यकारी अधिकारी यांची तांत्रिक मान्यता दिनांक ४ फेब्रुवारी २०१३ रोजी घेण्यात आलेली आहे. त्यानुसार बेंच खरेदी दोन वेळा केली असून रक्कम रुपये ३६,८४,६१८/- इतका खर्च झालेला आहे. सदर खरेदी महाराष्ट्र शासन अंगीकृत उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई - ३२ परिपत्रक क्रं./उस/भांखस/लाकडी फर्निचर/ दरनिश्चिती / (०१) /२०११-१२ बी १६८३२ दिनांक ३० ऑगस्ट, २०११ व उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई - ३२ परिपत्रक क्रं. /उस/भांखस / लाकडी फर्निचर / दरनिश्चिती / (०१) /२०१२-१३ बी १४४५३ दिनांक ८ ऑक्टोबर, २०१२ दरपत्रकानुसार (सर्व करासहित) करण्यात आलेली आहे.

१) पुरवठा आदेशामध्ये नमूद असलेनुसार बेंचेस पंचायत समिती स्तरावर उपलब्ध करून दिलेले आहेत. गटशिक्षणाधिकारी यांनी त्यांचे स्तरावर वाटप केले आहे त्यामुळे जिल्हा परिषद स्तरावर मागणी घेणेत आली नव्हती. पंचायत समिती स्तरावर शाळेची मागणी घेणेत आली आहे. सोबत जोडण्यात येत आहे.

२) ज्या शाळांना बेंचेस वाटप केले आहे त्याबाबत तालुकानिहाय गटशिक्षणाधिकारी यांचे विनियोग दाखले घेण्यात आलेले आहेत.

३) तालुकास्तरावर बेंचेस पोहोच झाल्याचे गटशिक्षणाधिकारी यांचेकडील मालसाठा नोंदवहीत घेतलेल्या असून त्यावर संबंधित गटशिक्षणाधिकारी यांच्या स्वाक्षरी आहेत.

४) सागवाणी बेंचेस शाळांना पुढील शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला वाटप करावयाचे असल्याचे तसेच हे साहित्य निरंतर टिकणारे असल्याने पूरवठा आदेश, प्रशासकीय मान्यता सक्षम अधिकाऱ्यांकडून एकाच दिवशी घेतलेल्या आहेत.

५) सदर बेंचेसची तपासणी केलेबाबत शासन मान्य सुप्रिटेडेन्स कंपनी ऑफ इंडिया (प्राव्हेट) लिमिटेड यांचे प्रथम टप्प्यातील बेंचेस तपासणी दिनांक ४ जुलै, २०१२ व दुसऱ्या टप्प्यातील बेंचेस तपासणी दिनांक ६ फेब्रुवारी २०१३ रोजी झालेचे तपासणी प्रमाणपत्र सोबत सादर करीत आहे.

६) सदर साहित्य पुरवठा आदेशातील अटीनुसार वेळीच मिळाल्याबाबत गटशिक्षणाधिकारी यांच्या डिलीव्हरी चलनावर स्वाक्षऱ्या घेतलेल्या आहेत. सोबत डिलीव्हरी चलनाच्या छायांकित प्रती सादर करीत आहोत.

७) मे. ॲम्बेसियस ब्लाईड इंडस्ट्रिज को-ऑपरेटिव्ह प्रोड्युस सोसायटी लिमिटेड, मुंबई या कंपनीला पुरवठा आदेश दिला आहे व त्यांनाच देयक अदा केले आहे. महालक्ष्मी इंडस्ट्रीज कबनूर तालुका हातकणंगले जि.कोल्हापूर यांचे मार्फत वाहतूक करणेसाठी प्राधिकृत केल्यामुळे वाहतुकीबाबतचा करारनामा त्यांचा केलेला आहे. सोबत पत्र जोडण्यात येत आहे.

८) पुरवठा आदेश मे. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, फोर्ट, मुंबई यांना दिलेले आहेत. त्यांचे नावे धनादेश देणेत आला आहे. सदरची रक्कम त्यांना मिळाल्याची पोहोच सोबत जोडली आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

सातारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ११ एप्रिल २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, मागणी नसताना सागवानी बेंच खरेदी केली आहे काय, तसेच पुरवठादार मे.अँबेसियस ब्लाईंड इंडस्ट्रीअल को-ऑपरेटीव्ह प्रोड्युस सोसायटी लिमिटेड, मुंबई यांचे बरोबर करारनामा केला आहे काय, त्यांच्याबरोबर करारनामा केला असल्यास महालक्ष्मी इंडस्ट्रीज कबनूर, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांच्याबरोबर वाहतुकीचा करारनामा करण्याची गरज काय होती.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सदरहू सागवानी बेंचेसची खरेदी दोन टप्प्यात झालेली आहे. पहिल्या टप्प्यातील खरेदीची प्रशासकीय मान्यता रुपये ६,८६,९०७/- इतक्या रकमेची होती. दुसऱ्या टप्प्यातील खरेदीची प्रशासकीय मान्यता रुपये २९,९७,७११/- इतक्या रकमेची होती. पहिल्या टप्प्यातील खरेदीची प्रशासकीय मान्यता दिनांक ०६ जून २०१२ रोजीची होती. त्यास तांत्रिक मान्यता दिनांक २६ जून २०१२ रोजीची आहे. या खरेदीबाबत उद्योग संचालनालय, प्रशासन भवन, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना यांच्यासोबत दिनांक २९ जून २०१२ रोजी दर करार करण्यात आला. महालक्ष्मी इंडस्ट्रीज कबनूर, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांचे एजंट मे.अँबेसियस ब्लाईंड इंडस्ट्रीअल को.ऑपरेटीव्ह प्रोड्युस सोसायटी यांच्या बरोबर करारनामा करण्यात आलेला आहे. या बाबतचे त्यांचे पत्र सुद्धा आले. पहिल्या टप्प्यात या अंतर्गत प्रती नग रुपये २७८१/- या दरानुसार २४७ नगांचा पुरवठा झाला आहे. दुसऱ्या टप्प्यातील रुपये २९ लाख ९७ हजार रुपयांच्या खरेदीसंदर्भात दिनांक ०४ फेब्रुवारी, २०१३ रोजी प्रशासकीय मान्यता दिली होती. सदरहू खरेदीच्या बाबतीत दिनांक ११ फेब्रुवारी, २०१३ रोजी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, फोर्ट मुंबई यांच्या बरोबर करारनामा करण्यात आला. या खरेदी संदर्भात पुरवठा आदेश दिनांक ०४ फेब्रुवारी २०१३ रोजी देण्यात आला आणि त्यानंतर करारनामा करण्यात आला. त्यावेळी जिल्हा परिषदेमध्ये अगोदर पुरवठा आदेश आणि त्यानंतर करारनामा करणे ही प्रचलित बाब जवळजवळ बऱ्याच खरेदी प्रक्रियेत असल्याचे दिसून येत आहे. समितीने सुचविल्यानुसार अगोदर पुरवठा आदेश व त्यानंतर करारनामा करण्यात आल्याप्रकरणी चौकशी करण्यात येईल. सदरहू खरेदी प्रक्रियेमध्ये काही चुकीचे घडले असेल तर त्या बाबतचा अहवाल समितीला सादर करण्यात येईल.

यावर समितीने विचारणा केली की, ३० लाख रुपयांच्या खरेदीचे अधिकार विषय समितीला होते. सदरहू खरेदीच्या तांत्रिक मान्यतेसह प्रशासकीय मान्यतेचा ठराव विषय समितीपुढे का ठेवला नाही, एकाच दिवशी प्रशासकीय मान्यता आणि तांत्रिक मान्यता घेण्यात आलेली आहे. हा निधी सेस फंडचा आहे. २३ ते ३० लाख रुपयांपर्यंतच्या खरेदीचे अधिकार हे विषय समितीला असल्यामुळे सदरहू खरेदी प्रक्रियेस मान्यता देण्यासाठी विषय समितीची सभा कधी झाली, तसेच सदरहू खरेदीस एकाच दिवशी प्रशासकीय मान्यता आणि तांत्रिक मान्यता कशी देण्यात आली,

तद्‌नंतर समितीने विचारणा केली की, त्यावेळी शिक्षणाधिकारी कोण होते, यावर तत्कालिन शिक्षणाधिकारी यांनी खुलासा केला की, त्यावेळी मी शिक्षणाधिकारी या पदावर होतो. सद्या मी शिक्षणाधिकारी, माध्यमिक या पदावर जिल्हा परिषद वाशिम येथे

कार्यरत आहे. पहिल्या टप्प्यामध्ये खरेदी झाली त्यावेळी माझ्याकडे शिक्षणाधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार होता. पहिल्या टप्यात ६ लाख ८६ हजार रूपयांची खरेदी झाली होती व २४७ बेंचेस खरेदी करण्यात आले होते. त्याला शिक्षण समितीची मान्यता घेण्यात आली होती. दुसऱ्या खरेदीच्या वेळी श्री. भास्कर पोटघन हे शिक्षणाधिकारी होते. यावर समितीने श्री.पोटघन यांना विचारणा केली असता श्री.पोटघन यांनी मी सेवा निवृत्त उप शिक्षणाधिकारी आहे. त्यावेळी मी शिक्षणाधिकारी पदावर नव्हतो अशी माहिती समितीला दिली.

तद्नंतर समितीने पुढे विचारणा केली की, लेखा परिक्षकांनी मुद्दा क्रमांक ४ मध्ये असे लिहिलेले आहे की, सदर खरेदीबाबत प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता व पुरवठा आदेश एकाच दिवशी घेण्यात आला. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, दिनांक १६ जानेवारी, २०१३ रोजी स्थायी समितीचा ठराव झाल्याचे दिसत आहे. त्यानंतर प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता आणि पुरवठा आदेश हे एकाच तारखेला दिलेले आहेत, ही वस्तुस्थिती आहे. यावर समितीने विचारणा करून मत व्यक्त केले की, ही बाब चुकीची झालेली आहे. एकाच दिवशी तिनही आदेश देण्याचे कारण काय आहे, २९ लाख रूपयाच्या खरेदीला मान्यता घेण्याची बाब स्थायी समिती समोर जाणार नाही. या विषयाला विषय समितीने बगल दिलेली आहे किंवा जाणूनबुजून एखादे कारण दाखवून मंजुरी नाकारली तरच स्थायी समिती विषय समितीच्या अधिकाराचा वापर करेल. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, यामध्ये असे दिसते की, पहिल्या टप्प्यातील खरेदीचे ७ लाख रूपये व दुसऱ्या खरेदीचे २९ लाख रूपये मिळून ३६ लाख ८९ हजार रूपये स्थायी समितीच्या ठरावामध्ये नमूद केल्याचे दिसत आहे. दिनांक १६ जानेवारी, २०१३ रोजी स्थायी समितीने ठराव दिला होता.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, त्या तारखेचा स्थायी समितीचा ठराव योजनेच्या मान्यतेचा असेल. तो प्रशासकीय मान्यतेचा ठराव नसेल. प्रशासकीय मान्यता दिनांक १६ जानेवारी, २०१३ रोजी मिळाली असेल तर तांत्रिक मान्यता आणि पुरवठा आदेश किती तारखेला झालेला आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, यामध्ये असे आहे की, ही सभा प्रशासकीय मंजुरीस मान्यता देते आणि असाच ठराव दिनांक १६ जानेवारी, २०१३ रोजीचा आहे. यावर समितीने विचारणा केली की, असे असेल तर तांत्रिक मंजुरी केव्हा मिळालेली आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, तांत्रिक मंजुरी दिनांक ४ फेब्रुवारी, २०१३ रोजी मिळालेली आहे. यावर समितीने मत व्यक्त केले की, असे होऊ शकत नाही. विना तांत्रिक मंजुरी प्रशासकीय मान्यता होऊ शकत नाही. ही योजना शक्य आहे की, अशक्य आहे, हे ठरविण्याचे अधिकार तांत्रिक मंजुरी देणाऱ्या अधिकाऱ्यास सक्षम अधिकार आहे. त्यावेळी शिक्षणाधिकारी कोण होते व तांत्रिक मान्यता कोणी दिली, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक ४ फेब्रुवारी, २०१३ रोजी तांत्रिक मान्यतेचा आदेश दिलेला आहे. यावर समितीने विचारणा केली की, तांत्रिक मान्यता अगोदर घेतात की, प्रशासकीय मान्यता अगोदर घेतात, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, बांधकामाच्याबाबत अगोदर प्रशासकीय मान्यता ढोबळ होते. त्यानंतर तांत्रिक मान्यता दिली जाते. परंतु खरेदी करीत असताना अगोदर तांत्रिक मान्यता घ्यावी व त्यानंतर प्रशासकीय मान्यता घ्यावी लागते, अशी वस्तुस्थिती आहे. परंतु या कागदपत्रांवरून असे दिसून येते की, स्थायी समितीचा ठराव आणि तांत्रिक मान्यतेचे आदेश हे वेगवेगळ्या तारखेला आहेत.

यावर समितीने विचारणा केली की, यामध्ये अनियमितता झाली आहे की, नाही हे सांगावे. स्थायी समितीला डावलून हे करण्यात आल्याचे सिद्ध होत आहे. तसेच पुरवठा कसा झाला आणि तांत्रिक मान्यता देताना स्पेसिफिकेशन कोणते ठरविले होते, हे स्पष्ट करण्यात यावे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, सागवानी डेस्कबेंचेस खरेदी करणे, त्याची साईज किती असावी व इतर बाबी स्थायी समितीच्या ठरावामध्ये नमूद आहेत. तसेच दराला देखील स्थायी समितीने मंजुरी दिलेली आहे. दर आणि स्पेसिफिकेशन या दोन्हीही बाजू स्थायी समितीसमोर ठेवण्यात आल्या होत्या. आरसीनुसार खरेदी करण्यात आली आहे.

यावर समितीने मत व्यक्त केले की, दर करारनामा आरसीएलच्या..साठी दिलेला आहे. परंतु त्याची स्पेसिफिकेशन, त्याची किंमत आणि प्रशासकीय मान्यता या तिनही बाबी स्थायी समितीच्या दिनांक १६ जानेवारी, २०१३ रोजीच्या ठरावामध्ये नमूद केलेल्या आहेत. त्यानंतर ऑर्डर दिलेली आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, स्थायी समितीपुढे हा विषय गेला तेव्हा त्याचे स्पेसिफिकेशन, त्याचे दर आणि नग या सर्व बाबी मांडण्यात आलेल्या होत्या. या तिनही बाबींचा स्थायी समितीच्या ठरावामध्ये उल्लेख आहे. दर किती राहाणार आहे, त्याचे स्पेसिफिकेशन काय राहाणार आहे आणि प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

यावर समितीने विचारणा केली की, सदरहू नस्ती दाखविण्यात यावी व त्यावेळी शिक्षणाधिकारी कोण होते, यावर तत्कालिन शिक्षणाधिकारी (श्री.नरळे) यांनी खुलासा केला की, मी त्यावेळी शिक्षणाधिकारी या पदावर कार्यरत होतो. यावर समितीने विचारणा केली की, याकरिता अगोदर तांत्रिक मान्यता घेतली किंवा कसे, अगोदर तांत्रिक मान्यता घ्यावी लागते की, प्रशासकीय मान्यता घ्यावी लागते, यावर तत्कालिन शिक्षणाधिकारी (श्री.नरळे) यांनी खुलासा केला की, तांत्रिक मान्यता प्रोसीजर प्रमाणे नंतर घेतली होती. अगोदर प्रशासकीय मान्यता घेतली आणि नंतर तांत्रिक मान्यता घेतली.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, शाळेत डेस्क नाहीत, हे तुम्हाला अगोदर माहिती नव्हते काय, हा साक्षात्कार एकाच दिवशी कसा झाला, शाळेने मागणी केली नव्हती. तरी देखील डेस्कची खरेदी करण्यात आलेली आहे.

यावर तत्कालिन शिक्षणाधिकारी (श्री.नरळे) यांनी खुलासा केला की, तालुकास्तरावरून गट शिक्षणाधिकाऱ्यांकडून मागणी केली जाते. युडायस मध्ये जी माहिती भरली जाते तिच्या आधारे आपल्या जिल्हातील कोणत्या शाळांमध्ये बेंचेस व इतर फर्निचर कमी आहे, ते पाहिले जाते. या आधारावर मागणी देण्यात आली होती.

यावर समितीने निदेश दिले की, तत्कालिन शिक्षणाधिकारी यांनी युडायसचा उल्लेख केला. युडायस केला असता तर मागणी आली नसती. आपण जबाबदारीने उत्तर दिले पाहिजे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या बाबत अधिकाऱ्यांचे ब्रिफिंग घेतल्याचे दिसत नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, मी यासंदर्भातील कागदपत्रे पाहिले. ब्रिफिंग करीत असताना हेच मुद्दे मला देखील आढळून आले होते. ही कागदपत्रे त्यावेळी का दिली गेली नाहीत, असा प्रश्न माझ्या पुढेही निर्माण झाला होता. त्यामुळे आम्ही या सर्वांवर जबाबदारी निश्चित करण्याचा निर्णय घेतलेला आहे. यावर समितीने विचारणा केली की, ही बाब आपल्या लक्षात केव्हा आली आणि यासंदर्भातील खुलासा केव्हा घेण्यात आला, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, मी यासंदर्भात १५ दिवसांपूर्वी ब्रिफिंग घेतले होते. तेव्हा ही बाब लक्षात आल्यावर संबंधितांकडून खुलासा मागविण्यात आला होता, परंतु खुलासा समाधानकारक नसल्यामुळे संबंधिताची विभागीय चौकशी करण्यासाठी दोषारोप तयार करून आयुक्त, शिक्षण यांच्याकडे पाठविलेला आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, डेस्कबेंचचा पुरवठा कोणी केला, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, पहिल्या खरेदीसाठी ॲम्बेसियस ब्लाईंड इंडस्ट्रिज को. ऑ. प्रोड्युस सोसायटी लिमिटेड हे पुरवठादार होते आणि दुसऱ्या वेळी महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ, फोर्ट, मुंबई हे पुरवठादार होते. यावर समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषदेने दिलेल्या माहितीमध्ये श्रीमती सुवर्णा दंडगे यांच्या नावाचा उल्लेख करण्यात आलेला आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, जिल्हा परिषदेने त्यावेळी महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ, फोर्ट, मुंबई यांच्या सोबत करारनामा केला होता. या मंडळाअंतर्गत विविध संस्था आहेत व त्यांच्यामार्फत श्रीमती सुवर्णा दंडगे, कोल्हापूर यांच्या संस्थेने सदरहू पुरवठा केलेला आहे. परंतु धनादेश महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ, फोर्ट, मुंबई यांच्या नावाने देण्यात आलेला आहे. महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ हे उत्पादक आहेत.

यावर समितीने विचारणा केली की, दुसऱ्या वेळेस महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ, फोर्ट, मुंबई यांच्या नावाने ऑर्डर काढण्यात आली आणि दुसरी ऑर्डर ॲम्बेसियस ब्लाईंड इंडस्ट्रिज को.-ऑप. प्रोड्युस सोसायटी लि. यांच्या नावाने काढण्याचे काय कारण होते, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, ॲम्बेसियस ब्लाईंड इंडस्ट्रिज को.-ऑप. प्रोड्युस सोसायटी लि. हे देखील अधिकृत विक्रेते आहेत. यावर समितीने मत व्यक्त केले की, दर करारनामा महाराष्ट्र शासनाकडून केला जात असतो. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, शासनाने महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ, फोर्ट, मुंबई यांच्या नावाने दर करार केला. त्यामध्ये त्यांचे एजंट कोण आहेत, त्यांचीही नावे दिलेली आहेत.

समितीने पुढे विचारणा केली की, एकाच वस्तुंचा पुरवठा दोन पुरवठाधारकाकडून करण्याचे काय कारण आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, ही खरेदी दोन वेगवेगळ्या टप्प्यामध्ये झालेली आहे. त्यामुळे असे दिसत आहे. समितीने पुढे आणखी विचारणा केली की, दुसऱ्या वेळेसचा पुरवठा करण्याचे आदेश पहिल्या संस्थेला का दिले नाही, त्याच्या आरसीची मुदत संपली नव्हती. दुसऱ्या पुरवठादाराला काम देण्याचे अधिकार कोणाला आहे, यासंदर्भात माहिती देण्यात यावी.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, पहिल्या वेळेस केवळ २४७ नगाचा पुरवठा होता. दुसऱ्या वेळेस १ हजार ४७ नगाचा पुरवठा झाला. महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ, फोर्ट, मुंबई या मंडळांतर्गत अनेक एजंट काम करतात व ही मोठी खरेदी असल्यामुळे त्यांच्याकडून पुरवठा लवकर होईल या हेतुने त्यांच्यासोबत दुसरा करारनामा केलेला दिसतो.

यावर समितीने मत व्यक्त केले की, पहिल्या टप्प्यातील खरेदी ॲम्बेसियस ब्लाईंड इंडस्ट्रिज को- ऑप. प्रोड्युस सोसायटी लि. या कंपनीकडून करण्याचा निर्णय ज्यांनी घेतला त्यांनीच महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ, फोर्ट, मुंबई यांच्याकडून खरेदी

करण्याचा निर्णय घेणे आवश्यक होते. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, दुसऱ्या टप्प्यातील खरेदी मोठी होती. महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ, फोर्ट, मुंबई यांच्याकडे अनेक एजंट काम करतात. त्यामुळे पुरवठा लवकरात लवकर आला पाहिजे, या उद्देशाने त्यांना पुरवठा आदेश दिले असावे, असे यावरून दिसून येते.

तद्नंतर समितीने विदित केले की, पुरवठादाराचे नाव वेगळे आहे, सप्लायर वेगळा आहे आणि काम तिसऱ्यालाच दिलेले आहे. महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ, फोर्ट, मुंबई यांना पुरवठा दिलेला आहे. पान क्रमांक १२ मधील 'विषय' या कॉलम मधील ८ क्रमांकाची बाब वाचून दाखवितो. पुरवठादार मे. महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ, फोर्ट, मुंबई हे आहेत. करारनामा जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळातर्फे श्री. सानप यांनी केलेले आहे. तथापि, रक्कम प्राप्त झाल्याची पोहोच दत्त विजय एंटरप्रायजेस, गेट क्रमांक ५, लक्ष्मी औद्योगिक वसाहत रोड,ॲटो असेंब्लीजवळ, कोल्हापूर च्या प्रो. सौ. सुवर्णा उदय दंडगे यांनी दिलेली आहे. म्हणजेच योग्य पुरवठादारास रक्कम पोहोच झालेली नाही.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, पुरवठादार वेगळा आहे, करारनामा वेगळ्या व्यक्तीसोबत झालेला आहे आणि रक्कम मिळणारी व्यक्ती वेगळी आहे, असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे. प्रश्नामध्येच असे दिलेले आहे की, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, महाराष्ट्र राज्य तर्फे श्री. सानप असे आहे. श्री. सानप हे त्यांनी नियुक्त केलेले अधिकारी आहेत. रकमेचा धनादेश महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ, फोर्ट, मुंबई यांच्या नावाने काढलेला आहे. जिल्हा परिषदेकडे याची पावती देखील आहे. वेगवेगळा पुरवठादार असल्यामुळे साहित्य घेऊन जाणाऱ्या व्यक्तीचे नाव यामध्ये आल्याचे दिसत आहे.

यावर समितीने विचारणा केली की, लेखा आक्षेप आला तेव्हा तुम्ही ही बाब क्लिअर करणे आवश्यक होते. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, ही बाब नंतर घडलेली नाही. अगोदर घडलेली बाब आक्षेपामध्ये नमूद केलेली आहे. यावर समितीने आणखी विचारणा केली की, लेखा आक्षेप पूर्वी आलेला आहे. यामध्ये आपल्याला एका वर्षाचा कालावधी मिळाला होता. त्या कालावधीत ही बाब क्लिअर का केली नाही, ही बाब क्लिअर केली असती तर हा मुद्दा येथे उपस्थित झाला नसता. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, जिल्हा परिषदेने ज्या वेळी अनुपालन पाठविले होते, त्या वेळी ते मान्य झाले नाही, म्हणून ही बाब आज उपस्थित झालेली आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, यासंदर्भातील पुरवठा कोणी केलेला आहे, हे स्पष्ट करावे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, दत्त विजय एंटरप्रायजेस, गेट क्रमांक ५, लक्ष्मी औद्योगिक वसाहत रोड, ॲटो असेंब्लीजवळ, कोल्हापूर यांनी पुरवठा केलेला आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, शासनाने एजन्सी ठेवलेली आहे. जिल्हा परिषदेने एजन्सीला पैसे दिले. त्यांनी माल सप्लाय केला असेल. परंतु समितीला यामध्ये थोडी शंका वाटते. खरेदी करण्यात आलेले सर्व डेस्क आले आहे काय, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबत स्वत: लक्ष देऊन चौकशी करावी व सदरहू डेस्क जागेवर आले आहे किंवा कसे ते पाहावे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, तशी काही बाब नाही. जिल्हा परिषदेला सर्व बेंचेसचा पुरवठा झालेला आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, दिनांक, ४ फेब्रुवारी, २०१३ रोजी ऑर्डर दिली आणि १५ तारखेला डेस्क उपलब्ध झाले. हे सर्व लाकडी डेस्क आहेत. हजारच्या वर डेस्क तयार करणे सोपे काम नाही. फळी कापणे, रांधणे व इतर प्रक्रिया करून कलर द्यायचा असेल तर कलर देणे, इत्यादी कामे करावी लागतात. या कामाला वेळ लागतो. ही सर्व प्रक्रिया १० दिवसांमध्ये कशी पूर्ण झाली, तसेच दोन पुरवठादारांना सागवानी बेंचेस पुरवठा करण्यासाठी आदेश का देण्यात आले.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, दर निश्चितीनुसार पहिला दर करार दिनांक ३० ऑगस्ट, २०११ रोजी करण्यात आला होता व तो दिनांक ३० जून, २०१२ रोजी पर्यंत होता. यावर समितीने विचारणा केली की, सदरहू बेंच खरेदीसाठी स्थायी समितीने मंजुरी दिली होती का, संगणक खरेदीचे दर कोणी ठरविले होते, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, पहिला दर करार दिनांक ३० ऑगस्ट, २०११ रोजी करण्यात आला होता व मे. ॲम्बेसियस ब्लाईंड इंडस्ट्रिज को-ऑप. प्रोड्यूस सोसायटी लिमिटेड ला पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले होते.

यावर समितीने विचारणा केली की, १० पुरवठादार असतील तर त्यांच्यापैकी कोणाला पुरवठा आदेश देण्यासाठी निवडण्यात आले, सदरहू निवड कोणी केली, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, १० पुरवठादारामधून दोन पुरवठादारांची निवड करण्यात आली होती. तद्नंतर समितीने मत व्यक्त केले की, १० दिवसांमध्ये बेंच तयार करून पुरवठा करण्यात आला आहे. सदरहू बाब शंकास्पद असून गंभीर आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सदरहू प्रकरणी पुरवठा आदेश दिनांक ४ फेब्रुवारी, २०१३ रोजी देण्यात आला होता.

यावर समितीने मत व्यक्त केले की, पुरवठा आदेश दिनांक ४ फेब्रुवारी, २०१३ रोजी देण्यात आला होता व पुरवठा दिनांक १५ फेब्रुवारी, २०१३ रोजी करण्यात आला. सदरहू आदेश प्राप्त होताच केवळ १० दिवसांच्या आत वस्तुचा पुरवठा करण्यात आला आहे.

तद्नंतर समितीने निदेश दिले की, बेंच खरेदी प्रकरणी झालेल्या चर्चेवरून प्रथमदर्शनी अनियमितता झाल्याचे आढळून येत असून सदरहू बाब गंभीर आहे. मागणी नसताना बेंच खरेदी करण्यात आली, असा लेखा परिक्षकांचा आक्षेप आहे. दोन पुरवठादारांकडून बेंच खरेदी करण्यात आले असल्याने अनियमितता झाली आहे. कोणाला पुरवठा आदेश दिले पाहिजे, हे जिल्हा परिषदेचे अधिकारी स्पष्ट करू शकले नाही. सदरहू प्रकरणी चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी व १ महिन्याच्या आत समितीला अहवाल सादर करावा. सदरहू प्रकरणी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या संचालकांची साक्ष लावण्यात येत आहे. तसेच, सदरहू प्रकरणातील अभिलेखे लेखापरीक्षणाच्या वेळी दाखविण्यात आलेले नाही. त्यामुळे संबंधितांवर नियम ७ नुसार २५ हजार रुपये दंड व एक वेतनवाढ रोखून जबाबदारी निश्चित करून कारवाई करावी. सदरहू कारवाईचा अहवाल शासनाला व समितीला १ महिन्याच्या आत सादर करण्यात यावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

१) मागणी नसताना बेंच खरेदी करण्यात आल्याने अनियमितता झाल्या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

२) असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांविरुद्ध जबाबदारी निश्चित करून कोणती कारवाई करण्यात आली आहे,

३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सन २०१२-१३ जिल्हा परिषद सेस मधून रक्कम रुपये ३६,८९,०००/- सागवानी बेंच खरेदी करण्यासाठी तरतुद करण्यात आली होती. सदर खरेदी महाराष्ट्र शासन अंगीकृत, उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई-३२ यांचेमार्फत दर करारान्वये करण्यात आली होती.

१) जिल्हा परिषद सेस अंतर्गत सागवानी बेंच खरेदीमध्ये अनियमितता झाल्या प्रकरणी प्रारंभिक चौकशी करण्यात आली आहे. त्या चौकशीच्या आधारे खालील आरोप ठेवण्यात आले आहेत.

a. प्रस्तुत खरेदीपूर्व प्रत्यक्ष शाळांची मागणी नोंदविण्यात आली नाही अथवा त्यांचा रितसर तपशील संकलित करण्यात आला नाही.

b. प्रस्तुत सागवानी बेंच खरेदी प्रकरणी प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता व पुरवठा आदेश ही सर्व प्रक्रिया एकाच तारखेस झाल्याचे दिसून येते.

c. सदर खरेदी संदर्भातील पुरवठा आदेश देण्यापूर्वी संबंधितांशी करारनामा करणे आवश्यक असताना तो त्यानंतर करण्यात आला आहे.

d. मे. ॲम्बेसियस ब्लाईंड इंडस्ट्रिज को-ऑपरेटीव्ह प्रोड्युस सोसा. लि. यांना पुरवठा आदेश दिलेला असता त्यांचेशी करारनामा न करता तो महालक्ष्मी इंडस्ट्रीज, कबनूर, ता. हातकंणगले जि. कोल्हापूर यांचेशी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी का केला यासंदर्भात कोणताही बोध होत नाही.

e. सागवानी बेंच तांत्रिक तपासणी ज्या कंपनीकडून करून घेतली आहे ती कंपनी शासन मान्य आहे त्याचा तपशील नस्तीत आढळून आला नाही. त्यामुळे सदर तपासणी अहवालाबाबत संदिग्धता दिसते. तसेच सदरचा तपासणी अहवाल नस्तीत प्रथम दर्शनी नंतर जोडल्याचे दिसून येते.

f. सदर खरेदी प्रक्रियेमध्ये नियमानुसार प्रथम ९० टक्के रक्कम व तद्नंतर १० टक्के रक्कम अदा करावयाची असताना एकाचवेळी १०० टक्के म्हणजे संपूर्ण रक्कम अदा केली आहे.

२) सागवाणी बेंच खरेदी प्रकरणी चौकशी अधिकारी यांचेकडील दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८ रोजीचे प्राप्त अहवालानुसार खालील तत्कालिन अधिकारी /कर्मचारी यांचेवर दोषारोप ठेवून सदरचा प्रस्ताव विभागीय चौकशीसाठी सादर करणेत आला आहे.

१) श्री. भास्कर मारुती पोटघन, सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

२) श्री. तानाजी आत्माराम नरळे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.वाशिम

३) श्री. राकेश झिंटुजी कुसनाके, कनिष्ठ लेखा अधिकारी, जि.प.वर्धा

४) श्री. बजरंग छत्तरसिंग चौधरी, सेवा निवृत्त वरिष्ठ सहाय्यक (लेखा)

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय** :- शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सातारा यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सातारा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सागवानी बेंच खरेदी व वाटप प्रकरणी चौकशी अधिकारी यांचेकडील दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८ रोजीचे प्राप्त अहवालानुसार खालील तत्कालीन अधिकारी / कर्मचारी यांचेवर दोषारोप ठेवून सदरचा प्रस्ताव विभागीय चौकशीसाठी सादर करणेत आला आहे, असे जिल्हा परिषद, सातारा यांनी प्रश्नावलीच्या उत्तरामध्ये नमूद केले आहे.

यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, सदरहू विषय गंभीर आहे. तत्कालिन अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करण्यासाठी विभागीय आयुक्त यांचेकडे प्रस्ताव सादर केला आहे. सद्य:स्थितीत माहिती प्राप्त झाली आहे की, उक्त प्रकरणी आयुक्त कार्यालयाने काही त्रुटी काढून नस्ती परत केली आहे. सदरहू विषय शिक्षण विभागाशी संबंधित असून उक्त प्रकरणी वस्तुस्थिती आहे की, दर करारानुसार कार्यारंभ आदेश देण्यात आला असून एकाच दिवशी सर्व प्रक्रिया तातडीने पार पाडण्यात आली आहे. सदरहू कामासाठी १०० टक्के निधी सुरुवातीस अदा करण्यात आला आहे. बेंच खरेदी करण्यासाठी कोणी मागणी केली, किती बेंचेसची आवश्यकता आहे याचे मुल्यांकन करण्यात आले आहे का, असे मुद्दे आहेत. दस्तऐवजामध्ये बेंचची मागणी केल्याचे आढळून येत नाही. बेंच खरेदी प्रक्रिया गतीने करण्यात आली असून सर्व माल प्राप्त झाला असून त्याची पावती उपलब्ध आहे. उक्त मालाच्या दर्जाबाबत काही प्रश्न नाही. परंतु विनानिविदा दर कराराने कंत्राट देण्यात आले आहे.

यावर समितीने विचारणा केली की, सदरहू प्रकरणी पुरवठा आदेश जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिला असेल. हा विषय शिक्षण विभागाचा आहे. दरकरार नसताना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुरवठा आदेश दिला आहे काय, यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, दर करार सादर करण्यात आला होता. मुख्य आक्षेप आहे की, एकाच दिवशी सर्व कार्यवाही करण्यात आली आहे. यावर समितीने माहिती दिली की, उक्त प्रकरणी तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी अडचणीत येतील. कारण शिक्षण विभागास प्रशासकीय मान्यता व पुरवठा आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी देत असतात.

यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, सदरहू प्रकरणी प्राथमिक चौकशी करून ४ अधिकारी व कर्मचारी यांचेवर दोषारोप ठेवण्यात आले आहेत. यावर समितीने विचारणा केली की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेल्या पुरवठा आदेशाची चौकशी मुख्य लेखा व वित्त अधिकारी कसे काय करु शकतात, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सदरहू खरेदी प्रक्रिया शिक्षण विभागाने केली आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, उक्त प्रकरणीच्या प्रशासकीय मान्यता व पुरवठा आदेशावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांची स्वाक्षरी असल्याने उक्त प्रकरणाची चौकशी मुख्य लेखा व वित्त अधिकारी कसे करु शकतात, उक्त खरेदी प्रकरणी शिक्षण विभागाकडून मुख्य कार्यकारी अधिकारी यांना नस्ती सादर करण्यात आली. शिक्षण विभाग मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अधिपत्याखाली आहे. पुरवठा आदेशावर शिक्षण अधिकारी स्वाक्षरी करीत नाही, ते शिफारस करतात. पुरवठा आदेशावर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची स्वाक्षरी आहे. प्रशासकीय मान्यता मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उक्त प्रकरणीचा अहवाल विभागीय चौकशीसाठी प्रस्तावित केला आहे. सदरहू प्रकरण खूप जुने असून अद्यापही विभागीय चौकशी प्रस्तावित आहे. अद्यापपर्यंत विभागीय चौकशी केली किंवा नाही, याबाबत शंका आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध चौकशीचे आरोपपत्र तयार करून पाठविले आहेत. आरोपपत्र प्रत्यक्षात बजावलेले नसल्यामुळे प्रस्तावित शब्द वापरलेला आहे. ते जिल्हापरिषदेचे वर्ग-१ चे अधिकारी आहेत.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, प्रशासकीय मान्यता, कार्यारंभ आदेश आणि पुरवठा हे सर्व एकाच दिवशी झालेले आहे. तेव्हा या संदर्भात तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांची चौकशी करून समितीला एक महिन्यात अहवाल सादर करावा. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, या प्रकरणामध्ये शिक्षणाधिकारी यांची चौकशी आहे.

यावर समितीने निदेश दिले की, आपण एकाच अधिकाऱ्याची चौकशी कशी करता, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांची देखील चौकशी झाली पाहिजे. एकाच दिवशी सर्व प्रक्रिया झालेल्या आहेत. खरेदीमध्ये गैरप्रकार झालेला आहे. या प्रकरणी जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई होणे अपेक्षित होते. एकूण ३६ लाख ८९ हजार रुपये किमतींच्या बाकांची खरेदी होती. या खरेदीस सर्वसाधारण सभेस मान्यता दिली असेल. या प्रकरणी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जबाबदार धरले पाहिजे.

यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, प्रस्तुत खरेदीपूर्व प्रत्यक्ष शाळांची मागणी नोंदविण्यात आली नव्हती. कोणत्या शाळांची किती आवश्यकता आहे, किती मुले आहेत याचा ऊहापोह दिसत नाही, या सर्व गोष्टी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पाहणे आवश्यक होते, परंतु सर्वसाधारणपणे विभाग प्रमुख कारवाई करतात. दुसरा मुद्दा म्हणजे सर्व व्यवहार एकाच दिवशी झालेला आहे. तिसरा मुद्दा खरेदी संदर्भातील पुरवठा आदेश देण्यापूर्वी संबंधितांशी करारनामा करणे आवश्यक असताना तो नंतर करण्यात आला. खाते प्रमुखांनी करारनामा करणे अपेक्षित होते. कोणकोणत्या चुका झाल्या त्या सांगत आहेत.

यावर समितीने विचारणा केली की, या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चूक केलेली आहे. त्यांच्याकडे फक्त पुरवठा आदेशाचे पत्र गेले नाही तर त्या संदर्भातील पूर्ण नस्ती गेली असेल. या प्रकरणी तर सर्व व्यवहार एकाच दिवशी झालेला आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुरवठा आदेशावर डोळे झाकून सही केली का, यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, एकाच दिवशी व्यवहार झाला. खरेदी संदर्भातील पुरवठा आदेश देण्यापूर्वी करारनामा केला नाही. ज्याच्या नावे करारनामा केला त्या व्यक्तीचे नाव करारनाम्यामध्ये, दरकारारामध्ये नाही. बाकांची तपासणी केल्याशिवाय पूर्ण रक्कम अदा करण्यात आली. यावर समितीने मत व्यक्त केले की, जो कोणी पुरवठा आदेशावर सही करतो त्यांच्यावर या सर्व बाबी तपासण्याची जबाबदारी असते. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी विदित केले की, हे सर्व खाते प्रमुखांनी केले.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, करारनामा न होता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुरवठा आदेशावर सही कशी केली, त्यांनी प्रथम करारनामा पाहणे आवश्यक होते. दिनांक १६ जानेवारी रोजी स्थायी समितीचा ठराव झाल्याचे दिसत आहे. त्यानंतर प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता आणि पुरवठा आदेश एकाच तारखेला दिलेले आहेत ही वस्तुस्थिती आहे, हे त्यांनी मान्य केलेले आहे. म्हणजे हे सर्व तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी भ्रष्टाचार केला हे सिद्ध होते. या प्रकरणी चौकशी करून समितीला एक महिन्यात अहवाल देणार काय तसेच दिनांक ४ फेब्रुवारी रोजी आदेश दिले आणि दिनांक १३ फेब्रुवारी रोजी पुरवठा झाला म्हणजे या सर्व गोष्टी पुर्वनियोजित आहेत. बाके तयार करण्यासाठी वेळ लागतो, परंतु काही ठिकाणी दहा दिवसांत बाके पुरविण्यात आली आहेत, हा गंभीर विषय आहे.

समितीने जवळपास पंधरा जिल्ह्यांचा दौरा केलेला आहे. बऱ्याच ठिकाणी असा प्रश्न उपस्थित झाल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. सागवान बाक खरेदी प्रकरणी फार मोठा गैरव्यवहार झालेला आहे. या सर्व गोष्टी पाहण्याची ज्यांची जबाबदारी होती त्यांनी या गोष्टी न पाहता सही करून सर्व व्यवहार एकाच दिवशी झालेला आहे. खरेदी संदर्भातील सर्व व्यवहार तपासण्याची जबाबदारी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची असताना त्यांनी कोणतीही कागदपत्रे पाहिलेली नाहीत. तसेच या सर्व गोष्टी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पाहणे आवश्यक होते, परंतु तसे झालेले दिसत नाही. तेव्हा या प्रकरणी सखोल चौकशी करावी. ज्यांच्यावर ही जबाबदारी होती त्यांनी त्यांची जबाबदारी पार पाडली पाहिजे. सचिवांनी विभागाला शिस्त लावण्याची गरज आहे. त्यांच्यावर जबाबदारी निश्चित झालेली आहे त्यांना ती टाळता येणार नाही. तेव्हा या प्रकरणी सखोल चौकशी करून जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करून केलेल्या त्या संदर्भातील अहवाल समितीला सादर करावा.

यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, या प्रकरणी विभागीय आयुक्त, पुणे यांना चौकशी करण्यास सांगण्यात येईल. त्यांच्याकडे हे प्रकरण असून त्यांना या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याबाबत सांगण्यात येईल. तद्नंतर समितीने विचारणा केली की, समितीने भेट दिली होती त्यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना चौकशी करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार त्यांनी आतापर्यंत कोणती चौकशी केली, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, या

प्रकरणी चौकशी झालेली आहे. संबंधितांवरील आरोपपत्र तयार आहे तसेच जिल्हापरिषदेच्या कर्मचाऱ्यांवर आरोपपत्र ठेवून त्यांची विभागीय चौकशी सुरु झालेली आहे. वर्ग-१ आणि वर्ग-२ चे अधिकारी हे शिक्षण विभागाचे आहेत.

**अभिप्राय व शिफारशी**

सन २०१२-१३ मध्ये जिल्हा परिषद सेसमधून प्राथमिक शाळेतील इयत्ता ६ वी ते ७ च्या वर्गासाठी बेंच खरेदीसाठी रक्कम रुपये ३४,८४,६१८/- एवढा खर्च करण्यात आला होता. यासंदर्भात पुढील लेखा आक्षेप नोंदविण्यात आले आहेत.

शाळानिहाय मागणी घेण्यात आलेली नव्हती, बेंच वाटप तालुकानिहाय गट शिक्षणाधिकारी यांचेमार्फत झाल्याचे विनियोग दाखले उपलब्ध केले नाहीत, गटशिक्षणाधिकारी यांची स्वाक्षरी घेण्यात आलेली नाही. खरेदीबाबत प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता व पुरवठा आदेश एकाच दिवशी घेण्यात आलेले आहेत. बेंचेसची तपासणी न करता शाळांना वाटप करण्यात आले असून पुरवठादार करारनाम्यात विसंगती दिसून येते. सदर लेखा आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने घेतलेल्या साक्षीदरम्यान असे निदर्शनास आले की, सागवानी बेंचेसची खरेदी दोन टप्प्यात करण्यात आलेली होती. या खरेदीबाबत उद्योग संचालनालय, प्रशासन भवन, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना यांच्यासोबत दिनांक २९ जून, २०१२ रोजी दरकरार करण्यात आला होता. महालक्ष्मी इंडस्ट्रीज कबनूर, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांचे एजंट मे.ॲम्बेसियस ब्लाईंड, इंडस्ट्रीयल को.ऑप.प्रोड्यूस सोसायटी यांच्यासमवेत करारनामा करण्यात आला होता. सागवानी बेंच खरेदी संदर्भात दिनांक ४ फेब्रुवारी, २०१३ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती व खरेदीबाबत दिनांक ११ फेब्रुवारी, २०१३ रोजी महाराष्ट्र राज्य, खादी व ग्रामोद्योग मंडळ, फोर्ट, मुंबई यांच्यासमवेत करारनामा करण्यात आला. त्यामुळे अगोदर पुरवठा आदेश आणि त्यानंतर करारनामा करणे ही बाब उचित नाही. त्यामुळे समिती या प्रकरणी तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

विषय समितीला रुपये ३० लाखांपर्यंत खरेदी करण्याचे अधिकार होते. सदरहू खरेदीच्या तांत्रिक मान्यतेसह प्रशासकीय मान्यतेचा ठराव विषय समितीपुढे ठेवण्यात आला नाही. एकाच दिवशी प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता घेण्यात आली आहे. यावरुन प्रथमदर्शनी असे दिसून येते की, प्रस्तुत प्रकरणी अनियमितता झालेली असून सदरहू बाब गंभीर आहे. मागणी नसताना बेंच खरेदी करण्यात आली असून दोन पुरवठादाराकडून बेंच खरेदी करण्यात आली आहे. कोणाला पुरवठा आदेश दिले पाहिजेत हे जिल्हा परिषदेचे अधिकारी स्पष्ट करु शकले नाहीत.

प्रस्तुत खरेदीपूर्वी प्रत्यक्ष शाळांची मागणी नोंदविण्यात आली नाही. तपशील संकलित करण्यात आला नाही, पुरवठा आदेश देण्यापूर्वी संबंधितांशी करारनामा करणे आवश्यक असताना करारनामा नंतर करण्यात आला. मे.ॲम्बेसियस ब्लाईंड इंडस्ट्रीज को.ऑप.प्रोड्यूस सोसायटी लिमिटेड यांना पुरवठा आदेश दिलेला असताना त्यांचेशी करारनामा न करता महालक्ष्मी इंडस्ट्रीज कबनूर, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांचेशी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी करारनामा का केला याचा बोध होत नाही, बेंच तपासणी अहवालाबाबत संदिग्धता दिसून येते. **खरेदी प्रक्रियेमध्ये नियमानुसार प्रथम ९० टक्के रक्कम व तद्नंतर १० टक्के रक्कम अदा करणे आवश्यक असताना एकाचवेळी १०० टक्के म्हणजे संपूर्ण रक्कम अदा केली. बेंच खरेदी प्रकरणी चौकशी अधिकारी यांचेकडील दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार तत्कालिन शिक्षणाधिकारी (प्राथमिक), शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, वाशिम कनिष्ठ लेखाधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा सेवानिवृत्त वरिष्ठ सहाय्यक (लेखा) यांचेवर दोषारोप ठेवून विभागीय चौकशीसाठी सादर करण्यात आलेल्या प्रस्तावावर पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच बेंच खरेदीसंदर्भातील सर्व व्यवहार तपासण्याची जबाबदारी तत्कालिन मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची असताना त्यांनी कोणतीही कागदपत्रे तपासलेली नाहीत. त्याचबरोबर तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी देखील पाहणे आवश्यक होते. तथापि, याठिकाणी तसे झालेले दिसून येत नाही. त्यामुळे याप्रकरणी सर्वंकष व सखोल चौकशी करून उक्त चौकशीत दोषी आढळणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा.**

**तसेच सदरहू प्रकरणातील अभिलेखे लेखापरिक्षणाच्या वेळी न दर्शविल्याप्रकरणी संबंधितांविरुद्ध महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार रुपये २५०००/- दंडाची शास्ती व एक वेतनवाढ रोखणे व सेवापुस्तिकेत नोंद घेऊन जबाबदारी निश्चित करण्यात यावी व उपरोक्त प्रकरणी केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, सातारा

## संगणक खरेदीबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.११९ (सन २०१२-१३)**

शिक्षण विभाग यांनी जिल्हा परिषद सेस अंतर्गत २४० व डी. पी. डी. सी. अंतर्गत ६० असे एकूण ३०० संगणक खरेदी केली असून त्यावर रुपये १,०१,७०,००० /- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१) सदर संगणकाची खरेदी शासनाच्या दर करारातील तपशिलाप्रमाणे केलेली नाही. सदरचा खर्च मान्य करता येत नाही.

२) संबंधीत शाळांच्या साठा नोंदवहीत नोंद घेतलेबाबत गट शिक्षणाधिकारी यांचे प्रमाणपत्र घेणेत आलेले नाही. त्यामुळे वाटपाची खात्री करता आली नाही.

३) गट शिक्षणाधिकारी यांनी संगणक वाटपाबाबत विनियोग दाखले दिलेले नाहीत.

४) संगणक खरेदी करणेपूर्वी शाळावार मागणी करून खरेदी केल्याचे दिसून येत नाही.

५) डिलीव्हरी चलन नं. १२७२ शाळा सोनवडी तालुका फलटण व डिलीव्हरी चलन क्रमांक - १३८४ शाळा आरफळ तालुका सातारा यावर संगणक प्राप्त झाल्याची दिनांक व स्वाक्षरी नमूद केलेले नाही.

६) कोरेगाव शाळा क्र. १ संगणक प्राप्त झाल्याबाबत डिलीव्हरी चलन दप्तरी नाही. सबब रक्कम रुपये ३३,१००/- वसुलीची पुर्तता दाखविणे आवश्यक आहे.

७) संगणक पुरवठा केलेल्या शाळांमध्ये वीजेची सोय असलेबाबत पुरावा सादर करणेत आलेला नाही.

८) करारनाम्यापोटी रुपये १०० /- कमी वसुली केलेली आहे.

९) उद्योग सह संचालनालय (भांख) विभाग, आयुक्त (उद्योग) यांचे परिपत्रक क्रमांक उर्स/भांखस/दर निश्चिती/ शालेय पाटी /०४/०९-१०/ बी-२१८६२, दिनांक २३ जुलै, २००९ चे दर करारातील अट क्र. २३ प्रमाणे रकमेचे प्रदान न करता शिक्षण विभागाने नियमबाह्यपणे सर्व रक्कम एक रकमी प्रदान केली आहे.

१०) दर करारातील अट क्रमांक १७ अन्वये पुरवठादाराने बँक गॅरंटी देणेची आहे. तशी कार्यवाही झालेली नाही.

११) ज्या ३०० शाळांना संगणक पुरविणेत आलेले आहेत त्या शाळांना अन्य योजनांतून संगणक दिला नसल्याचे मुख्याध्यपकांचे प्रमाणपत्र नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सातारा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

महाराष्ट्र शासनाचे दर करारानुसार स्टेप कंम्प्युटर, गोरेगाव, मुंबई यांचेकडून सदरची खरेदी करण्यात आली आहे. जिल्हा परिषद सेस मधून सन २०१२-१३ मध्ये संगणक खरेदीसाठी खालीलप्रमाणे तरतूद केलेली होती.

जिल्हा परिषद सेस मुळ तरतूद रक्कम रुपये ४८,००,००० /-

जिल्हा परिषद सेस पुरवणी तरतूद रक्कम रुपये ३९,००,००० /-

जिल्हा वार्षिक योजनातून तरतूद रक्कम रुपये <u>२०,३४,००० /-</u>

एकूण रक्कम रुपये १,०७,३४,००० /-

शिक्षण संचालक यांची तांत्रिक मान्यता दिनांक ०७ मार्च, २०१३ व प्रशासकीय मान्यता जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेतील ठराव क्र. ११७ दिनांक १ फेब्रुवारी, २०१३ नुसार रुपये ५५,००,००० /- (३९.०० लक्ष संगणक व १६.०० लक्ष आज्ञावली) देण्यात आली आहे. संगणक खरेदीसाठी रक्कम रुपये ४८,००,०००/- च्या खर्चास मुख्य कार्यकारी अधिकारी यांची तांत्रिक मान्यता दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१३ व स्थायी समितीतील ठराव क्र. १५५ दिनांक ८ फेब्रुवारी, २०१३ अन्वये प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. तसेच जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत मंजूर तरतूद २०,३४,०००/- या रक्कमेस जिल्हा वार्षिक योजनेमधून दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१३ रोजी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार जिल्हा परिषद सेस मधील तरतुदीतून २४० व जिल्हा वार्षिक योजनेतील मंजूर तरतूदीतून ६० अशी एकूण ३०० संगणक प्राथमिक शाळांना पुरवठा करण्यात आले आहेत.

१) सदर संगणकाची खरेदी शासनाच्या दर करारातील AMD Desktop Windows & Linux या स्पेसीफिकेशन प्रमाणेच संगणक घेण्यात आलेली आहेत व त्याच स्पेशीफिकेशनचे संगणक सर्व शाळांना पुरविण्यात आलेले आहेत.

२) शाळेच्या साठा नोंदवहीत नोंदी घेतल्याचे गटशिक्षणाधिकारी यांचेकडून प्रमाणपत्र घेण्यात आलेले आहे.

३) गटशिक्षणाधिकारी यांचेकडून विनियोग दाखले घेण्यात आलेले आहेत.

४) जिल्ह्यात एकूण जिल्हा परिषदेच्या शाळा २७४८ होत्या. त्यापैकी १०४९ शाळांना संगणक होते. तसेच १५४ शाळांना सन २०११-१२ पूर्वी संगणक प्रयोगशाळा सुविधा देण्यात आल्या होत्या. संगणक असलेल्या शाळा वगळून १५४५ शाळांपैकी ३०० शाळांना संगणक देण्यात आले होते. त्यामुळे गरजेनुसार खरेदी करण्यात आली होती.

५) प्राथमिक शाळा सोनवडे ता. पाटण असून चलन क्रमांक १२७२ व आरफळ सातारा चलन क्रमांक १३८४ या शाळेला संगणक पुरवठा केला असून पोहोच स्वाक्षरी मुख्याध्यापक यांची आहे. सदरचे चलन दप्तरी उपलब्ध आहे.

६) कोरेगाव शाळा क्र. १ संगणक प्राप्त झाल्याबाबत डिलीव्हरी चलन क्र. १३४४ दप्तरी उपलब्ध आहे.

७) शाळेमध्ये वीज पुरवठा असलेबाबत गटशिक्षणाधिकारी यांचेकडून प्रमाणपत्र घेतलेली आहेत.

८) करारनाम्यापोटी आवश्यक असणारी रक्कम घेण्यात आलेली आहे.

९) संबंधीत पुरवठादार यांनी सादर केलेल्या संख्येप्रमाणे मालसाठा नोंदवहीत १०० टक्के पुरवठा केल्याचे नोंद घेतलेली आहे. सर्व संगणक मिळाल्याची खात्री झाल्यानंतरच १०० टक्के रक्कम अदा केली आहे.

१०) पुरवठाधारकाकडून एकूण ५ टक्के रक्कम कपात करून घेणे आवश्यक होते. बयाना स्वरुपात बँक गॅरंटी घेणेची कार्यवाही झाली नाही. तथापि, गटशिक्षणाधिकारी यांचेकडील प्रमाणपत्रावरुन शाळांना पुरवठा केलेले सर्व संगणक सुस्थितीत असले बाबत प्रमाणपत्रावरुन दिसून येते.

११) ३०० शाळांना अन्य योजनेतून संगणक दिले नसल्याचे गटशिक्षणाधिकारी यांचे प्रमाणपत्र घेतले आहे. तरी वरील पूर्तता पाहून शक वगळण्यास विनंती आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

सातारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ११ एप्रिल, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, लेखापरिक्षणाच्या वेळी कागदपत्रे का दाखविण्यात आली नाहीत व संगणक खरेदी सुमारे १ कोटी रुपयांची करण्यात आली आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, स्थायी समिती ठराव क्रमांक १५५, दिनांक ८ फेब्रुवारी, २०१३ अन्वये १४१ संगणक खरेदीस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली होती. तसेच जिल्हा वार्षिक योजनेतून दिनांक १ फेब्रुवारी, २०१३ रोजी संगणक खरेदीस प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देण्यात आली होती. जिल्हा वार्षिक योजनेच्या सेस मधून संगणक खरेदी करण्यासाठी दिनांक ६ डिसेंबर, २०१२, दिनांक ७ मार्च, २०१३ व दिनांक ८ मार्च, २०१३ रोजी तांत्रिक मान्यता प्राप्त झाली होती. दर करारानुसार तपशिल आहे. सदरहू संगणक खरेदी ४ टप्प्यात करण्यात आली असून प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेण्यात आली आहे.

यावर समितीने विचारणा केली की, सदरहू संगणक एचसीएल कंपनीकडून का घेण्यात आले, दर करारामध्ये एचसीएल या एकाच कंपनीच्या संगणकाचा समावेश आहे काय, सदरहू निर्णय स्थायी समितीने घेतला आहे की शिक्षणाधिकारी यांनी घेतला आहे, ४ कंपनीच्या संगणकांपैकी एचसीएल कंपनीच्या संगणकाची निवड का करण्यात आली, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, सदरहू संगणक खरेदी दर करारानुसार करण्यात आली आहे. एचसीएल कंपनीचे संगणक का खरेदी करण्यात आले याची माहिती मूळ नस्ती पाहून सादर करण्यात येईल.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, दर करारातील तपशिलानुसार संगणक खरेदी करण्यात आली नाही. याचे उत्तर देताना नमूद करण्यात आले आहे की, तपशिलाप्रमाणे संगणक खरेदी करण्यात आली आहे. तपशिलाप्रमाणे खरेदी केली असती तर हा लेखा आाक्षेप समितीसमोर आला नसता. लेखा आक्षेप निकाली काढण्यासाठी जिल्हा परिषदेला ३ वेळा संधी देण्यात आली होती. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, तपशिलाच्या संदर्भात अनुपालनामध्ये माहिती नमूद करण्यात आली आहे. सदरहू मुद्दा वगळला गेला नसल्यामुळे तो समितीसमोर चर्चेला आला आहे, यावर संचालक, स्थानिक निधी लेखा

संचालनालय यांनी खुलासा केला की, लेखापरीक्षणामध्ये आक्षेप काढल्यानंतर त्याचे उत्तर ४ महिन्यांच्या आत देणे आवश्यक आहे. त्यावेळी सदरहू प्रकरणी कोणते उत्तर देण्यात आले होते हे पहावे लागेल.

यावर समितीने निदर्शनास आणून दिले की, लेखापरीक्षणाच्या वेळी सदरहू संगणक खरेदी तपशिलानुसार करण्यात आली नाही, असा आक्षेप काढण्यात आला आहे. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा संचालनालय यांनी खुलासा केला की, लेखापरीक्षणाच्या वेळी तपशिलानुसार संगणक खरेदी करण्यात आली नाही, असा आक्षेप काढण्यात आला आहे हे खरे आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, लेखापरीक्षणाच्या वेळी तपशिलानुसार दर करार करण्यात आला, हे स्पष्ट करता आले नाही म्हणून सदरहू मुद्दा समितीसमोर आला आहे. स्थायी समितीची मंजूरी घेताना दर करारानुसार संगणक खरेदी करण्यात येणार आहे, ही बाब लक्षात आणून देण्यात आला होती का तसेच लेखा आक्षेप निकाली काढण्यासाठी तीन वेळा संधी देऊनही तो निकाली काढण्यात आला नाही. त्यासंदर्भात संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, संगणक खरेदीच्या संदर्भात नेहमी चुका आढळून आल्या असल्याने संबंधितांचा खुलासा घेण्यात आला असून तो समाधानकारक नसल्याने त्यांची विभागीय चौकशी करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

यावर समितीने मत व्यक्त केले की, मुख्य कार्यकारी अधिकारी समितीला खोटी माहिती देत आहेत. सदरहू कारवाईची माहिती अनुपालन अहवालामध्ये समितीला देणे आवश्यक होते ती देण्यात आली नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, सदरहू प्रकरणी १५ दिवसांपूर्वी संबंधितांचा खुलासा मागविण्यात आला होता व तो प्राप्त झाल्यानंतर समाधानकारक नसल्याने २ दिवसांपूर्वी विभागीय चौकशीचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

यावर समितीने विदित केले की, समितीला अनुपालन अहवाल सादर करताना उक्त प्रकरणाची सुधारित माहिती देणे आवश्यक होते. मुख्य कार्यकारी अधिकारी समितीच्या समाधानासाठी कारवाई केल्याची माहिती देत आहेत. सदरहू प्रकरणी प्रत्यक्षात कारवाईची कार्यवाही सुरु आहे असे अनुपालन अहवालामध्ये दिसून येत नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, सदरहू प्रकरणी सुधारित उत्तर देणे अनवधानाने राहून गेले त्याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो. सदरहू प्रकरणीचे सुधारित अनुपालन समितीला सादर करण्यात येईल.

यावर समितीने निदेश दिले की, सदरहू संगणक खरेदी प्रकरणीच्या अनियमितते प्रकरणी कारवाईची कार्यवाही सुरु केली, हे ठीक आहे. सदरहू प्रकरणी गंभीर आहे. संगणक खरेदी सुमारे १ कोटी रुपयांची करण्यात आली आहे. त्यासंदर्भात समितीने विचारलेल्या अनेक प्रश्नांचे समाधानकारक उत्तर प्राप्त झालेले नाही. सदरहू प्रकरणी फार मोठी अनियमितता झाल्याचे दिसून येत आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, सदरहू लेखा आक्षेप प्रकरणी उद्योग सह संचालनालय यांच्या दिनांक २३ जुलै, २००९ चे दर करारातील अट क्र.२३ प्रमाणे रकमेचे प्रदान न करता नियमबाह्यपणे सर्व रक्कम एक रकमी प्रदान केली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विभागीय चौकशीचा प्रस्ताव सादर केला आहे. सदरहू प्रकरणी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना नोटीस देण्यात आली होती काय, सदरहू रकमेचे प्रदान मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी केलेले असल्याने तेही सदरहू प्रकरणी जबाबदार आहेत. त्यामुळे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची देखील विभागीय चौकशी करण्यात येणार आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सदरहू प्रकरणी शिक्षणाधिकारी यांना प्रथम नोटीस देण्यात आली होती, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना नोटीस देण्यात आली नाही. समितीने निदेश दिल्यानुसार मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना देखील नोटीस देण्यात येईल.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, सदरहू खरेदी करण्यात आलेले संगणक चांगल्या स्थितीत सुरु आहेत काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सदरहू संगणक आजही सुरु असून त्याबाबत गट शिक्षणाधिकारी यांचेकडून दाखले घेण्यात आले आहेत. यावर समितीने विचारणा केली की, सदरहू संगणक वापराचे ज्ञान शिक्षकांना आहे काय, सांगली जिल्ह्यातील एकाही शिक्षकाला संगणक वापराचे ज्ञान नाही, त्यांना संगणकही सुरु करून दाखवता आला नव्हता. सातारा जिल्ह्यातील शिक्षक संगणक प्रशिक्षित आहेत काय, त्यांना संगणकाचा वापर करता येतो याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना खात्री आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, १,८०० शाळांना संगणक पुरवठा करण्यात आला आहे त्यापैकी एखादे संगणक बंद असू शकते. सर्व संगणकाच्या संदर्भात निश्चित माहिती नाही. परंतु बहुतांश संगणक सुरु आहेत. संगणक प्रशिक्षण देण्यासाठी शिक्षकांना पत्र दिले असून प्रशिक्षणाचा कार्यक्रम सुरु करण्यात आला आहे.

यावर समितीने विचारणा केली की, संबंधित पुरवठाधारकाने बँक हमी देणे अभिप्रेत आहे. परंतु, ती त्यांनी दिली नाही. असे उत्तरात कबूल केलेले आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, या प्रकरणी अनियमितता झाल्याचे मी मान्य करीत आहे. त्यानुसार पुढील चौकशी केली जाणार आहे.

तद्नंतर समितीने निदेश दिले की, ८ दिवसांमध्ये सर्व संगणकाचा पुरवठा झालेला आहे. संगणक खरेदीसंदर्भातील १ कोटी १ लक्ष ७० हजार रुपयांचा प्रश्न आहे. सदरहू परिच्छेदामध्ये प्रशासकीय आणि तांत्रिक मान्यतेमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झालेली आहे. शाळेत संगणक सुस्थितीत आहेत किंवा कसे असा देखील प्रश्न निर्माण झालेला आहे. यामध्ये तत्कालिन अधिकाऱ्यांची चौकशी करून परिच्छेद क्रमांक ३.११९/२२/शिक्षण, १२०/२३/शिक्षण, १२१/३४/ शिक्षण यासंदर्भात कारवाई करून त्यासंदर्भातील अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

१) जिल्हा वार्षिक योजनेच्या सेस मधून संगणक खरेदी संदर्भात प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेमध्ये मोठया प्रमाणात अनियमितता झाल्या प्रकरणी तत्कालिन अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात आली आहे काय ?

२) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांची जबाबदारी निश्चित करून पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

३) नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

१) जिल्हा वार्षिक योजना व जिल्हा परिषद सेस अंतर्गत संगणक खरेदीमध्ये अनियमितता झाल्या प्रकरणी प्रारंभिक चौकशी करण्यात आली आहे. त्या चौकशीत खालील बाबी आढळून आल्या आहेत.

१. प्रस्तुत संगणक खरेदी प्रकरणी पुरवठा आदेश देण्यापूर्वी संबंधितांशी करारनामा करणे आवश्यक असताना तो त्यानंतर केलेला आहे.

२. शासकीय तंत्र निकेतन संस्था, सी.बी.डी.बेलापूर यांचेकडून प्राप्त तपासणी प्रमाणपत्रावर टंकलिखित तारखेऐवजी हस्तलिखित दिनांक ३१ मार्च, २०१३ ही तारीख नमूद आहे. त्यामुळे सदर प्रमाणपत्राच्या तारखेबाबत संदिग्धता दिसून येते.

३. दर करारातील अट क्र.५ नुसार ५ टक्के बँक गॅरंटी रुपये ५,०८,५००/- घेण्यात आलेली नाही.

४. सदर खरेदी प्रक्रियेमध्ये नियमानुसार ९० टक्के रक्कम प्रथम तदनंतर १० टक्के रक्कम अदा करावयाची असताना एकाचवेळी १०० टक्के म्हणजे संपूर्ण रक्कम अदा केली आहे.

२) संगणक खरेदी प्रकरणी चौकशी अधिकारी यांचेकडील दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार खालील तत्कालिन अधिकारी/कर्मचारी यांचेवर वरील दोषारोप ठेवून सदरचा प्रस्ताव विभागीय चौकशीसाठी आयुक्त शिक्षण, पुणे यांना सादर करण्यात आला आहे.

१. श्री भास्कर मारुती पोटघन, सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

२. श्री बजरंग छत्तरसिंग चौधरी, सेवा निवृत्त वरिष्ठ सहाय्यक (लेखा)

३. श्री नझमुद्दीन लतिब डांगे, वरिष्ठ सहाय्यक (प्रशा) शिक्षण विभाग, पंचायत समिती, कोरेगाव

जिल्हा परिषद सेस मधून सन २०१२-१३ मध्ये संगणक खरेदीसाठी खालील प्रमाणे तरतूद केली होती.

| | |
|---|---|
| जिल्हा परिषद सेस मुळ तरतूद | रक्कम रुपये ४८,००,०००/- |
| जिल्हा परिषद सेस पुरवणी तरतूद | रक्कम रुपये ३९,००,०००/- |
| जिल्हा वार्षिक योजना तरतूद | रक्कम रुपये २०,३४,०००/- |
| एकूण | रक्कम रुपये १,०७,३४,०००/- |

महाराष्ट्र शासनाचे दरकरारानुसार स्टेप कॉम्प्युटर गोरेगाव, मुंबई यांचेकडून सदरची खरेदी करण्यात आली आहे. यामध्ये कोणतीही आर्थिक अफरातफर झाल्याचे आढळून येत नाही.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्राम विकास विभागाचे अभिप्राय :-** (वित्त-३) जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी शासन सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सातारा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा वार्षिक योजनेच्या सेस मधून संगणक खरेदी संदर्भात प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेमध्ये मोठया प्रमाणात अनियमितता झाल्या प्रकरणी कोणताही आर्थिक गैरव्यवहार व अफरातफर झाल्याचे आढळून येत नाही असा जिल्हा परिषदेचा खुलासा केलेला आहे आणि त्या खुलाशाबाबत शासन सहमत आहे. तथापि, याबाबत समितीने समाधान व्यक्त केले आहे.

## अभिप्राय व शिफारशी

सातारा जिल्हा परिषद शिक्षण विभाग यांनी जिल्हा परिषद सेस अंतर्गत २४० व जिल्हा नियोजन विकास समिती अंतर्गत ६० असे एकूण ३०० संगणक खरेदी केली असून त्यावर रुपये १,०१,७०,०००/- एवढा खर्च केलेला असून याबाबत पुढील प्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आले आहेत.

सदर संगणकाची खरेदी शासनाच्या दर करारातील तपशिलाप्रमाणे केलेली नाही, नोंदवहीत गट शिक्षणाधिकारी यांचे प्रमाणपत्र घेतलेले नाही, विनियोग दाखले दिलेले नाहीत, शाळावार मागणी करून खरेदी केल्याचे दिसून येत नाही, सोनवडी, ता.फलटण व आरफळ, ता.सातारा येथे संगणक प्राप्त झाल्याचा दिनांक व स्वाक्षरी नमूद नाही. कोरेगाव येथील शाळेत बटवडा चलन दप्तरी नाही, त्यामुळे रुपये ३३,१००/- वसुलीची पूर्तता दाखविणे आवश्यक आहे. नियमबाह्यपणे सर्व रक्कम एक रकमी प्रदान केली आहे. पुरवठादाराने बँक हमी देण्याची कार्यवाही केली नाही. ज्या शाळांना संगणक पुरविण्यात आले त्या शाळांना अन्य योजनांमधून संगणक दिला नसल्याचे मुख्याध्यापकांचे प्रमाणपत्र नाही.

उपरोक्त लेखा आक्षेपाच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे घेतलेल्या साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, जिल्हा परिषद स्थायी समितीकडून दिनांक ८ फेब्रुवारी, २०१३ रोजी १४१ संगणक खरेदीस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली होती. जिल्हा वार्षिक योजनेच्या सेसमधून संगणक खरेदी करण्यासाठी दिनांक ६ डिसेंबर, २०१२ दिनांक ७ मार्च, व दिनांक ८ मार्च, २०१३ रोजी तांत्रिक मान्यता प्राप्त झाली होती. दरकरारानुसार तपशिल आहे. संगणक खरेदी ४ टप्प्यात करण्यात आली असून एचसीएल कंपनीचे संगणक आहेत. दर करारातील तपशिलानुसार संगणक खरेदी करण्यात आलेली नसताना लेखी उत्तरामध्ये तपशिलाप्रमाणे संगणक खरेदी करण्यात आल्याचे नमूद करण्यात आल्यामुळे समितीची एकप्रकारे दिशाभूल केली आहे. त्यामुळे समिती याप्रकरणी तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. **सदर संगणक खरेदीप्रकरणी संबंधितांचा खुलासा मागविण्यात आला होता व तो प्राप्त झाल्यानंतर खुलासा समाधानकारक नसल्याच्या कारणास्तव विभागीय चौकशीचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रकरणी सखोल चौकशी करून त्यानुसार संबंधितांविरुद्ध पुढे कोणती कारवाई करण्यात आली तसेच उक्त प्रकरणी अद्यापही कारवाई केली नसल्यास विभागाने याबाबतही ठोस भुमिका घेऊन संबंधितांविरुद्ध कठोर कारवाई करावी आणि या एकूणच गंभीर प्रकरणी तातडीने कारवाई करून याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

तसेच सदरहू लेखा आक्षेपाप्रकरणी उद्योग सह संचालनालय यांच्या दिनांक २३ जुलै, २००९ चे दर करारातील अट क्र.२३ प्रमाणे रकमेचे प्रदान न करता नियमबाह्यपणे संगणक खरेदीसाठी सर्व रक्कम एक रकमी प्रदान केली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विभागीय चौकशीचा प्रस्ताव सादर केला होता. सदरहू रकमेचे प्रदान मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी केलेले असल्याने तेही सदर प्रकरणी जबाबदार आहेत असे समितीचे मत आहे. प्रस्तुत प्रकरणी शिक्षणाधिकारी यांना प्रथम नोटीस देण्यात आली होती. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना नोटीस देण्यात आली नाही. तसेच संबंधित संगणक पुरवठाधारकाने रुपये ५,०८,५००/- एवढी बँक हमी देणे अभिप्रेत असताना बँक हमी दिलेली नाही. त्यामुळे याप्रकरणी अनियमितता झाल्याचे दिसून येत असल्याने समिती असमाधान व्यक्त करीत आहे.

विभागीय सचिवांच्या साक्षीदरम्यान जिल्हा वार्षिक योजनेच्या सेसमधून संगणक खरेदी संदर्भात प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याप्रकरणी कोणताही आर्थिक गैरव्यवहार व अफरातफर झाल्याचे आढळून येत

नसल्याचा जिल्हा परिषदेने खुलासा केलेला होता. त्या खुलाशाबाबत शासन सहमत आहे. यावर समितीने समाधान व्यक्त केले असले तरी **संगणक खरेदीसाठी रुपये १ कोटी १ लक्ष ७० हजार एवढा खर्च करण्यापूर्वी नियमानुसार प्रथम ९० टक्के रक्कम व तद्नंतर १० टक्के रक्कम अदा करावयाची असताना ती एकाचवेळी १०० टक्के म्हणजे संपूर्ण रक्कम अदा केली आहे त्यामुळे प्रशासकीय आणि तांत्रिक मान्यतेमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झालेली आहे तसेच ज्या शाळांना संगणक पुरविण्यात आलेले आहेत ते सुस्थितीत आहेत किंवा कसे असा देखील प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यामुळे तत्कालिन अधिकाऱ्यांची चौकशी करून चौकशीनुसार दोषी आढळून आलेल्या संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण चार

## जिल्हा परिषद, सातारा

## इको फ्रेंडली पॉलिमर बेंच खरेदीबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.१२२ (सन २०१२-१३)**

शिक्षण विभागाने इको फ्रेंडली पॉलीमर बेंच खरेदीपोटी रक्कम रुपये १,४९,९६,०१६ /- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१) शाळा स्तरावर बेंच वाटप केल्याचे त्याचा मालसाठा नोंदवहीत नोंदी घेतल्याचे प्रमाणपत्र गट शिक्षणाधिकारी यांचे घेणेत आलेले नाही. त्यामुळे संबंधीत खर्चाचा विनियोग झाल्याचे दिसून येत नाही.

२) बेंच वाटपाबाबत, विनियोग झाल्याचा तपशिल सादर करून साठा नोंदवहीत अद्यावत करून दाखविणे आवश्यक आहे.

३) शाळा निहाय मागणीपत्र नसतांना जिल्हा स्तरावर खरेदी संख्या काम आधारे निश्चित केली.

४) शैक्षणिक वर्ष संपतांना मार्च अखेरीस बेंचेस पुरवठा आदेश देऊन वाटप केल्याने शासन उद्देश सफल झाला नाही.

५) उद्योग, सह संचालनालय (भांख) विकास, आयुक्त (उद्योग) परिपत्रक क्र.उस/भांखस/दर निश्चिती/०४/०९१०/बी-२/८२, दिनांक २३ जुलै, २००९ नुसार पुरवठाधारकाच्या रकमेचे प्रदान करतांना ९०% व उर्वरीत १०% रक्कम ३० दिवसांत अदा करावयाची आहे. परंतू एक रकमी प्रदान केले आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सातारा यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सदरची खरेदी महाराष्ट्र शासन अंगीकृत उद्योग व ऊर्जा संचालनालय यांचे दर करारान्वये केली आहे. इको फ्रेंडली पॉलीमर बेंच खरेदी डी.पी.डी.सी. नाविन्यपूर्ण योजना मधून १.५० कोटी एवढी तरतूद प्राप्त झाली. दिनांक १ फेब्रुवारी, २०१३ जिल्हा परिषद ठराव क्रमांक ९२ प्रशासकीय मान्यता व दिनांक २८ मार्च, २०१३ च्या शिक्षण संचालक यांचेकडील पत्रानुसार तांत्रिक मान्यता व त्यानुसार पुरवठा आदेश दिनांक २६ मार्च, २०१३ रोजी देण्यात आला असून करारनामा दिनांक ३० मार्च, २०१३ रोजी केलेला आहे. साहित्य पोहोच दिनांक ३१ मार्च, २०१३ रोजी झालेले आहे.

१) शाळेच्या साठा नोंदवहीत नोंदी घेतल्याचे गट शिक्षणाधिकारी यांचेकडून प्रमाणपत्र घेण्यात आलेले होते.

२) बेंच वाटपाबाबतचे विनियोग झाल्याचे दाखले गट शिक्षणाधिकारी यांचेकडून घेण्यात आलेले आहेत.

३) पुरवठा आदेशामध्ये नमुद असलेनुसार बेंचेस पंचायत समितीस्तरावर उपलब्ध करून दिलेले आहेत. गटशिक्षणाधिकारी यांनी त्यांचे स्तरावर वाटप केले आहे त्यामुळे जिल्हा परिषद स्तरावर मागणी घेणेत आली नव्हती. पंचायत समिती स्तरावर शाळेची मागणी घेणेत आली आहे. सोबत जोडण्यात येत आहे.

४) सदर बेंचेस हे एका वर्षासाठी नसून ते निरंतर वापरासाठी आहेत व त्याचा वापर सद्यस्थितीत होत आहे.

५) संबंधीत पुरवठादार यांनी सादर केलेल्या संख्येप्रमाणे मालसाठा नोंदवहीत १०० टक्के पुरवठा केल्याचे नोंद घेतलेली असल्याने व सदर मालाचा पुरवठा योग्य व सुस्थितीत असल्याचे शिक्षणाधिकारी यांनी रक्कम अदा करणेबाबतचे प्रमाणपत्र दिले आहे. त्यामुळे १०० टक्के रक्कम अदा केली आहे. तरी वरील पूर्तता पाहून शक वगळण्यास विनंती आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

सातारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ११ एप्रिल, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, अगोदर करारनामा न करता इको फ्रेंडली पॉलीमर बेंच खरेदीबाबत पुरवठा आदेश देण्यात आला आहे, या बाबत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे काय म्हणणे आहे,

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, यापूर्वी सुद्धा अनेक विषयांच्या बाबतीत करारनामा करण्यापूर्वी पुरवठा आदेश देण्यात आल्याचे निदर्शनास आलेले आहे. या प्रकरणात सुद्धा तसेच घडलेले आहे. सदरहू खरेदीचा पुरवठा आदेश दिनांक २६ मार्च, २०१३ रोजी देण्यात आला आणि करारनामा हा दिनांक ३० मार्च, २०१३ रोजी करण्यात आला. दिनांक ३१ मार्च, २०१३ रोजी साहित्य प्राप्त झाले होते.

तद्‌नंतर समितीने विचारणा केली की, खरेदी संदर्भात करारनामा अगोदर करावयाचा असतो की पुरवठा आदेश अगोदर द्यावयाचा असतो, याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, खरेदी प्रक्रियेस मान्यता मिळाल्यानंतर अगोदर पुरवठादाराकडून करारनामा करून घ्यावयास पाहिजे. तसेच त्यांच्याकडून सुरक्षा अनामत म्हणून काही रक्कम भरुन घ्यावयास पाहिजे. त्यानंतर पुरवठा आदेश दिला पाहिजे, अशी सर्वसाधारण पद्धत आहे. या ठिकाणी अगोदर पुरवठा आदेश देण्यात आला. पुरवठा आदेश दिल्यानंतर करारनामा करून घ्यावा, असे नमूद करण्यात आल्यामुळे या बाबी घडल्या आहेत.

तद्‌नंतर समितीने विदित केले की, मार्च महिन्यात अंदाजपत्रक मंजूर होते. दिनांक १ एप्रिल पासून कामाला सुरुवात होते. शासनाने प्रत्येक महिन्याचे कार्यपद्धती विषयक वेळापत्रक आखून दिले आहे. सदरहू १२ महिन्यांच्या वेळापत्रकानुसार जिल्हा परिषदेने काम केले असते तर जिल्हा परिषदेला वेळापत्रकातील तारखांमध्ये मागे-पुढे करण्याची वेळच पडली नसती. जिल्हा परिषदेची सर्व खरेदी मार्च महिन्यातच झाल्याचे दिसून येते. तांत्रिक मान्यतेची सर्व प्रक्रिया फेब्रुवारी-मार्च या दोन महिन्यात होते. कोणत्या महिन्यात कामाची निवड करावयाची, कोणत्या महिन्यात अंदाजपत्रक मंजूर करून घ्यावयाचे, कोणत्या महिन्यात प्रशासकीय मान्यता घ्यावयाची, कोणत्या महिन्यात तांत्रिक मान्यता घ्यावयाची इत्यादी बाबींचे वेळापत्रक शासनाने ठरवून दिलेले आहे. या वेळापत्रकानुसार जिल्हा परिषदेने काम केले असते तर हा प्रश्नच उद्‌भवला नसता.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, नाविन्यपूर्ण योजनेच्या निधीसाठी जिल्हाधिकारी यांच्याकडून दिनांक १३ मार्च, २०१३ रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली होती. यावर समितीने विदित केले की, जिल्हा परिषदेला नाविन्यपूर्ण योजनेचा निधी दोन वर्षात खर्च करण्याची मुभा होती. जिल्हा परिषदेने करारनामा करण्यापूर्वी पुरवठा आदेश देण्याची घाई करण्याची काहीच गरज नव्हती. जिल्हा परिषदेने नियमानुसार अगोदर करारनामा करु शकला असता आणि त्यानंतर पुरवठा आदेश देऊ शकला असता. तसेच साहित्याचा चाचणी अहवाल येण्यापूर्वीच पुरवठा प्राप्त करून घेतला आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, शिक्षण संचालक यांचे दिनांक २० मार्च, २०१३ रोजीचे पत्र आहे. त्यात नमूद करण्यात आले आहे की, जी खरेदी करावयाची आहे ती दिनांक ३१ मार्चपर्यंत करावी.

यावर समितीने विचारणा केली की, नाविन्यपूर्ण योजनेसाठी जिल्हा परिषदेला निधी देण्याचे सन २०१२-१३ हे पहिलेच वर्ष होते. १.५ कोटी रुपये किंमतीचे बेंचेस खरेदी करण्यासाठी जिल्हा परिषदेने विशेष सभा कधी आयोजित केली होती, तसेच दिनांक १३ मार्च, २०१३ रोजी निधी प्राप्त झाल्यानंतर सर्वसाधारण सभा झाली आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सुरुवातीला १.५ कोटी रुपयांच्या बेंच खरेदीचा प्रस्ताव सादर केला होता. ही योजना नाविन्यपूर्ण असल्यामुळे जिल्हाधिकारी यांच्याकडून सदरहू निधीस दिनांक १३ मार्च, २०१३ रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली.

यावर समितीने विदित केले की, मुळात नाविन्यपूर्ण योजनेचा निधी हा जिल्हा परिषदेचा स्वत:चा असल्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी सदरहू निधीस मान्यता देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, या योजनेच्या निधीस जिल्हा परिषदेच्या दिनांक ०१ मार्च, २०१३ रोजीच्या सर्वसाधारण सभेत प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती.

यावर समितीने विचारणा केली की, सदरहू निधी जिल्हा परिषदेस कधी प्राप्त झाला, यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, सदरहू नाविन्यपूर्ण योजनेच्या निधीस जिल्हाधिकाऱ्यांनी दिनांक १३ मार्च, २०१३ रोजी प्रशासकीय मान्यता दिल्याची तसेच निधी वितरीत केल्याबाबतच्या आदेशाची प्रत उपलब्ध आहे. यावर समितीने विचारणा केली की, सदरहू निधीस प्रशासकीय मान्यता कोणी दिली, यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, सदरहू निधीस प्रशासकीय मान्यता जिल्हाधिकाऱ्यांनी दिली होती. तद्‌नंतर समितीने विचारणा केली की, नाविन्यपूर्ण योजनेचा निधी कोणाच्या खात्यावर आला होता, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सदरहू निधी जिल्हा परिषदेच्या खात्यावर आला होता.

यावर समितीने निदर्शनास आणून दिले की, जिल्हा परिषदेला निधी मिळाल्यानंतर त्या निधीस जिल्हाधिकारी प्रशासकीय मान्यता कशाच्या आधारावर देऊ शकतात, जिल्हाधिकारी केवळ जनसुविधेच्या कामांना प्रशासकीय मान्यता देऊ शकतात. समितीच्या मते मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दिनांक १६ फेब्रुवारी, २००८ **(परिशिष्ट ४.१)** रोजीच्या शासन निर्णयाचा अभ्यास करावा. त्यातील सेक्शन ३.२ यामध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की, स्थानिक स्वराज्य संस्थांना जो निधी दिला जातो त्याला प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार प्रचलित पद्धतीनुसार कायम राहतील. विभाग प्रमुख उदाहरणार्थ मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्वसाधारण सभा यांना जे अधिकार आहेत त्यानुसार हे अधिकार राहतील.

यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, या विषयाच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेकडे आवश्यक त्या सर्व मान्यता होत्या. परंतु कोणतीही नाविन्यपूर्ण योजना प्रशासकीय मान्यतेसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविली जाते. तद्‌नंतर

शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी खुलासा केला की, सदरहू खरेदीच्या संदर्भात दिनांक १६ फेब्रुवारी, २००८ रोजीच्या शासन निर्णयाचा संदर्भ दिला होता. यावर समितीने मत व्यक्त केले की, सदरहू बेंच खरेदी ही जिल्हा परिषदेच्या माध्यमातून करावयाची असताना सुद्धा जिल्हा परिषदेला त्या बाबत माहिती नव्हती.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, जिल्हा परिषदेच्या मागणीनुसार नाविन्यपूर्ण प्रस्तावास मान्यता मिळालेली आहे. मी समितीच्या मताशी सहमत आहे. कारण सदरहू खरेदी प्रकरणी दिनांक १६ फेब्रुवारी, २००८ रोजीच्या शासन निर्णयाचा संदर्भ दिला आहे.

यावर समितीने विचारणा केली की, या कामी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रशासकीय मान्यता दिली आहे. जिल्हाधिकाऱ्यांना प्रशासकीय मान्यता देण्याचा अधिकार आहे काय, जिल्हाधिकाऱ्यांनी दिनांक १६ फेब्रुवारी, २००८ रोजीच्या शासन निर्णयाचा अवमान केला आहे. समितीच्या मते हा विषय निकाली लावण्यासाठी नियोजन व महसूल विभागाच्या सचिवांची साक्ष लावण्यात येईल. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, या प्रकरणी उशिराने प्रशासकीय मान्यता मिळाल्यामुळे काम होण्यास विलंब झाला.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, सदरहू बेंच सेस निधीतून घेतले आहेत काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, नाही, अहवाल वर्षातील बेंच खरेदी नाविन्यपूर्ण योजनेच्या निधीतून केली होती. यावर समितीने मत व्यक्त केले की, जिल्हाधिकाऱ्यांनी केवळ पैसे कमविण्याच्या दृष्टीने प्रशासकीय मान्यता देण्याचे काम केले आहे. नाविन्यपूर्ण योजनेचा निधी दोन वर्षापर्यंत खर्च करता येतो. जिल्हा परिषद अगोदरच्या वर्षी प्रशासकीय मान्यता घेऊन नंतरच्या वर्षात सदरहू निधी खर्च करु शकली असती. यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी कमीशन घेतले असावे, असा समितीचा आरोप आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, आपण ही खरेदी कोणत्या दरानुसार केली, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, शिक्षण संचालकांच्या दर करारानुसार खरेदी केली आहे. यावर समितीने विचारणा केली की, दर करारानुसार ज्या कंपनीला पुरवठा आदेश दिला होता त्यात नमूद केले होते की, खुल्या बाजारात त्या वस्तूंचे दर कमी असतील तर खुल्या बाजारातून खरेदी करावी, म्हणून सर्व खरेदी खुल्या बाजारातून करण्याचा पुरवठा आदेश देणार काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, खरेदी धोरणानुसार दर करार ठरलेला असतो. ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक ०६ ऑगस्ट, २००९ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करणे बंधनकारक आहे. बाजार भावातील दर हे दर करारापेक्षा कमी असतील तर उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णयान्वये खरेदी करावी.

यावर समितीने निदर्शनास आणून दिले की, जिल्हा परिषदेने अकाऊंट कोड वाचावे. त्यातील तरतुदीनुसार पुरवठादाराला वाटाघाटीसाठी बोलवावे लागते. दर करारामध्ये दर जास्त असतील तर पुरवठादाराला बोलावून वाटाघाटी करता येतात. यानुसार जिल्हा परिषदेने पुरवठादाराला वाटाघाटीसाठी बोलवावयास पाहिजे होते. तसेच जिल्हाधिकारी यांनी २ कोटी रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता दिली होती. यापैकी १.५ कोटी रुपयांचे बेंचेस खरेदी केले. उर्वरित ५० लाख रुपये निधीचे काय केले, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, उर्वरित ५० लाख रुपयांतून डिजीटल व व्हर्च्युअल शाळांसाठी संगणक खरेदी करण्यात आली.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, तसेच दुसरी बाब अशी की, प्राप्त झालेल्या मालाची तांत्रिक तपासणी न करता पुरवठा धारकास उर्वरित १० टक्के रक्कम अदा केली आहे. मालाची तांत्रिक तपासणी न करण्याची कारणे काय आहेत, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, सुपरीडेंटस् इंडिया कंपनी प्रायव्हेट लिमिटेड यांच्याकडून साहित्याची तपासणी केली होती. यावर समितीने विचारणा केली की, ज्या कंपनीकडून तांत्रिक तपासणी करण्यात आली ती शासनाची आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, ती शासन मान्य खाजगी कंपनी आहे. यावर समितीने विचारणा केली की, सुपरीडेंटस इंडिया प्रायव्हेट लिमिटेड याच कंपनीकडून तांत्रिक तपासणी करून घेण्याबाबतचे आदेश होते काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, जिल्हा परिषद सुरुवातीलाच पुरवठादाराला सांगत असते की, त्यांनी पुरवठा केल्याचे प्रमाणपत्र सादर करावे. तद्नंतर समितीने विचारणा केली की, या संदर्भात शासन निर्णय काय आहे, सद्य:स्थितीत सदरहू बेंच चांगल्या स्थितीत आहेत काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, जिल्हा परिषदेच्या प्रस्तावानुसार जिल्हाधिकारी यांनी प्रस्ताव मंजूर केलेला आहे. खरेदी करण्याची मागणी जिल्हा परिषदेची आहे.

यावर समितीने निदेश दिले की, याकरिता शासकीय मान्यता अटी व शर्ती नुसार दिली. परंतु त्या अटी व शर्तीची अंमलबजावणी झाली की नाही, हे पाहण्याचे काम जिल्हाधिकारी यांचे आहे. जिल्हाधिकारी यांना जिल्हा परिषदेमध्ये हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही. ही मोठ्या रकमेची खरेदी करण्यात आलेली आहे. पुरवठा आदेश आणि करारनामा या प्रक्रिया चुकीच्या

झालेल्या आहेत. संबंधित विभागाने योग्य काम करायला पाहिजे होते. दर कराराप्रमाणे साहित्य चांगले आहे की नाही याचा कुठेही ताळमेळ दिसत नाही. त्यामुळे या प्रक्रियेची सखोल चौकशी करण्यात यावी. यामध्ये ज्यांनी अनियमितता केली असेल, त्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई प्रस्तावित करण्यात यावी. हे गंभीर प्रकरण आहे. यासंदर्भात शालेय शिक्षण विभाग, महसूल विभाग आणि नियोजन विभागाच्या सचिवांची साक्ष लावण्यात येईल. या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सखोल चौकशी करून संबंधितांवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

१) इको फ्रेंडली पॉलीमर बेंच खरेदीमध्ये अनियमितता झाल्या प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

२) असल्यास, चौकशीनुसार संबंधिताची जबाबदारी निश्चित करून पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे,

३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत नाविन्यपूर्ण योजना मधून १५०.०० लक्ष एवढी तरतूद प्राप्त झाली आहे. महाराष्ट्र शासन अंगीकृत उद्योग व ऊर्जा संचालनालय यांचे दर करारान्वये सदरची खरेदी केली आहे.

१) जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत पॉलिमर बेंच खरेदीमध्ये अनियमितता झाल्या प्रकरणी प्रारंभिक चौकशी करण्यात आली आहे. त्या चौकशीच्या आधारे खालील आरोप ठेवण्यात आले आहेत.—

a. सर्व तालुक्यांची मागणी संकलित न करता खरेदीची प्रक्रिया राबविल्याचे दिसून येते.

b. प्रस्तुत इको फ्रेंडली पॉलीमर बेंच खरेदी प्रक्रियेमध्ये पुरवठा आदेश दिल्यानंतर करारनामा केल्याचे दिसून येते.

c. पुरवठा आदेश दिनांक २६ मार्च, २०१३ दिलेला असून करारानामा दिनांक ३० मार्च, २०१३ रोजी केलेला आहे व माल पुरवठा दिनांक ३१ मार्च, २०१३ रोजी झालेल्याचे कागदपत्रावरून दिसून येते तसेच देयक प्रदानसुद्धा दिनांक ३१ मार्च, २०१३ रोजी झालेले असून Superintendence Company of India (Pvt.) Ltd. मुंबई यांचा तपासणी अहवालात मात्र दिनांक १० एप्रिल, २०१३ रोजीचा आहे. यावरून तांत्रिक तपासणीपूर्वीच प्रदान झालेले आहे. सदर तपासणी यंत्रणा शासन मान्य आहे अगर कसे, याचा बोध होत नाही.

d. सदर खरेदी प्रक्रियेमध्ये नियमानुसार ९० टक्के रक्कम प्रमाणे प्रथम व तदनंतर १० टक्के रक्कम अदा करावयाची असताना एकाचवेळी संपूर्ण रक्कम अदा केली आहे.

२) पॉलीमर बेंच खरेदी प्रकरणी चौकशी अधिकारी यांचेकडील दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार खालील तत्कालिन अधिकारी/कर्मचारी यांचेवर वरील दोषारोप ठेवून सदरचा प्रस्ताव विभागीय चौकशीसाठी सादर करण्यात आला आहे.

१. श्री तानाजी आत्माराम नरळे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.वाशिम

२. श्री राकेश झिंटुजी कुसनाके, कनिष्ठ लेखा अधिकारी, जि.प.वर्धा

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय :-** शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सातारा यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सातारा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, पुरवठा आदेश दिल्यानंतर करारनामा केल्याचे दिसून येते. तसेच जी बाके खरेदी करण्यात आलेली आहे त्याबाबत खादी ग्रामोद्योग विभागाचे काय मत आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, खादी व ग्रामोद्योग मंडळ यांनी खुलासा केला की, मुख्य कार्यकारी अधिकारी, खादी ग्रामोद्योग हे पुरवठा आदेश निर्गमित करतात. त्यांनतर ते स्वत: मागणी पत्र प्राप्त करून घेतात. यावर समितीने विचारणा केली की, खादी व ग्रामोद्योग मंडळाने माल व्यवस्थित पुरवला नाही अशा प्रकारची नोटीस देण्यात आली काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, खादी व ग्रामोद्योग मंडळ यांनी खुलासा केला की, असे काही नाही.

## अभिप्राय व शिफारशी

सातारा जिल्हा परिषद शिक्षण विभागाने इको-फ्रेंडली पॉलिमर बेंच खरेदीसाठी रक्कम रुपये १,४९,९६,०१६/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत पुढीलप्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत.

शाळास्तरावर बेंच वाटप केल्याचे नोंदवहीत नोंदी घेतल्याचे शिक्षणाधिकारी यांचे प्रमाणपत्र घेतलेले नाही, त्यामुळे खर्चाचा विनियोग झाल्याचे दिसून येत नाही. शाळानिहाय मागणीपत्र नसताना जिल्हास्तरावर खरेदी संख्या निश्चित केली. मार्च अखेरीस बेंचेस पुरवठा आदेश देऊन वाटप केल्याने शासनाचा उद्देश सफल झाला नाही. पुरवठाधारकाला एकरकमी रक्कम प्रदान करण्यात आली आहे.

उपरोक्त लेखा आक्षेपाच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, सातारा जिल्हा परिषद शिक्षण विभागाने इको-फ्रेंडली पॉलिमर बेंच खरेदीसाठी करारनामा करण्यापूर्वी पुरवठा आदेश दिलेला आहे. सदरहू खरेदीचा पुरवठा आदेश दिनांक २६ मार्च, २०१३ रोजी देण्यात आला आहे आणि करारनामा दिनांक ३० मार्च, २०१३ रोजी करण्यात आला व सन २०१३ रोजी साहित्य प्राप्त झाले होते. शासनाने प्रत्येक महिन्याचे कार्यपद्धती विषयक वेळापत्रक आखून दिलेले आहे. त्यामुळे दिनांक १ एप्रिल पासून कामाला सुरुवात करणे अभिप्रेत असताना जिल्हा परिषदेची सर्व खरेदी माहे मार्च महिन्यातच झाल्याचे दिसून येते. नाविन्यपूर्ण योजनेच्या निधीसाठी जिल्हाधिकारी यांच्याकडून दिनांक १३ मार्च, २०१३ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली असली तरी जिल्हा परिषदेला नाविन्यपूर्ण योजनेचा निधी दोन वर्षात खर्च करण्याची मुभा होती. त्यामुळे जिल्हा परिषदेने करारनामा करण्यापूर्वी पुरवठा आदेश देण्याची घाई करण्याची अजिबात आवश्यकता नव्हती. कारण अगोदर करारनामा करू शकला असता आणि त्यानंतर पुरवठा आदेश देऊ शकला असता. दुसरी गंभीर बाब म्हणजे साहित्याचा चाचणी अहवाल येण्यापूर्वीच पुरवठा प्राप्त करून घेतला आहे. म्हणजेच दिनांक २६ मार्च, २०१३ रोजीचा पुरवठा आदेश असून करारनामा दिनांक ३० मार्च, २०१३ रोजी केलेला आहे, त्यामुळे समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

समितीच्या मते दिनांक १६ फेब्रुवारी, २००८ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. ३.२ मध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की, स्थानिक स्वराज्य संस्थांना जो निधी दिला जातो त्याला प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार प्रचलित पद्धतीनुसार कायम राहतील. विभाग प्रमुख उदाहरणार्थ मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्वसाधारण सभा यांना जे अधिकार आहेत त्यानुसार हे अधिकार राहतील. सदरहू बेंच खरेदी ही जिल्हा परिषदेच्या माध्यमातून करावयाची असताना सुद्धा जिल्हा परिषदेला त्याबाबत माहिती नव्हती याबद्दल समिती सखेद आश्चर्य व्यक्त करीत आहे.

**तसेच जिल्हाधिकाऱ्यांनी दिनांक १६ फेब्रुवारी, २००८ रोजीच्या शासन निर्णयाचा अवमान केला असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. जिल्हाधिकारी यांना जिल्हा परिषदेमध्ये हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही. पुरवठा आदेश आणि करारनामा या प्रक्रिया चुकीच्या झालेल्या आहेत. दर कराराप्रमाणे साहित्य चांगले आहे की नाही याचा कुठेही ताळमेळ दिसत नाही. सर्व तालुक्यांची मागणी संकलित न करता खरेदीची प्रक्रिया राबविली असल्याचे दिसून येते. त्यामुळे या प्रक्रियेची सखोल चौकशी करून यामध्ये ज्या ज्या अधिकाऱ्यांनी अनियमितता केली असेल त्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल एक महिन्याच्या आत समितीला पाठविण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, सातारा

**१) प्राथमिक आरोग्य केंद्र विंग, ता.कराड संरक्षक भिंत बांधणे,**

**२) येरळवाडी बनपुरी रस्ता सुधारणा करणेबाबत,**

**३) गारळेवाडी चाफ्याचा मळा रस्ता दुरुस्ती करणे ता.खटाव,**

**१) परिच्छेद क्रमांक ३.२७१/९० (सन २०१२-१३) प्राथमिक आरोग्य केंद्र विंग, ता.कराड संरक्षक भिंत बांधणे :-**

बांधकाम विभाग सातारा यांनी सन २०१२-१३ मध्ये सार्वजनिक आरोग्य इमारती या शिर्षाखाली या कामासाठी रक्कम रुपये २,७५,२८२/- एवढा खर्च केला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

१) सदर कामात एकूण भिंतीच्या लांबीमध्ये २७ कॉलम (पिलर) आहेत असे मोजमाप नोंदवहीवर बाब क्रमांक ५ अन्वये नोंदविले आहे. मात्र बाब क्रमांक ६ अन्वये भिंतीचे ८ भाग असून प्लॅस्टर साठी २२ पिलरचेच ऑफसेट दिसून येत आहेत. सबब या कामात २२ पिलरच असून २७ पिलरचे २७.८९ घ.मी. मोजमाप दिलेने ५.८९ घ.मी. जादा मोजमाप दिलेले आहे. याबाबत ५.८९ घ.मी. X रुपये २६,२२४.०५/- एवढी रक्कम जादा प्रदान वसुल होणे आवश्यक आहे.

२) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्र. झेडपीए-२००९/ प्र.क्र.४४/३३ दिनांक २२ डिसेंबर, २००० **(परिशिष्ट ५.१)** अन्वये मोजमाप नोंदवहीवर शाखा अभियंता यांची दिनांकित स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. मात्र अशी स्वाक्षरी नाही. तसेच काम सुरु करण्यापूर्वीचा व पुर्ण झाल्यानंतरचा असे फोटो काढणे व ते संपूर्ण तपासणीसह प्रमाणित करून नस्तीस ठेवणे बंधनकारक असताना अशी कार्यवाही केलेली नाही. नामफलक लावलेला नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सातारा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) सदर कामाचे मोजमाप पुस्तिकेमध्ये बाब क्रमांक ४ मध्ये विट बांधकाम बाबीमध्ये भिंतीची एकूण लांबी ८४.५० मीटर इतकी व भिंतीलगतचे २७ पिलर ऑफसेटची मोजमापे, मोजमाप पुस्तकामध्ये नोंदवलेले आहेत. त्यानुसार भिंतीच्या विटबांधकामाचे परिमाण २६.५४ घन मीटर व पिलरचे परिमाण १.३४ घन मीटर (एकूण २७.८९ घन मीटर) नोंदविलेले आहे. तसेच बाब क्रमांक ५ मध्ये वरील प्रमाणे कोपिंगचे एकूण परिमाण २.१० घन मीटर मोजमाप पुस्तकात नोंदवलेले आहेत. तथापि बाब क्रमांक ६ मध्ये प्लॉस्टरबाबीचे २२ पिलर ऑफसेटचे मोजमापे नोंदविलेले आहेत. त्यानुसार जादा झालेले ५ पिलर ऑफसेट विटबांधकामाचे व कोपिंगचे परिमाण खालील प्रमाणे आहे.

१) वीटबांधकाम = ५X०.३५ X ०.१२X१=३०=०.२७cumX दर रुपये ४४५२.३०/- cum = रुपये १२०२.१२/-

२) कोपींग = ५X०.३५X०.१२X०.१०= ०.१२ cumX दर रुपये ४२४८.००/- cum = रुपये ८९.२०/- एकूण रुपये १२९१.३२/- म्हणजेच रुपये १२९१.००/- जादा झालेली अदाई संबंधीताकडून वसूल करणेत आलेली आहे. भरणा केलेल्या चलनाची प्रत सोबत केली आहे.

२) सदर कामाचे मोजमाप पुस्तिकेमध्ये संबंधीत शाखा अभियंता यांनी तारीख नमुद करून स्वाक्षरी केलेली आहे. कामाचा व कामावरील माहितीफलकाचा फोटो घेणेत आलेला असून त्याची प्रत सोबत सादर केली आहे.

**२) परिच्छेद क्रमांक ३.२७२/९५ (सन २०१२-१३) येरळवाडी बनपुरी रस्ता सुधारणा करणेबाबत:-**

बांधकाम विभाग सातारा यांनी सन २०१२-१३ मध्ये मार्ग व पूल या लेखाशिर्षाखाली या कामासाठी रुपये १४,५४,३६१/- एवढा खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१) सदर कामात मोजमाप पुस्तक क्रमांक १३२४ मध्ये पान क्रमांक ३७ वर ०/४०० ते ०/५२५ या चेनेजमध्ये ४०० एमएम डब्ल्यूबीएम नोंद केलेली आहे. पुढे पान क्रमांक ३९ वर साखळी क्रमांक ०/००० ते ०/८०० यामध्ये पुनश्च ४० एमएम डब्यूबीएम नोंद केली आहे. मात्र पान क्रमांक ३९ या नोंदीतून पान क्रमांक ३७ वरील ४० एमएम डब्ल्यूबीएम ची नोंदीमधील काम वजा केलेले नाही. यामुळे साखळी क्रमांक ०/४०० ते ०/५२५ यातील मोजमाप दोनवेळा दिले गेले आहे. या दुबार अदा मध्ये जादा प्रदान ४० एमएम खडी ३६.७५ घनमीटर मऊ मुरुम ८.१० घ.मी. व दबाई ३७५ वर्गमीटर याबाबत रुपये १९८१०+१६९७+३५६३ एकूण रुपये २५०७०/- जादा अदा रक्कम वसुल होणे आवश्यक आहे.

२) सदर कामात १४०५.५३ घनमीटर गौण खनिज वापरले असून याबाबत रुपये ९९,३२९/- रॉयल्टी पोटी वसुल होणे आवश्यक असताना रुपये २७,८५९/- एवढेच वसुल केले आहेत. कमी कपातीबाबत चलन जोडले नसून वाहतूक पासच्या झेरॉक्स प्रती जोडल्या आहेत. मूळ चलन लेखापरिक्षणास सादर करावे. अन्यथा रुपये ७१,४७०/- वसुल करून शासनास भरणा करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सातारा यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) मोजमाप पुस्तक क्रमांक १३२४ पान क्रमांक ३६,३७,३९ वर ज्या खडीच्या नोंदी केलेल्या आहेत त्या बरोबर असून रस्त्याच्या ०/४०० ते ०/५२५ मीटर लांबीचा पृष्ठभाग हा काळ्या मातीचा असल्यामुळे ६० मीलिमीटर खडीचा एक थर व ४० मीलिमीटर खडीचे दोन थराचे काम करून घेतले असून ते तांत्रिक दृष्टया योग्य आहे. त्यामुळे सदर लांबीमध्ये झालेले काम दुबार झालेले नाही.

२) मोजमाप पुस्तक क्रमांक १३२४ पान क्रमांक ४८ वर रॉयल्टी नोंद केली असून बिलासोबत वाहतूकीच्या पासावरील मालाची रॉयल्टी मक्तेदाराने अगोदरच भरणा केली असल्याने उर्वरीत रॉयल्टी रुपये २७,८५९/- ब्रास म्हणजे १११७.८५ घन मीटर इतक्या साहित्याची वाहतूक केलेली असून खाणमालकाने दिलेले वाहतूक पास दिनांक ०६ जानेवारी, २०११, दिनांक ०४ नोव्हेंबर २०११, दिनांक ०५ नोव्हेंबर २०११, दिनांक ०६ नोव्हेंबर २०११, दिनांक ०७ नोव्हेंबर २०११, दिनांक १० नोव्हेंबर २०११, दिनांक ११ नोव्हेंबर २०११, दिनांक १२ नोव्हेंबर २०११, दिनांक १५ नोव्हेंब, २०११, दिनांक १६ नोव्हेंबर २०११ अन्वये रुपये ७८,९९८/- भरलेली आहे. सोबत वाहतूक पास अवलोकनार्थ सादर करीत आहे.

**३) परिच्छेद क्रमांक ३.२७३/९७ (सन २०१२-१३) गारळेवाडी चाफ्याचा मळा रस्ता दुरुस्ती करणे ता.खटाव :-**

बांधकाम विभाग सातारा यांनी सन २०१२-१३ मध्ये जिल्हा मार्ग व पूल या लेखाशिर्षाखाली या कामासाठी रुपये १२,९२,०५६/- एवढा खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१) सदर कामात रस्त्याचे बाजूने विविध चेनेजमध्ये साईड गटर १.२० मीटर पेक्षा जास्त रुंदीने गटर खुदाई केली आहे. सदरचा मार्ग हा ग्रामीण मार्ग २७२ असून या रस्त्याची रुंदी ३.०० मीटर आहे. तसेच हा भाग दुष्काळी कमी पावसाचा भाग आहे. साईड गटर कटींग हे ०.९० मीटर रुंदीनेच आवश्यक असताना जास्त रुंदी दर्शविली असून आवश्यकतेपेक्षा १.६२ घनमीटर जास्त कटींग झाले असून रुपये ५५.८० प्रती घनमीटर प्रमाणे रुपये ९,०३९.६०/- एवढी रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

२) सदर कामात चेनेज क्रमांक ०/२५० ते ०/५०० यामध्ये ९०० एमएम पाईपसह सीडीवर्क आहे. याच चेनेजमध्ये खुदाई अनुक्रमे ५० मीटर व १०० मीटर लांबीने दर्शविले आहे. यानंतर पान क्र. ३४ वर सीडी वर्कसाठी अनुक्रमे १४ मीटर व १५ मीटर (दोन्ही बाजूस एक प्रमाणे) १.५० मीटर खोलीने पाया खुदाई दर्शविली आहे. मात्र यातील पाईप फिक्सिंगचे काम हे पान क्रमांक २९ वरील नोंदीनुसार अगोदर दिनांक १५ सप्टेंबर, २०१२ रोजीच पूर्ण केले आहे. पाईप फिक्सिंग झालेनंतर त्याखालील पाया भरणे, पीसीसी कॉंक्रीट इत्यादी कामे नंतर कशी काय केले तसेच पायाचे क्षेत्रात गटर खुदाईचे मोजमाप दिल्याने दुबार मोजमाप ३३.०४ घनमीटर X रुपये ५५५.८० प्रमाणे रुपये १८४४.०७ /- एवढी रक्कम वसूल होणे आवश्यक आहे.

३) सीडी वर्क्स साईड वॉल बांधकाम कॉंक्रीटीकरण दोन्ही बाजूचा पाईप व्हॉल्यूम वजा करणे आवश्यक असताना अशी वजाबाकी न केल्याने २.५४ घ.मी. चे कामाचे जादा प्रदान झाले आहे. सबब २.५४ घनमीटर X ३१६९ = ८,०४९.६४/- एवढे जादा प्रदान वसुल होणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सातारा यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) सदर रस्त्याचा सा. क्र. ०/० ते ०/५०० कि.मी. हा भाग डोगरातून जात असल्याने रस्त्याच्या कडेने गटर खुदाई करताना रस्त्याच्या चढ उतारामुळे जादा रुंदीने उपलब्ध जमिनीमध्ये गटर काढणे तांत्रिक दृष्टया गरजेचे होते. साखळी क्रमांक ०/५०० ते ०/७०० मध्ये गटरची रुंदी ०.९० मीटर घेऊन गटर खुदाई केली आहे. अंदाजपत्रकामध्ये १.२० मीटर रुंदीने गटर काढणे प्रस्तावित केले आहे. त्यामुळे काम जादा किंवा अनावश्यक झालेले नाही.

२) रस्त्याच्या सीडी वर्क (मोरी बांधकाम) साठी पहिल्या देयकामध्ये दिनांक १७ मे २०११ रोजी फक्त पाईप जागेवर आणलेचे देयक अदा केले आहे. पाईप बसविणेची रक्कम मक्तेदारास अदा केली नाही. त्यानंतर मक्तेदाराने खुदाई करून पीसीसी करून पाईप बसविले आहेत व नंतर कॉंक्रीट बॉक्स (क्रसिंग कॉंक्रीट) भरला आहे हे तांत्रिकदृष्टया योग्य आहे.

३) मोरी बांधकामाच्या मुख्य भिंतीची तळातील रुंदी १.०६ मीटर व जमीन लेव्हलची रुंदी ०.८१ मीटर अशी आहे. या काँक्रीटची बाब क्रमांक ३ आहे व काँक्रीट बॉक्स भरणे बाब क्रमांक २ आहे. मोजमाप पुस्तक क्रमांक ७९६ मध्ये पान क्रमांक ३५ वर बाब क्रमांक २ काँक्रीट बॉक्स भरलेली नोंद आहे. तसेच त्यातून पाईपचे परिमाण वजा केले आहे. नोंदविलेली मोजमापे बरोबर आहेत. सोबत मोजमाप पुस्तक क्रमांक ७९६ ची सत्यप्रत जोडलेली आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

सातारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ११ एप्रिल २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने परिच्छेद क्रमांक ३.२७१/९०/बांधकाम, प्राथमिक आरोग्य केंद्र विंग तालुका कराड संरक्षक भिंत बांधणे, ३.२७२/९५/बांधकाम, येरळवाडी बनपूरी रस्ता सुधारणा करणेबाबत आणि ३.२७३/९७/बांधकाम, गारळेवाडी चाफ्याचा मळा रस्ता दुरुस्ती करणे, तालुका खटाव यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तात्काळ चौकशी करावी. तसेच अनियमितता असेल तर रक्कम वसूल करावी आणि दंडात्मक कारवाई करावी असे निदेश समितीने दिले. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस होकारार्थी उत्तर दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

<u>प्राथमिक आरोग्य केंद्र विंग, ता.कराड संरक्षक भिंत बांधणे,</u>

<u>येराळवाडी बनपुरी रस्ता सुधारणा करणेबाबत,</u>

<u>गारळेवाडी चाफ्याचामळा रस्ता दुरुस्ती करणे ता.खटाव</u>

उपरोक्त मुद्यांसंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार अंनियमितता झाली असल्यास संबंधिताकडून रक्कम वसुल करण्यात आली आहे काय तसेच संबंधिताविरुद्ध कोणती दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

परिच्छेद क्रमांक ३.२७१/९०, ३.२७२/९५, ३.२७३/९७ बाबत अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी व कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग दक्षिण यांनी केलेल्या चौकशीनुसार खुलासा खालीलप्रमाणे आहे.

**<u>परिच्छेद क्रमांक ३.२७१/९०/ प्राथमिक आरोग्य केंद्र विंग ता.कराड संरक्षक भिंत बांधणे</u>**

सदरचे काम जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे अखत्यारीतील आहे.

१) कामाचे मोजमाप पुस्तिकेमध्ये बाब क्रमांक ४ मध्ये विट बांधकाम बाबीमध्ये भिंतीची एकूण लांबी ८४.५० मीटर इतकी व भिंतीलगतचे २७ पिलर ऑफसेटची मोजमापे, मोजमाप पुस्तिकेमध्ये नोंदवलेले आहेत. त्यानुसार भिंतीच्या विटबांधकामाचे परिमाण २६.५४ घन मीटर व पिलरचे परिमाण १.३४ घन मीटर (एकूण २७.८९ घन मीटर) नोंदविलेले आहे. तसेच बाब क्रंमाक ५ मध्ये वरील प्रमाणे कोपिंगचे एकूण परिमाण २.१० घन मीटर मोजमाप पुस्तकात नोंदविलेले आहेत. तथापि बाब क्रंमाक ६ मध्ये प्लॅास्टरबाबीचे २२ पिलर ऑफसेटचे मोजमापे नोंदविलेले आहेत. त्यानुसार जादा झालेले ५ पिलर ऑफसेट, विटबांधकामाचे व कोपिंगचे परिमाण खालीलप्रमाणे आहे.

१) वीट बांधकाम = ५ X ०.३५ X ०.१२ X १.३० = ०.२७ cum X दर रुपये ४४५२.३०/- cum = रुपये १२०२.१२/- २) कोपींग = ५ X ०.३५ X ०.१२ X ०.१० = ०.०२१ cum X दर रुपये ४२४८.००/- cum = रुपये ८९.२०/- एकूण रुपये १२९१.३२/- म्हणजेच रुपये १२९१.००/- जादा झालेली अदाई संबंधीताकडून वसूल करण्यात आलेली आहे. भरणा केलेल्या चलनाची प्रत सोबत सादर केली आहे. जादा आदाई रक्कम वसूल केली असून तांत्रिकदृष्टया काम योग्य झाले आहे.

२) सदर कामाचे मोजमाप पुस्तकामध्ये संबधीत शाखा अभियंता यांनी तारीख नमुद करून स्वाक्षरी केलेली आहे. कामाचा व कामावरील माहितीफलक बसविल्या बाबत गट विकास अधिकारी यांचे प्रमाणपत्राची प्रत सादर केली आहे. उपरोक्त प्रकरणी जादा मोजमाप लिहीले असल्याने तसेच काम सुरू करण्यापुर्वीचा फोटो काढून नस्तीस ठेवला नसल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती (शिस्त व अपिल) नियम १९६४ नुसार तत्कालिन शाखा अभियंता श्री. यु.एन.देसाई यांना सक्त ताकीद देणेत आलेली आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.२७२/९५/ येरळवाडी बनपूरी रस्ता सुधारणा करणे**

सदरचा रस्ता ग्रामिण मार्ग क्र.३७ असून जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे अखत्यारीतील आहे.

१) मोजमाप पुस्तक क्रमांक १३२४ पान क्रमांक ३६, ३७, ३९ वर ज्या खडीच्या नोंदी केलेल्या आहेत त्या बरोबर असून रस्त्याच्या ०/४०० ते ०/५२५ मीटर लांबीचा पृष्ठभाग हा काळया मातीचा असल्यामुळे ६० मि.मीटर खडीचा एक थर व ४० मि. मीटर खडीचे दोन थराचे काम करून घेतले असून ते तांत्रिक दृष्टया योग्य आहे. त्यामुळे सदर लांबीमध्ये झालेले काम दुबार झालेले नाही.

२) मोजमाप पुस्तक क्रमांक १३२४ पान क्रमांक ४८ वर रॉयल्टी नोंद केली असून बिलासोबत वाहतूकीच्या पासावरील मालाची रॉयल्टी मक्तेदाराने अगोदरच भरणा केली असल्याने उर्वरीत रॉयल्टी रूपये २७,८५९/- बिलातून वसुल करण्यात आली आहे. मक्तेदाराने खाणीतून एकूण ३९५ ब्रास म्हणजे १११७.८५ घन मीटर इतक्या साहित्याची वाहतूक केलेली असून खाण मालकाने दिलेले वाहतूक पास दिनांक ०६ जानेवारी, २०११, दिनांक ०४ नोव्हेंबर, २०११, दिनांक ०५ नोव्हेंबर, २०११, दिनांक ०६ नोव्हेंबर, २०११, दिनांक ०७ नोव्हेंबर, २०११, दिनांक १० नोव्हेंबर, २०११, दिनांक ११ नोव्हेंबर, २०११, दिनांक १२ नोव्हेंबर, २०११, दिनांक १५ नोव्हेंबर, २०११, दिनांक १६ नोव्हेंबर, २०११अन्वये रूपये ७८,९९८/- भरलेली आहे.

**परिच्छेद क्रमांक ३.२७३/९७/ गारळेवाडी चाफ्याचा मळा रस्ता दुरूस्ती करणे**

सदरचा रस्ता ग्रामिण मार्ग क्र.२७२/२७३ असून जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे अखत्यारीतील आहे.

१) सदर रस्त्याचा सा.क्र.०/० ते ०/५०० कि.मी. हा भाग डोंगरातून जात असल्याने रस्त्याच्या कडेने गटर खुदाई करताना रस्त्याच्या चढ उतारामुळे जादा रूंदीने उपलब्ध जमिनीमध्ये गटर काढणे तांत्रिक दृष्टया गरजेचे होते. साखळी क्रमांक ०/५०० ते ०/७०० मध्ये गटरची रूंदी ०.९० मीटर घेऊन गटर खुदाई केली आहे. अंदाजपत्रकामध्ये १.२० मीटर रूंदीने गटर काढणे प्रस्तावित केले आहे. त्यामुळे काम जादा किंवा अनावश्यक झालेले नाही.

२) रस्त्याच्या सिडी वर्क (मोरी बांधकाम) साठी पहिल्या देयकामध्ये दिनांक १७ मे, २०११ रोजी फक्त पाईप जागेवर आणल्याचे देयक आदा केले आहे. पाईप बसविणेची रक्कम मक्तेदारास आदा केली नाही. त्यानंतर मक्तेदाराने खुदाई करून पीसीसी करून पाईप बसविल्या आहेत व नंतर कॉंक्रीट बॉक्स (क्रसिंग कॉंक्रीट) भरला आहे हे तांत्रिक दृष्टया योग्य आहे.

३) मोरी बांधकामाच्या मुख्य भिंतीची तळातील रूंदी १.०६ मीटर व जमीन लेव्हलची रूंदी ०.८१ मीटर अशी आहे. या कॉंक्रीटची बाब क्रमांक ३ आहे व कॉंक्रीट बॉक्स भरण्याची बाब क्रमांक २ आहे. मोजमाप पुस्तक क्रमांक ७९६ मध्ये पान क्रमांक ३५ वर बाब क्रमांक २ कॉंक्रीट बॉक्स भरल्याची नोंद आहे. तसेच त्यातून पाईपचे परिमाण वजा केले आहे. नोंदविलेली मोजमापे बरोबर असून तांत्रिकदृष्टया काम योग्य झाले आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (बांधकाम-३) जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने सातारा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ जानेवारी २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, येरळवाडी-बनपुरी रस्ता सुधारणा करणेबाबत, गारळेवाडी चाफ्याचा मळा रस्ता दुरुस्ती करणे याप्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली आहे, यावर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी खुलासा केला की, उक्त प्रकरणी जिल्हा परिषदेने कारवाई केली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागास उक्त प्रकरणी कारवाई करण्याची आवश्यकता नाही.

यावर समितीने विचारणा केली की, कोणती कारवाई करण्यात आली आहे, यावर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी खुलासा केला की, प्राथमिक आरोग्य केंद्र विंग ता.कराड, संरक्षक भिंत बांधणे या प्रकरणी जादा अदाई झालेली १,२९१/- रुपये रक्कम संबंधिताकडून वसूल करण्यात आली आहे. तसेच जिल्हा परिषदेने उक्त प्रकरणी शाखा अभियंता श्री.देसाई यांना सक्त ताकीद दिली आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, उक्त प्रकरणी करावयाच्या परिगणनेमध्ये काही चुका झाल्याने १,२९१/- रुपये रक्कम अधिक अदा करण्यात आली होती, ती वसूल करण्यात आली आहे. उक्त रक्कम किरकोळ होती.

## अभिप्राय व शिफारशी

प्राथमिक आरोग्य केंद्र, विंग ता.कराड येथील संरक्षक भिंत बांधणे, येरळवाडी बनपुरी रस्ता सुधारणा करणे, गारळेवाडी चाफ्याचा मळा ता.खटाव रस्ता दुरुस्ती करणे या कामांबाबत लेखापरिक्षकांनी घेतलेल्या आक्षेपामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, बांधकाम विभाग सातारा यांनी सन २०१२-२०१३ मध्ये सार्वजनिक आरोग्य इमारती या शिर्षाखाली प्राथमिक आरोग्य केंद्र विंग ता.कराड येथील भिंतीच्या लांबीमध्ये २७ कॉलम (पिलर) असल्याचे मोजमाप नोंदवहीवर नोंदविले असताना प्रत्यक्षात २२ पिलर असणे, त्यामुळे ५.८९ घ.मी. जादा मोजमाप असल्याप्रकरणी रुपये २६,२२४.०५/- एवढी रक्कम वसूल होणे आवश्यक आहे. तसेच मोजमाप नोंदवही वर शाखा अभियंता यांची दिनांकित स्वाक्षरी असणे आवश्यक असताना तशी स्वाक्षरी नसणे, कामाचा व कामावरील माहिती फलकाचा फोटो घेण्यात आलेला नसणे. येरळवाडी बनपुरी रस्ता सुधारणा करणेबाबत बांधकाम विभाग, सातारा यांनी मार्ग व पुल या लेखा शिर्षाखाली या कामासाठी रुपये १४ लाख ५४ हजार ३६१ एवढा खर्च करण्यात आला असून मोजमाप पुस्तिकेत पान क्र.३७ वर ४०० एमएम डब्ल्यूबीएम नोंद केली आहे. पान क्र.३७ वरील ४० एमएम डब्ल्यूबीएमची नोंदीमधील काम वजा केलेले नाही. सदर कामात १४०.५३ घ.मी. गौण खनिज वापरले असून यासाठी रुपये ९९,३२७/- स्वामित्वधन वसूल करणेऐवजी रुपये २७,८५९/- एवढी रक्कम स्वामित्वधन म्हणून वसूल केली आहे तसेच गारळेवाडी चाफ्याचा मळा रस्ता दुरुस्ती करीता रुपये १२,९२,०५६/- एवढा खर्च केला असून सदर रस्त्याच्या बाजूने असणाऱ्या गटरची ०.९० मी. रुंदी आवश्यक असताना १.२० मी. पेक्षा जास्त रुंदीने गटर खुदाई केली आहे त्यामुळे रुपये ९०३९/- एवढी रक्कम वसूल होणे आवश्यक होते. सदर कामात पाईप फिक्सिंग झाल्यानंतर त्याखालील पाया भरणे, पीसीसी कॉंक्रीट इत्यादी कामे नंतर केल्यामुळे रुपये १८४४.०७/- एवढी रक्कम वसूल होणे आवश्यक होते व सीडी वर्क्स साईड वॉल बांधकाम कॉंक्रीटीकरण दोन्ही बाजूचा पाईप व्हाल्यूम वजा करणे आवश्यक असताना २.५४ घ.मी. कामाचे जादा प्रदान झाल्यामुळे रुपये ८०४९.६४/- एवढी रक्कम वसूल होणे आवश्यक होते.

उपरोक्त लेखा आक्षेपाबाबत जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने साक्ष घेतली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, **प्राथमिक आरोग्य केंद्र, विंग ता.कराड येथील संरक्षक भिंत बांधकाम करणे याप्रकरणी जादा अदाई झालेली किरकोळ रक्कम रुपये १२९१/- संबंधितांकडून वसूल करण्यात आली असून मोजमाप नोंदवहीवर दिनांकित स्वाक्षरी नसल्याप्रकरणी शाखा अभियंता श्री.देसाई यांना सक्त ताकीद दिली आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी करण्यात आलेली कारवाई अत्यंत त्रोटक व जुजबी स्वरुपाची असल्याचे दिसून येते, त्यामुळे याप्रकरणी समिती असमाधान व्यक्त करीत आहे.**

**तसेच येरळवाडी बनपुरी रस्ता सुधारणा व गारळेवाडी चाफ्याचा मळा रस्ता दुरुस्ती संदर्भात घेण्यात आलेल्या लेखा आक्षेपाबाबत करण्यात आलेल्या लेखी खुलाशामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, करण्यात आलेली रस्ता दुरुस्ती व गटाराची कामे नोंदविलेली मोजमापे बरोबर असून तांत्रिकदृष्टया योग्य आहेत, त्यामुळे काम जादा व अनावश्यक झालेले नाही. याप्रकरणी समिती समाधान व्यक्त करीत आहे.**

## प्रकरण सहा

## जिल्हा परिषद, सातारा

## साठवण बंधारा वडुज तामखडी, ता.खटाव

**परिच्छेद क्रमांक ३.४२८/५ (सन २०१२-१३)**

५ लघुपाटबंधारे या लेखाशिर्षांतर्गत या कामावर सन २०१२-१३ मध्ये रक्कम रुपये १७,३९,८२०/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१) काम चालू करण्याआधी Trial Pit घेतलेले नाहीत.

२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ मधील नियम १६८ प्रमाणे कार्यकारी अभियंता यांनी कामाची तपासणी केल्याबाबतची नोंद मोजमाप पुस्तकात करणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही केलेली नाही.

३) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.व्हीपीएस.१०९९/प्रशा ९९-०८, दिनांक २० मे, १९९८ नुसारच्या कामाच्या ठिकाणी माहिती फलक लावणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नाही.

४) काम पुर्ण करण्यापूर्वी कामाच्या ठिकाणची छायाचित्र घेतलेली नाहीत.

५) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ मधील नियम क्र.४ प्रमाणे खालील परिशिष्ट २ व ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र. झेडपीए/२०००/प्रक्र४४४/वित्त ९, दिनांक १५ जुलै, २००८ (**परिशिष्ट ६.१**) मधील टीप क्रमांक १ नुसार प्रशासकीय मान्यतेची माहिती पुढील विषय समिती/स्थायी समितीच्या बैठकीस अवलोकनार्थ सादर करणे अनिवार्य आहे. परंतु अशी कार्यवाही केलेली नाही.

६) मोजमाप पुस्तक पान क्र.४९ वर बाब क्र.१ नंतर बाब क्र.६ व ७ ची नोंद घेतली आहे. दोन्ही नोंदीची हस्ताक्षर व शाई वेगळी आहेत. तसेच खटाव तालुका तीव्र दुष्काळाचा असताना दररोज १८ तास पाणी उपसा केल्याची बाब क्रमांक ७ व ८ नुसार नोंद घेतली आहे. सदर बाबत साधार खुलासा होणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सातारा यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) अंदाजपत्रके तयार करणेपूर्वी ट्रायलपीट ची तरतुद नाही, तथापि, अंदाजपत्रक तयार करताना आजूबाजूचे विहिरीचे खुदाईची तलांक पद्धतीने पाहणी करून माती, मुरुम, खडक यांचीउंची पाया अंदाज घेऊनच सदर कामाचे अंदाजपत्रक तयार केलेले आहे.

२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ मधील नियम १६८ प्रमाणे कार्यकारी अभियंता यांनी विहित केलेल्या प्रमाणात कामाची तपासणी बाबत नोंद मोजमाप पुस्तिकेत करून त्याप्रमाणे स्वाक्षरी केली आहे.

३) संबंधित मक्तेदारांस नाम फलकाची रक्कम देयकातून अदा केली नसली तरी मक्तेदाराने नामदर्शक माहिती फलक लावलेला आहे. सोबत त्याची झेरॉक्स प्रत जोडली आहे.

४) शासन निर्णयानुसार उप अभियंता यांनी सदरचे काम सुरू करणेपूर्वी परिसराची छायाचित्रे घेतली आहे. तसेच काम सुरू असताना व काम पूर्ण झालेनंतर घेतलेली छायाचित्रे सोबत जोडली आहेत.

५) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ मधील नियम ४ खालील परिशिष्ट २ ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.झेडपीए/२००/प्रक्र/वित्त दिनांक १५ मे, २००८ मधील टीप क्र.१ नुसार दिलेल्या प्रशासकीय मान्यतेची कामे जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीची मान्यता दिनांक १२ मार्च, २०१३ रोजीच्या मासिक सभेत ठराव क्र.१५३ अन्वये अवलोकनार्थ ठेवणेत आली आहेत.

६) डी वॉटरींग ची नोंद अनावधानाने मोजमाप पुस्तिकामध्ये घेण्यात राहून गेल्याने ती अनुक्रमाने घेतली गेली नाही व सदरची नोंद दुसऱ्या पेनने नमूद केल्याने वेगळ्या हस्ताक्षरात आहे असे वाटते. तथापि, त्याच शाखा अभियंता यांनी नोंदवली आहे. पाणी उपसा कामी झालेला खर्च रुपये २२,६४२/- संबंधित मक्तेदाराकडून वसूल करून चलनाने भरणा करणेत आलेला आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

सातारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ११ एप्रिल, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, नामफलक लावलेला होता तर फलकाचे देयक का अदा केले नाही, रक्कम रुपये २२,६४२/- वसूली कधी केली, रक्कम वसूल केली असल्याने खोटी मापे नोंदविण्यास जबाबदार कोण आहे, यावर कार्यकारी अभियंता (प्रभारी), लघुपाटबंधारे विभाग यांनी खुलासा केला की, पाणी उपसा कामी आलेला खर्च रुपये २२,६४२/- संबधित मक्तेदाराकडून वसूल करून चलनाने शासनाकडे भरणा केलेली आहे.

यावर समितीने विचारणा केली की, सदरची वसूली केव्हा केलेली आहे, वसुली केली असल्यास ती व्याजासहित वसूल केलेली आहे काय, यावर कार्यकारी अभियंता (प्रभारी), लघुपाटबंधारे विभाग यांनी खुलासा केला की, आता वसुली केलेली आहे. व्याजासहित वसुली केलेली नाही. यावर समितीने विचारणा केली की, व्याजासहित वसुली का केलेली नाही, पाणी उपसा झालेला नसताना मोजमाप पुस्तिकेत कशी नोंद घेतली, उप अभियंत्याने चुकीची नोंद घेतलेली आहे. अंदाजपत्रके तयार करण्यापूर्वी ट्रायलपीटची तरतूद नाही. तथापि अंदाजपत्रक तयार करताना आजुबाजूचे विहिरीचे खुदाईची तलांक पद्धतीने पाहणी करून माती मुरुम खडक यांची उंची पाया अंदाज घेऊनच सदर कामाचे अंदाजपत्रक तयार केलेले आहे, असे स्पष्टीकरण दिलेले आहे. १७ लाख रुपये बंधाऱ्यावर खर्च केले आहेत.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, खटाव तालुक्यातील काम असून तेथील सर्व भाग हा मुरुमाचा आहे. तद्नंतर समितीने विचारणा केली की, मोजमाप पुस्तिकेत नोंद घेतली आहे. त्यावेळी आक्षेप खोडून काढता आला असता. नियमानुसार मोजमाप पुस्तिकेत नोंदी घ्याव्याच लागतात. पाण्याचा उपसा का केलेला नाही, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, हस्ताक्षरामध्ये थोडासा बदल झालेला होता. यावर समितीने विचारणा केली की, या ठिकाणी खोडाखोड केल्याचे दिसून येत आहे. ज्या दिवशी काम केले त्याच दिवशी मोजमाप पुस्तिकेत नोंद घेतली जाते तसेच रक्कम वसुल केली आहे काय, तसेच सन २०१२-२०१३ मधील कामाची असताना आता वसुली केलेली आहे. त्यामुळे ५ वर्षाचे व्याज आकारुन वसुली केली जाईल काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, महोदय, आता रक्कम वसूल केलेली आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, पाण्याचा उपसा झालेला नसताना मोजमाप पुस्तिकेत नोंद कशी घेतली. बिनापाणी उपसा केल्यानंतर काम केलेले आहे काय, १८ तास पाणी उपसा केल्याचे आपण सांगत आहात. मुळात त्या कालावधीत दुष्काळ होता. त्यामुळे पाणीच उपलब्ध नव्हते. मला वाटते या ठिकाणी चुकीच्या नोंदी दाखविण्यात आल्या आहेत. जर पाणीपुरवठा झालाच नसेल तर मोजमाप पुस्तिकेत या बाबतची नोंद कशी घेतली, जर खरोखरच काम करून पाण्याचा उपसा केल्याची नोंद पुस्तिकेत केली असेल तर संबंधितांकडून वसुली कोणत्या आधारे केली तसेच या प्रकरणात सुद्धा ज्यांच्याकडून वसुली करण्याची आवश्यकता नाही त्यांच्याकडून वसुली केली जात असेल तर ते योग्य नाही.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, या प्रकरणी संबंधितांकडून थेट वसुली केलेली नाही. जिल्हा परिषदेने अगोदर त्यांच्याकडून खुलासा घेतला होता. संबंधित अधिकारी आता सेवानिवृत्त झालेले आहेत. मी या बाबतची माहिती घेण्यासाठी त्यांना माझ्या कार्यालयात बोलविले सुद्धा होते.

यावर तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी खुलासा केला की, महोदय, सन २०१२-१३ मध्ये मी या जिल्हा परिषदेमध्ये कार्यकारी अभियंता पदी कार्यरत होतो. त्यावेळी वडूज तामखडी साठवण बंधाऱ्याचे काम पूर्णत्वास गेलेले होते. मी या ठिकाणी रुजू होण्यापूर्वीच काम झालेले होते. परंतु देयक अदा करण्यात आलेले नव्हते. मी सदरहू काम झाल्याची स्वत: जाऊन खात्री केलेली आहे. सदरहू काम चांगले झालेले आहे. सदरहू प्रकरणातील वसुली ही केवळ डी वॉटरींगच्या बाबत आहे.

यावर समितीने विचारणा केली की, आपण डी वॉटरींग केले काय, एका बाजूला आपण सांगत आहात की, त्या काळात १८ तास डी वॉटरींग करण्यात आले. मुळात त्या कालावधीत दुष्काळ होता. त्या काळात १८ तास डी वॉटरींग करण्याइतपत पाणी उपलब्ध नव्हते. याचा अर्थ त्या वेळी चुकीचे मोजमाप करून पैसे उचलले आहेत.

तद्नंतर समितीने निदेश दिले की, एकंदरीत या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. या विषयाच्या बाबतीत अनेक सन्माननीय सदस्यांमध्ये मते-मतांतरे आहेत. सन्माननीय सदस्यांची भावना आहे की, कोणावरही विनाकारण वसुलीचा भुर्दंड पडता कामा नये किंवा कारवाई होता कामा नये. समितीचे मत आहे की, या संपूर्ण प्रकरणाची मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शहानिशा करून घ्यावी. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष ठिकाणावर जाऊन चौकशी करावी व त्या बाबतचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल समितीला सादर करावा. जर यामध्ये काही चुकीचे घडले असेल तर ती बाब दुरुस्त करावी. जर लेखा परिक्षणातील आक्षेप सत्य असेल तर एवढ्या कमी रकमेची वसुली होऊ शकत नाही. लेखा परिक्षणातील आक्षेप सत्य असेल तर

या प्रकरणी मोठ्या प्रमाणावर अफरातफर झाली असे समजू शकतो. एकंदरीत या संपूर्ण विषयाच्या बाबतीत विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात येत आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, समितीने सांगितलेल्या बाबीची नोंद घेण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

साठवण बंधारा वडूज तामखडी, ता. खटाव प्रकरणी मोठया प्रमाणात अफरातफर झाल्याचे लेखा परिक्षणामध्ये आक्षेप घेण्यात आलेले असून यासंदर्भात सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांची जबाबदारी निश्चित करून त्यांचेविरूद्ध पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

साठवण बंधारा वडूज तामखडी ता.खटाव सन २०१२-१३ च्या पंचायत राज समिती पुनर्विलोकन अहवालामधील परिच्छेद प्रकरणी सखोल चौकशी करणेत आलेली आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, सातारा यांनी लघुपाटबंधारे विभागातील अधिकारी, कर्मचारी तसेच लाभधारक शेतकरी समवेत संबंधित बंधाऱ्याची पाहणी केलेली आहे.

सद्य:स्थितीत बंधारा हा सुस्थितीत आहे. त्याची साठवण क्षमता ४९.६० स.घ.मी. असून त्याचे लाभक्षेत्र १४ हे. इतके आहे. बंधाऱ्यामध्ये अपेक्षित पाणीसाठा होत असलेने स्थानिक शेतकऱ्यांना त्याचा सिंचनासाठी लाभ होत असलेचे निदर्शनास आले व तसे लेखी म्हणणे लाभधारकांनी सादर केलेले आहे. बंधाऱ्याच्या उपयोगितेबाबत शहानिशा करणेसाठी सभोवतालच्या ५ सिंचन विहिरी व २ विंधन विहिरी यांची पाहणी केली आहे. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे :—

| अ. क्र. | तपासणी केलेले पाण्याचे स्रोत | कठड्याचा भुतलांक (मी.) | पाणी पातळी (मी.) | बांधकाम वर्ष | बंधाऱ्या पासूनचे अंतर | मालकी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिंचन विहीर क्र.१ | १००.९६ | ९७.४० | १९९५ | ८५ मी. | अशोक रगोडसे |
| २ | सिंचन विहीर क्र.२ | १०१.०७ | ९७.४० | १९९८ | ६० मी. | जयवंत मोगोडसे |
| ३ | सिंचन विहीर क्र.३ | १०१.६७ | ९७.८० | १९९५ | २० मी. | शहाजी प्रगोडसे |
| ४ | सिंचन विहीर क्र.४ | १०१.६७ | ९७.३० | १९८२ | १०४ मी. | सुहास प्रगोडसे |
| ५ | सिंचन विहीर क्र.५ | १०१.२५ | ९८.१० | १९९३ | १७० मी. | दत्तात्रय शं. सजगणे |
| ६ | विंधन विहीर क्र.१ | १०१.९४ | - | २००७ | १६५ मी. | अशोक रगोडसे |
| ७ | विंधन विहीर क्र.२ | १०१.३४ | - | २००७ | ६५ मी. | शहाजी प्रगोडसे |

वरील सर्व माहितीवरून सदरच्या बंधाऱ्यामुळे शेतकऱ्यांना सिंचनासाठी फायदा होत आहे. तसेच क्षेत्रिय भेटी वेळी सुद्धा ऊस, मका व ज्वारीची पिके आढळूण आली आहेत.

मार्च, २०११ मध्ये सदर बंधाऱ्याचे पाया खुदाईचे काम सुरू असताना जो पाणी उपसा केला गेला याबाबत शहानिशा केली असता पुढील बाबी निदर्शनास आल्या.

सदर कामाचे पहिले धावते देयक रक्कम रुपये १०,००,०००/- दिनांक ३१ मार्च, २०११ रोजी अदा केले मात्र तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री.तु.दौ.चिंदके यांनी सदर कामाची तपासणी केली नसलेबाबत स्थानिक निधी लेखा यांनी शक उपस्थित केला असल्याने त्यांना तपासणी न केलेबाबतचा खुलासा करणेबाबत नोटिस बजावणेत आलेली आहे. तसेच तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री. नि.ना.सुपेकर यांनी दुसरे धावते व तिसरे अंतिम देयक अदा करताना तपासणी केलेबाबतची दिनांकीत स्वाक्षरी न केलेबाबत त्यांना खुलासा करणेबाबत नोटिस बजावणेत आलेली आहे.

सन २०११ साली वडूज ता.खटाव येथे दुष्काळी परिस्थिती होती. खटाव तालुक्यामध्ये सन २०११ मध्ये ४५ गावामध्ये टँकरने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जात होता, तसेच विविध ठिकाणी ५१ चाराछावण्या सुरू होत्या यावरून पायाखुदाई दरम्यान एवढया मोठया प्रमाणात पाणी उपसा हा संयुक्तिक वाटत नाही. तसेच लाभधारक शेतकऱ्यांनी नोंदविलेल्या जबाबानुसार पायाखुदाईमध्ये एवढया मोठयाप्रमाणात पाणी उपसा केलेची खात्री पटत नाही. या सर्व बाबींवरून दुष्काळी परिस्थिती असतानाही पाणी उपसा केल्याची नोंद चूकीची केली असलेचे सकृतदर्शनी दिसून येते.

आक्षेपातील मुद्यातील पाणी उपसा करणेसाठी १५० तास ऑईल इंजिन वापरासाठीची रक्कम रूपये २२,६४२/- ही अंतिम अमान्य असलेने ठेकेदाराने दिनांक २६ मार्च, २०१८ रोजी चलनाने शासनखाती जमा केलेली आहे. पंचायत राज समितीच्या भेटीच्या कार्यवृत्तांतानुसार सदरची रक्कम ही व्याजासह वसूल करणेचे सुचित केले आहे. त्यानुसार व्याजापोटी रुपये १३,०८४/- ही शासनास जमा करणेबाबत संबंधित ठेकेदारास लेखी कळविणेत आलेले आहे व ती वसूल करून तदनंतर सदर कामाची सुरक्षा ठेव मक्तेदारास अदा करणेत येईल.

तत्कालीन शाखा अभियंता व प्रभारी उप अभियंता श्री.थेटे हे दिनांक ३१ डिसेंबर, २०१६ रोजी उप अभियंता या पदावरून सेवानिवृत्त झाले असून सदरची घटना ही चार वर्षापेक्षा जास्त कालावधीपुर्वीची असल्याने महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२, नियम २७-२(बी) नुसार श्री.थेटे च्या विरुद्ध चौकशी सुरु करणे शक्य नाही.

सदर बाबत समितीने उपस्थित केलेल्या मुद्दयानुसार योग्य ती कार्यवाही केलेली असल्याने सदर मुद्दा गाळणेची विनंती करणेत येत आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**मृद व जलसंधारण विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषद, सातारा यांनी दिलेल्या माहितीशी सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने सातारा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, साठवण बंधारा वडूज तामखडी ता.खटाव या प्रकरणी मोठ्या प्रमाणात अफरातफर झाल्याचा लेखापरीक्षणामध्ये आक्षेप घेण्यात आला आहे. त्या संदर्भात सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, मी स्वत: या कामाची पाहणी केलेली आहे. तेथे साठवण बंधारा आहे. मूळ मुद्दा असा होता की, दुष्काळामध्ये पाणी उपसण्याचे २२ ते २३ हजार रुपये देयक चुकून लावण्यात आले होते. ती रक्कम वसूल करण्यात आली असून ठेकेदाराकडून दंडनीय व्याज वसूल केलेले आहे.

**अभिप्राय व शिफारशी**

साठवण बंधारा वडूज तामखडी ता.खटाव या कामाकरीता ५ लघुपाटबंधारे या लेखाशिर्षांतर्गत सन २०१२-२०१३ मध्ये रक्कम रुपये १७,३९,८२०/- खर्च करण्यात आला आहे, याबाबत पुढीलप्रमाणे आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. काम चालू करण्याआधी ट्रायल पीट घेतलेले नाहीत, कार्यकारी अभियंता यांनी कामाची तपासणी केल्याबाबतची नोंद मोजमाप पुस्तिकेत करणे आवश्यक होते, कामाच्या ठिकाणी माहिती फलक लावलेला नाही तसेच कामपूर्ण करण्यापूर्वी त्याचे छायाचित्र घेतलेले नाही. प्रशासकीय मान्यतेबाबतची माहिती पुढील विषय समिती किंवा स्थायी समितीच्या बैठकीस अवलोकनार्थ सादर करणे आवश्यक होते मात्र तसे करण्यात आले नाही. मोजमाप पुस्तिकेतील नोंदीची हस्ताक्षर व शाई वेगळी आहे. तसेच खटाव तालुक्यात तीव्र दुष्काळ असताना दररोज १८ तास पाणी उपसा केल्याची नोंद घेतली आहे, याबाबत साधार खुलासा होणे आवश्यक आहे.

उपरोक्त लेखा आक्षेपाच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने साक्ष घेतली असता समितीच्या निदर्शनास आले की, खटाव तालुक्यात तीव्र दुष्काळ असताना संबंधित मक्तेदाराने पाणी उपसा केल्याप्रकरणी पाणी उपसा कामी आलेला खर्च रुपये २२,६४२/- वसूल करून चलनाने शासनाकडे भरणा केलेली आहे. सदर वसुली लेखा आक्षेपानंतर नुकतीच करण्यात आलेली असून व्याजासहीत वसुली करण्यात आलेली नाही. पाणी उपसा नसताना मोजमाप पुस्तिकेत उप अभियंता यांनी चुकीच्या पद्धतीने नोंद कशी घेतली ही बाब शंकास्पद आहे. तसेच अंदाजपत्रके तयार करण्यापूर्वी ट्रायलपीटची तरतुद केली नाही. **तथापि, अंदाजपत्रक तयार करताना आजूबाजूचे विहीरीचे खुदाईची तलांक पद्धतीने पाहणी करून माती, मुरुम, खडक यांची उंची पाया अंदाज घेऊनच सदर कामाचे अंदाजपत्रक तयार केलेले आहे असे कार्यकारी अभियंता (प्रभारी) लघुपाटबंधारे विभाग यांनी दिलेले स्पष्टीकरण समाधानकारक नाही व याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.**

साठवण बंधारा बांधण्याच्या कामाचा सर्व भाग मुरुमाचा असला तरी मोजमाप पुस्तिकेत नोंद घेतेवेळी आक्षेप खोडून काढता आला असता, नियमानुसार मोजमाप पुस्तिकेत नोंदी घ्याव्याच लागतात, याठिकाणी मोजमाप पुस्तिकेमध्ये खाडाखोड केल्याचे दिसून येत आहे. ज्यादिवशी काम केले त्याच दिवशी मोजमाप पुस्तिकेत नोंद घेतली जाते तसेच रक्कम वसुली केली जाते. सदर काम सन २०१२-२०१३ मधील असताना आता वसुली केलेली आहे. त्यामुळे ५ वर्षांचे व्याज आकारुन वसुली करणे आवश्यक होते. तत्कालिन कार्यकारी अभियंता यांच्या म्हणण्यानुसार ते त्या ठिकाणी रुजू होण्यापूर्वीच म्हणजेच सन २०१२-२०१३ मध्ये वडूज तामखडी साठवण बंधाऱ्याचे काम पूर्णत्वास गेलेले होते. परंतु देयक अदा करण्यात आलेले नव्हते. सदरहू प्रकरणातील वसुली ही केवळ पाणी उपसा (डी वॉटरींग) केल्याबाबतची आहे. यासंदर्भात समितीचे असे मत आहे की, **खटाव तालुक्यात दुष्काळ असताना १८ तास पाणी उपसा करण्याइतपत पाणी उपलब्ध नसताना त्यावेळी चुकीचे मोजमाप करून पैसे उचलल्याचे दिसून येत आहे. तसेच लाभधारक शेतकऱ्यांनी नोंदविलेल्या जबाबानुसार पायाखुदाईमध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणात पाणी उपसा केल्याची खात्री पटत नाही. यासर्व बाबींवरुन दुष्काळी परिस्थिती असतानाही पाणी उपसा केल्याची नोंद चुकीची केली असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. त्यामुळे एकंदरीतच या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी. प्रत्यक्ष ठिकाणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करावी व त्याबाबतचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल समितीला सादर करावा.**

साठवण बंधारा तलाव कामाचे पहिले धावते देयक रक्कम रुपये १० लाख दिनांक ३१ मार्च, २०११ रोजी अदा केले. तथापि, **तत्कालिन कार्यकारी अभियंता श्री.तु.दौ. चिंदके यांनी सदर कामाची तपासणी केली नसलेबाबत त्यांच्यावर लेखा आक्षेप असल्याने त्यांना नोटीस बजावण्यात आलेली आहे. तसेच त्यानंतरचे तत्कालिन कार्यकारी अभियंता यांनी दुसरे व तिसरे अंतिम देयक अदा करताना तपासणी केलेबाबतची दिनांकित स्वाक्षरी न केल्याबाबत त्यांचेकडून देखील खुलासा करणेबाबत नोटीस बजावण्यात आलेली आहे ही बाब विचारात घेता उपरोक्त दोन्ही तत्कालिन कार्यकारी अभियंता यांचेविरुद्ध चौकशी करण्यात यावी व चौकशीत दोषी आढळल्यास नियमानुसार कारवाई करण्यात यावी. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण सात

## जिल्हा परिषद, सातारा

## अभिकरण शुल्क वसुली केली नसल्याबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.५१६/१८ (सन २०१२-१३)**

अभिकरण शुल्क रक्कम रुपये २७,७७,१३४/- वसुल करून जिल्हा परिषद निधीत भरणा केलेली नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१) महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.स्थाविका-२०११/प्र.क्र.३६/कार्यासन १४२२ दिनांक १३ सप्टेंबर २०१२ **(परिशिष्ट ७.१)** मध्ये यापुढे कोणत्याही प्रकारचे अभिकरण शुल्क आकारणेत येणार नाही असे नमुद आहे. तथापि, सदर शासन निर्णयाच्या निर्गमित दिनांकापर्यंत पुर्वी अस्तित्वात असलेल्या शासन निर्णय क्र.स्थाविका/९००७/प्र.क्र.१७०/का/ १४/२ दिनांक १८ फेब्रुवारी २०११ अन्वये प्राप्त अनुदानाच्या प्रत्यक्ष खर्चाच्या ३ टक्के रक्कम अभिकरण शुल्क म्हणून आकारणे आवश्यक आहे.

२) सन २०११-१२ पर्यंत प्रलंबित असलेले अभिकरण शुल्क रक्कम रुपये २७,७७,१३४/- जिल्हा परिषद निधीत भरणा करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सातारा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जिल्हा परिषद, सातारा या विभागाकडील सन २००८-०९ पासून ते सन २०११-१२ या कालावधीमधील ३ टक्के अभिकरण शुल्क निधी रक्कम रुपये २७,७७,१३४/- इतकी रक्कम जिल्हा परिषद स्व:निधीत भरणा करणे प्रलंबित आहे. जिल्हाधिकारी, सातारा यांचेकडून योजनेच्या अंदाजपत्रकानुसार अनुदान वितरीत केले जाते. त्यामुळे प्राप्त होणाऱ्या अनुदानामध्ये ३ टक्के अभिकरण शुल्काचा समावेश नसतो. त्यामुळे योजनेच्या प्रत्यक्ष खर्चाच्या ३ टक्के अभिकरण शुल्काची अतिरिक्त निधीची मागणी जिल्हाधिकारी सातारा यांचेकडे खालील पत्रान्वये करणेत आलेली आहे.

१) या कार्यालयाकडील पत्र क्र.जा.क्र.ग्रापापुवि/जिपसा/हि-१/१६६/१२ दिनांक २७ जानेवारी, २०१२

२) या कार्यालयाकडील पत्र क्र.जा.क्र.ग्रापापुवि/जिपसा/हि-१/१८१/१२ दिनांक ३० जानेवारी, २०१२

३) या कार्यालयाकडील पत्र क्र.जा.क्र.ग्रापापुवि/जिपसा/हि-१/२५४/१२ दिनांक २३ फेब्रुवारी, २०१२

४) या कार्यालयाकडील पत्र क्र.जा.क्र.ग्रापापुवि/जिपसा/हि-१/ /१५ दिनांक ११ फेब्रुवारी, २०१२

५) या कार्यालयाकडील पत्र क्र.जा.क्र.ग्रापापुवि/जिपसा/हि-१/२५७/१७ दिनांक २५ जुलै, २०१७

सदर निधी प्राप्त होताच प्रलंबित असलेले अभिकरण शुल्क रक्कम रुपये २७,७७,१३४/- जिल्हा परिषदेच्या स्व:निधीमध्ये भरणा करणेची दक्षता घेत आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

सातारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ११ एप्रिल २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अभिकरण शुल्काची रक्कम वसुल करून जिल्हा परिषद निधीत भरणा केली नसल्याचे विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, यामधील अतिक्रमणाबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडे पत्र पाठविण्यात आलेले आहे. जिल्हा परिषदेला काही अभिकरणांचे चार्जेस मिळालेले आहेत.

यावर संचालक, स्थानिक निधी लेखा संचालनालय यांनी माहिती दिली की, यासंदर्भात प्रथम मागणी केली जाते. जिल्हाधिकारी यांच्याकडून तरतूद होत नाही. यावर समितीने या विषयासंदर्भात विभागीय सचिवांची साक्ष लावण्यात यावी असे निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

अभिकरण शुल्क वसुली केली नसल्याप्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांकडून तरतूद होत नसल्याबाबत चौकशी करून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद सातारा या विभागाकडे सन २००८-०९ ते सन २०११-१२ या कालावधीमधील आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत ३ टक्के अभिकरण शुल्क रक्कम रुपये २७,७७,१३४/- जिल्हाधिकारी, सातारा यांचेकडून प्राप्त करून घेवून जिल्हा परिषद स्वनिधीत भरणा करणे प्रलंबित आहे. जिल्हाधिकारी, सातारा यांचेकडून प्राप्त होणाऱ्या अनुदानामध्ये ३ टक्के अभिकरण शुल्काचा समावेश नसतो. त्यामुळे योजनेच्या प्रत्यक्ष खर्चाच्या ३ टक्के अभिकरण शुल्काची अतिरिक्त निधीची मागणी मा. जिल्हाधिकारी,सातारा यांचेकडे खालील पत्रान्वये करणेत आलेली आहे.

१) या कार्यालयाकडील पत्र क्र.जा.क्र.ग्रापापुवि/जिपसा/हि-१/१६६/१२ दिनांक २७ जानेवारी, २०१२

२) या कार्यालयाकडील पत्र क्र.जा.क्र.ग्रापापुवि/जिपसा/हि-१/१८१/१२ दिनांक ३० जानेवारी, २०१२

३) या कार्यालयाकडील पत्र क्र.जा.क्र.ग्रापापुवि/जिपसा/हि-१/२५४/१२ दिनांक २३ फेब्रुवारी, २०१२

४) या कार्यालयाकडील पत्र क्र.जा.क्र.ग्रापापुवि/जिपसा/हि-१/ /१५ दिनांक ११ फेब्रुवारी, २०१२

५) या कार्यालयाकडील पत्र क्र.जा.क्र.ग्रापापुवि/जिपसा/हि-१/२५७/१७ दिनांक २५ जुलै, २०१७

६) या कार्यालयाकडील पत्र क्र.जा.क्र.ग्रापापुवि/जिपसा/हि-१/४०५/१८ दिनांक ४ मे, २०१८

तसेच मा. प्रधान सचिव व अवर सचिव, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे पुढीलप्रमाणे पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

१) जा.क्र.अर्थ/अभि.शु.मागणी/८१/२०१५ दिनांक २३ मार्च, २०१५

२) पत्र क्र.जा.क्र.ग्रापापुवि/जिपसा/हि-५/६०७७/१८ दिनांक १७ ऑक्टोबर, २०१८.

नियोजन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक स्थाविका-२०११/प्र.क्र.३६/कार्यासन-१४८२ दिनांक १३ सप्टेंबर, २०१२ अन्वये अभिकरण शुल्क माफ करण्यात आलेले आहे.

ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद सातारा विभागाकडे सन २००८-०९ ते सन २०११-१२ या कालावधीतील ३ टक्के अभिकरण शुल्क रुपये २७,७७,१३४/- इतकी रक्कम जिल्हा परिषद, स्व:निधीत अंदाजपत्रकानुसार वितरीत केली जाते. त्यामुळे योजनेच्या प्रत्यक्ष खर्चाच्या ३ टक्के अभिकरण मागणी जिल्हाधिकारी यांचेकडे करण्यात आली होती.

नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक स्थाविका-२०११/प्र.क्र.३६/कार्यासन-१४८२, दिनांक १३ सप्टेंबर २०१२ नुसार आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत करण्यात येणा-या विकास कामांवर सर्व सबंधित कार्यान्वयीन यंत्रणाकडून अभिकरण शुल्क आकारण्यात येणार नसल्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (वित्त-३) ग्रामविकास विभागाकडून जिल्हा परिषद, सातारा यांना अभिकरण शुल्काची कोणतीही रक्कम देणे प्रलंबित नाही. इतर प्रशासकीय विभागाकडील अभिकरण शुल्क येणे बाबत जिल्हा परिषद, सातारा यांच्या स्तरावरुन कार्यवाही सुरू आहे.

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे अभिप्राय :-** नियोजन विभागाच्या दिनांक १३ सप्टेंबर, २०१२ च्या शासन निर्णयानुसार आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत अभिकरण शुल्क माफ करण्यात आले आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सातारा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ जानेवारी २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, मंत्रालयीन विभागाच्या अभिप्रायामध्ये नमूद केले आहे की, नियोजन विभागाच्या दिनांक १३ सप्टेंबर २०१२ च्या शासन निर्णयानुसार आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत अभिकरण शुल्क माफ करण्यात आले.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमाच्या कलम १२३ अन्वये ज्या हस्तांतरित योजना आहेत त्याचे जिल्हा परिषदेला अभिकरण शुल्क मिळत असते, ते अभिकरण शुल्क जिल्हा परिषदेला मिळालेले नाही असा तो मुद्दा आहे. ही स्थानिक विकास निधीतील कामे होती. माहे फेब्रुवारी, २०११ मध्ये स्थानिक विकास निधीवर ३ टक्के अभिकरण शुल्क घेण्याचा निर्णय झाला होता. परंतु माहे सप्टेंबर, २०१२ मध्ये तो निर्णय मागे घेण्यात आला. हे जिल्हा परिषदेचे उत्पन्न आहे. जी थकबाकी राहिलेली होती ती त्या त्या विभागांकडे पाठपुरावा करून वसूल केलेली आहे.

### अभिप्राय व शिफारशी

स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत दिनांक १८ फेब्रुवारी, २०११ रोजीच्या शासन निर्णयानुसार सातारा जिल्हा परिषदेने सन २०११-२०१२ पर्यंत प्रलंबित असलेले अभिकरण शुल्क रक्कम रुपये २७ लाख ७७ हजार १३४ वसूल करून जिल्हा परिषद निधीत भरणा केलेली नाही. प्राप्त अनुदानाच्या प्रत्यक्ष खर्चाच्या ३ टक्के रक्कम अभिकरण शुल्क म्हणून आकारणे आवश्यक होते.

ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, सातारा या विभागाकडे सन २००८-२००९ पासून सन २०११-२०१२ या कालावधीमधील आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत ३ टक्के अभिकरण शुल्क रक्कम रुपये २७ लाख ७७ हजार १३४ जिल्हाधिकारी, सातारा यांचेकडून प्राप्त करून घेऊन जिल्हा परिषद स्वनिधीत भरणा करणे प्रलंबित होते. जिल्हाधिकारी सातारा यांचेकडून प्राप्त होणाऱ्या अनुदानामध्ये ३ टक्के अभिकरण शुल्काचा समावेश नसतो त्यामुळे योजनेच्या प्रत्यक्ष खर्चाच्या ३ टक्के अभिकरण शुल्काची अतिरिक्त निधीच्या मागणीसाठी जिल्हाधिकारी, सातारा यांचेकडे तसेच प्रधान सचिव व अवर सचिव, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे पत्रव्यवहार करण्यात आलेला होता.

**तथापि, नियोजन विभागाच्या दिनांक १३ सप्टेंबर २०१२ रोजीच्या शासन निर्णयानुसार आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत करण्यात येणाऱ्या विकास कामावर सर्व संबंधित कार्यान्वयीन यंत्रणाकडून अभिकरण शुल्क आकारण्यात येणार नसल्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जी थकबाकी राहिलेली होती ती त्या त्या विभागाकडे पाठपुरावा करून वसूल केलेली आहे, त्यामुळे समिती याबाबत समाधान व्यक्त करीत आहे.**

## प्रकरण आठ

## जिल्हा परिषद, सातारा

## प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना, शिंगणापूर पाणीपट्टी वसुलीबाबत.

**परिच्छेद क्रमांक ३.५१८/२१ (सन २०१२-१३):**

ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या अधिनस्त ९ तालुक्यांमध्ये १५ प्रादेशिक नळ योजना समाविष्ट आहेत. तथापि, शिंगणापूर योजनेचा समावेश यामध्ये केला नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत:—

१) याबाबतची पाणीपट्टी आकारणी व वसुलीची नोंदवही पहाता, १५ योजना असल्याचे नोंदले आहे. तथापि, याबाबतची नस्ती पहाता शिंगणापूर प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना अस्तित्वात असताना यामध्ये समावेश केला नाही. उप अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, पंचायत समिती, दहिवडी यांचे शिंगणापूर प्रादेशिक योजनेच्या पाणीपट्टी थकबाकी बाबतचे स्मरणपत्र क्र.ग्रापापु/जिप/भांडार/१८३/१३, दिनांक ०१ मार्च, २०१३ नुसार पाणीपट्टी मागणी एकूण रक्कम रुपये १,०१,८८,०००/- इतकी दर्शविली आहे. उपरोक्त पत्रानुसार सदर योजना माहे एप्रिल, २०१२ पासून सुरू असल्याचे नमूद आहे. मात्र उपरोक्त १५ योजनांमध्ये या योजनेचा समावेश नसल्याने, तसेच सदर योजना सन २०१२-१३ पूर्वी अस्तित्वात असल्याबाबत नोंदी नसल्याने पाणीपट्टी वसुली व खर्च याबाबत पडताळणी करता आली नाही.

२) उपरोक्त पत्रात सदर पाणीपट्टी जिल्हा निधी खाते क्र.१० मध्ये भरणा करणेबाबत संबंधित ग्रामपंचायतींना सूचित केले आहे. याबाबत ग्रामीण पाणीपुरवठा विभागात कोणत्याही नोंदीबाबत अभिलेख नसलेने पाणीपट्टी वसुली व योजनेवरील खर्च याची पडताळणी करता आली नाही. विभागाची नोंदवही तसेच विवरणपत्र या अभिलेख्यांत याची नोंद नसल्याने उपरोक्त योजनेवर पाणीपट्टी वसुली व खर्च या रकमा लेख्याबाहेर राहीली असल्याने खुलासा होणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सातारा यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

सदर शकामध्ये नमूद केलेल्या मुद्यांचा खुलासा खालीलप्रमाणे करणेत येत आहे. —

१) जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीच्या दिनांक ६ मे, २००६ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.१४१ अन्वये दैनंदिन देखभाल व दुरुस्तीसाठी शिंगणापूर प्रादेशिक नळ योजना जिल्हा परिषदेच्या ताब्यात घेण्याबाबत मान्यता देण्यात आली होती. त्याप्रमाणे दिनांक १ डिसेंबर, २०१६ रोजी सदर योजना जिल्हा परिषदेने ताब्यात घेतली आहे व देखभाल व दुरुस्तीसाठी श्री.शंभु महादेव प्रादेशिक पाणीपुरवठा मंडळ, शिंगणापूर या मंडळाचे ताब्यात देणेत आली होती. त्यामुळे सदर योजनेची जिल्हा परिषदेकडील नोंदवहीमध्ये नोंद घेण्यात आलेली नाही. माहे मे, २००६ पासून पुढे मंडळामार्फत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सहकार्याने व तांत्रिक मार्गदर्शनाखाली माहे जून, २०१० अखेरपर्यंत योजनेचा पाणी पुरवठा करणेत आला होता. शकामध्ये नमूद केलेल्या उपअभियंता यांच्या पत्रावरील दिनांक १ मार्च, २०१३ नसून दिनांक ११ मार्च, २०१३ हा आहे. सदर योजना चालविलेल्या कालावधीतील जमा खर्चाचे विवरण पत्र सोबत जोडून सादर करीत आहे.

२) पाणीपट्टी वसुली व खर्चाबाबत पंचायत समिती स्तरावर रजिस्टर ठेवणेत आले आहे. विवरणपत्र सोबत जोडले आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :

सातारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ११ एप्रिल, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना, शिंगणापूर पाणीपट्टी वसुलीबाबत समितीस माहिती देण्यात यावी. यावर प्रभारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग यांनी खुलासा केला की, एकूण २६ प्रादेशिक योजना आहेत. त्यापैकी १३ योजना चालू असून १३ योजना बंद आहेत. यावर समितीने विचारणा केली की, यांमधील १३ योजना बंद असण्याची कारणे काय आहेत, यावर प्रभारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग यांनी खुलासा केला की, देयकाची थकबाकी भरलेली नसल्यामुळे काही योजना बंद आहेत. ग्रामपंचायतीने देयक भरले पाहिजे. यावर समितीने विचारणा केली की, या प्रादेशिक योजना आहेत. या योजना ग्रामपंचायतीला चालविण्यासाठी कशा दिल्या, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, काही योजना जिल्हा परिषद चालविते. ९ योजना मंडळांमार्फत चालविल्या जातात.

यावर समितीने विचारणा केली की, नळ योजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करायला पाहिजे. या योजना कोणी मंजूर केलेल्या आहेत, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, या योजना जिल्हा परिषदेने मंजूर केलेल्या आहेत. यावर समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषदेला मंजूर करण्याचे अधिकार आहे काय, एखाद्या ग्रामपंचायतीने पैसे भरले नाही, म्हणून त्यांच्या नळ योजना बंद करायच्या काय, या योजनेसाठी जिल्हा परिषदेने खर्च करायला पाहिजे. तसेच लेबरसाठी शासनाकडून पैसे येतात. जिल्हा परिषदेने ३१५ लेखाशिर्षाखाली योजनेचे पैसे पाठविले पाहिजे. तसेच हा अतिशय गंभीर मुद्दा असून पूर्ण राज्यभर असेच चालू आहे. त्यामुळे याबाबत समिती गांभीर्याने विचार करणार आहे.

तद्नंतर समितीने निदर्शनास आणून दिले की, यासंदर्भात परिपत्रक निर्गमित करण्याची आवश्यकता आहे. ग्रामविकास विभागाचे कक्ष अधिकारी किंवा अवर सचिव आजच्या बैठकीला आले असतील. पंचायती राज समितीच्या प्रत्येक बैठकीला ग्राम विकास विभागाचे वेगवेगळे अधिकारी येत असतात. त्यामुळे अशा प्रकारचे गंभीर मुद्दे त्यांच्या लक्षात येत नाहीत व ते विभागाला काही सूचवित नाही. गेल्या तीन वर्षांपासून हा गोंधळ चालू आहे. विभागाचे सचिव गेल्या तीन वर्षांपासून पंचायती राज समितीच्या बैठकीला येतात. प्रत्येक वेळी एकच अधिकारी आले तर जिल्हा पातळीवरील व गाव पातळीवरील विषयाचे गांभीर्य त्यांच्या लक्षात येईल. असे झाले तर त्यांच्याकडून याबाबत कार्यवाही केली जाऊ शकते. त्यामुळे या विषयाबाबत सचिव पातळीवर चर्चा झाली आहे काय, यावर कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग यांनी विदित केले की, मागील वेळी समितीच्या साक्षीमध्ये पाणी पुरवठा विभागाचे सचिव उपस्थित होते. ते यासंदर्भातील आढावा घेऊन समितीला अहवाल सादर करणार होते.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, ग्रामपंचायतीने देयकाची रक्कम भरली नाही, म्हणून जिल्हा परिषदेने त्यांची योजना बंद करायला नको होती. सदरहू ग्रामपंचायतीच्या वीज बिलाचे पैसे जिल्हा परिषदेने ३१५ लेखाशीर्षाखाली का भरले नाही, हा महत्त्वाचा मुद्दा आहे. ग्रामपंचायतीमधील ज्या योजना बंद आहेत. त्या योजना हस्तांतरीत करण्यात याव्या. बऱ्याच गावांमध्ये ग्रामपंचायतीची क्षमता नसल्यामुळे त्या योजना बंद आहेत. परंतु अशा ग्रामपंचायतींचे पैसे जिल्हा परिषदेने लेखाशीर्ष ३१५ मधून भरावे आणि त्यांच्या बंद असलेल्या योजना चालू कराव्या. सद्या उन्हाळा सुरू असून जिल्ह्यामध्ये बऱ्याच खेड्यांमध्ये पाण्याची टंचाई असेल किंवा काही खेड्यांमध्ये पाणी योजना बंद असेल. त्यामुळे ही बाब गांभीर्याने घेण्यात यावी व बंद असलेल्या ग्रामपंचातींच्या योजना चालू करण्यात याव्या.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, दिनांक ०१ एप्रिल, २०१८ रोजीपर्यंत बॅलेन्स-शीटमध्ये किती पैसे शिल्लक आहेत, यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, वर्षाचे २० टक्के बजेट होते. मागील वर्षी सन २०१७-२०१८ मध्ये १ लाख ९० हजार रूपये शिल्लक होते. यावर समितीने निदेश दिले की, रक्कम शिल्लक असेल तर अशा ग्रामपंचायतींच्या विद्युत बिलाची रक्कम भरण्यात यावी. किती रक्कम शिल्लक आहे, किती रक्कम खर्च झाली याबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी, हा गंभीर विषय आहे. जिल्ह्यामध्ये ३-४ तालुके दुष्काळग्रस्त आहेत. तसेच २६ पैकी १३ योजना बंद आहेत. त्यामुळे जिल्ह्यामध्ये पाण्याची बिकट परिस्थिती निर्माण होऊ शकते. या ३ वर्षांपासून जलयुक्त शिवार योजनेची कामे झाल्यामुळे जिल्ह्यातील पाण्याची पातळी वाढलेली आहे. ज्या ग्रामपंचायतींचे देयक बाकी आहे, ते आपण लेखाशीर्ष ३१५ मधून भरून घ्यावे, जेणेकरून दुष्काळी परिस्थितीमध्ये सर्व गांवांना पिण्याचे पाणी मिळाले पाहिजे. हा विषय संपूर्ण राज्याचा असल्यामुळे याबाबत सचिव, पाणी पुरवठा विभाग आणि सचिव, ग्रामविकास विभाग यांची साक्ष घेण्यात येईल.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, वीज बील आणि पाणीपट्टी किती थकीत आहे, यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, पाणीपट्टीचे १० कोटी ५० लाख रूपये थकीत आहेत. यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, एका कुटुंबाला पाणीपट्टीची रक्कम ५०० ते ६०० रूपये येत असते, परंतु ही रक्कमही दिली जात नाही. या पूर्वी जिल्हा परिषदेने टंचाईमध्ये या सर्व योजना राबविलेल्या आहेत. यावर समितीने निदेश दिले की, हा पाण्याचा महत्त्वाचा विषय आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेने कोणालाही वेठीस धरू नये. जिल्हा परिषदेने संबंधितांकडून वसुली करावी आणि गरजेप्रमाणे त्या त्या ठिकाणी योजना राबवावी.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, सद्या किती तालुक्यांमध्ये टँकरने पाणीपुरवठा चालू आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, माण तालुक्यात २ टँकर आणि खटाव तालुक्यात १ टँकर चालू आहे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली :**

ग्रामपंचायतीने वीज बिलाची थकबाकी न भरल्यामुळे २६ पैकी १३ प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजना बंद आहेत, त्यामुळे जिल्हा परिषदेने ३१५ मधून ग्रामपंचायतींचे वीज देयक भरण्यासंदर्भात ग्रामविकास व पाणीपुरवठा विभागाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :**

सातारा जिल्ह्यातील २६ योजनांपैकी १४ प्रादेशिक पाणीपुरवठा योजना बंद आहेत. उरमोडी कॅनॉलची कामे झाल्याने जुने उद्‌भव चालु झाल्याने खटाव तालुक्यातील पुसेसावळी व औंध योजना चालविण्याची आवश्यकता नाही. शिंगणापूर ता. माण व सासवड व ढवळ, ता. फलटण योजनेच्या कामासाठी आता टंचाई अंतर्गत निधी उपलब्ध होऊ शकेल. उंडाळे ता. कराड योजनेची मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेंतर्गत दुरूस्तीच्या कामास तत्त्वत: मान्यता देण्यात आली आहे. मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजने अंतर्गत पुर्नजिवन करता येईल.

महिमानगड, ता. माण, लोहोम ता.खंडाळा, धोम मांढरदेव ता. वाई, करंजे व गांजे ता. जावली, प्रतापगड ता.महाबळेश्वर व मोरगिरी ता. पाटण योजनांतर्गत गावांसाठी स्वतंत्र योजना आहेत. फक्त टंचाई कालावधीत टोकाकडील गावांची पाण्याची मागणी असते. या योजना चालविण्यासाठी दरमहा येणारा खर्च व टँकरसाठी द्यावा लागणारा खर्च विचारात घेता, योजना चालविणे किफायतशीर नसल्याने योजना सुरू करण्यात आल्या नाहीत.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय :

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे अभिप्राय :-** दहिवडी योजनेसाठी आंधळी धरणात पाणी टाकण्याचे तसेच ढाकणी तलाव, लोधवडे, मोरेमळा व खटाव तालुक्यतील येरळवाडी फिडींग पॉईंटसाठी उरमोडी कॅनॉल मधून भरून पाणी पुरवठा करण्याचे नियोजन आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सातारा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, पाणीपट्टी वसुली झाली काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, समितीसमोर वैयक्तिक पाणीपुरवठा योजनेच्या पाणीपट्टीचा प्रश्न आला होता. काही प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना जिल्हा परिषदेने चालविल्या. त्याची पाणीपट्टी वसुली ग्रामपंचायतीने जिल्हा परिषदेला द्यायला पाहिजे होती. ती पाणीपट्टी अजून जिल्हा परिषदेला मिळालेली नाही. रुपये १ कोटी ५३ लाख वसूल केले आहेत. अजूनही येणे बाकी आहे. ग्रामपंचायतीकडे पाठपुरावा सुरू आहे. जिल्हा परिषदेचे वसुलीचे प्रयत्न सुरू आहेत.

यावर समितीने माहिती दिली की, काही ग्रामपंचायत आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यामुळे ते देयक भरू शकत नाहीत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, कायद्यानुसार जो उपभोक्ता आहे त्याने पाणीपट्टी दिली पाहिजे. अन्यथा जिल्हा परिषदेचे नुकसान होणार आहे.

यावर समितीने विदित केले की, काही ग्रामपंचायतींची आर्थिक क्षमता नसेल तर ते देयक भरण्याबाबत जिल्हा परिषद आपल्या पातळीवर निर्णय घेऊ शकते. ३१५ हेडमधून विविध उत्पन्नाचा जो २० टक्के निधी जिल्हा परिषदेकडे जमा होतो त्यामधून कमकुवत ग्रामपंचायतींना विद्युत देयक भरण्यासाठी जिल्हा परिषद निधी देऊ शकते.

## अभिप्राय व शिफारशी :

सातारा जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या अधिनस्त ९ तालुक्यांमध्ये १५ प्रादेशिक नळ योजनांबाबत असे लेखा-आक्षेप नोंदविण्यात आले आहेत की, पाणीपट्टी आकारणी व वसुलीची नोंदवही पहाता १५ प्रादेशिक नळ योजना नोंदीत आहेत. तथापि, याबाबतची नस्ती पहाता शिंगणापूर प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजना अस्तित्वात असतानादेखील त्यामध्ये या योजनेचा समावेश केला नाही. दिनांक १ मार्च, २०१३ रोजीच्या उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या पत्रानुसार पाणीपट्टीची मागणी एकूण रक्कम रुपये १,०१,८८,०००/- एवढी दर्शविण्यात आलेली होती. सदर योजना माहे एप्रिल, २०१२ पासून सुरु असल्याचे नमूद आहे. तथापि, उपरोक्त १५ योजनांमध्ये शिंगणापूर प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजनेचा समावेश नसल्याने तसेच सदर योजना सन २०१२-२०१३ पुर्वी अस्तित्वात असल्याबाबत नोंद नसल्याने पाणीपट्टी वसुली व खर्च यांबाबत पडताळणी करता आली नाही. सदर योजनेवर पाणीपट्टी वसुली व खर्च या रकमा लेख्याबाहेर राहिल्या असल्याने खुलासा होणे आवश्यक आहे.

उपरोक्त लेखा-आक्षेपाच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांची साक्ष घेतली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, सातारा जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागांतर्गत एकूण २६ प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना असून त्यांपैकी १३ योजना चालू आहेत व १३ योजना बंद आहेत. देयक थकबाकी न भरल्यामुळे सदर १३ योजना बंद आहेत. सदर योजनांपैकी काही योजना जिल्हा परिषद चालविते व ९ योजना मंडळामार्फत चालविल्या जातात. समितीच्या मते एखाद्या ग्रामपंचायतीचे थकीत देयकाचे पैसे भरले नाही म्हणून नळपाणी योजना बंद करणे उचित नाही. सदर योजनांसाठी जिल्हा परिषदेने खर्च करणे आवश्यक आहे. जिल्हा परिषदेला ३१५ लेखाशिर्षाखाली योजनेचे पैसे पाठविले पाहिजेत हा विषय अत्यंत गंभीर आहे. ग्रामपंचायतीने प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेची देयकाची रक्कम भरली नाही म्हणून जिल्हा परिषदेने त्यांची योजना बंद करायला नको होती. ग्रामपंचायतीमधील ज्या योजना बंद आहेत त्या योजना हस्तांतरीत करण्यात याव्यात. बहुतांश गावांमध्ये ग्रामपंचायती आर्थिकदृष्टया सक्षम नसल्यामुळे योजना बंद आहेत, अशा ग्रामपंचायतीची विज देयकाची थकबाकी संबंधित जिल्हा परिषदेने लेखाशीर्ष ३१५ मधून भरणा करणे आवश्यक आहे. राज्यात ज्या ठिकाणी दुष्काळी परिस्थिती आहे अशा सर्व गावांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे ही अत्यावश्यक बाब आहे.

**सातारा जिल्ह्यातील माण व खटाव या पर्जन्यछायेच्या (पावसाचे तुरळक प्रमाण) तालुक्यांमध्ये पिण्याच्या पाण्याची समस्या अत्यंत गंभीर असून पिण्याच्या पाण्याअभावी अनेक कुटुंबे तात्पुरत्या स्वरूपात स्थानांतरण देखील करीत असतात. अशा परिस्थितीत एखाद्या ग्रामपंचायतीकडे पाणी पुरवठा योजनेची कमी रकमेची थकबाकी असल्यास केवळ त्या कारणास्तवच त्या गावाची पाणी पुरवठा योजना बंद करणे ही बाब निश्चितच उचित वाटत नाही. थकबाकीच्या वसुलीसाठी अन्य उपाययोजना करणे आवश्यक असून संबंधित गावचा पाणीपुरवठा बंद करणे हा त्यावर तोडगा होऊ शकत नाही. वसुलीचे प्रभावी उपाय वापरण्यात यावेत, ७/१२, घरपट्टी इत्यादी प्रमाणपत्रे देण्यात येऊ नयेत अशा काही प्रभावी योजना राबवून पाणीवापरकर्त्यांना पाणीपट्टी देण्यास बाध्य करावे. दुष्काळी भाग असल्यास त्याबाबत ठोस उपाययोजना कराव्यात. सबब, पाणीपुरवठा बंद न करता अन्य पर्यायी मार्गांचा वापर जिल्हा परिषदेने करून अशा गावांना पिण्याचे पाणी प्राथम्यक्रमाने उपलब्ध करून देण्याबाबत तात्काळ कार्यवाही करावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**तसेच शिंगणापूर प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना अस्तित्वात असताना देखील या योजनेचा समावेश प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेमध्ये न केल्याप्रकरणी तसेच पाणीपट्टी थकबाकी व वसुली प्रकरणी संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे व या प्रकरणी केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा.**

प्रकरण नऊ

## जिल्हा परिषद, सातारा

## सन २०१२-२०१३ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी

**परिच्छेद क्रमांक ३.१०७२/३२ (सन २०१२-१३)**

| अ. क्र. | नियमबाह्य बाबीचे स्वरुप | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| २ | अफरातफर/अपहार प्रकरणे | सातारा | सामान्य प्रशासन | ३२ | ३,४०,३३,८६८/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सातारा यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सन २०१२-२०१३ या वित्तीय वर्षात मार्च, २०१३ अखेर १२० प्रकरणे रक्कम रुपये ३,५९,२८,५०५.४८/- प्राप्त होती. त्यामधून लेखा परिक्षण कालावधी पर्यंत १२ प्रकरणे निकाली निघालेने १०८ प्रकरणे रुपये ३,४०,३३,८६८.४८/- प्रलंबित होती. प्रलंबित १०८ प्रकरणांपैकी माहे फेब्रुवारी २०१८ अखेर ७५ प्रकरणांचा निपटारा करणेत आला असून त्यामधील रक्कम रुपये २,०३,९९,८६८.६४/- ची (वसूली रक्कम रुपये १४,१६,०३६.७५/- व समायोजन रक्कम रुपये १,८९,८३,८३१.८९/-) पुर्तता झाली असलेने प्रकरणे निकाली निघालेली आहेत. प्रकरणे निकाली काढताना दोषी आढळून आलेल्या व्यक्तीवर खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

| समाविष्ठ ग्रामसेवक | वेतनवाढी बंद | मुळ वेतनावर आणणे | ठपका ठेवणे | सक्त ताकीद | वसुली | कारणे दाखवा नोटीस | सक्तीने सेवा निवृत्त | सेवेतून कमी | बडतर्फ | मयत / परागंदा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ग्रामसेवक ११४ | ३५ | ५ | ९ | १४ | ८ | ११ | ३ | ४ | ५ | १५ |

प्रलंबित ३३ प्रकरणामध्ये रक्कम रुपये १,३६,३४,०००/- गुंतलेली आहे. त्यापैकी माहे फेब्रुवारी, २०१८ अखेर रक्कम रुपये ३,२८,०३९/- वसुलीने व रक्कम रुपये ७१,६६,५१९/- समायोजनाने पूर्तता झालेली आहे. अद्याप रुपये ६१,३९,४४२/- पूर्तता होणे बाकी आहे. शिल्लक रक्कमेपैकी रक्कम रुपये २,७३,९७०/- ही रक्कम कायमस्वरुपी व रुपये ५८,६५,४७२/- समायोजनाने पूर्तता होणे बाकी आहे.

प्रलंबित ३३ प्रकरणांमध्ये ५३ ग्रामसेवकांचा व एका माजी सरपंच यांचा समावेश आहे. त्यामधील ९ ग्रामसेवक सेवानिवृत्त, ५ ग्रामसेवक बडतर्फ, ४ ग्रामसेवक सेवेतून कमी, ६ ग्रामसेवक मयत आहेत. ३३ प्रकरणांपैकी ८ प्रकरणांमध्ये दोषी ४ ग्रामसेवकांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. उर्वरित ३१ ग्रामसेवकांपैकी १५ ग्रामसेवक यांनी पूर्तता केलेली असून १६ ग्रामसेवक यांचेवर कारवाई करणेबाबत गट विकास अधिकारी यांना सुचना देण्यात आल्या आहेत.

ग्रामपंचायत लोणंद यांचेकडील सन १९७३-७४ सालचे एक प्रकरण प्रलंबित असून यामध्ये रक्कम रुपये ५५,७००/- गुंतलेली आहे. सदरचे ग्रामसेवक हे परागंदा असलेने रक्कम माफीसाठी जिल्हाधिकारी, सातारा यांच्यामार्फत विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांच्याकडे दिनांक १५ डिसेंबर, २०१५ अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. तसेच दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजीचे पत्रान्वये रक्कम निर्लेखित करणेबाबत पुनश्च पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

ग्रामसेवक सेवानिवृत्त, मयत, बडतर्फ, सेवेतून कमी असणे इत्यादीं मुळे प्रलंबित प्रकरणे निकाली न निघणेची कारणे आहेत. प्रलंबित प्रकरणे निकाली काढणेसाठी जिल्हा स्तरावरुन आढावा घेऊन कार्यवाही केली आहे. उर्वरित प्रकरणात कारवाई तातडीने पूर्ण करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

सातारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ११ एप्रिल २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, सन २०१२-२०१३ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी यामध्ये अफरातफर / अपहार प्रकरणातील अपहारित रक्कम रुपये ७१.६६ लाखाचे समायोजनापूर्वी लेखापरिक्षकाकडून मान्यता घेतलेली आहे का, नसल्यास त्यासाठी कोणते अधिकारी दोषी आहेत, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, अफरातफर / अपहाराची एकूण १०८ प्रकरणे प्रलंबित होती. त्यानुसार सन २०१२-१३ माहे मार्च अखेर ३ कोटी ४० लाख रुपये रक्कम गुंतलेली होती. सदरहू प्रकरणांपैकी ७५ प्रकरणांचा निपटारा करण्यात आला असून त्यामधून २.०३ कोटी रुपये रकमेची पूर्तता झालेली आहे. सदरहू रकमेमध्ये वसूली रक्कम १४.१६ लाख रुपये व समायोजन रक्कम १.८९ कोटी रुपयांचा समावेश आहे. सदरहू प्रकरणी निकाली काढताना दोषी आढळून आलेल्या जबाबदार व्यक्तींवर कारवाई करण्यात आली आहे. सदरहू प्रकरणे ग्रामपंचायत स्तरावरील लेखे उपलब्ध न झालेली होती. तद्नंतर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामीण पाणीपुरवठा विभाग) यांनी खुलासा केला की, महोदय, १ कोटी ९१ लाख ६१ हजार ३२१ रुपये समायोजित केले आहेत.

यावर समितीने विदित केले की, पंचायती राज समितीचा दौरा निश्चित झाल्यानंतरच अपहाराची प्रकरणे निकाली काढण्याचे लक्षात येते का, ग्रामपंचायत स्तरावरील तपासणीमध्ये गट विकास अधिकारी लक्ष घालत नाहीत. सदरहू वसूलीची कार्यवाही पंचायत विस्तार अधिकारी यांनी केली पाहिजे. ते ग्रामपंचायतीची तपासणी करताना कामकाज समाधानकारक दाखवतात परंतु लेखापरीक्षण झाल्यानंतर आक्षेप नोंदविण्यात येतात. पंचायत विस्तार अधिकारी यांनी समाधानकारक काम असल्याचा शेरा दिल्यामुळे गैरव्यवहार झाला नाही याची ग्रामसेवकाला खात्री पटते. परंतु लेखापरिक्षकांनी लेखा आक्षेप काढल्यानंतर त्यांच्यावर कारवाई करण्यात येते. सदरहू प्रकरणी गट विकास अधिकारी व पंचायत विस्तार अधिकारी यांचेवर देखील कारवाई केली पाहिजे.

सदरहू अपहार प्रकरणी ग्रामसेवकांना वेठीस धरुन त्यांच्यावर कारवाई करण्यात येत असल्याचे समितीने वारंवार पाहिले आहे. सदरहू प्रकरणी गट विकास अधिकारी व पंचायत विस्तार अधिकारी हे दोषी नाहीत का, त्यांना कारवाईमधून का वगळण्यात येते, यापुढील कालावधी मध्ये सदरहू प्रकरणी ग्रामसेवकांसह संबंधित दोषी अधिकारी यांचेवर देखील कारवाई करण्याची दक्षता घेण्यात यावी.

यावर समितीने विचारणा केली की, लेखा आक्षेप लेखापरिक्षकाने काढलेला आहे. जेव्हा रक्कम समायोजित केली जाते त्यावेळी लेखापरिक्षकांना दाखविली पाहिजे. यावर संचालक, स्थानिक निधी लेखा संचालनालय यांनी खुलासा केला की, यासंदर्भात व्हॉव्हर्चस मिळाले नाहीत. नंतर व्हॉऊचर्स आणून दिले जातात. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, आता लेखापरिक्षण झाल्यानंतरच त्यावर निर्णय घेतला जातो.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

सन २०१२-१३ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी, अफरातफर व अपहार प्रकरणी ग्रामसेवकासह संबंधित दोषी गट विकास अधिकारी व विस्तार अधिकारी यांची चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय, असल्यास त्यानुसार संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

१) ग्रामपंचायत लेखापरिक्षण करतेवेळी ग्रामपंचायतीची प्रमाणके, मोजमाप पुस्तके, मुल्यांकने तपासणीस उपलब्ध न करणे इ. कारणांमुळे लेखा परिक्षणामध्ये अपहार/अफरातफर प्रकरणी महाराष्ट्र ग्रामपंचायत (हिशेब तपासणी) नियम, १९६१ च्या नियम १९ अन्वये शासन निर्णय ग्रामविकास विभाग क्र.व्हीपीएफ-१५७०/२१११६-ई, दिनांक ३ नोव्हेंबर १९७० अन्वये कार्यवाही करण्याबाबत सुचित केले जाते. या शासन निर्णयानुसार गट विकास अधिकारी व विस्तार अधिकारी (पंचायत) यांचेकडून तपासणी करून घेऊन खर्च केलेल्या रकमेची खात्री करून जर त्यामध्ये अफरातफर आढळली तर पोलीस केस दाखल करणे किंवा वसुल करणे अशी कार्यपद्धती निर्धारित केलेली आहे.

२) जिल्हा परिषद सातारा अंतर्गत ग्रामपंचायत लेखापरिक्षण अहवालाच्या अनुषंगाने सन २०१२-१३ मध्ये मार्च, २०१३ अखेर १०८ अपहार प्रकरणे प्रलंबित होती. या प्रकरणांवर उपरोक्त दिनांक ३ नोव्हेंबर १९७० च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही केली असून अहवाल वाचनावेळी ७८ प्रकरणे निकाली काढण्यात आलेली असून सदर ७८ प्रकरणांमध्ये दोषी आढळून आलेल्या ११६ ग्रामसेवक यांच्यावर वेतनवाढी रोखणे, ठपका ठेवणे, वसुली करणे इ. कारवाया करण्यात आल्या आहेत. तर ९ प्रकरणात कागदपत्रे उपलब्ध होऊ शकली नाहीत म्हणून पोलीस केसेस दाखल केल्या आहेत. उर्वरित प्रकरणी तपासणी करून कार्यवाही करण्यात येत आहे.

३) मा.समिती प्रमुख यांच्या निर्देशाप्रमाणे या प्रकरणी काही प्रकरणांची चौकशी केली आहे. चौकशीमध्ये आढळून आलेल्या बाबींनुसार पुढीलप्रमाणे वस्तुस्थिती समितीच्या सविनय निदर्शनास आणण्यात येत आहे.

१) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम ५७ (३) नुसार, सरपंच व ग्रामसेवक यांच्या संयुक्त स्वाक्षरीने सर्व व्यवहार होतात. त्यामध्ये कायद्याने संपूर्ण जबाबदारी ही या दोघांवरच ठेवलेली आहे. विस्तार अधिकारी (पंचायत) व गट विकास अधिकारी हे ग्रामपंचायत स्तरावरचे कोणतेही देयक अदा करत नाहीत वा प्रमाणित करत नाहीत. त्यांची पर्यवेक्षीय जबाबदारी येते. तपासणीत वेळोवेळी ग्रामपंचायतींना लेखे अद्ययावत ठेवण्याबाबत विस्तार अधिकारी (पंचायत) व गट विकास अधिकारी यांच्या तपासणीतून निर्देश दिलेले आहेत. त्यामुळे याप्रकरणी विस्तार अधिकारी (पंचायत) व गट विकास अधिकारी यांना सकृतदर्शनी जबाबदार धरता येत नाही.

२) स्थानिक निधी लेखापरिक्षा विभागाकडून ग्रामपंचायतीच्या लेखापरीक्षणामध्ये उघडकीस आलेली अफरातफरीची प्रकरणे महाराष्ट्र ग्रामपंचायत (हिशोब तपासणी) नियम, १९६१ चा नियम १९ अन्वये व ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक क्र.व्हीपीएफ-१५७०/२१११६-ई, दिनांक ३ नोव्हेंबर, १९७० अन्वये निर्धारित केलेल्या कार्यपद्धतीनुसार अंतिम निर्णयासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पाठविण्यात येतात. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून सदर प्रकरणांवर चौकशीअंती निर्णय घेण्यात येतो. प्रकरणपरत्वे संबंधित दोषी ग्रामसेवकांवर शिस्तभंगाची कारवाई/पोलीस केसेस दाखल करणे इ. कारवाया केल्या जातात व त्याबाबत स्थानिक निधी लेखापरिक्षा यांना कळविण्यात येते.

मात्र, वरीलप्रमाणे नमुना दाखल ११ ग्रामपंचायतींच्या प्रकरणांची तपासणी केली असता अफरातफरीच्या प्रकरणांवर वरील शासन निर्णय दिनांक ३ नोव्हेंबर, १९७० अन्वये निश्चित केलेल्या कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करण्यात येत असल्याचे दिसून येत आहे. मात्र महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १४० मधील तरतुदीनुसार अफरातफरीच्या प्रकरणांवरदेखील कार्यवाही होणे आवश्यक असून स्थानिक निधी लेखापरिक्षा कडून कळविण्यात येणारी प्रकरणे कलम १४० मधील तरतुदीनुसार कार्यवाहीसाठी जिल्हा परिषदेकडे पाठविण्याबाबत निर्णय झाल्यास प्रत्येक पंचायतीचे लेखे पंचायत समितीस सादर होतील आणि त्यांच्या मान्यतेने जिल्हा परिषद निर्णय घेऊ शकेल. मात्र सद्यस्थितीत ही कार्यवाही होत नाही.

३) विस्तार अधिकारी (पंचायत) यांनी नियमित तपासणी केल्यानंतर आर्थिक अफरातफरीबाबत निरिक्षण ज्ञापन निर्गमित करून त्यांचे अनुपालनसुद्धा महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम १४० प्रमाणे कार्यवाही झाल्यास अफरातफरीच्या प्रकरणी योग्य निर्णय होऊ शकेल.

४) सद्य:स्थितीत मुंबई ग्रामपंचायत (ग्रामनिधीची अभिरक्षा व गुंतवणुक) नियम, १९५९ चा नियम ३ (१) नुसार फक्त १५० रुपये हातखर्चासाठी ठेवण्याच्या मर्यादा आहेत. मात्र तपासणीत मोठया प्रमाणात हात खर्चाने रकमा खर्ची दाखविल्या आहेत. त्यामुळे सर्व व्यवहार हे बँकेमार्फत अथवा Digital Payment Gateway मार्फत झाल्यास त्यावर निर्बंध येतील. तसेच रुपये १५० ही रक्कम सन १९५९ साली निश्चित केली आहे. तर महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखासंहिता, २०११ चा नियम १४ नुसार रुपये १०००/- पर्यंत स्थायी अग्रिम ठेवण्यास परवानगी आहे. काही बाबी या हातखर्चाशिवाय पर्याय राहात नाही. त्यामुळे ही रक्कम वाढविण्यासाठीही समयोचित विचार व्हावा. हातखर्चातून अदा करण्यात येणाऱ्या रकमांबद्दल खर्चाची साधी पावती जोडण्यात येत असल्याचे दिसून येते. अशा पावत्यांना देण्यात येणारे पावती क्रमांक प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी वेगवेगळे असतात तसेच पावती क्रमांक हस्ताक्षरात लिहिलेले आढळतात त्यामुळे हातखर्चातून किरकोळ रकमा खर्च करताना द्यावयाच्या पावत्यांचे क्रमांक मुद्रीत केलेले असावेत. तसेच पावती पुस्तकांना विशिष्ट सांकेतांक क्रमांक देवून पंचायत समिती स्तरावरुन पावती पुस्तके प्रमाणित करून ग्रामपंचायतींना दिल्यास हातखर्चातून केल्या जाणाऱ्या खर्चावर निर्बंध येतील. मात्र याबाबत शासन स्तरावरुन कार्यपद्धती निर्धारित करून दिल्यास सर्व जिल्हा परिषदांमध्ये एकवाक्यता राखता येईल.

५) ग्रामपंचायतीस दैनंदिन देखभाल दुरुस्ती अंतर्गत वीज, पाणी पुरवठा, स्वच्छता व सादील या बाबींवर खर्च करावा लागतो. त्याकरीता ग्रामपंचायतीने वर्षभरासाठी लागणारा खर्च विचारात घेऊन एकाच यंत्रणेमार्फत खरेदी करण्याचा विचार केल्यास हात खर्चाचे प्रकार टाळता येतील. जसे नालेसफाईसाठी वर्षभर संस्थेबरोबर करार केल्यास हात खर्च करावा लागणार नाही.

६) ग्रामपंचायतीचे सर्व स्तरावर संगणकीकरण होत आले आहे. त्यामुळे सर्व बांधकामे ही Geo Tagged करणे योग्य होईल. त्यामुळे यामध्ये अपहार टळू शकेल.

७) उपरोक्त १ ते ६ येथील अभिप्रायांशिवांय जिल्हा परिषद सातारा यांनी मागील वर्षभरात ग्रामसेवक व विस्तार अधिकारी यांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही केली आहे.

अ) विस्तार अधिकारी (पंचायत) यांनी ग्रामपंचायतीची तपासणी केल्यानंतर तपासणी अहवाल संगणकामध्ये नोंद करून ठेवण्यात यावा व तो तपासणी अहवाल ग्रामपंचायतीस देणे, तपासणी अहवालाची एक प्रत गट विकास अधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांना पाठविणे, ग्रामपंचायतीमध्ये त्रुटी आढळल्यानंतर त्या त्रुटींचे अनुपालन झाल्याचा निर्णय गट विकास अधिकारी यांनी घेतला पाहिजे अशा सूचना सातारा जिल्हा परिषदेकडील जा.क्र.साजिप/मुकाअ/पीए/१८४४/२०१८, दिनांक १ डिसेंबर, २०१८ च्या पत्राने सर्व संबंधितांना देण्यात आल्या आहेत. मात्र याबाबत शासन स्तरावरुन सर्वसाधारण सूचना दिल्यास सर्व जिल्हा परिषदांमध्ये एकवाक्यता राखता येईल.

ब) महाराष्ट्र ग्रामपंचायत लेखासंहिता, २०११ च्या परिशिष्ट-चार नुसार सखोल व सर्वसाधारण तपासणीचा नमुना विहित करण्यात आला आहे. तथापि, ग्रामपंचायतींची वाढीव जबाबदारी १४ वा वित्त आयोगाचा प्राप्त होणारा निधी, ग्रामपंचायत विकास आराखडा या बाबींवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी व सर्व लेख्यांची तपासणी व्हावी यासाठी सातारा जिल्हा परिषदेकडील पत्र क्र.ग्रापं/८/कावि/१५१२०/२०१७, दिनांक २६ डिसेंबर, २०१७ अन्वये ग्रामपंचायत तपासणीचा अतिरिक्त नमुना देण्यात आला आहे. याबाबतही शासनस्तरावरुन सर्वसमावेशक सूचना दिल्यास सर्व जिल्हा परिषदांमध्ये एकवाक्यता राखता येईल.

क) आर्थिक व्यवहार करताना ग्रामपंचायतींनी सर्वसाधारण वित्तीय तत्वांचे पालन करण्याबाबत सातारा जिल्हा परिषदेकडील परिपत्रक क्र.ग्रापं/९/कावि/१३२९/२००९ दिनांक २२ डिसेंबर, २००९ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

ड) ग्रामपंचायतींचे अभिलेख अद्ययावत करण्यासाठी सातारा जिल्हा परिषदेकडील परिपत्रक क्रमांक ग्रापं/५/कावि/१२४९३/२०१६, दिनांक १३ डिसेंबर, २०१६ अन्वये सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. यासाठी दिनांक १५ डिसेंबर २०१६ ते १५ जानेवारी, २०१७ या कालावधीत कालबद्ध कार्यक्रम राबविण्यात आला.

ई) ग्रामपंचायत स्तरावर जमा होणाऱ्या रक्कमांबाबत नमुना नं. ७ व नमुना नं. १० ची पावती पुस्तकांच्या वापरावरील नियंत्रणासाठी पावती पुस्तके पंचायत समिती स्तरावरुन प्रमाणित करून देण्याची कार्यपद्धती निश्चित करण्यात येवून त्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना सातारा जिल्हा परिषदेकडील पत्र क्र. ग्रापं/५/कावि/ ५४२९/२०१७ दिनांक २० मे, २०१७ नुसार निर्गमित करण्यात आल्या आहेत. प्रत्येक पावती पुस्तकांना ग्रामपंचायत स्तरावर अनुक्रमांक देण्याऐवजी पंचायत समिती स्तरावर नोंदवही ठेवण्यात येऊन नोंदवहीतील चढत्या क्रमांकानुसार पावती पुस्तकांना मुद्रीत अनुक्रमांक देऊन ग्रामपंचायतींना पावती पुस्तके वापरासाठी देण्याची कार्यपद्धती या पत्रानुसार निर्धारित करण्यात आली आहे. याबाबतही वर नमुद केल्याप्रमाणे शासन स्तरावरुन सर्वसाधारण सूचना दिल्यास सर्व जिल्हा परिषदांमध्ये एकवाक्यता राहील.

फ) मा.विभागीय आयुक्त, पुणे यांच्या उपस्थितीत दिनांक २८ नोव्हेंबर, २०१७ रोजी ग्रामसेवक व विस्तार अधिकारी यांच्या कामकाजाबाबत बैठक घेतली. या बैठकीत झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम १५४ मधील तरतुदीनुसार ग्रामसेवकांच्या कामकाजाचा सखोल आढावा घेणे व नागरिकांना योग्य सेवा मिळावी म्हणून परिपत्रक क्र.विकास/कार्यासन-१/कावि-५६/२०१८, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१८ अन्वये ग्रामसेवकांच्या बैठकांमध्ये आढावा घ्यावयाच्या विषयांबाबत व परिपत्रक क्र.विकास/ कार्यासन-१/कावि-५५/२०१८, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१८ नुसार ग्रामसेवकांची ग्रामपंचायतीतील उपस्थिती व पंचायत समिती स्तरावर आयोजित करावयाच्या ग्रामसेवकांच्या आढावा सभांबाबत मार्गदर्शक सूचना सर्व ग्रामपंचायतींना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

ग) ग्रामसेवकांना कामकाजामध्ये येणाऱ्या अडचणीं विचारात घेऊन सातारा जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींचे ग्रामसेवक, विस्तार अधिकारी (पंचायत), सहाय्यक गट विकास अधिकारी व गट विकास अधिकारी यांची एक दिवसाची जिल्हास्तरीय कार्यशाळा व आढावा सभा दिनांक १२ डिसेंबर, २०१८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेमध्ये तज्ञ व्याख्यात्यांमार्फत ई-निविदा कार्यपद्धती, आयकर टीडीएस कपात, गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलद्वारे खरेदीची कार्यपद्धती, जी.एस.टी. कार्यपद्धती इ. विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

घ) सातारा जिल्ह्यातील सर्व ग्रामसेवकांचे तीन दिवसांचे निवासी प्रशिक्षण चार बॅचेसमध्ये भिलार, ता.महाबळेश्वर येथे आयोजित करण्यात आले. या प्रशिक्षणामध्ये ग्रामपंचायत स्तरावरील आर्थिक व प्रशासकीय बाबींचे प्रशिक्षण देण्यात आले.

च) विस्तार अधिकारी (पंचायत) यांचे ग्रामपंचायतींच्या कामकाजावरील संनियंत्रण प्रभावी होण्यासाठी विस्तार अधिकारी यांनी क्षेत्रीय पातळीवर जास्तीत जास्त जाऊन ग्रामपंचायतींच्या कामकाजावर पर्यवेक्षण करण्याबाबत सातारा जिल्हा परिषदेकडील पत्र क्र.ग्रापं/५/कावि/ ४०८८/२०१८ दिनांक ३१ मार्च, २०१८ नुसार त्यांच्या कामकाजाबाबत सुसूत्रता येण्यासाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

वरील बाबींच्या अनुषंगाने शासनाकडे दिनांक ३१ डिसेंबर २०१८ च्या पत्रान्वये प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

७) **निष्कर्ष :-** उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम ५७(३) अन्वये ग्रामपंचायतीचे सर्व व्यवहार हे सरपंच व सचिव म्हणून ग्रामसेवक यांच्या संयुक्त स्वाक्षरीने होतात व झालेल्या खर्चास पंचायत मान्यता देत असते. यामध्ये विस्तार अधिकारी (पंचायत) वा गट विकास अधिकारी यांचा थेट संबंध येत नाही. त्यामुळे विस्तार अधिकारी (पंचायत) व गट विकास अधिकारी यांना जबाबदार धरणे उचित ठरणार नाही. मात्र उपरोक्त सर्वसाधारण अभिप्रायात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही केल्यास पंचायतीच्या व्यवहारावर प्रभावी नियंत्रण ठेवता येईल.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्राम विकास विभागाचे अभिप्राय :-** (वित्त-४) जिल्हा परिषद सातारा कडून शासनाकडे दिनांक ३१ डिसेंबर २०१८ च्या पत्रान्वये प्राप्त झालेल्या प्रस्तावाची तपासणी करून यथोचित मान्यतेने आवश्यक ते निर्देश सर्व संबंधितांना देण्यात येतील.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सातारा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, नियमबाह्य बाबीसंबंधी चौकशीची काय परिस्थिती आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी अफरातफर व अपहार प्रकरणी ग्रामसेवकासह संबंधित दोषी गट विकास अधिकारी व विस्तार अधिकारी देखील जबाबदार आहेत काय असा मुद्दा तपासण्यास समितीने सांगितले होते. जिल्हयात एकूण ११८ ग्रामपंचायती आहेत. त्या संदर्भात मी स्वत: प्रश्नावली तयार करून माहिती जमा करून घेतली. ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ५७ (३) नुसार सरपंच व ग्रामसेवक यांच्या संयुक्त स्वाक्षरीने सर्व व्यवहार होतात. झालेला खर्च प्रमाणकाशिवाय आहे किंवा कसे याबाबत मासिक सभेत तपासणी होते. माझ्या असे निदर्शनास आले की, हातखर्चावर मोठया प्रमाणात रक्कम खर्च झालेली आहे. सन १९७० मध्ये हातखर्चाची मर्यादा १०० रुपये आणि १५० रुपये निश्चित केलेली आहे. त्यानंतर सन २०११ मध्ये ही मर्यादा एक हजार रुपये करण्यात आली. आजही हातखर्चावर मोठ्या प्रमाणात रक्कम खर्च झालेली दिसते. दुसरा मुद्दा म्हणजे लेखापरीक्षणामध्ये अफरातफरीच बाब निदर्शनास आल्यानंतर त्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कळविण्यात येते. मुख्य कार्यकारी अधिकारी विस्तार अधिकारी यांच्यामार्फत पुन्हा चौकशी करून घेतात. तसेच गट विकास अधिकारी यांचा अहवाल घेण्यात येतो. जर प्रमाणके दिली असतील तर त्याचे समायोजन करणे आणि जर प्रमाणके देऊ शकला नाही तर त्याबाबत वसुली करणे अशी दोन्ही प्रक्रिया करणे. या दोन्ही प्रक्रिया झाल्या नाही तर त्यांच्या विरुद्ध फौजदार कारवाई करणे. स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाकडून अशा अफरातफरीच्या प्रकरणाबाबत महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १४० (क) नुसार कारवाई करण्यास सांगितले तर संबंधितांना एक महिन्यात पूर्तता करण्याची वेळ असते. त्यानंतर पंचायत समिती त्यावर चर्चा करून झालेल्या बाबी योग्य आहेत की अयोग्य आहेत हे ठरविते. जर काही अयोग्य बाबी झाल्या असतील तर ते मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कारवाई करण्यास शिफारस करतील अशी तरतूद आहे. पण काही प्रकरणे १९७० या नियमाप्रमाणे येतात. त्याऐवजी तशी झाली तर जिल्हा परिषदेला त्याचा फायदा होईल. हातखर्चाची रक्कम वाढविली पाहिजे असे जिल्हा परिषदेचे म्हणणे आहे. जर नालेसफाई करायची असेल तर त्यासाठी कंत्राटदार नेमून काम करु शकत नाही. त्याऐवजी दोन माणसे नेमून काम करून घ्यावे लागते. जिल्हा परिषदेची अशी मागणी आहे की, अशाप्रकारच्या बाबी टाळावयाच्या असतील तर

ग्रामपंचायत स्तरावर वर्षासाठी सेवा पुरवठादार म्हणून मजूर सहकारी संस्थांशी करार करावा. म्हणजे आवश्यकता लागेल त्यावेळी मजूर मिळतील. किरकोळ साहित्य, वीज बल्ब याचे दर ठरवून द्यावेत. तसेच जी प्रमाणके ग्रामपंचायत स्तरावर तयार केली जातात ती तालुका स्तरावर, जिल्हास्तरावर तयार करावीत आणि त्याला नंबर देऊन त्या त्या ग्रामपंचायतीला इश्यू करावीत. म्हणजे प्रमाणकाची खात्री राहील आणि प्रमाणक कोठून आणले असा आक्षेप कोणी घेऊ शकणार नाही. दुसरे म्हणजे ग्रामपंचायतीचे सर्व स्तरावर संगणकीकरण होत आले आहे. त्यामुळे सर्व बांधकामे जिओ टॅग करणे योग्य होईल. जेथे जेथे भौतिक कामे आहेत ती जिओ टॅग केली तर अपहार टळू शकेल. जिओ टॅग केले तर भिंत बांधली की नाही, रस्ते बांधले की नाही, पेव्हर ब्लॉक टाकले की नाही या बाबी कालांतराने कधीही पहाता येऊ शकतील. दुसरा एक मुद्दा असा की, आता आमच्या सर्व ग्रामपंचायती ऑनलाईन झालेल्या आहेत. सेवाकेंद्रावर केंद्र चालक नेमले आहेत त्यांना १२ हजार रुपये वेतन देण्यात येते. ग्रामसेवक व विस्तार अधिकारी यांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी विस्तार अधिकारी (पंचायत) यांनी ग्रामपंचायतीचे तपासणी केल्यानंतर तपासणी अहवाल संगणकामध्ये नोंद करून ठेवण्यात यावा व तो तपासणी अहवाल ग्रामपंचायतीस द्यावा. तपासणी अहवालाची एक प्रत गट विकास अधिकारी व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांनी पाठविणे. ग्रामपंचायतीमध्ये त्रुटी आढळल्यानंतर त्या त्रुटींचे अनुपालन झाल्याचा निर्णय गट विकास अधिकारी यांनी घेतला पाहिजे. जोपर्यंत गट विकास अधिकारी त्या आक्षेपाची पूर्तता करीत नाही तोपर्यंत ते आक्षेप तसेच राहतील. जसे आपण बांधकाम विभागामध्ये व्हीजीलन्स क्वॉलिटी कंट्रोल तपासणीसाठी जाते त्या धर्तीवर कोणत्याही बाबीची पूर्तता झाल्याशिवाय कोणतेही देयक देण्यात येऊ नये अशा बाबी केल्या तर भविष्यात नियंत्रण ठेवू शकतो.

यावर समितीने निदेश दिले की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा सादर केलेला आहे. गट विकास अधिकारी आणि विस्तार अधिकाऱ्यांना महिन्यातून किमान दोन वेळा ग्रामपंचायतीची सखोल तपासणी करण्याचे अधिकार आहेत. लेखापरिक्षकांनी आक्षेप घेतल्यानंतर गैरप्रकार उघडकीस येतात हे संबंधित अधिकाऱ्यांच्या वेळीच लक्षात का आले नाही असा समितीचा प्रश्न आहे. ग्रामपंचायतीचा कारभार नियमानुसार चालतो किंवा कसे हे तपासण्याचे काम गट विकास अधिकारी आणि विस्तार अधिकाऱ्याचे आहे. गट विकास अधिकारी आणि विस्तार अधिकाऱ्यांना ग्रामपंचायतीमध्ये अफरातफर झाल्याचे लक्षात येत नसेल तर त्यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलेले आहे, असेच म्हणता येईल. त्यांनी कोणतीही तपासणी न करता ती मोघम स्वरुपाची केलेली आहे. म्हणून संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करावी, अशी समितीची मागणी आहे. शासनाने गट विकास अधिकारी आणि विस्तार अधिकाऱ्यांना ग्रामपंचायतीमध्ये कोणती तपासणी करावयाची आहे ते निश्चित करून दिलेले आहे. लेखापरिक्षकांनी आक्षेप घेतल्यानंतर गैरप्रकार उघडकीस येतात हे संबंधित अधिकाऱ्यांच्या त्याचवेळी लक्षात का येत नाही असा समितीचा प्रश्न आहे. गट विकास अधिकारी हे ग्रामसेवकाचा गोपनीय अहवाल लिहीतात. याचाच अर्थ संबंधित अधिकारी नियमानुसार तपासणी करीत नाही, आपले कर्तव्य बजावित नाही, असेच दिसून येत आहे.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, ग्रामपंचायतीची तपासणी विस्तार अधिकारी यांनी केलेली आहे किंवा कसे याबाबत मी चौकशी केलेली आहे. चौकशीमध्ये कागदपत्रे नाहीत आणि नोंदी व्यवस्थित घेतलेल्या नाहीत, असे आक्षेप नोंदविलेले आहेत. यावर समितीने निदेश दिले की, लेखापरिक्षकांकडून अफरातफरीसंदर्भात आक्षेप घेतले जातात. परंतु, ही बाब विस्तार अधिकारी यांच्या त्याचवेळी लक्षात का येत नाही. सदरहू प्रश्न सातारा जिल्हा परिषदेतील असला तरी तो संपूर्ण राज्यातील जिल्हा परिषदांचा आहे. विस्तार अधिकारी यांनी ग्रामपंचायातीची नियमानुसार चौकशी केली पाहिजे, असे अभिप्रेत आहे. परंतु, तसे होत नाही. राज्यातील अनेक जिल्हा परिषदेत अशीच प्रकरणे आहेत. मागिल समितीच्या बैठकीत याबाबत वाच्यता झालेली होती. परंतु, त्याची म्हणावी तशी अंमलबजावणी होत नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे सचिवांनी राज्य स्तरावरुन या सर्व बाबींची दक्षात घेतली पाहिजे. त्यानुसार दोषी अधिकाऱ्यांवर लवकरात लवकर कारवाई करावी, अशी समितीची सूचना आहे. समितीने यापूर्वी आयुक्तांची बैठक घेतली होती, त्यावेळी देखील अशाच प्रकारची सूचना केलेली होती.

यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, गट विकास अधिकारी आणि विस्तार अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायतीची महिन्यातून किमान दोन वेळा आणि ८ वेळा सामान्य सखोल तपासणी करणे अपेक्षित आहे. आता ही तपासणी संगणकीय मुक्तपणे केली जाणार आहे. ग्रामपंचायत जवळ असेल तर त्या ठिकाणी तपासणी केली जाते. त्यामुळे तपासणीचा मुख्य उद्देश सफल होत नाही. कामाच्या व्यापामुळे संबंधित अधिकाऱ्यांना ग्रामपंचायतीची १० वेळा तपासणी करणे हे शक्य नाही. यावर समितीने निदर्शनास आणून दिले की, एकाही गट विकास अधिकाऱ्याने किंवा विस्तार अधिकाऱ्याने वर्षातून एकदाही ग्रामपंचायतीची तपासणी केलेली नाही. १५ दिवस अगोदर ग्रामसेवक आणि सरपंचाला नोटीस पाठवून सखोल तपासणी करणे आवश्यक आहे. परंतु, नियमानुसार गट विकास अधिकारी किंवा विस्तार अधिकारी अशा प्रकारची तपासणी करीत नाही. यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, गट विकास अधिकारी तपासणी करीत असतात. पंरतु, काही वेळा त्यांना कामाच्या व्यापामुळे तपासणी करणे शक्य होत नाही.

यावर समितीने विचारणा केली की, सचिवांनी गट विकास अधिकारी यांना कामाच्या व्यापामुळे तपासणी करणे शक्य होत नाही असे उत्तर दिलेले आहे. गट विकास अधिकारी यांना वेळ नसतो काय, यावर प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी खुलासा केला की, गट विकास अधिकारी आणि विस्तार अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायतीची महिन्यातून किमान दोन वेळा आणि ८ वेळा जनरल सखोल तपासणी करणे अपेक्षित आहे. आता कॉम्प्युटरली रॅण्डमली तपासणी केली जाणार आहे.

## अभिप्राय व शिफारशी

सन २०१२-२०१३ या वर्षामध्ये जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये अफरातफर व अपहाराच्या एकूण १२० प्रकरणांमध्ये रुपये ३,५९,२८,५०५.४८/- एवढी रक्कम आहे. लेखापरिक्षण कालावधीपर्यंत १२ प्रकरणे निकाली निघाल्याने १०८ प्रकरणामधील रुपये ३,४०,३३,८६८.४८/- एवढी रक्कम प्रलंबित होती. सदर १०८ प्रकरणांपैकी माहे फेब्रुवारी, २०१८ अखेर ७५ प्रकरणांचा निपटारा करण्यात आलेला असून त्यामधील रुपये २,०३,९९,८६८.६४/- (वसुली रक्कम रुपये १४,१६,०३६.७५/- व समायोजन रक्कम रुपये १,८९,८३,८३१.८९) एवढ्या रकमेची पूर्तता झालेली असल्याने प्रकरणे निकाली निघालेली आहेत. उर्वरित ३३ प्रकरणांमध्ये गुंतलेल्या रुपये १,३६,३४,०००/- रकमेपैकी माहे फेब्रुवारी, २०१८ अखेर रुपये ३,२८,०३९/- वसुलीने व रक्कम रुपये ७१,६६,५१९/- समायोजनाने पुर्तता झालेली असली तरी अद्याप रुपये ६१,३९,४४२/- एवढ्या रकमेची पुर्तता होणे बाकी आहे. सदर रकमेपैकी रुपये २,७३,९७०/- ही रक्कम कायमस्वरुपी व रुपये ५८,६५,४७२/- समायोजनाने पुर्तता होणे बाकी आहे.

जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या उपरोक्त लेखी माहितीच्या आधारे समितीने साक्ष घेतली असता समितीच्या निदर्शनास आले की, सन २०१२-२०१३ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी यामध्ये अफरातफर व अपहार प्रकरणांतील अपहारीत रक्कम रुपये ७१ लाख ६६ हजाराचे समायोजनापूर्वी लेखापरिक्षकांकडून मान्यता घेताना ग्रामपंचायत स्तरावरील लेखे उपलब्ध झालेली नाहीत. यावरुन असे दिसून येते की, ग्रामपंचायत स्तरावरील तपासणीमध्ये गट विकास अधिकारी लक्ष घालत नाहीत. सदर वसुलीची कार्यवाही पंचायत विस्तार अधिकारी यांनी केली पाहिजे. विस्तार अधिकारी ग्रामपंचायतीची तपासणी करतेवेळी कामकाज समाधानकारक असल्याचे दाखवतात. परंतु लेखापरिक्षण झाल्यानंतर आक्षेप नोंदविण्यात येतात. पंचायत विस्तार अधिकारी यांनी समाधानकारक असा शेरा दिल्यामुळे गैरव्यवहार झाला नाही याची ग्रामसेवकाला खात्री पटते. परंतु लेखापरिक्षकांनी आक्षेप काढल्यानंतर त्यांच्यावर कारवाई करण्यात येते. सदरहू प्रकरणी गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी (पंचायत) हे ग्रामपंचायत स्तरावरचे कोणतेही देयक अदा करत नाहीत वा प्रमाणित करत नाही. तथापि, त्यांचेवर पर्यवेक्षकीय जबाबदारी येते त्यामुळे त्यांचेविरुद्ध देखील कारवाई होणे अभिप्रेत आहे. जेणेकरून पंचायतीच्या व्यवहारावर प्रभावी नियंत्रण ठेवता येईल. पंचायती राज समितीचा दौरा निश्चित झाल्यानंतर अपहाराची प्रकरणे निकाली काढण्यात आल्याचे दिसून येते. त्यामुळे समिती प्रस्तुत प्रकरणी तीव्र नाराजी व असमाधान व्यक्त करीत आहे.

ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम ५७ (३) नुसार ग्रामपंचायतींमध्ये सरपंच व ग्रामसेवक यांच्या संयुक्त स्वाक्षरीने सर्व व्यवहार होतात. झालेला खर्च प्रमाणकाशिवाय आहे किंवा कसे याबाबत मासिक सभेत तपासणी होते. सातार जिल्ह्यातील ग्रामपंचायतींमध्ये हात खर्चावर मोठ्या प्रमाणावर रक्कम खर्च झालेली आहे. सन १९७० मध्ये हातखर्चाची मर्यादा १०० रुपये आणि १५० रुपये निश्चित केलेली होती. त्यानंतर सन २०११ मध्ये ही मर्यादा एक हजार रुपये करण्यात आली. अद्याप हातखर्चावर मोठ्या प्रमाणात रक्कम खर्च झालेली दिसते. लेखापरीक्षणामध्ये अफरातफरीची बाब निदर्शनास आल्यानंतर त्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कळविण्यात येते. तद्नंतर मुख्य कार्यकारी अधिकारी, विस्तार अधिकारी यांच्यामार्फत चौकशी करून घेतात तसेच गटविकास अधिकारी यांचा अहवाल घेण्यात येतो. जर प्रमाणके दिली असतील तर त्यांचे समायोजन करणे आणि जर प्रमाणके देऊ शकला नाही, तर त्याबाबत वसुली करणे या दोन्ही प्रक्रिया न झाल्यास फौजदारी करवाई करणे अभिप्रेत आहे. गटविकास अधिकारी आणि विस्तार अधिकाऱ्यांना महिन्यातून किमान दोन वेळा ग्रामपंचायतीची सखोल तपासणी करण्याचे अधिकार आहेत. लेखापरिक्षकांनी आक्षेप घेतल्यानंतर गैरप्रकार उघडकीस येतात, याबाबत समिती सखेद आश्चर्य व्यक्त करीत आहे.

**गटविकास अधिकारी आणि विस्तार अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायतींची महिन्यातून किमान दोन वेळा आणि ८ वेळा सामान्य सखोल तपासणी करणे अपेक्षित आहे. एकाही गटविकास अधिकाऱ्याने किंवा विस्तार अधिकाऱ्याने वर्षातून एकदाही ग्रामपंचायतींची तपासणी केलेली नाही ही बाब अत्यंत गंभीर आहे. गटविकास अधिकारी व विस्तार अधिकाऱ्यांना ग्रामपंचायतीमध्ये अफरातफर झाल्याचे लक्षात येत नसेल तर त्यांनी जाणीवपूर्वक त्याकडे दुर्लक्ष केलेले आहे असे समजण्यास कोणताही प्रत्यवाय नाही. तसेच ग्रामपंचायतींची कोणतीही तपासणी न करता मोघम स्वरुपाची कार्यवाही केलेली आहे. अधिकारी क्षेत्रिय स्तरावर भेटी न देताच कामे करतात, शासन निर्णयात जिल्हा परिषदेच्या पंचायत समिती व जिल्हा परिषद स्तरावर संपूर्ण अधिकाऱ्यांनी त्या त्या क्षेत्रात किंवा त्यांच्या कार्यक्षेत्रात किती वेळा भेट देऊन तपासणी करणे, पाहणी करणे, सूचना देणे, कारवाई करणे इत्यादी बाबी अपेक्षित आहेत. या सर्व बाबींचा**

**त्यात समावेश करून पुन्हा नव्याने एक सर्वंकष शासन निर्णय निर्गमित करावा. त्यात संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांना महिना/वर्षातून किती भेटी देणे आवश्यक आहे हे स्पष्ट नमुद करावे, त्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करून उल्लंघन करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाईचे बंधन टाकावे इत्यादी बाबतीत विभागाने सत्वर कारवाई करून त्याबाबतचा शासन निर्णय त्वरेने निर्गमित करण्यासंदर्भात ठोस कारवाई करावी व याबाबत केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस करीत आहे.**

## प्रकरण दहा

## जिल्हा परिषद, सातारा

## सन २०१२-२०१३ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबी

**परिच्छेद क्रमांक ३.१०७२/२३ (सन २०१२-१३)**

| अ.क्र. | नियमबाह्य बाबीचे स्वरुप | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १७ | इतर बाबी | सातारा | वित्त | २३ | ४,२४,८४,९८३/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सातारा यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) सन २०१२-२०१३ अखेर रक्कम रुपये ४,६९,४५,९७०/- अभिकरण शुल्क येणे असून त्यापैकी रक्कम रुपये ४४,६०,९८७ इतकी रक्कम वसूल झाली आहे. उर्वरित रक्कम रुपये ४,२४,८४,९८३/- वसूली होणेसाठी जिल्हा परिषदेकडील संबंधित विभागांना शासनाकडे अभिकरण शुल्क मागणी करणेस कळविले आहे. त्यानुसार त्यांचेकडून मागणी करणेत आली आहे व पाठपुरावा सुरु आहे. वसूलीबाबत विभागांना सूचित केले आहे.

२) अशासकीय माध्यमिक शाळांना वितरीत करण्यात येणारे वेतनेतर अनुदान हे शिक्षण विभाग (माध्यमिक), सवलत शाखा, यांचेकडे परस्पर शिक्षण संचालक, पुणे यांचेकडून उपलब्ध करून दिले जाते व त्यांचेकडून त्याचा विनियोग केला जातो. त्यामुळे सदरच्या अनुदानाची रक्कम वार्षिक लेख्यात दिसून येत नाही. केवळ सदर खर्चाच्या ५ टक्के अभिकरण शुल्क जिल्हा परिषदेस शिक्षण विभागाकडून (माध्यमिक) उपलब्ध करून दिले जाते. सदर अनुदानाचे लेखापरिक्षण, महालेखापाल, मुंबई, यांचेकडून वेळोवेळी केले जाते. सन २०१२-१३ मध्ये प्रत्यक्ष वसूली जमा रक्कम रुपये ७३,५८३/- झाल्याने त्याची नोंद घेतली आहे. सोबत चलनाची प्रत व विभागाकडील माहिती तक्ता सादर केला आहे.

३) सन २०१२-१३ अखेर रक्कम रुपये ४,६९,४५,९७०/- येणे असून त्याची अद्ययावत नोंदवही सन १९९२-९३ पासून ठेवणेत आली आहे. सदर आकारणी शासन निर्णयानुसार केली असून त्याची नोंदवही दरवर्षी लेखा परिक्षणास दाखविणेत आली आहे. सोबत सन २०१२-१३ या वर्षातील नोंदवहीची छायाप्रत जोडली आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

सातारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ११ एप्रिल, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, अभिकरण शुल्काची रक्कम रुपये ४.२४ कोटी शासनाकडून प्राप्त करण्यासाठी जिल्हा परिषदेने कोणते प्रयत्न केले, यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, सन २०१२-२०१३ अखेर रुपये ४,६९,४५,९७०/- अभिकरण शुल्क येणे होते. त्याचवर्षी रुपये ४४,६०,९८७/- इतकी वसुली झालेली आहे. उर्वरित रक्कम रुपये ४,२४,८४,९८३/- वसूली होण्यासाठी जिल्हा परिषदेकडील संबंधित विभागांना शासनाकडे अभिकरण शुल्क मागणी करण्यास कळविले आहे. त्यानुसार त्यांच्याकडून मागणी करण्यात आली आहे व पाठपुरावा सुरु आहे. वसुली करण्यासाठी विभागांना आवश्यक त्या सूचना दिलेल्या आहेत. दिनांक १३ सप्टेंबर, २०१२ च्या शासन निर्णयानुसार अभिकरण शुल्क बांधकाम विभाग, लघु पाटबंधारे विभाग, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाला माफी दिलेली आहे.

यावर समितीने विचारणा केली की, रुपये ४४,६०,९८७/- इतकी वसुली झालेली असून, ती कोणाकडून केलेली आहे, यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, माध्यमिक शिक्षण विभागाकडे ७३ हजार रुपये होते. यावर समितीने विचारणा केली की, सदरहू पैसा शिल्लक कसा राहिला, यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, ही शिल्लक नाही. यावर समितीने विचारणा केली की, माध्यमिक शिक्षण विभागाकडे अतिरिक्त पैसा कशासाठी दिला, यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, हा अभिकरण शुल्क एजन्सी चार्जेस आहे. एकात्मिक बालविकास सेवा योजना विभाग १ कोटी ८२ लाख १ हजार ४७८ रुपये जिल्हा परिषदेला येणे आहे. माध्यमिक विभागाचे ७ लाख १८ हजार ७५१ रुपये, प्राथमिक शिक्षण विभागाचे ५ लाख ७ हजार ४६१, आरोग्य विभागाचे ९ लाख ३४९ रुपये, कुटुंब कल्याण योजनेमध्ये ६५ लाख ८१ हजार

७७५ रुपये, कृषि विभागाचे ४१ लाख २९ हजार ८९७ रुपये, समाजकल्याण विभागाचे ३९ लाख ९० हजार १४५, बांधकाम दक्षिण विभागाचे ५७ लाख ४६ हजार ९०६, बांधकाम उत्तर विभाग २२ लाख, ९० हजार ९८२, लघु पाटबंधारे विभाग १० लाख ४५ हजार ७७८ रुपये, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग २७ लाख ९३ हजार ९९७ रुपये असे मिळून ४ कोटी ६९ लाख ४५ हजार ९७० रुपये जिल्हा परिषदेला येणे आहे. यापैकी ४४ लाख ६० हजार ९८७ रुपये वसूल केलेले आहे.

यावर समितीने माहिती दिली की, सदरहू मुद्दा शासन स्तरावरील आहे. सर्व खातेप्रमुख मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अधिनस्त काम करीत असतात. अशा वेळी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्याकडून हिशेब घेण्याचे काम करतो. खासदार निधी असेल तर अभिकरण शुल्क जिल्हा परिषदेला मिळते. महिला व बाल कल्याण विभागाकडून अभिकरण शुल्क मिळते. काही विशिष्ट लेखाशिर्षामधून जिल्हा परिषदेला अभिकरण शुल्क जमा होत असते.

यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, दिनांक १३ सप्टेंबर, २०१२ रोजीच्या शासन निर्णयानुसार अभिकरण शुल्क कमी केलेले आहे. यावर संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय, यांनी खुलासा केला की, शासनाचे असिस्मेंट केल्यानंतर ते दिले जाते. अर्थसंकल्पीय तरतुद वेगळी दाखविली जाते. शासनाचे विभाग प्रमुख असिस्मेंट करीत नाही.

यावर समितीने विचारणा केली की, उत्पन्नाच्या स्त्रोताकडे लक्ष दिले जात नाही. सद्य:स्थितीमध्ये पाणीपट्टी किती थकित आहे. यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी खुलासा केला की, सद्य:स्थितीमध्ये १० कोटी रुपयांची पाणीपट्टी थकित आहे. तद्नंतर समितीने निदेश दिले की, सदरहू मुद्दा शासन स्तरावरील असल्यामुळे विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

सन २०१२-१३ अखेर रुपये ४,६९,४५,९७०/- अभिकरण शुल्क येणे होते व त्याच वर्षी रुपये ४४,६०,९८७/- इतकी वसुली झालेली आहे. उर्वरित रक्कम रुपये ४,२४,८४,९८३/- एवढया वसुलीसाठी तसेच रुपये १० कोटी एवढी पाणीपट्टी थकीत रक्कम वसुलीसाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे; अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची करणे काय आहेत ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

१) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक गविआ-१०९९/५० क्रमांक ३४५, दिनांक १९ मे, १९९९ अनुसार महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम १२३ अन्वये ज्या योजना जिल्हा परिषदेकडे अभिकरण तत्त्वावर राबविण्यास दिल्या आहेत. त्या योजनेच्या ५ टक्के अभिकरण शुल्क शासनाकडून जिल्हा परिषदेस देण्यात येते.

पुढील विभागांकडे सन २०१२-१३ अखेर खालीलप्रमाणे अभिकरण शुल्क प्रलंबित आहे.

| अ.क्र. | जिल्हा परिषद विभागाचे नाव | प्रलंबित अभिकरण शुल्क रक्कम रुपये |
|---|---|---|
| १) | एकात्मिक बालविकास सेवा योजना विभाग | १,८२,०१,४७८/- |
| २) | शिक्षण माध्य., शिक्षण प्राथ., सवलत शाखा शिक्षण माध्य., | १२,४३,९६२/- |
| ३) | आरोग्य व कुटुंबकल्याण विभाग | ७५,०३,१२५/- |
| ४) | कृषि विभाग | ४१,२९,८९७/- |
| ५) | समाजकल्याण विभाग | ३९,९०,१४५/- |
| ६) | बांधकाम (दक्षिण) विभाग | ५७,४६,९०६/- |
| ७) | बांधकाम (उत्तर) विभाग | २२,९०,६८२/- |
| ८) | लघुपाटबंधारे विभाग | १०,४५,७७८/- |
| ९) | ग्रामीण पाणी पुरवठा विभाग | २७,९३,९९७/- |
| | **एकूण** | **४,६९,४५,९७०/-** |

एकूण अभिकरण शुल्क ४,६९,४५,९७०/- पैकी सन २०१२-१३ मध्ये शिक्षण विभाग (माध्यमिक) (सवलत शाखा), रक्कम रुपये ७३,५८३/-, कृषि विभाग रक्कम रुपये २५,०४,०२०/- व बांधकाम विभाग (उत्तर) रक्कम रुपये १८,८३,३८४/- अशी एकूण रक्कम रुपये ४४,६०,९८७/- वसुल झालेली आहे.

थकित रक्कम रुपये ४,२४,८४,९८३/- एवढी असून सदर रक्कम वसूलीसाठी संबंधित सर्व विभाग प्रमुखांना दिनांक ३ डिसेंबर, २०१६, दिनांक ०९ मे, २०१८, दिनांक ६ ऑक्टोबर, २०१८ अन्वये पत्र व्यवहार करण्यात आलेला आहे. विभाग प्रमुखांनी दिनांक ०७ मार्च, २००९, दिनांक ०८ मार्च, २०११, दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१२, दिनांक १७ डिसेंबर, २०१३, दिनांक ०३ जुलै, २०१७, दिनांक ०९ जानेवारी, २०१८ व दिनांक २३ ऑक्टोबर, २०१८ अन्वये त्यांचे मंत्रालयीन विभागांकडे अभिकरण शुल्काची मागणी केलेली आहे. अभिकरण शुल्क संबंधित प्रशासकीय विभांगामार्फत जिल्हा परिषदेस देणेसाठी मा.प्रधान, सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांना पत्र दिनांक २३ मार्च, २०१५, दिनांक ०३ डिसेंबर, २०१६ व दिनांक १६ एप्रिल, २०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

नियोजन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक स्थाविका-२०११/प्र.क्र.३६/कार्यासन-१४८२, दिनांक १३ सप्टेंबर, २०१२ व जिल्हाधिकारी, सातारा यांचेकडील दिनांक ०९ ऑक्टोबर, २०१२ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत करण्यात येणाऱ्या विकास कामांवर कोणत्याही प्रकारचे अभिकरण शुल्क सन २०१२-१३ पासुन आकारण्यात येवू नये, असे निर्देश आहेत. यामध्ये जि.प.बांधकाम विभाग उत्तर /दक्षिण, लघु पाटबंधारे, ग्रामीण पाणी पुरवठा या विभागांचा अंतर्भाव आहे.

२) ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडील १५ प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांची सन २०१२-१३ अखेर रक्कम रुपये १४,७४, ५२,५३१/- येणे बाकी होती. जिल्हा परिषदेमार्फत थकित पाणीपट्टी भरणेबाबत वृत्तपत्रात दिनांक ०६ जानेवारी, २०११ अन्वये प्रसिध्दीद्वारे तसेच पंचायत समिती स्तरावर व ग्रामपंचायत स्तरावर बैठका घेवून थकीत पाणीपट्टी भरण्याबाबत जाहीर आवाहन करण्यात आलेले आहे. तथापि, ग्रामस्थांकडून थकीत पाणीपट्टी वसुलीबाबत प्रतिसाद मिळत नसल्याने वसूलीचे प्रमाण अत्यल्प आहे. सोबत पाणीपट्टी भरणेबाबत प्रसिद्ध केलेल्या वृत्तपत्राची सत्यप्रत जोडलेली आहे.

सन २००२-०३ ते सन २००४-०५ या तीन वर्षाच्या कालावधीत सातारा जिल्ह्यामध्ये दुष्काळ सदृष्य परिस्थिती निर्माण झाल्याने गावकऱ्यांकडून पाणीपट्टी वसूल होणे व पर्यायाने प्रादेशिक योजनांसाठी निधी उपलब्ध होणे कठिण झाले. मुख्यत: याच कालावधीची थकबाकी वसूल करणेचे दुष्काळामुळे जिकिरीचे झाले होते.

पाणीपट्टी थकीत रक्कम वसुलीसाठी सन २००३ ते सन २०१८ या कालावधीमध्ये गटविकास अधिकारी, तालुक्याचे उप अभियंता, ग्रामपंचायतीचे पदाधिकारी यांना सातत्याने थकीत रक्कम वसुलीसाठी पत्र देवून वसुलीचे प्रयत्न करण्यात आले आहेत.

सदर वसुली तालुकास्तरावरुन होत असून तालुकास्तरावरुन प्राप्त अहवालानुसार सन २०१३-१४ ते दिनांक ३१ मार्च, २०१८ अखेर रक्कम रुपये १५,०३,६६,९३४/- इतकी थकबाकी होती. त्यापैकी सन २०१३-१४ ते सन २०१७-१८ अखेर रक्कम रुपये १,५३,६७,३८२/- वसूल झालेले आहेत. दिनांक ३१ मार्च, २०१८ अखेर रक्कम रुपये १३,४९,९९,५५२/- एवढी पाणीपट्टी येणे बाकी आहे.

पाणीपट्टी वसूलीबाबत सर्व उप अभियंता, यांना दिनांक ७ एप्रिल, २०१५, दिनांक २२ मे, २०१५, दिनांक ०४ एप्रिल, २०१६, दिनांक २० मे, २०१६, दिनांक १४ जून, २०१६, दिनांक ०१ एप्रिल, २०१७, दिनांक १६ मे, २०१७, दिनांक २२ जून, २०१७, दिनांक ०५ जुलै, २०१७, दिनांक २१ एप्रिल, २०१८, दिनांक १८ जून, २०१८ तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, यांचेकडील अर्ध शासकिय पत्र दिनांक ०५ मे, २०१६ अन्वये कळविण्यात आलेले आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्राम विकास विभागाचे अभिप्राय :-** (वित्त-३) ग्रामविकास विभागाकडून जिल्हा परिषद, सातारा यांना अभिकरण शुल्काची कोणतीही रक्कम देणे प्रलंबित नाही. इतर प्रशासकीय विभागाकडील अभिकरण शुल्क येणेबाबत जिल्हा परिषद, सातारा यांच्या स्तरावरुन कार्यवाही सुरू आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सातारा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्यावेळी समितीने अशी विचारणा केली की, सन २०१२-२०१३ अखेर रुपये ४,६९,४५,९७०/- इतकी वसुली होती, त्यापैकी रुपये ७३,५८३/- इतकी

रक्कम वसुल केली आहे. कृषी विभागाकडून २५,०४,०२०/- रुपये आणि बांधकाम विभाग (उत्तर) यांच्याकडून १८,८३,३८४/- अशी एकूण ४४,६०,९८७/- रुपये वसुल केलेले आहेत. पाणीपट्टीची १३,४९,९९,५५२/- रुपयांची वसुली करावयाची आहे, वसुलीचे प्रमाण कमी का आहे आणि वसुली करण्यासाठी कोणते प्रयत्न केलेले आहेत, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, या पूर्वी समितीच्या बैठकीत अभिकरण शुल्क म्हणजेच पाणी पुरवठ्याचा प्रश्न चर्चेला आलेला होता. शासनाने सन १९९९ मध्ये अभिकरण शुल्क हे संबंधित विभागाने द्यावे असा नियम केलेला होता. आमदार विकास निधी ३ टक्के आहे. अंदाजपत्रकामध्ये तशी तरतूद करणे आवश्यक आहे. यामध्ये ४ टक्के वसुल केले पाहिजे आणि ज्यावेळी आर्थिक ताळेबंद होईल त्यावेळी १ टक्के वसुल केले पाहिजेत. ही रक्कम त्या त्या वेळेस वसुल करावयाची राहिलेली आहे. आता प्रशासकीय विभागाकडे पाठपुरावा करून अनेक योजना डीपीसी आणि राज्य शासनाकडे हस्तांतरित झालेल्या आहेत. पुढील अर्थसंकल्पात ही वाढीव रक्कम वसुल करण्यासाठी जिल्हा परिषदेकडून प्रयत्न केला जाणार आहे आणि ते जिल्हा परिषदेचे उत्पन्न आहे.

यावर समितीने विचारणा केली की, आमदार निधीतील अभिकरण शुल्कामध्ये कपात होत नाही. तसेच जिल्हा परिषदेतील अंगणवाडीमध्येदेखील अभिकरण शुल्कामध्ये कपात होत नाही. शुल्क जमा झालेले नाही हा त्यांचा विषय आहे. तसेच सरकारची व्यवस्था असल्यामुळे अभिकरण शुल्क कपात करण्यात येऊ नये असा निर्णय घेतलेला आहे. वसुलीच्या संदर्भात असेस्मेंट करून संबंधित विभागाकडे पैसे गेले पाहिजेत. यासंदर्भात सचिवांनी लक्ष घालावे अशी समितीची सूचना आहे.

### अभिप्राय व शिफारशी

सन २०१२-१३ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये झालेल्या इतर नियमबाह्य बाबीमधील रुपये ४,६९,४५,९७०/- एवढे अभिकरण शुल्क येणे होते. त्यापैकी रुपये ४४,६०,९८७/- एवढी रक्कम वसुल झालेली आहे. उर्वरित रक्कम रुपये ४,२४,८४,९८३/- एवढी रक्कम अभिकरण शुल्क येणे आहे. सदर रक्कम वसुल होणेसाठी जिल्हा परिषदेकडील संबंधित विभागांना शासनाकडे अभिकरण शुल्क मागणी करण्यास कळविण्यात आले आहे. दिनांक १३ सप्टेंबर, २०१२ **(परिशिष्ट ७.१)** रोजीच्या शासन निर्णयानुसार अभिकरण शुल्क बांधकाम विभाग, लघुपाटबंधारे विभाग, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाला माफी दिलेली आहे. अभिकरण शुल्काची रक्कम पुढीलप्रमाणे आहे.

एकात्मिक बालविकास सेवा योजना विभाग (आयसीडीएस) कडून १ कोटी ८२ लाख १ हजार ४७८ रुपये जिल्हा परिषदेला येणे आहे. माध्यमिक शिक्षण विभागाचे ७ लाख १८ हजार ७५१ रुपये, प्राथमिक शिक्षण विभागाचे ५ लाख ७ हजार ४६१ रुपये, आरोग्य विभागाचे ९ लाख ३४९ रुपये, कुटुंब कल्याण योजनेमध्ये ६५ लाख ८१ हजार ७७५ रुपये, कृषि विभागाचे ४१ लाख २९ हजार ८९७ रुपये, समाजकल्याण विभागाचे ३९ लाख ९० हजार १४५ रुपये, बांधकाम दक्षिण विभागाचे ५७ लाख ४६ हजार ९०६ रुपये, बांधकाम उत्तर विभाग २२ लाख ९० हजार ९८२ रुपये, लघुपाटबंधारे विभाग १० लाख ४५ हजार ७७८ रुपये, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग २७ लाख ९३ हजार ९९७ रुपये असे एकूण ४ कोटी ६९ लाख ४५ हजार ९७० रुपये जिल्हा परिषदेला येणे आहे. त्यापैकी ४४ लाख ६० हजार ९८७ रुपये वसुल करण्यात आले आहेत.

**मुळात महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम १२३ (२) नुसार बांधकामे किंवा विकास परियोजना पार पाडताना किंवा त्या सुस्थितीत ठेवताना, जिल्हा परिषद किंवा पंचायत समिती किंवा त्या दोन्ही राज्य शासनाचा अभिकर्ता (Agent) म्हणून काम करीत असतात. त्यांना राज्य शासन निर्धारित करील ती रक्कम प्राप्त होत असते. त्यांनी अभिकर्ता म्हणून केलेल्या कामाचा मोबदला म्हणून अभिकरण शुल्क वसुल करण्याची तरतुद शासन निर्णयात आहे. अभिकरण शुल्क शासनाच्या संबंधित विभागाकडून वेळेत प्राप्त होण्यासाठी संबंधित जिल्हा परिषद व पंचायत समिती यांनी सातत्याने पाठपुरावा करून अभिकरण शुल्काची मागणी करावी, जेणेकरून त्या त्या जिल्हा परिषदेच्या उत्पन्नात भर पडेल, अशी समितीची शिफारस आहे.**

**अभिकरण शुल्काची येणे असलेली थकित रक्कम रुपये ४,२४,८४,९८३/- एवढी असून ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडील प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांची दिनांक ३१ मार्च, २०१८ अखेर रक्कम रुपये १३,४९,९९,५५२/- एवढी पाणीपट्टी येणे बाकी आहे. यावरुन असे दिसून येते की, जिल्हा परिषदेचे वसुलीचे प्रमाण कमी आहे, त्यामुळे जिल्हा परिषदेच्या उर्वरित वसुलीसंदर्भात जिल्हा परिषदेच्या संबधित विभागांना पैसे प्राप्त होण्यासाठी ग्रामविकास विभागाने संबंधितांकडे पाठपुरावा करून तातडीने कार्यवाही करावी अशी समिती शिफारस करीत आहे व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा.**

## प्रकरण अकरा

## जिल्हा परिषद, सातारा

## लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करून देणेबाबत

### १) परिच्छेद क्रमांक ३.११७ (सन २०१२-१३) कापडी बस्करपट्टी खरेदीबाबत :-

शिक्षण विभागाकडे प्राथमिक शाळांसाठी कापडी बस्करपट्टी पोटी ९,९५,८३६ /- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१) तालुका पाटण व कराड वगळता ९ तालुक्यांची मागणी नसतांना एकूण १३,४२१/- बस्करपट्ट्या पुरविण्यात आलेल्या आहेत.

२) पुरवठा आदेशानंतर करारनामा करणेत आलेला आहे.

३) कापडी बस्करपट्टी खरेदी पुरविलेबाबत प्रशासकीय व तांत्रिक मान्यता एकाच दिवशी घेणेत आलेली आहे.

४) संबंधित शाळांना बस्करपट्ट्या पुरविलेबाबत संबंधित गट शिक्षणाधिकारी यांची प्रमाणपत्र घेणेत आलेली नाहीत. तसेच विनियोग दाखले घेणेत आलेले नाहीत.

५) पुरवठा आदेशातील अट क्र. ४ नुसार जिल्हा स्तरावर व पंचायत समिती स्तरावर साहित्य पोहोच झाल्याची कार्यवाही झाली नाही.

६) सदर मुल्यावर्धित कराबाबत मुल्यावर्धित कर कायदा २००२ प्रमाणे ५% दराने १,२४,८९१ /- वसूल होणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सातारा यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सदर खरेदी महाराष्ट्र शासन अंगीकृत उद्योग व संचालनालय यांचेकडून कापडी बस्करपट्टी खरेदी केली आहे. सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात जिल्हा परिषद सेस मधून रक्कम रुपये २४,९८,०००/- तरतूद करण्यात आली आहे. सदरच्या खर्चास तांत्रिक मान्यता दिनांक २५ मार्च, २०१३ व प्रशासकीय मान्यता दिनांक २५ मार्च, २०१३ अन्वये घेतली आहे. स्थायी समिती ठराव क्रमांक १७०, दिनांक १० एप्रिल, २०१३ अन्वये मान्यता दिलेली आहे. एकूण खरेदी पैकी रक्कम रुपये ९,९५,८३६/- इतक्या खर्चास लेखापरिक्षणामध्ये आक्षेप नोंदविला आहे. महाराष्ट्र शासन, उद्योग संचालनालय, परिपत्रक क्रमांक भांखस/हातमाग कापड / दरनिश्चिती / (३८)/१२-१३/बी-१२५३९, दिनांक १५ सप्टेंबर, २०१२ या परिपत्रकाच्या अनुषंगाने मा. सचिव, वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, यांचेकडून शासकीय कार्यालयांना लागणाऱ्या हातमागावरील कापडाची दरनिश्चिती ही (सर्व कर समाविष्ट) त्यानुसार बस्करपट्टी खरेदीबाबत कार्यवाही करणेत आलेली आहे.

| पुरवठा आदेश दिनांक | नग संख्या | रक्कम | करारनामा दिनांक | मालसाठा पान क्रमांक |
|---|---|---|---|---|
| २६ मार्च, २०१३ | ५२७४ | ९,९५,८३६ | ३० मार्च, २०१३ | १९०/३० मार्च, २०१३ |

१) पाटण व कराड वगळता उर्वरीत ९ तालुक्यांची बस्करपट्टया पुरविणेबाबतची शाळा निहाय मागणी गटशिक्षणाधिकारी यांचेकडून घेण्यात आली होती. तरी सर्व मागणीपत्र अनुपालनासोबत सादर केलेले आहेत.

२) शासन मान्य संस्थेकडून बस्कर पट्टीची मागणी केली आहे. तसेच या कार्यालयाकडील पुरवठा आदेशामध्ये नमूद केलेल्या अट क्रमांक ८ मध्ये स्पष्ट नमुद केले आहे की, पुरवठा आदेश दिलेनंतर करारनामा करून द्यावा लागेल त्यानुसार तो करून घेण्यात आलेला आहे. सोबत पुरवठा आदेश जोडण्यात आलेला आहे.

३) कापडी बस्करपट्टया शाळांना पुढील शैक्षणिक वर्षासाठी खरेदी केलेल्या आहेत. खरेदी प्रक्रिया वेळेत पूर्ण होण्यासाठी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता सक्षम अधिकाऱ्याकडून एकाच दिवशी घेतलेल्या आहेत.

४) संबंधित शाळांना बस्करपट्टया पुरविणेबाबत गटशिक्षणाधिकारी यांचे प्रमाणपत्र व विनियोग दाखले घेणेत आलेले होते. तरी सर्व गटशिक्षणाधिकारी यांचे प्रमाणपत्र व विनियोग दाखलेसोबत जोडले आहेत.

५) पुरवठा आदेशातील अट क्र. ४ नुसार जिल्हा स्तरावर व पंचायत समिती स्तरावर पोहोच झाल्याचे गटशिक्षणाधिकारी यांचेकडील मालसाठा नोंदवहीमध्ये नोंदी आहेत. तसेच जिल्हास्तरावरील मालसाठा नोंदवहीमध्ये नोंदी लेखापरिक्षण अधिकारी यांनी हिरव्या शाईने खुणा केल्या आहेत. जिल्हास्तरावरील मालसाठा नोंदवहीमध्ये पान क्रमांक १८७ वर करण्यात आली आहे.

६) महाराष्ट्र शासन अंगीकृत, उद्योग संचालनालय, परिपत्रक क्रमांक भांखस/हातमाग कापड / दरनिश्चिती / (३८)/१२-१३/बी-१२५३९ दिनांक १५ सप्टेंबर, २०१२ या परिपत्रकाच्या अनुषंगाने मा. सचिव, वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, यांचेकडून शासकीय कार्यालयांना लागणाऱ्या हातमागावरील कापडाची दरनिश्चिती ही (सर्व कर समाविष्ट) असल्याने ५ टक्के कर वसूल करण्यात आलेला नाही.

**२) परिच्छेद क्रमांक ३.११८/८२ (सन २०१२-१३)**

**सागवानी बेंच खरेदी व वाटपाबाबत :-**

प्राथमिक शाळेतील इयत्ता ६ वी ते ७ वी च्या वर्गासाठी बेंच खरेदी पोटी रक्कम रुपये ३४,८४,६१८/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१) बेंच खरेदी प्रक्रिया करणेपूर्वी शाळा निहाय मागणी करून घेणेत आलेली नाही.

२) ज्या शाळांना बेंचेस वाटप केले त्याबाबत तालुकानिहाय गट शिक्षणाधिकारी यांचेमार्फत झालेबाबत विनियोग दाखले उपलब्ध केले नाहीत.

३) सदर बेंचेस तालुका स्तरावर वितरीत केलेबाबत गट शिक्षणाधिकारी यांची स्वाक्षरी घेणेत आलेल्या नाहीत.

४) सदर खरेदीबाबत प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता व पुरवठा आदेश एकाच दिवशी घेणेत आलेले आहेत.

५) सदर बेंचेसची तपासणी न करता संबंधीत शाळांना वाटप केल्याचे दिसून येते.

६) सदर साहित्य पुरवठा आदेशातील अटीनुसार वेळीच मिळाल्याबाबत गट शिक्षणाधिकारी यांचेकडील डिलीव्हरी चलनावर दिनांक नमूद नाही. त्यामुळे वेळीच पोहोचल्याची खात्री करता आली नाही.

७) पुरवठादार - मे. ॲम्बेसियस ब्लाईड इंडस्ट्रिज को-ऑपरेटिव्ह प्रोड्युस सोसायटी लि. असून सदरचा करारनामा महालक्ष्मी इंडस्ट्रीज, कबनूर, तालुका हातकणंगले यांच्या नावाने केल्याने करारनाम्यात विसंगती दिसून येते.

८) पुरवठादार मे. महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ, फोर्ट, मुंबई हे आहेत. करारनामा जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाततर्फे श्री. सानप यांनी केलेले आहे. तथापि, रक्कम प्राप्त झाल्याची पोहोच दत्त विजय एंटरप्रायजेस गेट क्रमांक ५ लक्ष्मी औद्योगिक वसाहत रोड, ॲटो ॲसेम्बीलजवळ कोल्हापूर प्रोप्रायटर सौ. सुवर्णा उदय दंडगे यांनी दिलेली आहे. म्हणजेच योग्य पुरवठादारास रक्कम पोहोच झालेली नाही. विसंगतीबाबत खुलासा करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सातारा यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सदर खरेदी महाराष्ट्र शासन अंगीकृत उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई - ३२ यांचेमार्फत करण्यात आली आहे. सन २०१२-१३ जिल्हा परिषद सेस मधून तरतूद रक्कम रुपये ३६,८९,०००/- सागवानी बेंच खरेदी व वाटप तालूकास्तर करण्यासाठी एवढी आहे. त्यास स्थायी समिती ठराव क्रमांक १३६, दिनांक १६ जानेवारी, २०१६ अन्वये प्रशासकीय व मुख्य कार्यकारी अधिकारी यांची तांत्रिक मान्यता दिनांक ४ फेब्रुवारी, २०१३ रोजी घेण्यात आलेली आहे. त्यानुसार बेंच खरेदी दोन वेळा केली असून रक्कम रुपये ३६,८४,६१८/- इतका खर्च झालेला आहे. सदर खरेदी महाराष्ट्र शासन अंगीकृत उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई - ३२ परिपत्रक क्रमांक /उस/भांखस / लाकडी फर्निचर / दरनिश्चिती / (०१) /२०११-१२/बी १६८३२, दिनांक ३० ऑगस्ट, २०११ व उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई - ३२ परिपत्रक क्रमांक /उस/भांखस / लाकडी फर्निचर / दरनिश्चिती / (०१) /२०१२-१३ बी १४४५३ दिनांक ८ ऑक्टोबर, २०१२ दरपत्रकानुसार (सर्व करासहित) करण्यात आलेली आहे.

१) पुरवठा आदेशामध्ये नमूद असलेनुसार बेंचेस पंचायत समिती स्तरावर उपलब्ध करून दिलेले आहेत. गटशिक्षणाधिकारी यांनी त्यांचे स्तरावर वाटप केले आहे. त्यामुळे जिल्हा परिषद स्तरावर मागणी घेणेत आली नव्हती. पंचायत समिती स्तरावर शाळेची मागणी घेणेत आली आहे. सोबत जोडण्यात येत आहे.

२) ज्या शाळांना बेंचेस वाटप केले आहे त्याबाबत तालुकानिहाय गटशिक्षणाधिकारी यांचे विनियोग दाखले घेण्यात आलेले आहेत.

३) तालुका स्तरावर बेंचेस पोहोच झाल्याचे गटशिक्षणाधिकारी यांचेकडील मालसाठा नोंदवहीत घेतलेल्या असून त्यावर संबंधित गटशिक्षणाधिकारी यांच्या स्वाक्षरी आहेत.

४) सागवानी बेंचेस शाळांना पुढील शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला वाटप करावयाचे असल्याचे, तसेच हे साहित्य निरंतर टिकणारे असल्याने पूरवठा आदेश, प्रशासकीय मान्यता सक्षम अधिकाऱ्यांकडून एकाच दिवशी घेतलेल्या आहेत.

५) सदर बेंचेसची तपासणी केलेबाबत शासन मान्य सुप्रिटेडेन्स कंपनी ऑफ इंडिया (प्रायव्हेट) लिमिटेड यांचे प्रथम टप्प्यातील बेंचेस तपासणी दिनांक ४ जुलै, २०१२ व दुसऱ्या टप्प्यातील बेंचेस तपासणी दिनांक ६ फेब्रुवारी, २०१३ झालेचे तपासणी प्रमाणपत्र सोबत सादर करीत आहे.

६) सदर साहित्य पुरवठा आदेशातील अटीनुसार वेळीच मिळाल्याबाबत गटशिक्षणाधिकारी यांच्या डिलीव्हरी चलनावर स्वाक्षऱ्या घेतलेल्या आहेत. सोबत डिलीव्हरी चलनाच्या छायांकित प्रती सादर करीत आहोत.

७) मे. ॲम्बेसियस ब्लाईड इंडस्ट्रिज को-ऑपरेटिव्ह प्रोड्युस सोसायटी लि. मुंबई या कंपनीला पुरवठा आदेश दिला आहे व त्यांनाच देयक अदा केले आहे. महालक्ष्मी इंडस्ट्रीज, कबनूर, तालुका हातकणंगले यांच्या जि.कोल्हापूर यांचे मार्फत वाहतूक करणेसाठी प्राधिकृत केल्यामुळे वहातूकीबाबतचा करारनामा त्यांचा केलेला आहे. सोबत पत्र जोडण्यात येत आहे.

८) पुरवठा आदेश मे. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, फोर्ट, मुंबई यांना दिलेले आहेत. त्यांचे नावे धनादेश देणेत आला आहे. सदरची रक्कम त्यांना मिळाल्याची पोहोच सोबत जोडली आहे.

**३) परिच्छेद क्रमांक ३.१२२ (सन २०१२-१३), इको फ्रेंडली पॉलीमर बेंच खरेदीबाबत :-**

शिक्षण विभागाने इको फ्रेंडली पॉलीमर बेंच खरेदीपोटी रक्कम रुपये १,४९,९६,०१६/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१) शाळा स्तरावर बेंच वाटप केल्याचे त्याचा मालसाठा नोंदवहीत नोंदी घेतल्याचे प्रमाणपत्र गट शिक्षणाधिकारी यांचे घेणेत आलेले नाही. त्यामुळे संबंधीत खर्चाचा विनियोग झाल्याचे दिसून येत नाही.

२) बेंच वाटपाबाबत, विनियोग झाल्याचा तपशिल सादर करून साठा नोंदवहीत अद्यावत करून दाखविणे आवश्यक आहे.

३) शाळा निहाय मागणीपत्र नसतांना जिल्हा स्तरावर खरेदी संख्या काम आधारे निश्चित केली.

४) शैक्षणिक वर्ष संपतांना मार्च अखेरीस बेंचेस पुरवठा आदेश देऊन वाटप केल्याने शासन उद्देश सफल झाला नाही.

५) उद्योग, सह संचालनालय (भांख) विकास, आयुक्त (उद्योग) परिपत्रक क्रमांक उस/भांखस/दर निश्चिती/०४/०९१०/बी-२/८२, दिनांक २३ जुलै, २००९ नुसार पुरवठा धारकाच्या रकमेचे प्रदान करतांना ९०% व उर्वरीत १०% रक्कम ३० दिवसांत अदा करावयाची आहे. परंतु एक रकमी प्रदान केले आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सातारा यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सदरची खरेदी महाराष्ट्र शासन अंगीकृत उद्योग व ऊर्जा संचालनालय यांचे दरकरारान्वये केली आहे. इको फ्रेंडली पॉलीमर बेंच खरेदी डी.पी.डी.सी. नाविन्यपूर्ण योजना मधून १.५० कोटी एवढी तरतूद प्राप्त झाली. दिनांक १ फेब्रुवारी, २०१३ जिल्हा परिषद ठराव क्रमांक ९२ प्रशासकीय मान्यता व दिनांक २८ मार्च, २०१३ च्या शिक्षण संचालक यांचेकडील पत्रानुसार तांत्रिक मान्यता व त्यानुसार पुरवठा आदेश दिनांक २६ मार्च, २०१३ रोजी देण्यात आला असून करारनामा दिनांक ३० मार्च, २०१३ रोजी केलेला आहे. साहित्य पोहोच दिनांक ३१ मार्च, २०१३ रोजी झालेले आहे.

१) बेंच वाटपाबाबतचे विनियोग झाल्याचे दाखले गट शिक्षणाधिकारी यांचेकडून प्रमाणपत्र घेण्यात आलेले होते.

२) बेंच वाटपाबाबतचे विनियोग झाल्याचे दाखले गट शिक्षणाधिकारी यांचेकडून घेण्यात आलेले आहेत.

३) पुरवठा आदेशामध्ये नमुद असलेनुसार बेंचेस पंचायत समिती स्तरावर उपलब्ध करून दिलेले आहेत. गटशिक्षणाधिकारी यांनी त्यांचे स्तरावर वाटप केले आहे त्यामुळे जिल्हा परिषद स्तरावर मागणी घेणेत आली नव्हती. पंचायत समिती स्तरावर शाळेची मागणी घेणेत आली आहे. सोबत जोडण्यात येत आहे.

४) सदर बेंचेस हे एका वर्षासाठी नसून ते निरंतर वापरासाठी आहेत. व त्याचा वापर सद्य:स्थितीत होत आहे.

५) संबंधीत पुरवठादार यांनी सादर केलेल्या संख्येप्रमाणे मालसाठा नोंदवहीत १०० टक्के पुरवठा केल्याचे नोंद घेतलेली असल्याने व सदर मालाचा पुरवठा योग्य व सुस्थितीत असल्याचे शिक्षणाधिकारी यांनी रक्कम अदा करणेबाबतचे प्रमाणपत्र दिले आहे. त्यामुळे १०० टक्के रक्कम अदा केली आहे. तरी वरील पूर्तता पाहून शक वगळण्यास विनंती आहे.

**४) परिच्छेद क्रमांक ३.२५७ (सन २०१२-१३),**

**दरे बु. कोंढवे पोहोच रस्ता ग्रामा-५४ बीबीएम कारपेट करणे :-**

३०५४ मार्ग व पूल गट ब या लेखाशिर्षाखाली सन २०१२-१३ मध्ये रुपये १,२५,०००/- एवढा खर्च करणेत आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१) कामाचे प्रथम व अंतिम देयक नमूना नंबर ५८ ऐ मधील मुखपृष्ठावर व काम पूर्णत्वाचा दाखला नमूना नंबर ६५ वर काम पूर्णत्वाचा दिनांक नमूद नसतांना देयक कसे पारीत केले याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

२) सदर कामाची मंजूरी दिनांक २० ऑगस्ट, २००९ म्हणजे सन २००९-१० मधील असून त्या वर्षात अनुदान नव्हते. त्यामुळे सदर देयक तीन वर्षांनी मर्यादित रक्कमेस मंजूर केले आहे. अनुदान नसताना मंजुरी देणे व तीन वर्षानी प्रदान करणे याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

३) कामाचे मोजमाप नोंदवही नस्ती अंदाजपत्रक हे अभिलेख लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

४) कामातील बाब क्रमांक २ अन्वये ४०.५० घनमीटर इतकी तरतूद असताना बाब क्रमांक ४ अन्वये २२४.१० घनमीटर म्हणजे १८३.६० घनमीटर जादा मुरुम वापर केलेबाबत रक्कम रुपये ३६,८४८.५२/- वसूल होणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सातारा यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) सदर कामाचे अंतिम देयकाचे मोजमाप पुस्तक क्रमांक ३८१५ पृष्ठ क्रमांक ९७ मध्ये काम पूर्णत्वाचा दिनांक १० मे, २०११ नमूद असल्याने तसेच अनुदान मर्यादित रक्कमेस सदरचे देयक पारीत करणेत आले. तसेच सदर कामाचे उर्वरीत रक्कम अदाई वेळी देयकांच्या पृष्ठ क्रमांक १ व नमूना नं ६५ मध्ये तसेच कामाच्या नामफलकामध्ये कामाचा पूर्णत्वाचा दिनांक नमूद करून अदा करणेत आलेले आहे.

२) रस्ते पूल व देखभाल दुरुस्ती ३०५४ मार्ग व पूल या कार्यक्रमाअंतर्गत सन २००९-१० मध्ये अधिक्षक अभियंता सां. बा. मंडळ, सातारा, यांचेकडून अंदाजित ४५.०० लक्ष कामांना जॉब नंबर उपलब्ध झाले असून सदर कामाचा जॉब क्रमांक ०९-२७-स्था-१-२-८३ क्रमांक दिनांक २० ऑगस्ट, २००९ अन्वये मंजूरी देणेत आली होती. रस्त्यांची वाहतूकीची अडचण विचारात घेता काम करणे अत्यंत निकडीचे असलेने सदर कामास जॉब मंजूर केला असून त्यानुसार निविदा मंजूर करणेत आलेली आहे. अनुदान प्राप्त झालेनंतरच देयक रक्कम अदा करणेचे अटीवर कार्यारंभ आदेश देवून काम पूर्ण करून घेणेत आले. तसेच केलेल्या कामाचे लेखाशिर्ष ३०५४ मार्ग व पुल गट अ अनुदान उपलब्धतेनुसार देयक पारीत करणेत आले आहे.

३) सदर कामाचे मोजमाप पुस्तक क्रमांक ३८१५, अंदाजपत्रक लेखा परिक्षणास उपलब्ध केले आहे.

४) सदर कामांच्या बाब क्रमांक २ व ४ मधील शकात नमूद केलेल्या रक्कम रुपये ३६,८४९ /- रक्कमेचे वसुल करून चलनाची प्रत सोबत जोडली आहे.

**५) परिच्छेद क्रमांक ३.५१९ (सन २०१२-१३),**

**नळ पाणी पुरवठा योजना मौजे कवठे, ता.वाई, जि.सातारा :-**

जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा योजना मौजे-कवठे ता.वाई, जि.सातारा या योजनेसाठी रक्कम रुपये ५३,८४,७४४/- इतका खर्च झाला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

१) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र.जिप/२००५/प्रक्र.३६६/वित्त-५ दिनांक ३० डिसेंबर, २००६ नुसार ५ लाख ते ५० लाख व त्यावरील कामाची जाहीर निविदा राज्यस्तरीय वर्तमानपत्रात प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. तथापि, स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दी दिल्याने जास्तीत जास्त मक्तेदारांनी सहभाग न घेतल्याने स्पर्धात्मक दराचा फायदा झाला नाही. सबब, शासनाचे नुकसान झाले आहे व शासन निर्णयाचे पालन झाले नाही.

२) सदर कामाची मुदत १२ महिन्याची असून दिनांक २३ ऑगस्ट, २०१३ पर्यंत पूर्ण होणे आवश्यक असताना लेखा परिक्षण कालावधी अखेर दिनांक ३१ डिसेंबर, २०१३ पर्यंत पूर्ण झाले नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम १४८ प्रमाणे १५ दिवस अगोदर मुदतवाढीसाठी अर्ज करणे आवश्यक आहे. ठेकेदाराने मुदतवाढीसाठी अर्जही केला नाही. सबब, विहित दरांनी दंडाची आकारणी करून वसुल करणे आवश्यक आहे.

३) विक्रीकर आयुक्त, मुंबई यांचे नोटीफीकेशन दिनांक १ एप्रिल, २००५ व महाराष्ट्र शासन मुल्यवर्धित कर (वॅट) अधिनियम, २००२ नुसार नोंदणी नसलेल्या ठेकेदाराकडून ४ टक्के विक्रीकर रक्कम रुपये ९१,१४२/- वसुल करणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सातारा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) मौजे कवठे नळ पाणीपुरवठा योजना, ता.वाई सन २०१२-१३ मध्ये जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत मंजूर झालेली आहे. सदर योजनेची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ८८,७५,६०९/- असून निविदा रक्कम रुपये ७९,८६,७३५/- आहे. दिनांक ३ सप्टेंबर, २००१ शासन निर्णयानुसार सदर योजनेस प्रशासकीय मान्यता ग्रामपंचायतीने दिनांक ८ मार्च, २०१२ रोजी ग्रामसभा ठराव क्रमांक १२/१ अन्वये देणेत आलेली आहे. सदर योजनेस तांत्रिक मान्यता अधिक्षक अभियंता भारत निर्माण कक्ष समन्वय व सनियंत्रण कक्ष, पुणे यांचेकडून जा.क्र.भा.नि.क./तां.शा.१/ /०२/१२ दिनांक १७ फेब्रुवारी, २०१२ अन्वये देणेत आलेली आहे. सदर कामाची निविदा कार्यवाही अध्यक्ष ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती कवठे यांनी केलेली आहे. निविदा कार्यवाही करताना या योजनेची निविदा नोटीस ही राज्यस्तरीय वर्तमान पत्रामध्ये प्रसिद्ध करणे आवश्यक होते. त्याऐवजी समितीने या कामाची जाहीर निविदा, दै ऐक्य, पुढारी व ग्रामोद्धार या स्थानिक वर्तमानपत्रात दिलेली होती. जिल्हा स्तरावरुन निविदा पडताळणी करतेवेळी सदर बाब निदर्शनास येणे आवश्यक होते. तथापि, अनावधनाने ही बाब राहून गेली. या पुढे राज्यस्तरीय वर्तमानपत्रात जाहीर निविदा प्रसिद्ध करणेची दक्षता घेत आहे.

२) कामाची मुदत दिनांक २१ ऑगस्ट, २०१३ रोजी संपली असून मुदतीत काम पूर्ण न झालेने मक्तेदार मे.राहुलदेव कंन्स्ट्रक्शन, सातारा यांनी दिनांक ५ ऑगस्ट, २०१३ म्हणजे मुदत संपणे अगोदर १५ दिवस अर्ज दिला असून त्यानंतरचा झालेला ग्राम ठराव क्र.३ दिनांक २८ नोव्हेंबर, २०१३ रोजी मुदतवाढ दिलेली आहे. मक्तेदाराचा अर्ज व मुदत वाढ ठराव लेखा परिक्षणासाठी सोबत जोडला आहे.

३) महाराष्ट्र शासन मुल्यवर्धित कर (व्हॅट) अधिनियम, २००२ नुसार मक्तेदाराचे नोंदणी प्रमाणपत्र उपलब्ध असलेने २ टक्के विक्रीकर वसुल करण्यात आला आहे. मक्तेदाराची नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत सोबत जोडली आहे. त्यामुळे उर्वरित वसुली करणेत आली नाही.

**६) परिच्छेद क्रमांक ३.८३१ (११) (सन २०१२-१३)**

**घरघंटी खरेदी निविदा प्रक्रियेतील अनियमिततेबाबत :-**

२० टक्के जिल्हा निधीतून मागासवर्गीय विद्यार्थ्यांना १०० टक्के अनुदानावर घरघंटी वाटप योजनेवर रुपये २३,९२,०००/- एवढा खर्च झालेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

१) सदर योजनेसाठी मूळ तरतूद रुपये ९.९९ लक्ष व पुरवणी तरतूद रूपये ८.१ लक्ष अशी एकूण रुपये १८ लक्ष तरतूद असताना रुपये २३.९२ लक्ष खर्च झालेला आहे. म्हणजेच रुपये ५.९२ लक्ष एवढा तरतुदीपेक्षा जादा खर्च झालेला आहे.

२) लाभार्थी निवड निश्चित न करता खरेदी प्रक्रिया राबविली आहे. शासन निर्णय क्र. झेडपीए/२०००/प्रत/२२६/विलाक्र, दिनांक २०जून, २००८ अन्वये कार्यवाही करणे आवश्यक आहे.

३) घरघंटी खरेदीसाठी महिला व बालकल्याण विभागाने २६.४० लक्ष व समाजकल्याण विभागाने रुपये १६.०० लक्ष अशी एकूण रुपये ४२.४० लक्षची खरेदी एकत्रितरित्या ई. टेंडरींग पद्धतीने केलेली आहे. त्यानुसार सुरक्षा ठेव पोटी महिला व बालकल्याण विभागासाठी रुपये १,३२,०००/- व समाजकल्याण विभागासाठी रु.८०,०००/- अशी एकूण रु.२,१२,०००/- पैकी रुपये १,०६,०००/- निविदेसोबत भरणा करणे आवश्यक होते. तथापी मंजूर निविदा धारक मे. अनंत ट्रेडर्स, सातारा यांनी रुपये ८६,४००/- एवढीच रकमेचा भरणा केला आहे. एकूण रुपये १९,६००/- एवढा कमी रकमेचा भरणा केला आहे.

४) पुन्हा याच निविदेवर रुपये ७.९२ लक्ष एवढ्या रकमेची खरेदी केली आहे. परंतू त्यासाठी रुपये १९,८००/- एवढी रक्कम सुरक्षा ठेव पोटी घेण्यात आलेली नाही.

५) मंजूर निविदाधारकाने सुरक्षा ठेव म्हणून भरलेले रुपये ८६,४००/- पैकी दिनांक १० मार्च, २०१३ रोजी चलनाने भरलेले रुपये ४४,०००/- बाबत चलनावर बँक अधिकारी / रोखपालाची सही नसलेने रक्कम प्रत्यक्ष बँकेत जमा झाल्याची खात्री पटविणे आवश्यक आहे.

६) सदर योजनेसाठी समाजकल्याण विभागास १८ लक्ष मंजूर असताना १६ लक्ष रकमेच्या निविदा मागविल्याबाबत खुलासा करणे आवश्यक आहे.

७) लाभार्थीचे प्रस्ताव जिल्हा स्तरावर पहावयास मिळाले नाहीत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सातारा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) सन २०१२-१३ चे जिल्हा परिषदच्या मुळ अंदाजपत्रकात घरघंटी पुरविणे या योजनेसाठी रक्कम रुपये २.०० लक्ष इतकी तरतूद होती. दिनांक १३ जुलै, २०१२ चे जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेतील ठराव क्र.२६ अन्वये पुर्नविनियोजनव्दारे सदर योजनेत रक्कम रुपये ७.९९ लक्ष वाढवून घरघंटी या योजनेसाठी एकूण तरतूद रक्कम रुपये ९.९९ लक्ष इतकी झाली. पुरवणी अंदाजपत्रकामध्ये रक्कम रुपये ६.०१ लक्ष सदर योजनेत वाढ होऊन ती रक्कम रुपये १६.०० लक्ष झाली. अंतिम सुधारित अंदाजपत्रकामध्ये सदर योजनेस रक्कम रुपये ८.०० लक्ष ने वाढ होऊन सुधारीत रक्कम रुपये २४.०० लक्ष इतकी तरतूद झाली. त्यानुसार उपलब्ध तरतूदीबाबत जिल्हा परिषदच्या वार्षिक लेख्याची प्रत सोबत सादर केली आहे. सबब उबलब्ध तरतूदीनुसारच खर्च करणेत आलेला आहे. जादा खर्च करणेत आलेला नाही.

२) दिनांक १ ऑगस्ट, २०१२ ने ठराव क्र. २६ ने ५, दिनांक ३१ ऑगस्ट, २०१२ ठराव क्र. ३० ने ९, दिनांक २९ ऑक्टोबर, २०१२ ठराव क्र.३९ ने १३, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१२ ठराव क्र.४४ ने ४६, व दिनांक २४ डिसेंबर, २०१२ ठराव क्र.४८ ने ८० अशी एकूण १५३ लाभार्थीची निवड केलेली असून लाभार्थी निवडीची प्रक्रिया झालेनंतरच पुरवठाधारकास दिनांक १८ फेब्रुवारी, २०१३ अन्वये ९७ घरघंटी व दिनांक २८ फेब्रुवारी, २०१३ ने ४८ घरघंटी अशा एकूण १४५ घरघंटी पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. त्यामुळे लाभार्थीची पूर्ण निवड झालेनंतर पुरवठा आदेश पारीत केलेला आहेत.

३) घरघंटी खरेदीसाठी महिला व बालकल्याण विभागाने रुपये २६.४० लक्ष व समाजकल्याण विभागाने रुपये १६.०० लक्ष अशी एकूण रुपये ४२.४० लक्षची खरेदी एकत्रितरित्या ई. टेंडरींग पद्धतीने केली आहे. त्यानुसार खलील प्रमाणे रक्कम भरलेली आहे.

१) म.बा.क.- रक्कम रुपये ४८,२६५/- दिनांक २६ फेब्रुवारी, २०१३
रक्कम रुपये २६,४००/- दिनांक १४ मार्च, २०१३

-------------------------------------------------------------

**एकूण - रक्कम रुपये ७४,६६५/-**

२) स.क. रक्कम रुपये ४४,०००/- दिनांक १३ मार्च, २०१३
रक्कम रुपये १६,०००/- दिनांक १४ मार्च, २०१३

-------------------------------------------------------------

**एकूण - रक्कम रुपये ६०,०००/-**

अंतिम सुधारित तरतूदीमध्ये समाजकल्याण विभागास घरघंटी योजनेसाठी रक्कम रुपये ८.०० लक्ष वाढीव तरतूद प्राप्त झालेने समाजकल्याण विभागाची एकूण तरतूद रक्कम रुपये २४.०० लक्ष झाली त्यानुसार समाजकल्याण विभागाचा पुरवठा आदेश रक्कम रुपये २३,९२,०००/- व महिला बाल कल्याण विभागाचा रक्कम रुपये २६,८९,५००/- पुरवठा आदेशानुसार खालील प्रमाणे देयकातून सुरक्षा ठेव कपात करण्यात आलेली आहे.

१) म.बा.क.- रक्कम रुपये ६७,२३७/- प्र.क्र.३२८ दिनांक ३१ मार्च, २०१३

२) स.क. रक्कम रुपये ५९, ६००/- प्र.क्र.३७० दिनांक ३१ मार्च, २०१३

वरील प्रमाणे महिला बाल कल्याण विभागाची एकूण खरेदीची रक्कम रुपये २६,८९,५००/- ची ५ टक्के सुरक्षा ठेव रक्कम रुपये १,३४,४७५ /- व समाज कल्याणची एकूण खरेदीची रक्कम रुपये २३,९२,००० /- ची ५ टक्के प्रमाणे सुरक्षा ठेव रक्कम रुपये १,१९,६०० /- अशी कपात घेणेची आहे. तथापि, महिला बाल कल्याण विभागाची प्रत्यक्षात सुरक्षा ठेव रक्कम रुपये १,४१,९०२/- व समाजकल्याण विभागाची प्रत्यक्षात सुरक्षा ठेव रक्कम रुपये १,१९,६०० /- कपात करण्यात आलेली आहे. सदरची सुरक्षा ठेवीची घेण्यात आलेली ही ५ टक्के पेक्षा रक्कम रुपये ७,४२७/- ही जादा कपात करून घेण्यात आलेली आहे.

४) उपरोक्त मुद्दा क्र.३ मध्ये नमूद केलेले तरतुदीची रक्कम ही रक्कम रुपये ७.९२ लक्ष यासह असून देयकाच्या रकमेनुसार एकूण रक्कम रुपये २३.९२ लक्ष देयकाच्या ५ टक्के प्रमाण सुरक्षा ठेव भरणा करून घेणेत आलेली आहे.

५) पुरवठादार यांनी सुरक्षा ठेवी पोटी जमा करण्यात आलेल्या रक्कमेच्या किर्दीच्या नोंदीच्या प्रती सोबत सादर केल्या आहेत.

६) सन २०१२-१३ या आर्थिक वर्षामध्ये निविदा प्रसिद्ध करतेवेळी पुरवणी अंदाजपत्रकातील रक्कम रुपये १६.०० लक्षच्याच तरतुदीनुसार निविदा मागविणेत आली आहे. सन २०१२-१३ चे जिल्हा परिषदेच्या मुळ अंदाजपत्रकात घरघंटी पुरविणे या योजनेसाठी रक्कम रुपये २.०० लक्ष इतकी तरतुद होती. दिनाक १३ जुलै, २०१२ चे जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेतील ठराव क्र.२६ अन्वये पुर्नविनियोजनद्वारे सदर योजनेत रक्कम रुपये ७.९९ लक्ष वाढवून घरघंटी या योजनेसाठी एकूण तरतुद रक्कम रुपये ९.९९ लक्ष इतकी झाली. पुरवणी अंदाजपत्रकामध्ये रक्कम रुपये ६.०१ लक्ष सदर योजनेत वाढ होऊन ती रक्कम रुपये १६.०० लक्ष झाली दिनांक १० डिसेंबर, २०१२ या दिनांकास असलेल्या नियतव्ययानुसार निविदा मागविल्या आहेत. त्यावेळी १८.०० लक्ष नियतव्यय उपलब्ध नव्हता.

७) लाभार्थीचे प्रस्ताव हे मंजुरीनंतर तालुका स्तरावर पाठविले जातात. त्याची जिल्हा स्तरावर प्रत ठेवली आहे.

**७) परिच्छेद क्रमांक ३.१०६९ (२९) (सन २०१२-१३)**

**जिल्हा परिषदेचे लेखापरीक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे :-**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम (३) प्रमाणे ज्या तारखेस लेखा परिक्षणाचे काम सुरु करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविणेत येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखा परिक्षण सुरु झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्याची मागणी कळविली जाते. व सदरचे अभिलेखे विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरीसुद्धा लेखा परिक्षणास कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध केले जात नाहीत. त्या त्या जिल्हा परिषद/विभाग/पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेद लेखा परिक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसाचे आत सादर करणेबाबत सुचित केले जाते. तथापि, या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभिर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमुद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समित्या यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देऊनसुद्धा लेखा परिक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

उदाहरणादाखल, जिल्हा परिषदेचे विभाग आणि पंचायती समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेखाबाबत घेतलेले आक्षेप खाली दर्शविणेत आले आहेत.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| २९ | सातारा | सामान्य प्रशासन | २४ | ---- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सातारा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सातारा जिल्ह्यामध्ये ग्रामनिधी, जवाहर रोजगार योजना, संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना तसेच जवाहर ग्रामसमृध्दी योजनांचे ६० ग्रामपंचायतींचे ५२४ घटकांचे दप्तर लेखा परिक्षणास उपलब्ध नसलेबाबतचा शक घेणेत आला आहे. त्यापैकी अधिकाधिक दप्तरे सन १९८९-९० ते १९९९-२००० या कालावधीतील आहेत. या प्रलंबित ग्रामपंचायतीपैकी आज अखेर ०७ ग्रामपंचायतींच्या ३३ घटकांचे लेखा परिक्षण पूर्ण झाले असून २४ ग्रामपंचायतींच्या २०० इतक्या घटकांचे दप्तर लेखा परिक्षणासाठी उपलब्ध झाले असून तसे सहाय्यक संचालक स्थानिक निधी लेखा यांना कळविणेत आले आहे. आज अखेर ४४ ग्रामपंचायतींचे २१९ घटकांचे दप्तर लेखा परिक्षणास उपलब्ध झालेले नाही. यासाठी ४९ ग्रामसेवक जबाबदार आहेत. त्यापैकी ३४ ग्रामसेवक मयत, बडतर्फ, सक्तीने सेवानिवृत्त झालेले आहेत. उर्वरीत १५ ग्रामसेवक दप्तर उपलब्ध करून न दिलेबाबत मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० (दिनांक १० मार्च, २००५ पर्यंत सुधारलेला) मधील कलम ७ तसेच सन २०११ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५, दिनांक १० मार्च, २०११ मधील कलम ८ अन्वये मा. विभागीय आयुक्त यांचेकडे दंडाची कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे.

**८) परिच्छेद क्रमांक ३.१०६९ (३०) (सन २०१२-१३)**

**जिल्हा परिषदेचे लेखापरीक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे :-**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम (३) प्रमाणे ज्या तारखेस लेखा परिक्षणाचे काम सुरु करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविणेत येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखा परिक्षण सुरु झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्याची मागणी कळविली जाते. व सदरचे अभिलेखे विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरीसुद्धा लेखा परिक्षणास कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध केले जात नाहीत. त्या त्या जिल्हा परिषद/विभाग/पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेद लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसांचे आत सादर करणेबाबत सुचित केले जाते. तथापि, या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभिर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमुद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समित्या यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देवूनसुद्धा लेखा परिक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

उदाहरणादाखल, जिल्हा परिषदेचे विभाग आणि पंचायती समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेखाबाबत घेतलेले आक्षेप खाली दर्शविणेत आले आहेत.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ३० | सातारा | शिक्षण | २ | ३२,३५,४०,१६७ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सातारा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

लेखापरीक्षणास अभिलेखे सादर करणेबाबत, संबंधीत असणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना या कार्यालयाकडून वरीष्ठांनी वेळोवेळी लेखी व तोंडी सुचना दिलेल्या आहेत.

लेखापरीक्षणास अभिलेख उपलब्ध न करून दिलेले या विभागातील एकूण ६ कार्यासने असून, सर्व कार्यासन मिळून एकूण गुंतवलेली रक्कम रुपये ३२,३५,४०,६१७/- एवढी आहे. त्याचा बाबनिहाय तपशिल खालीलप्रमाणे.

१) डी.पी.डी.सी. स्वच्छतागृह बांधकाम खर्च रु. १,५४,०८,८२०/-

२) शालेय पोषण आहारासंबंधी सर्व जमा खर्च अभिलेखे रुपये ३०,७०,६३,७९७/-

३) विज्ञान कीट खरेदी रु. १०,००,०००/-

४) कोर्ट केस फी केलेला खर्च रु. ६८,०००/-

५) शिक्षक निश्चितीबाबत अभिलेखे रु. तत्सम खर्च

वरील बाब क्रमांक १ ते ३ संबंधीत सर्व अभिलेखे हे तत्कालीन कार्यरत कर्मचारी श्री. प्रमोद विठ्ठल शेलार, कनिष्ठ सहाय्यक यांचे कार्यासनाकडे होते. श्री. शेलार, क.सहा. यांनी वरील १ ते ३ बाबींचे अभिलेखे, सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा यांचेकडील सन २०१२-१३ च्या लेखा परीक्षणास सादर केलेले नाहीत. श्री. शेलार यांना अभिलेखे उपलब्ध न केलेबाबत या कार्यालयाकडून शिस्तभंगाची कारवाई सुरु केली आहे.

श्री.शेलार यांनी **बाब क्रमांक १** डी.पी.डी.सी. स्वच्छतागृह बांधकाम खर्च रुपये १,५४,०८,८२०/- या झालेल्या खर्चासाठी, डी.पी.डी.सी. प्राप्त अनुदान १,८०,६०,६००/- मधून स्वच्छतागृह बांधकामासाठी घेणेत आलेल्या, प्रशासकीय मान्यतेची व सदर बाबीसाठी वित्तप्रेषणव्दारे तालुकास्तरावर रु. १,५८,५५,०००/- एवढे अनुदान वितरीत केलेल्या नस्तीची छायांकित प्रत उपलब्ध करून दिलेली आहे.

श्री. शेलार यांनी **बाब क्रमांक २** शालेय पोषण आहारासंबंधी परिच्छेदामधील आक्षेपीत रक्कम रुपये ३०,७०,६३,७९७/- चे लेखापरीक्षणासाठी आवश्यक असलेले अभिलेख खालीलप्रमाणे उपलब्ध करून दिलेले आहेत.

अ) जिल्हास्तरावरील सर्व धान्यादी माल खरेदी देयके एकूण रक्कम रु. १५,४१,४०,४०९/-

ब) तालुकास्तरावर वितरीत केलेले अनुदान वितप्रेषण नस्ती (तालुका स्तरावरील खर्च रुपये १५,२९,२३,३८८/-)

क) प्रशासकीय मान्यता नस्ती.

ड) तांदुळ व धान्यादी माल मागणी नस्ती.

ई) इतर पत्रव्यवहार नस्ती

श्री. शेलार यांनी **बाब क्रमांक ३** विज्ञान कीट खरेदी रु. १०,००,०००/- या बाबींचे, तांत्रीक व प्रशासकीय मान्यता, शिक्षण समितीतील मंजूर ठराव, पुरवठा आदेश, साहित्य मिळल्याच्या तालुकास्तरावरील पोहोच पावत्या यांची नस्ती उपलब्ध करून दिलेली आहे.

वरील १ ते ३ बाबींचे अभिलेखे, श्री. शेलार, क.सहाय्यक यांनी सन २०१२-१३ लेखापरीक्षणास सादर केले नसल्याने त्यांच्यावर सदर प्रकरणी जबाबदारी निश्चित केली आहे. तसेच प्रशासकीय कारवाई प्रस्तावीत केली आहे.

वरील **बाब क्रमांक ४** शिक्षण विभागाकडील कोर्ट केस बाबत वकिल फी देण्यासाठी रक्कम रुपये ६८,०००/- एवढा खर्च करण्यात आलेला आहे. कोर्ट केस संबंधीत अभिलेखे हे तत्कालीन कार्यरत कर्मचारी

१) श्री. राकेश कुसनाके, वरिष्ठ सहाय्यक (रु. २८,०००/-)

२) श्री. सत्यवान भगवान उमापे, कनिष्ठ सहाय्यक (रु.१०,०००/-),

३) श्री. जग्देवराव धोंडीराम जाधव, वरिष्ठ सहाय्यक (१०,०००/-)

४) श्रीमती सुवर्णा वसंतराव यादव, वरिष्ठ सहाय्यक (रु.१०,०००/-)

५) श्री. विजय अर्जुन खबाले, कनिष्ठ सहाय्यक (रु.१०,०००/-) यांचे कार्यासनाकडे होते. संबंधीतांनी कोर्ट केस फी वरील झालेल्या खर्चाचे अभिलेखे सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, यांचेकडील सन २०१२-१३ च्या लेखा परीक्षणास सादर केलेले नाहीत. संबंधीतांना अभिलेखे उपलब्ध न केलेबाबत या कार्यालकयाकडून नोटीस बजावली आहे.

सदर खर्चाच्या सर्व नस्ती विभागाकडे उपलब्ध असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१) उच्च न्यायालय प्रकरण रिट पिटिशन नं. ५८८०/२०१० श्रीम.उर्मिला लक्ष्मण निकम, कुटुंब निवृत्ती वेतन बाबत रुपये १०,०००/- वकिल फी ॲड श्री. यु.पी. वारुंजीकर यांना प्रमाणक नं.४७४ दिनांक ३१ मार्च, २०१२ अन्वये प्रदान केले.

२) उच्च न्यायालय प्रकरण रिट पिटिशन १६५४ श्री. सदाशिव वेळे यांच्या जन्मतारखेच्या शाळेच्या दुरुस्ती बाबत रुपये १०,०००/- वकिल फी ॲड.श्री. यु.पी. वारुंजीकर यांना प्रमाणक नं.५५१९ दिनांक १९ जुलै, २०१२ अन्वये प्रदान केले.

३) उच्च न्यायालय रिट पिटिशन ५४४५/२०१० श्रीम. स्नेहल गोविंद कराडकर अंशनादान निवृत्ती वेतनाबाबत रुपये १०,०००/- ॲड श्री. यु.पी. वारुंजीकर यांना प्रमाणक नं.५५ दिनांक १९ जुलै, २०१२ अन्वये प्रदान केले.

४) जिल्हा न्यायालय - श्री. बाळासो विठोबा माने, अंगणवाडी शाळेचे बांधकामाबाबत वकिल फी श्री. डी.व्ही.देशपांडे यांना प्रमाणक नं.८७ दिनांक ३१ मार्च, २०१३ अन्वये १०,०००/- प्रदान केले.

५) जिल्हा न्यायालय - केस क्रमांक २०-२०१२ श्री. वसंत चिंतामण खजुरे लोकल बोर्ड शेती शाळा बाबत वकिल फी डॉ.डी.व्ही देशपांडे यांना रक्कम रुपये ८०००/- प्रमाणक नं.४५० दिनांक ३१ मार्च २०१३ व रक्कम १०,०००/- प्र.क्र. ४५१ दिनांक ३१ मार्च, २०१३ अन्वये १०,०००/- प्रदान केले.

६) उच्च न्यायालय रिट पिटिशन ४९३०/११ कु.हिना करहिन नसरत, प्रकरणी श्री. यु.पी. वारुंजीकर यांना १०,०००/- प्रमाणक क्रमांक ३७ दिनांक १७ मे, २०१२ अन्वये प्रदान केले.

कोर्ट केस फी बाबतचे अभिलेखे, संबंधीत वरील नमुद केलेल्या ५ तत्कालीन कर्मचारी यांनी सन २०१२-१३ च्या लेखापरीक्षणास सादर केले नसल्याने त्यांच्यावर सदर प्रकरणी जबाबदारी निश्चित केली आहे. तसेच त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई प्रस्तावित केली आहे.

वरील **बाब क्रमांक ५** मधील शिक्षक निश्चितीबाबत सर्व अभिलेखे हे तत्कालिन कार्यरत कर्मचारी श्री.विजय अर्जुन खबाले, कनिष्ठ सहाय्यक यांचे कार्यासनाकडे होते. श्री.खबाले, कनिष्ठ सहाय्यक यांचे शिक्षक निश्चिती बाबतचे सर्व अभिलेखे सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा यांचेकडील सन २०१२-१३ च्या लेखा परिक्षणास सादर केलेले नाहीत. श्री.खबाले यांना अभिलेखे उपलब्ध न केलेबाबत या कार्यालयाकडून नोटीस बजावली असून श्री.खबाले यांनी सदरचे अभिलेखे उपलब्ध असून लेखापरिक्षणास सादर करीत असलेबाबतचा लेखी खुलासा या कार्यालयास दिलेला आहे.

उपलब्ध अभिलेख्यावरुन शिक्षण निश्चितीबाबत खालील प्रमाणे माहिती आहे.

१) शैक्षणिक वर्ष २०१२-१३ ची शिक्षक निश्चिती शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी दिनांक १ डिसेंबर, २०१२ रोजी मंजूर केलेली होती, ती या कार्यालयास दिनांक ४ डिसेंबर, २०१२ रोजी प्राप्त झाली.

२) सदर शिक्षक निश्चितीनुसार सातारा जिल्हा परिषद प्राथमिक शाळांसाठी शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये एकूण ९,२६६ शिक्षकांची पदे मंजूर करण्यात आली होती, तर कार्यरत पदे ९,०४६ होती. त्याप्रमाणे तालुकाअंतर्गत एकूण १९३ पदे अतिरिक्त तर ४१३ पदे रिक्त होती.

३) या कार्यालयाने दिनांक १२ डिसेंबर, २०१२ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेशान्वये तालुका अंतर्गत अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन दिनांक १४ डिसेंबर, २०१२ रोजी करावे असे सुचित केले होते.

४) त्यानुसार तालुक्यातील अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन १४ डिसेंबर, २०१२ रोजी पूर्ण करण्यात आले व शिल्लक राहिलेल्या ३५ अतिरिक्त शिक्षक समायोजन करण्यासाठी जिल्हा स्तरावर प्रस्ताव प्राप्त झाले.

५) जिल्हा स्तरावर दिनांक २८ डिसेंबर, २०१२ रोजी ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय १८ मे, २०११ व दिनांक २८ ऑगस्ट, २०१२ मधील मार्गदर्शक सुचनानुसार समायोजन बदल्या करण्यात आलेल्या आहेत.

६) उपरोक्तप्रमाणे शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर यांचेकडून दिनांक ४ डिसेंबर, २०१२ रोजी शिक्षक निश्चिती मंजूर झाल्यापासून तीन ते चार आठवड्यांच्या आत समायोजनाची प्रक्रिया पूर्ण केलेली आहे. त्यामुळे अतिरिक्त शिक्षक समायोजनाबाबत कोणताही विलंब झालेला नाही. तसेच शाळेमध्ये अतिरिक्त शिक्षक राहणे, अतिरिक्त शिक्षकांचे वेतन व भत्ते प्रदान अतिप्रदान होणे असे काहीही झालेले नाही. तसेच त्यामुळे शासनाचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही.

श्री.विजय अर्जुन खबाले, कनिष्ठ सहाय्यक यांनी सन २०१२-१३ च्या लेखापरिक्षणास अभिलेखे सादर केले नसल्याने त्यांच्यावर सदर प्रकरणी जबाबदारी निश्चित केली आहे. तसेच प्रशासकीय कारवाई प्रस्तावीत केली आहे.

**९) परिच्छेद क्रमांक ३.१०६९ (३१) (सन २०१२-१३)**

**जिल्हा परिषदेचे लेखापरीक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे :-**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम (३) प्रमाणे ज्या तारखेस लेखा परिक्षणाचे काम सुरु करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविणेत येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखा परिक्षण सुरु झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्याची मागणी कळविली जाते. व सदरचे अभिलेखे विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरीसुद्धा लेखा परिक्षणास कागदपत्रे/अभिलेखे उपलब्ध केले जात नाहीत. त्या त्या जिल्हा परिषद/विभाग/पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेद लेखा परिक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसांचे आत सादर करणेबाबत सुचित केले जाते. तथापि, या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभिर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमुद केल्याप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समित्या यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देऊनसुद्धा लेखा परिक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

उदाहरणादाखल, जिल्हा परिषदेचे विभाग आणि पंचायती समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेखाबाबत घेतलेले आक्षेप खाली दर्शविणेत आले आहेत.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषदेचा विभाग | लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ३१ | सातारा | कृषि | ३० | १३,८१,०००/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सातारा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

केंद्र शासनाचे नवीन व नविकरण ऊर्जा विभाग मंत्रालयाचे दिनांक २७ नोव्हेंबर, २००९ चे मार्गदर्शक सुचना व महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक बिजीएस-२०१४/प्र.क्र.१२९/पंरा-६, दिनांक ७ फेब्रुवारी, २०१५ मध्ये बायोगॅस व खत व्यवस्थापन कार्यक्रम या योजनेसाठी लाभार्थ्यांच्या सविस्तर माहितीचा तपशिल (यामध्ये लाभार्थीचे संपूर्ण नाव, पत्ता, शेतकऱ्यांचा प्रवर्ग, जनावरांची / कुटुंबातील व्यक्तीची संख्या, सयंत्राचे मॉडेल व आकार, केंद्रीय सहाय्याची रक्कम, ती दिल्याचा दिनांक, इ. माहितीचा) डाटाबेस संगणकावर तयार करून ही माहिती तालुका व जिल्हा स्तरावर कायक रेकॉर्ड म्हणून ठेवण्यात यावी. तसेच सदर माहिती केंद्रशासनाच्या अधिकारी व लेखा परिक्षणास उपलब्ध करून द्यावी असे नमुद केले आहे. याबाबत मार्गदर्शक सुचनामध्ये योजनेअंतर्गत निवड केलेल्या लाभार्थीचे ७/१२ उतारा घेणे अनिवार्य करण्यात आलेले नाही.

**१०) परिच्छेद क्रमांक ४.२५० (सन २०१२-१३)**

**अल्प / अत्यल्प भुधारक शेतकऱ्यांना ५० % अनुदानावर ताडपत्री वाटप केले बाबत :-**

पंचायत समिती, खटाव यांनी सन २०१२-१३ मध्ये अल्प / अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ताडपत्री वाटपावचर रक्कम रुपये १,५७,६८० /- इतका खर्च केला आहे. या बाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

१) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक झेडपीए २००८ / प्र.क्र. ४४६/ वित्त-१, दिनांक २० जून, २००८ नुसार योजनेची अंमलबजावणी बाबत नियोजन व वेळापत्रकानुसार कार्यवाही केलेली नाही

२) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रं.१०८९/ प्र.क्र.१५/ ३४, दिनांक ०५ ऑक्टोबर, १९८९ अन्वये वैयक्तीक लाभ देण्यात आलेल्या लाभार्थीची वर्ष व गाव निहाय मास्टर नोंदवही ठेवलेली नाही.

३) साठा नोंदवहीतील नोंदी नूसार ताडपत्रीचे वाटप त्याच्या वित्तीय वर्षात लाभ न देता पुढील आर्थिक वर्ष २०१३- २०१४ मध्ये झालेने योजनेचा उद्देश झालेला नाही.

४) आयकर अधिनियम, १९६१ मधील कलम १९४ क प्रमाणे २ टक्के आयकर रक्कम रुपये ३,१५४/- वसूल होणे आवश्यक आहे

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सातारा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

१) शकात नमुद केले प्रमाणे सन २०१२/१३ या आर्थिक वर्षात ५० % टक्के अनुदानावर ताडपत्री खरेदी करून वाटप करणेच्या योजनेस पंचायत समिती खटाव (वडूज) मासिक सर्वसाधारण सभा दिनांक २२ जानेवारी, २०१३ पंचात समिती ठराव क्रमांक- ८४ ने ताडपत्री खरेदी करणेच्या १,५८,२२० /- रुपये अंदाजपत्रकास व दिनांक ११ फेब्रुवारी, २०१३ रोजी ताडपत्री खरेदीस प्रशासकिय मान्यता देण्यात आली. योजना अंमलबजावणीस कृषी विभागास सदर आर्थिक वर्षात माहे जानेवारी, २०१३ मध्ये आर्थिक तरतुद करणेत आलेने लाभार्थीचे निवड करणे व त्याच्य आर्थिक वर्षात ताडपत्री खरेदी करून त्यांचे वाटप करण्याच्या योजनेत अडचण निर्माण झाल्यामुळे वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही वेळेत करता आली नाही. यापुढे शासनाच्या वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही करणेची दक्षता घेत आहे

२) शकात नमुद केल्याप्रमाणे वैयक्तिक लाभ देण्यात आलेल्या लाभार्थीची मास्टर नोंदवही वर्षानिहाय व गावनिहाय पंचायत समिती स्तरावर ठेवणेत आलेली आहे.

३) शकात नमुद केल्याप्रमाणे सन २०१२/१३ या आर्थिक वर्षामध्ये ५० टक्के अनुदानावर वाटप करणेसाठी ८० ताडपत्री खरेदी करण्यात आल्या असून त्यासाठी रककम रुपये १,५७८,६८०/- एवढा खर्च झाला आहे. १४ लाभार्थ्यांनी सदर आर्थिक वर्षत ५० टक्के लाभार्थी हिस्साची रक्कम भरुन ताडपत्री खरेदी केली. सन २०१२/१३ या आर्थिक वर्षामध्ये खटाप तालुक्या मध्ये तीव्र दुष्काळ असल्याने व लाभार्थ्याच्या कडे उत्पान्नाचे साधन नसल्यामुळे उर्वरित मंजूर ६६ लाभार्थ्यांकडून ५० टक्के लाभार्थी हिस्साची रक्कम भरण्यास असमर्थ असल्याचे अर्ज प्राप्त झाले, त्यामुळे सदर आर्थिक वर्षात ताडपत्रीचे १०० टक्के वाटप करता आले नाही, उर्वरीत मंजूर ६६ लाभार्थीनी ५० टक्के लाभार्थी हिस्साची रक्कम भरणा केलेनंतर ताडपत्रीचे वाटप करणेत आलेले आहे. तरी या पुढे प्राप्त होणाऱ्या साहित्यांचे वाटप वेळेत करण्यांची दक्षता घेत आहे.

४) शकात नमुद केलेप्रमाणे ताडपत्री पुरवठादार मे.डेझी इंडस्ट्रीज मुंबई याचेकडून आयकराची रक्कम रुपये ३१५४ /- दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी वसुल करून भरणा केलेल्या चलनाची मुळ प्रत या सोबत जोडलेली आहे.

**११) परिच्छेद क्रमांक ४.४३७ (२४) (सन २०१२-१३)**

**ग्रामपंचायतीचे दप्तर व अभिलेखे लेखा परीक्षणास सादर न केले बाबत :-**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० मधील कलम ६(३) प्रमाणे ज्या तारखेला लेखा परिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग / पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखा परिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद / पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेख विहित मुदतीत सादर करण्याबाबत कालावधी दिला जातो. तरीसुद्धा लेखापरिक्षणास कागदपत्रे / अभिलेख उपलब्ध केले

जात नाही त्या त्या जिल्हा परिषद / विभाग पंचायत समिती अंतिमिकरणाच्या वेळी अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तार चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखपरीक्षण अहवालामध्ये समाविष्ट केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेल्या परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिष्द आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसांच्या आत सादर केरणे बाबत सूचित केले जाते. तथापी या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देउुन सुद्धा लेखापरिक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायत राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत लेखापरिक्षणात घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | पंचायत समितीचे नांव | लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| २४ | सातारा | फलटण | २७ | -- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सातारा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

दिनांक ३१ मार्च, २०१३ अखेर फलटण तालुक्यातील ५ ग्रामपंचातींनी लेखा परिक्षणासाठी अभिलेख उपलब्ध न करून दिल्याबाबत शक घेणेत आला होता. या प्रलंबित ग्रामपंचायतींपैकी कुसूर, रावडी बु. व रावडी खु. ग्रामपंचायतीचे दफ्तर उपलब्ध झाले नसलेने गामसेवक श्री. कांबळे व्ही.आर. यांची खाते चौकशी सुरू करणे बाबत या कार्यालयाकडील पत्र क्र. पंसफ/आस्था-२/५२४/२०१५ दिनांक ०७ फेब्रुवारी, २०१५ ने प्रस्ताव सादर केला होता. त्यानुसार श्री. कांबळे यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, सातारा, जिल्हा परिषद यांच्याकडील आदेश क्र. साप्रवि-२/ ग्रांप-३/३१/२०१४ दिनांक ०६ जानेवारी, २०१५ ने निलंबित करून खाते चौकशी पूर्ण करून मुख्य कार्यकारी, सातारा, जिल्हा परिषद यांचेकडील आदेश क्र. साप्रवि-२/ ग्रांप-३/३८११/२०१६ दिनांक ११ एप्रिल, २०१६ अन्वये ग्रामसेवक श्री. कांबळे, यांची एक वेतनवाढ एक वर्षासाठी (पुढील वेतनवाढीवर परिणाम न करता) तात्पुरती बंद करणेत आली आहे. सोबत खाते चौकशी प्रस्ताव व आदेशांच्या छायाप्रती सादर करीत आहे. सद्य:स्थितीत श्री. कांबळे यांनी सदर तीनही ग्रामपंचायतीचे दफ्तर उपलब्ध करून दिले असून त्याचे लेखा परीक्षण करणेसाठी सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखा, सातारा यांना या कार्यालयाकडील पत्र क्र. पंसफ/ग्रापं/ले.प./ ३४४५/२०१६ दिनांक २७ जून, २०१६ व पत्र क्र. पंसफ/ग्राम/३५५८/ दिनांक ०४ ऑगस्ट, २०१६ ने कळविले आहे. सोबत छायप्रत सादर करीत आहे.

उर्वरित दोन ग्रामपंचायती पैकी कोऱ्हाळे ग्रामपंचयतीचे ग्रामसेवक श्री. बोबडे एस.वाय., मयत असून सदर ग्रामपंचायतीचे दफ्तर उपलब्ध नसल्याबाबत कार्यरत ग्रामसेवक, कोऱ्हाळे श्री. भगत टी. जी. यांनी दिनांक १७ सप्टेंबर, २०११, दिनांक १३ डिसेंबर, २०१२ रोजी पंचायत समिती फलटण ला कळविले आहे. तद्नंतर दिनांक २८ जानेवारी, २०१६ रोजी कार्यरत ग्रामसेवक यांनी जवाहार रोजगार योजनेचे १) कॅश बुक :- दिनांक ५ जुलै, १९९० ते दिनांक १० डिसेंबर, १९९१ २) नमुना नं. २३ सन ८९-९० ते ९१-९२ क्र. ९२८ ३) बँक पासबुक- दिनांक २४ जुलै, १९८९ ते दिनांक ९ मार्च, १९९१ इ. दफ्तर उपलब्ध झाले असलेचे कळवले आहे. सदर कागदपत्राची छायाप्रत सोबत सादर करीत आहे.

ग्रामपंचायत वडले येथील सन १९९३-९४ ते सन १९९७-९८ या कालावधीचे ग्रामनिधीचे ५ घटकांचे दफ्तर लेखा परिक्षणास उपलब्ध झाले नसले बाबत शक घेणेत आलेला आहे. या पैकी दिनांक १ एप्रिल, १९९३ ते दिनांक १९ नोव्हेंबर, १९९६ या कालावधीत ग्रामपंचायत वडले येथे ग्रामसेवक शिंदे एस.एस. व दिनांक २१ नोव्हेंबर, १९९६ ते दिनांक २८ डिसेंबर, १९९८ या कालावधीत श्री. एस.एस.पाटोळे हे ग्रामसेवक कार्यरत होते. दफ्तर उपलब्ध होत नसेल बाबत ग्रामसेवक, ग्रामपंचायत वडले यांनी दिनांक १२ सप्टेंबर, १९९९ अन्वये लेखा परिक्षक, स्थानिक लेखा निधी सातारा यांना कळविले असून पंचायत समिती फलटण कडील कारणे दाखवा नोटीस जा.क्र. पंसफ/आस्था-२/५९५/१९९५ दि. मे, १९९५, पत्र क्र. पंसफ/ग्राम/८६४/२००९ व दिनांक २०ऑक्टोबर, २००९ अन्वय दफ्तर लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करून देणेबाबत संबंधित ग्रामसेवक यांना कळविले आहे.वरील दोन्ही पत्रांच्या छायाप्रती सोबत सादर करीत आहे.तद्नंतर तत्कालीन ग्रामसेवक श्री.शिंदे एस.एस. यांना या कार्यालयाकडील कारणे दाखवा नोटीस क्र.पंसफ/आस्था-२/३३९८/२०११ दिनांक ७ ऑक्टोबर, २०११, नोटीस जा.क्र. पंसफ/ग्रापं/ले.पं. /१८२५/२०१३ दि २३ सप्टेंबर, २०१३ अन्वये दफ्तर लेखा परिक्षणास उपलब्ध करून देणेबाबत कळविले आहे. तसेच ग्रामसेवक श्री.पाटोळे एम.एस. यांनाही नोटीस जा.क्र. पंसफ/ग्रापं/ले.पं./ १८३६/२०१३ दिनांक २३ सप्टेंबर, २०१३, नोटीस क्र. जा.क्र.

पंसफ/ग्रापं/ले.पं./ १८३६/१४ दिनांक २७ जानेवारी, २०१४ व नोटीस क्र. पंसफ/ग्रापं / ले.पं./५०१०/१४ दिनांक ११ जून, २०१४अन्वये कळविणेत आले होते. परंतु अद्यापही संबंधितांनी दफ्तर उपलब्ध करून दिलेले नाही. संबंधित ग्रामसेवक श्री. शिंदे एस.एस. व श्री. पाटोळे एम.एम. हे मयत आहेत. सोबत मृत्यूचा दाखला सादर करीत आहे.

**१२) परिच्छेद क्रमांक ४.४३७ (२५) (सन २०१२-१३)**

**पंचायत समित्यांनी लेखापरीक्षणासाठी अभिलेख सादर न करणे :-**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम ६ (३) प्रमाणे ज्या तारखेला लेखापरीक्षणाचे काम सुरू करण्याचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबधीत जिल्हा परिषदेचे विभाग / पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरीक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद / पंचायत समित्या यांना अर्धसमान पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदर अभिलेख विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरी सुद्धा लेखापरीक्षणास अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखापरीक्षण अहवालात समाविष्ठ केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेदांबाबत लेखापरीक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावति केले जातात व संबंधीत जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेल्या परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत सादर करणेबाबत सुचित केले जाते. तथापि, या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमुद केल्याप्रमाणे संबंधीत जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देवूनसुद्धा लेखा परीक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाबत पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत लेखापरीक्षणात घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रं. | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| २५ | सातारा | माण | ११ | - |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सातारा यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

पंचायत समिती, माण (दहिवडी) कडील ग्रामपंचायत विभागाकडील एकुण २५ ग्रामपंचायतीनी दप्तर व अभिलेख लेखापरीक्षेस सादर न केल्याबाबत संबंधित ग्रामपंचायतीच्या सचिंवाना वारवार तोंडी व लेखी कळविण्यात आलेले आहे. व त्या प्रमाणे दिनांक २१ डिसेंबर, २०१३, दिनांक २४ जुलै, २०१४ व दिनांक १५ जानेवारी, २०१७ रोजी नोटीसीने संबधीत ग्रामपंचायतीना समज दिलेली आहे. तसेच सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, सातारा यांचेकडून लेखापरीक्षण कार्यक्रम मिळताच लेखापरीक्षण पुर्ण करून घेण्याची कार्यवाही करीत आहे.

**१३) परिच्छेद क्रमांक ४.४३७ (२६) (सन २०१२-१३)**

**पंचायत समित्यांनी लेखापरीक्षणासाठी अभिलेख सादर न करणे :-**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम ६ (३) प्रमाणे ज्या तारखेला लेखापरीक्षणाचे काम सुरू करण्याचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबधीत जिल्हा परिषदेचे विभाग / पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरीक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६(१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद / पंचायत समित्या यांना अर्धसमान पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदर अभिलेख विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरी सुद्धा लेखापरीक्षणास अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद

लेखापरीक्षण अहवालात समाविष्ठ केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेदांबाबत लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावति केले जातात व संबंधीत जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेल्या परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत सादर करणेबाबत सुचित केले जाते. तथापि, या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमुद केल्याप्रमाणे संबंधीत जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देवूनसुद्धा लेखा परीक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाबत पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत लेखापरीक्षणात घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रं. | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| २६ | सातारा | खटाव (वडूज) | ३७ | - |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सातारा यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

पंचायत समिती, खटाव व स्थानिक निधी लेखापरिक्षा कार्यालय सातारा यांचेकडील नोंदीवरुन खटाव विकास गटातील ग्रामपंचायत दहिवड चे सन २००७-०८ ते सन २००९-१० या कालावधीतील लेखापरिक्षण प्रलंबित असल्याचे दिसून येते.

पंचायत समिती खटाव अंतर्गत एकूण १३३ ग्रामपंचायती असून त्यापैकी दहिवड ही पुनर्वसित (सातारा तालुक्यात खटाव तालुक्यात पुनर्वसन) ग्रामपंचायत असून तिला सन २००७ साली स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा प्राप्त झालेला आहे. परंतु सदर ग्रामपंचायत सन २०१०-११ पासून गठीत झाली आहे. ग्रामपंचायत गठीत झालेपासून म्हणजे सन २०१०-११ पासूनचे दप्तर उपलब्ध आहे. तसेच सन २०१०-११ ते सन २०१३-१४ अखेर लेखा परिक्षण झाले आहे. त्याचा लेखा परिक्षण अहवाल उपलब्ध आहे. तसेच सदर ग्रामपंचायतीचे स्थापनेपूर्वीचे दप्तर पंचायत समिती सातारा यांचेकडून दप्तर अद्याप खटाव विकास गटाकडे दप्तराचे हस्तांतरण/प्राप्त झालेले नसलेने सदर ग्रामपंचायत दहिवड चे सन २००७-०८ ते सन २००९-१० या कालावधीचे लेखापरिक्षण झालेले नाही. सदर ग्रामपंचायत दहिवडचे दप्तर पंचायत समिती सातारा यांचेकडून प्राप्त होताच त्याचे लेखा परिक्षण करून घेणेची दक्षता घेत आहे.

**१४) परिच्छेद क्रमांक ४.४३७ (२७) (सन २०१२-१३)**

**ग्रामपंचायताचे दप्तर लेखापरिक्षणास उपलब्ध न केलेबाबत :-**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम ६(३) प्रमाणे ज्या तारखेला लेखापरिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते. त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटिस संबंधीत जिल्हा परिषदेचे विभाग / पंचायत समित्या यांना कळविणेत येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्याच्या संदर्भात जिल्हा परिषद / पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्याची मागणी कळविली जातो व सदरचे अभिलेख विहीत मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरीसुद्धा लेखापरिक्षणास अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखापरिक्षण अहवालात सामाविष्ठ केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेदाबाबत लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना १५ दिवासांच्या आत सादर करणेबाबत सुचित केले जाते तथापि, या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमुद केले प्रमाणे संबंधित जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या उपलब्ध करून देवूनसुद्धा लेखापरिक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही सदर बाब गंभीर स्वरूपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणा-

दाखल पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्याबाबत लेखापरिक्षणात घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| २७ | सातारा | कराड | ३९ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सातारा यांचेकडून खालील प्रमाणेलेखी खुलासा कळविण्यात आला.**

करा‍ड तालुक्यातील शकात नमूद केलेप्रमाणे सन १९८७-८८ ते सन २००६-०७ या कालावधीत ग्रामनिधी/जवाहर रोजगार योजना/संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना तसेच जवाहर ग्रामसमृध्दी योजनांचे अशा ४८ ग्रामपंचायतीचे ९६ घटकाचे लेखापरिक्षणास दप्तर उपलब्ध नसलेबाबतचा शक घेण्यात आला आहे. त्यापैकी अधिकाधिक दप्तर सन १९८७-८८ ते सन २००१-२००२ या कालावधीतील आहेत. या प्रलंबित ग्रामपंचायतीपैकी आज अखेर ५ ग्रामपंचायतींच्या ५ घटकांचे दप्तर लेखा परिक्षण पूर्ण झाले असून २५ ग्रामपंचायतींच्या ३७ घटकांचे दप्तर लेखा परिक्षणास उपलब्ध झाले असून जा.क्र.पंसक/ग्रापं-२/कावि-३९४/०१६ दिनांक २० फेब्रुवारी २०१६ जा.क्र.पंसक/ग्रापं-२/कावि-१५८१/०१६ दिनांक ८ ऑगस्ट, २०१६ तसे सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखा यांना कळविणेत आले आहे. आज अखेर १८ ग्रामपंचायतीचे ५४ घटकांचे दप्तर लेखापरिक्षणासाठी उपलब्ध झालेले नाही. यासाठी २६ ग्रामसेवक जबाबदार आहेत. त्यापैकी सध्या ८ ग्रामसेवक मयत, ३ ग्रामसेवक बडतर्फ, व १ ग्रामसेवक सक्तीने सेवानिवृत्त झालेले आहेत. या ग्रामसेवकांचे मृत्यूचे दाखले, मालमत्तेचे उतारे घेवून ग्रामसेवकांचा क्षमापनाचा प्रस्ताव व ग्रामसेवकांचे मालमत्तेवर बोजा चढविणे किंवा पेन्शन मधून वसुलीची कारवाईसाठी प्रस्ताव उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामीण पाणीपुरवठा), जिल्हा परिषद, सातारा यांचेकडे सादर केलेला आहे. फक्त ग्रामपंचायत सैदापूर यांचे बाबतीत उच्च न्यायालयात कोर्ट केस चालू आहे.

उर्वरित १४ ग्रामसेवकांवर दप्तर उपलब्ध न केलेबाबत दंडाच्या कारवाईसाठी नोटीस दिलेल्या आहेत. यास त्यांनी प्रतिसाद दिला नाही म्हणून त्यांचे वेतनातूर दंड वसुलीबाबत आदेश दिले असून त्यांची विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.

**१५) परिच्छेद क्रमांक ४.४३७ (२८) (सन २०१२-१३)**

**पंचायत समित्यांनी लेखा परिक्षणासाठी अभिलेख सादर न करणे :-**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम ६ (३) प्रमाणे ज्या तारखेला लेखपरिक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग / पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद / पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्याची मागणी कळविली जाते. व सदरचे अभिलेख विहीत मुदतीत सादर करण्याबाबत कालावधी दिला जातो. तरीसुद्धा लेखापरिक्षणास अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालाबाबत लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करण्यासाठी प्रस्तावित केले जातात. व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसांचे आत सादर करणेबाबत सुचित केले जाते. तथापी या सूचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमूद केलेप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढया संधी उपलब्ध करून देऊनसुद्धा

लेखा परिक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असलेने ही बाब पंचायत राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणा दाखल पंचायत समिती यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्यांबाबत लेखापरीक्षणात घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहे.

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| २८ | सातारा | पाटण | ३ | २,४०,९८९/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सातारा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

प्रमाणक क्रमांक २६७,२६८,२६९ सदरचे प्रमाणक रद्द करणेत आले असून सदर प्रमाणकाची रक्कम रुपये १५,३९९/- (अक्षरी रक्कम रुपये पंधरा हजार तिनशे नव्व्यान्नव फक्त) इतकी रक्कम दिनांक ३० सप्टेंबर, २०१३ रोजी जिल्हा निधी २ मधील रोजकिर्दला जमा करून घेण्यात आली. सोबत चलन व रोजकिर्दचे पान सादर केले आहे.

तसेच खालील प्रमाणे ३ प्रमाणके बाबतची कार्यवाही केलेली आहे.

१) दिनांक २९ मार्च, २०१३ प्रमाणक क्रमांक १६९, रक्कम रुपये २,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये दोन लक्ष फक्त) सोबत लेखापरिक्षणास सादर केले आहे.

२) दिनांक ३० मार्च, २०१३ प्रमाणक क्रमांक २१२, रक्कम रुपये २१,९९०/- (अक्षरी रक्कम रुपये एकविस हजार नऊशे नव्वद फक्त) सोबत लेखापरिक्षणास सादर केले आहे.

३) दिनांक ३१ मार्च, २०१३ प्रमाणक क्रमांक २६५, रक्कम रुपये ३,६००/- (अक्षरी रक्कम रुपये तीन हजार सहाशे फक्त) सोबत लेखापरिक्षणास सादर केले आहे.

तरी केलेली पूर्तता पाहून शक वगळणेस नम्र विनंती आहे.

**१६) परिच्छेद क्रमांक ४.४३७ (२९) (सन २०१२-१३)**

**पंचायत समित्यांनी लेखा परिक्षणासाठी अभिलेख सादर न करणे :-**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम, १९३० मधील कलम ६ (३) प्रमाणे ज्या तारखेला लेखपरिक्षणाचे काम सुरु करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग / पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरिक्षण सुरु झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्याची मागणी कळविली जाते. व सदरचे अभिलेख विहीत मुदतीत सादर करण्याबाबत कालावधी दिला जातो. तरी सुद्धा लेखापरिक्षणास अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपाबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालाबाबत लेखापरिक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करण्यासाठी प्रस्तावीत केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसाचे आत सादर करणेबाबत सुचित केले जाते. तथापी या सूचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमूद केलेप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढया संधी उपलब्ध करून देऊनसुद्धा लेखा परिक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असलेने ही बाब

पंचायत राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणा दाखल पंचायत समिती यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्यांबाबत लेखापरीक्षणात घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहे.

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| २८ | सातारा | पाटण | १० | ---- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सातारा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

पंचायत समिती, पाटण गटाकडे एकूण २४१ ग्रामपंचायती कार्यरत असून त्यापैकी १०० ग्रामपंचायतीचे दप्तर लेखा परिक्षणास उपलब्ध न केलेने त्याचे लेखा परिक्षण झालेले नाही. असा आक्षेत घेणेत आलेला असून त्याबाबत पंचायत समिती पाटण या विकास गटात खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे.

| ले. परि. मध्ये घेणे आलेल्या ग्रापं संख्या | पैकी ले. प. पूर्ण ग्रापं संख्या | आज रोजी दप्तर उपलब्ध ग्रापं संख्या | कोर्टकेस मधील ग्रापं संख्या | ले. प. मध्ये दुबार नांवे असलेली ग्रापं संख्या | तालुक्यात नसलेली ग्रामपंचायत संख्या | तालुक्यात स्थापन नसलेली ग्राम संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १०० | ६ | १४ | १० | १४ | १ | १ |

लेखा परिच्छेदामध्ये नमुद केलेल्या १०० ग्रामपंचायतीपैकी ६ ग्रामपंचायतींचे लेखा परिक्षण झालेले आहे. ज्या ग्रामपंचायतींचे लेखा परिक्षण झालेले आहे त्या ग्रामपंचायतींचे लेखा परिक्षण अहवाल परिक्षणास अहवाल परिक्षणास उपलब्ध करीत आहे.

तसेच १४ ग्रामपंचायतींचे लेखा परिक्षण करून मिळावे याबाबतचे ग्रामपंचायतींचे पत्र कार्यालयास प्राप्त झालेले असून संबंधित ग्रामपंचायतीचे लेखा परिक्षण करून मिळावे या आशयाचे पत्र मा. सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखा, सातारा यांचेकडे पाठविणेत आलेले आहे. पाठविण्यात आलेल्या छायांकित प्रत परिक्षणास उपलब्ध केलेली आहे.

उपरोक्त १० ग्रामपंचायतीचे दप्तर कोर्ट केस झालेमुळे न्यायालयाचे ताब्यात आहे.

लेखा परिच्छेदांमध्ये १०० ग्रामपंचायतींचे लेखा परिक्षण झालेले नाही असे नमूद केले असले तरी १०० ग्रामपंचायतींपैकी १४ ग्रामपंचायतीचे दुबार नांवे लेखा परिच्छेदामध्ये घेणेत आलेली आहेत.

तसेच पाटण विकास गटामध्ये ग्रामपंचायत अरगड ही १ ग्रामपंचायत समाविष्ट नाही व मस्करवाडी ही १ ग्रामपंचायत सदर कालावधीत अस्तित्वात नव्हती. ती धामणी ग्रामपंचायतीमध्ये समाविष्ठ होती व धामणी ग्रामपंचायतीचे सदर कालावधीतील लेखापरीक्षण झालेले असून त्याचा लेखापरीक्षण अहवाल सोबत सादर केला आहे.

सद्य:स्थितीमध्ये ५४ ग्रामपंचायतीचे दप्तर लेखा परिक्षणास उपलब्ध नाही. त्यामध्ये ४४ एवढे ग्रासेवक गुंतलेले असून त्यापैकी १२ ग्रासेवक मयत, ५ ग्रामसेवक बडतर्फ व ११ ग्रामसेवक सेवानिवृत्त आहेत. आणि १६ कार्यरत ग्रामसेवक यांचेवर दप्तर उपलब्धतेबाबतच्या नोटीसा देणेत आल्या आहेत. तरीही ग्रामसेवकांनी योग्य ती कार्यवाही केली नसलेने, त्यांचेविरुद्ध दंडाचा प्रस्ताव मंजूरीसाठी पाठविण्यात आलेला आहे. तसेच सदरची दप्तरे उपलब्ध होणेसाठी तालूका स्तरावरुन दिनांक २४ सप्टेंबर, २०१५, दिनांक १८ जानेवारी, २०१६ व दिनांक २ जून, २०१६ या तारखांना नोटीस देणेत आलेल्या असून या कार्यालयामार्फत संबंधित वर कारवाई प्रस्तावित करणेची कार्यवाही चालू आहे.

**१७) परिच्छेद क्रमांक ४.४३७ (३०) (सन २०१२-१३)**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० मधील कलम ६ (३) प्रमाणे ज्या तारखेला लेखापरिक्षणाचे काम सुरु करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरिक्षण सुरु झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या

संदर्भात जिल्हा परिषद/पंचायत समित्या यांना अर्धमास पत्राने अभिलेख्याचे मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेख विहीत मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरी सुद्धा लेखापरिक्षणास अभिलेख उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखा परिक्षण अहवालात समाविष्ठ केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेदाबाबत लेखापरिक्षा पुर्नविलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावीत केले जातात व संबंधित जिल्हा परिषद विभाग आणि पंचायत समिती यांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांना १५ दिवसाच्या आत सादर करणेबाबत सुचित केले जाते. तथापि, या सुचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे आढळुन येते. वर नमुद केलेप्रमाणे संबंधित जिल्हा परिषद व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देवून सुद्धा लेखापरिक्षणास असे अभिलेख सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायती राज समितीच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरण दाखल पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेख्या बाबत लेखापरिक्षणात घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.

| अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखा परिक्षण अहवाल परिच्छेद क्रमांक | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ३० | सातारा | महाबळेश्वर | १५ | -- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, सातारा यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

महाबळेश्वर तालुक्यामध्ये सन २०१२-१३ मध्ये स्थानिक निधी लेखा परिक्षणामध्ये एकुण ६ ग्रामपंचायत दप्तर लेखा परिक्षणाकरिता उपलब्ध करून दिले नव्हते त्यानुसार खालीलप्रमाणे माहिती आहे.

| अ.क्र. | ग्रामपंचायत नाव | योजना | वर्ष | शेरा |
|---|---|---|---|---|
| १) | दाभेदाभेकर | ज.ग्रा.रो. यो | २००४-०५ ते २००६-०७ | एफआयआर नं. १५ दि. ७/२/११ ने दाखल सदरचे दप्तर पोलीस केस कामी पो. स्टे. मेढा यांचेकडे जमा केले आहे. |
| | | ग्रामनिधी | २००३-०४ ते २००५-०६ | |
| | | ज.ग्रा.रो. यो | १९९९ ते २००० | |
| २) | दाभेमोहन | ग्रामनिधी | २००३-०४ ते २००५-०६ | |
| | | ज.ग्रा.रो. यो | ९३-९४ ते ९९-९९ | |
| ३) | कोट्रोशी | ज.ग्रा.रो. यो | २००२-०३ ते २००५-०६ | सन ८९-९० ते २००६-०७ चे लेखापरिक्षण झाले आहे. |
| ४) | मांघर | ज.ग्रा.रो. यो | २००२-०३ ते २००३-०७ | लेखापरिक्षण करणेकामी सहा. संचालक स्था. नि. ले. सातारा यांना दि. ०१.०१.२०१३ रोजी व पत्र क्र. ५८, दि. २७.०१.२०१५ रोजी कळविले |
| ५) | पारुट | ज.ग्रा.रो. यो | १९८७-८८ ते २००३-०४ | लेखा परिक्षण झाले आहे. |
| ६) | यर्णे | ज. रो.यो. | १९९४-९५ ते १९९८-९९ | एफ.आय.आर.क्र. १५/ ३०.०६.२०१६ ने दाखल व खातेनिहाय चौकशी पुन्हा सुरु असून अंतिम टप्प्यात आहे. |
| | यर्णे | ज.ग्रा.स. यो | १९९९-०० ते २००१-०२ | |
| | यर्णे | ज.ग्रा.स. यो | २०००-०३ ते २००६-०७ | |

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

सातारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ११ एप्रिल, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, सन २०१२-१३ या वर्षाच्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेद क्रमांक ३.११७, ३.११८, ३.१२२, ३.५१९, ३.८३१, ३.१०६९ (२९ ते ३१), ४.२५०, ४.४३७ (२४ ते ३०) हे सर्व परिच्छेद लेखापरीक्षणास अभिलेखे सादर न करण्यासंदर्भातील आहेत. त्यामुळे या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस अहवाल सादर करावा व यासंदर्भात मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अन्वये २५ हजार रुपये दंड आकारावयाचा असून सेवापुस्तिकेत नोंदही घ्यावयाची आहे. तसेच, वेतनवाढ रोखण्यासंदर्भात देखील तरतूद आहे. ही सर्व कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपल्या स्तरावर करावी व समितीला एक महिन्याच्या आत अहवाल सादर करावा. त्यानंतर विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) सन २०१२-१३ या अहवाल वर्षात लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून दिले नसल्याप्रकरणी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर समितीच्या निदेशानुसार महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अनुसार दंडाची रक्कम वसुल करून एक वेतन वाढ रोखून तशी नोंद संबंधितांचे सेवा पुस्तिकामध्ये घेण्याची कारवाई केली आहे काय, त्यानुसार प्रकरण व परिच्छेद निहाय दोन्ही अहवाल वर्षाची माहिती समितीस सादर करणेत यावी.

(२) भविष्यात लेखा परिक्षणास अभिलेख उपलब्ध न करून देणे असे आक्षेप वारंवार उपस्थित होवू नयेत याबाबत काटेकोर अंमलबजावणी करण्या संदर्भात मंत्रालयीन विभागाकडून कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे ?

(३) संबंधित अधिनियमात दुरुस्ती करून रुपये ५०,००० /- दंड अथवा परिच्छेदातील एकूण रकमेच्या १० % इतकी रक्कम दंड म्हणून आकारण्याची तरतुद वित्त विभागाने केली आहे काय ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जे कर्मचारी दप्तर उपलब्ध न करणे व उशिरा उपलब्ध करणे यासाठी जबाबदार आहेत त्यांचेवर ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील परिपत्रक क्र पंरास-२०१५/प्र.क्र.२८/ वित्त ७ दिनांक ३० मार्च २०१६ दप्तर उपलब्ध करून न दिलेबाबत मुंबई स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम १९३० मधील कलम ७ तसेच सन २०११ मधील कलम ८ अन्वये च्या सुचनांनुसार मा विभागीय आयुक्त यांचेकडे संबंधीतांवर दंडाची कारवाई प्रस्तावीत केली जाते. तथापि महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाकडील शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण-२०१७/ प्र.क्र.३७/ कोषा-प्रशा-४ दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ च्या परिपत्रकानुसार मुंबई स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम १९३० मधील कलम ७ (सुधारित अधिनियम २०११ मधील कलम ८ नुसार लेखापरिक्षणासाठी विहित मुदतीत अभिलेखे उपलब्ध न झालेस दंडात्मक कारवाईचा प्रस्ताव विभागीय सहसंचालक स्थानिक निधी लेखा परिक्षा यांनी विभागीय आयुक्त यांचेकडे सादर करावा असे निर्देश आहेत.

तसेच दंडाची कारवाई करण्यासाठी प्रस्ताव प्रथम न्यायदंडाधिकारी यांचे कडे सादर करणे आवश्यक आहे जिल्हा परिषदेने कायदेशीर सल्लागार यांचा अभिप्राय घेतला असून कायदेशीर सल्लागार यांचे मागणीनुसार दावा दाखल करणेसाठी लेखा परिक्षकांकडून लेखा परिक्षणावेळी दप्तर उपलब्धतेसाठी देण्यात आलेल्या कागदपत्रांची मागणी सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, यांचेकडे करण्यात आली पाहीजे.

त्याचप्रमाणे दप्तर उपलब्ध न करणाऱ्या ग्रामसेवक व विलंबाने दप्तर उपलब्ध करणाऱ्या कर्मचारी यांना महाराष्ट्र जिल्हा परिषदा व जिल्हा सेवा (शिस्त व अपील नियम १९६४) नुसार नोटीसा देण्यात आल्या असून त्यांचेकडून खुलासा प्राप्त होताच त्यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येत आहे.

सन २०१२-१३ या अहवाल वर्षात लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करून दिल्याबददल मा. समितीने दिलेल्या निर्देशानुसार पुढीलप्रमाणे कार्यवाही करणेत येत आहे (सोबत प्रपत्र १ व २) **(परिशिष्ट ११.१)**

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :- (वित्त-७)**

१) जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी सहमत आहे.

२) महालेखापाल व स्थानिक निधी लेखा परिक्षण सुरू असताना त्यांना लेखा परिक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध न करून देण्यासाठी नोडल ऑफिसरची नियुक्ती करण्याबाबतच्या सूचना सर्व जिल्हा परिषदांना या विभागाच्या परिपत्रक क्र.लेखाप २०१३/ (७/९३), वित्त-८, दिनांक ११ फेब्रुवारी, २०१३ व परिपत्रक क्र. पंरास-२०१५/प्र.क्र.२८/वित्त-७ दिनांक ३० मार्च, २०१६ अन्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सातारा जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १६ जानेवारी, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, लेखापरीक्षणाकरिता कागदपत्रे उपलब्ध न करून देण्याबाबत दंडात्मक कारवाई केली आहे काय, असल्यास, किती प्रकरणात केली आहे, आणखी किती प्रकरणात कारवाई करणे शिल्लक आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, या ठिकाणी ६-७ मुद्यांबाबत प्रश्न विचारलेला आहे. ३ बेंचेस खरेदीबाबत शालेय शिक्षण विभागाशी चर्चा केली असून तोच प्रस्ताव या ठिकाणी आहे. सदर प्रकरणाची कागदपत्रे होती. मागणी केल्याची नोंदवही ठेवलेली नाही, असे म्हटले आहे. नोंदवही असून उपलब्ध करून दिले नाही असा मुद्दा नाही. तेथे नोंदवही ठेवलेलीच नव्हती, म्हणून संबंधितांवर आरोप ठेवला असून त्याची वेगळी चौकशी केली आहे. नोंदवही असताना उपलब्ध करून दिले नाही असे झालेले नाही. २-३ प्रकरणात दंड आकारण्यात आलेला आहे. श्री. शेलार यांच्या विरुद्ध कारवाई करून दंड आकारला आहे. ग्रामसेवकांच्या संबंधी एकूण ४१ प्रकरणे असून त्या बाबत दंडाची नोटीस देऊन कारवाई केलेली आहे. वित्त विभागाचे दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ रोजीचे परिपत्रक आहे, कागदपत्रे उपलब्ध करून दिली नसल्यास स्थानिक निधी लेखा कार्यालयाने विभागीय आयुक्तांची परवानगी घ्यावी. या बाबत शासनाचा निर्णय वेगळा आहे. जिल्हा परिषदेने या संबंधी कारवाई केल्यास त्या बाबत न्यायालयात आव्हान केले गेले तर ते टिकणार नाही. यामुळे जिल्हा परिषदेने ती कारवाई थांबवली आहे. तसेच स्थानिक लेखा कार्यालयाला विचारणा केलेली आहे. प्रथम न्यायदंडाधिकाऱ्यांकडे जाऊन दंड वसूल करावयाचा आहे. जिल्हा परिषद नोटीस देऊन दंड वसूल होणार नाही. दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार विभागीय आयुक्त यांच्याकडे अर्ज करावयाचा आहे.

यावर समितीने निदेश दिले की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नैसर्गिक न्याय तत्वानुसार ही सर्व प्रकरणे तपासावीत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मत व्यक्त केले की, न्यायालयाच्या समोर आरोप पत्र दाखल केले जाणार आहे. त्या संबंधी जुनी कागदपत्रे मागितली आहेत, त्यामुळे या संबंधी जिल्हा परिषद कार्यवाही करीत आहोत.

## अभिप्राय व शिफारशी

सातारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या समवेत झालेल्या साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, सन २०१२-२०१३ च्या स्थानिक निधी लेखा परिक्षणाच्या वेळी लेखा परिक्षकांस ते तपासणी करीत असताना त्यांनी मागितलेली कागदपत्रे संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी दाखविली नाहीत. अशा एकूण १७ परिच्छेदांमध्ये नोंदविलेल्या आक्षेपाच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार रुपये २५,०००/- इतकी दंडाची शास्ती तसेच एक वेतनवाढ रोखण्याची कारवाई करून तशी नोंद संबंधितांचे सेवा पुस्तिकेमध्ये घेण्याची कारवाई करण्याची शिफारस करून देखील काही अधिकारी या नियमास न जुमानता लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून देत नाहीत.

समिती राज्यात अनेक ठिकाणी भेट देत असताना लेखा परिक्षकांना अभिलेखे संबंधित अधिकाऱ्यांकडून वेळीच उपलब्ध करून दिली जात नाही. त्यामुळे लेखापरिक्षण करता येत नाही. या बाबींचा फायदा संबंधितांकडून घेतला जातो हे टाळण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या दंडात्मक तरतुदीत बदल करणे आवश्यक आहे. सदर बाब विचारात घेता आता समिती अशी शिफारस करीत आहे की, "**जी कोणतीही व्यक्ती कलम ६ पोटकलम (१) खंड (अ) किंवा खंड (ब) अन्वये कायदेशीररित्या तिला केलेल्या कोणत्याही आज्ञेचे पालन करण्यात जाणूनबुजून दुर्लक्ष करेल किंवा तिचे अनुपालन करण्याचे नाकारेल ती विभागीय आयुक्तांपुढे सदर बाब सिद्ध झाल्यानंतर लेखा परिक्षणास उपलब्ध न झालेले दस्तऐवज/अभिलेख यामध्ये गुंतलेल्या एकूण रकमेच्या ५% किंवा रुपये ५०,०००/- यापैकी जास्त असणाऱ्या रकमे-**

**इतक्या दंडात्मक रकमेस पात्र ठरविण्यात यावी. तसेच संबंधितांची एक वेतनवाढ रोखण्याची कारवाई करून तशी नोंद संबंधितांच्या सेवा पुस्तकामध्ये घेण्याची कारवाई करण्यात यावी"** अशी सुधारणा संबंधित अधिनियमात करण्यात यावी व करण्यात आलेल्या रकमेबाबतची माहिती समितीला कळविण्यात यावी.

ज्या प्रकरणांमध्ये अभिलेखे उपलब्ध करून न देणे याबाबत दंडात्मक कारवाई केलेली नाही, त्या प्रकरणांमध्ये दंड आकारणी करण्यात यावी. समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी केलेल्या अनुपालन अहवालामध्ये सदर अभिलेखे उपलब्ध असल्याचे स्पष्टीकरण केले आहे. मात्र सदर अभिलेखे लेखापरिक्षणाच्या वेळी उपलब्ध करून देणे आवश्यक होते. **सातारा जिल्हा परिषदेमध्ये सन २०१२-२०१३ या वर्षामध्ये एकूण १७ परिच्छेदांसंदर्भात अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे अभिलेखे लेखापरिक्षणाच्यावेळी सादर करण्यात आलेले नाहीत अशा सन २०१२-२०१३ मधील परिच्छेदासंदर्भात कलम ६ मधील पोट-कलम (१) खंड (अ) किंवा खंड (ब) नुसार कायदेशीर कारवाई करून वसुल केलेली रक्कम व गुंतलेली एकूण रक्कम याबाबतचा सविस्तर अहवाल तसेच ग्रामसेवकांच्या ४१ प्रकरणांबाबत दंडाची नोटीस देऊन केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

## प्रकरण बारा

## जिल्हा परिषद, सातारा

## सर्वसाधारण शिफारशी

### १. गैरव्यवहार/अपहार/अखर्चित रकमा जमा करण्याबाबत :-

समितीने राज्यातील जिल्हा परिषदांना भेटी दिल्या असता विशेषत: सातारा जिल्हा परिषदेत गैरव्यवहार व अपहाराच्या मोठ मोठ्या रकमा वसुलीविना प्रलंबित आहेत. अशी अनेक प्रकरणे समितीसमोर तपासणीसाठी आली असता समितीने या प्रकरणात सदरच्या रकमा शासन खाती जमा करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निदेशित केले आहे. सदर गैरव्यवहाराची/अपहाराची अनेक प्रकरणे असून ती जुनी आहेत. जिल्हा परिषदांनी वेळीच कार्यवाही केली असती तर शासनाचा कोट्यवधी रुपयांचा निधी या प्रकरणांमध्ये अडकून पडला नसता व तो वेळीच वसूल झाला असता. जिल्हा परिषदांनी सदरच्या रकमा संबंधितांवर प्रशासकीय कारवाई करून वसुल केल्या असत्या तर या रकमा केंव्हाच शासन खाती जमा झाल्या असत्या. शासनाचा विविध योजनांवरील निधी हा गैरव्यवहाराने जेव्हा हडपला जातो तेव्हा त्या त्या योजना राबविताना त्यात निश्चितच मोठ्या प्रमाणावर अनियमितता होऊन योजनेच्या फलनिष्पत्तीवर त्याचा विपरीत परिणाम होतो असे समितीला आढळून आले आहे. जिल्हा परिषदांकडून त्यांच्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात विलंब होत असल्यामुळे जिल्हा परिषदा अशा कर्मचाऱ्यांना पाठीशी घालत असून त्यांचेवरील संभाव्य कार्यवाहीस पुढे ढकलण्याचा प्रयत्न करताना दिसतात. त्याद्वारे एकप्रकारे शासनाचा निधी वेळीच वसूल होत नसल्यामुळे याबाबत मोठ्या प्रमाणात प्रशासकीय अनियमितता होत असल्याचे समितीला आढळून आले आहे. **याप्रकरणी समिती अशी शिफारस करीत आहे की, जिल्हा परिषदेची योजना राबविताना संबंधित योजनेत एखादा गैरव्यवहार अथवा अपहार उघडकीस आला असल्यास त्या गैरव्यवहारासंदर्भात कोणत्याही परिस्थितीत तीन महिन्यात दोषारोपपत्र दाखल करून असे प्रकरण सहा महिन्यात निकाली काढण्यासंदर्भात शासनाने निश्चित अशी भूमिका घ्यावी त्याचप्रमाणे अशी कार्यवाही मुदतीत पूर्ण करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेच्या संबंधित विभाग प्रमुखांवर सोपविण्यात यावी व असे विभाग प्रमुख गैरव्यवहाराच्या अथवा अपहाराच्या रकमा सहा महिन्यात शासन खाती जमा करण्यात अयशस्वी झाल्यास त्यांचेविरुद्ध जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर त्या प्रकरणी शिस्तभंगाची कार्यवाही करण्याबाबत विभागाने ठोस भूमिका घ्यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

शासनाकडून एखादी योजना राबविताना कोट्यवधी रुपयांचा निधीची तरतूद करून मिळविला जातो मात्र असा निधी वेळेत खर्च केला जात नाही व तो शासन खाती देखील जमा केला जात नाही. त्यामुळे वित्तीय बाबीत मोठ्या प्रमाणावर अनियमितता होत असून संबंधित अधिकाऱ्यांकडून रक्कम वेळीच खर्च करण्याबाबत कमालीचा हलगर्जीपणा करण्यात येतो. कोट्यवधी रुपये अखर्चित ठेवल्यामुळे शासनाला असा निधी आवश्यक असणाऱ्या अत्यंत महत्त्वाच्या योजनांवर खर्च करता येत नाही. पर्यायाने विविध भौगोलिक भागातील निधी वाटपातील असंतोष वाढतो. खर्चाच्या बाबतीतील अनियमितता व योजना राबविण्याच्या कामातील अधिकाऱ्यांद्वारा होत असलेला हलगर्जीपणा हा प्रशासकीयदृष्ट्या अत्यंत गंभीर असून त्यामुळे अखर्चित निधी राहून तो दुसऱ्या महत्त्वाच्या योजनांवर खर्च केला जात नाही. **म्हणून एखाद्या योजनेसाठी मागितलेला निधी त्या योजनेची उपयुक्तता तसेच जनसामान्यांच्या हिताचा विचार करून राबविणे आवश्यक आहे. जनतेला देय असलेल्या सुविधा योजना राबवून वेळीच मिळत नसल्याने जनतेत नैराश्य व संतापाच्या भावना वाढीस लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता अखर्चित रकमेवर बंधन टाकण्यासंदर्भात शासनाने यासंदर्भात कडक धोरण आखून त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात जिल्हा परिषदांना एका परिपत्रकाद्वारे कळविण्यात यावे अशीही समितीची शिफारस आहे.**

**गैरव्यवहार/अपहार/अखर्चित रकमा जमा करण्यासंदर्भात समितीने उपरोक्तप्रमाणे केलेल्या शिफारशीनुसार यासंदर्भात शीघ्रतेने कार्यवाही करून सातारा जिल्हा परिषदेमधील रक्कमा शासन खाती जमा करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी व पंचायती राज समितीने तपासणी केलेल्या अहवालासंदर्भात एकूण किती रकमेची शासन खाती वसुली केली याबाबीची माहिती समितीला कळविण्यात यावी, अशीही समितीची शिफारस आहे.**

### २. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणे :-

समितीने सातारा जिल्हा परिषदेला भेट दिली असता अनेक लेखा परिच्छेदांमध्ये लेखा परिक्षकांना संबंधित लेख्यांवरील कागदपत्रे उपलब्ध करून दिली नसल्याने त्याबाबतचा अंतिम अभिप्राय लेखा परिक्षकांस व्यक्त करता आला नाही. याबाबत समितीने असे लेखे विचारात घेतले असता अनेक प्रकरणात लेखा परीक्षणाच्या वेळी कागदपत्रे उपलब्ध नव्हती आता उपलब्ध

आहेत असे समितीला सांगण्यात आले. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध नव्हती त्याची कारणे काय या शोधात समितीला अनेक गंभीर बाबी निदर्शनास आल्या. **मुळात कागदपत्रे उपलब्ध असतानाही ते लेखा परिक्षणास न दाखविणे ही गंभीर बाब आहे. तो सरळ शिस्तभंगाचा प्रकार आहे. लेखा परीक्षक सुरुवातीला कागदपत्रे उपलब्ध करून देण्यासाठी चार महिन्यांचा वेळ देतात व त्यानंतर पुन्हा दोन महिन्यांचा कालावधी संबंधितांना दिला जातो. असे असूनदेखील संबंधित अधिकारी लेखा परीक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून देत नाहीत. मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ मध्ये सन २०११ पूर्वी लेखा परीक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करून देणाऱ्या अधिकाऱ्यास केवळ १०० रुपयांचा दंड आकारण्यात येत असे. कदाचित त्यामुळे लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध होत नसतील अशी समितीने भावना व्यक्त केल्यानंतर शासनाने सन २०११ मध्ये उक्त अधिनियमाच्या कलम ७ मध्ये सुमारे २५,००० रुपये (पंचवीस हजार रुपये) दंडाच्या रकमेची तरतूद केली आहे. समितीने या प्रकरणी जिल्हा परिषदांना ज्या कोणी लेखा परीक्षणाचे वेळी लेखा परिक्षकांस कागदपत्रे उपलब्ध करून दिली नाहीत अशा जबाबदार असणाऱ्या सर्व संबंधितांना अधिनियमातील तदतुदीनुसार रु.२५,०००/- इतका दंड आकारण्याची शास्ती करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार सातारा जिल्हा परिषदेमध्ये अशा किती व्यक्तींना प्रत्येक प्रकरणी दंड करण्यात आला व एकूण किती रक्कम शासन खाती जमा करण्यात आली याची संपूर्ण माहिती प्रकरणनिहाय समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

### ३. नियमानुसार व नैसर्गिक न्याय तत्त्वाला अनुसरुन दोषीतांवर कारवाई करण्याबाबत :-

संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीततेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, प्रभावी व अर्थपूर्ण असे नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे म्हणून कार्यकारी प्रशासन राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी पंचायती राज समितीची रचना करण्यात आली. समितीला अधिकार मिळाल्यावरुन समितीने अनेक प्रकरणात दोषीतांवर कार्यवाही करण्याबाबत शासनाला निर्देश दिले आहेत. असे निर्देश देत असताना समितीने एखाद्या अधिकारी/कर्मचाऱ्याची प्रथमदर्शनी चूक आढळून देखील संबंधित दोषींविरुद्ध जाणीवपूर्वक निलंबनाची कारवाई प्रस्तावित केलेली नाही. भारतीय संविधानाने प्रत्येकाला समान संधी देण्याचे धोरण दिल्याने कारवाई करतानादेखील दोषीताने तो निर्दोष असल्याचे अभिकथन करणे आवश्यक आहे असे समितीला प्रकर्षाने वाटते. कोणत्याही निर्दोष व्यक्तीवर दोष लादले जाणे हे नैसर्गिक न्याय तत्त्वाला अनुसरुन नाही असे समितीला वाटते. म्हणून प्रशासनाने कार्यवाही करताना कोणत्याही निर्दोष व्यक्तीला शास्ती करु नये आणि दोषी व्यक्तीला कोणत्याही परिस्थितीत शास्तीविना सोडू नये असे समितीला वाटते. भेटीच्या वेळी संबंधित प्रकरणाची निष्पक्षपणे चौकशी करून चौकशी अहवालामध्ये दोषीविरुद्ध कार्यवाही करून त्यास शिक्षा करणे योग्य आहे. **तथापि, एखाद्या निर्दोष व्यक्तीवर कारवाई केल्यास त्यात समितीच्या सूचनेनुसार कारवाई केली असे म्हणणे ही बाब समाजाची लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास उडवणारी आहे. जनमानसात समितीची भूमिका ही प्रशासनाने केलेल्या चांगल्या व वाईट बाबींना शोधून काढून त्यातून जनतेप्रती महत्त्वाची कामे कशी केली जातील याबाबतची प्रतिमा उभी करणे हे संसदीय लोकशाहीने दिलेले एक कर्तव्य आहे. समितीची नाहक बदनामी काही कर्तव्यपारायणवता व सचोटी नसलेले अधिकारी निर्माण करतात आणि जाणीवपूर्वक वैयक्तिक द्वेषापोटी, हेवेदाव्यापोटी निर्दोष व्यक्तींवर कार्यवाही करून समितीची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतात. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सतर्क राहणे आवश्यक असून एखादा गुन्हेगार सुटत असताना त्यास नैसर्गिक न्याय मिळेल परंतु एखाद्या निर्दोष व्यक्तीला शिक्षा होता कामा नये ही समितीची भूमिका असल्यामुळे समितीने ज्या ज्या प्रकरणांमध्ये चौकशी करण्याचे निर्देश दिलेले आहेत. अशा सर्व प्रकरणांमध्ये दोषारोपांची चौकशी करताना सर्व संबंधित व्यक्तींना नैसर्गिक न्याय तत्वानुसार तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार संपूर्ण वस्तुस्थिती विचारात घेतल्यानंतरच नि:पक्षपातीपणे कार्यवाही करून दोषींना शास्ती तर निर्दोषींना मुक्ती या तत्वानुसार कारवाई करण्यात यावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

**परिशिष्ट (अ)**

**शासनाचे आदेश, शासन निर्णय व परिपत्रके**

बिगर सिंचन पाणीपट्टी दरात वाढ

(परिशिष्ट १.१)

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग,
शा.नि.क्र. पापद २००६/(३९६/०३) सिंव्य(धो)
मंत्रालय मुंबई ४०० ०३२
दिनांक-३१/७/२००६

पहावे- १) शासन निर्णय क्र. पापद १००१/(५/२००१)सिं.व्य.(धो), दि.१२/९/०१
२) शासन निर्णय क्र.संकीर्ण २००२/(१४८/२००२)सिं.व्य.(धो), दि.२८/११/०२
३) शासन निर्णय क्र. डब्ल्यूटीआर १०८१/४६३/सिं.व्य., दि.२७/१/१९८६
४) शासन निर्णय क्र. डब्ल्यूटीआर १०८५/२६०/सिं.व्य., दि.२०/१/१९८६
५) शासन परिपत्रक क्र. पापद २००३/(३९६/०३)सिं.व्य.(धो), दि.१५/७/०४

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्रातील बिगर सिंचनाचे पिण्याच्या पाण्याचे व औद्योगिक पाणी वापराच्या पाणीपट्टीचे सध्याचे दर शासन निर्णय (पा.वि) क्र. संकीर्ण २००२/१४८/०२/सिं.व्य.(धो), दिनांक २८/११/०२ नुसार निश्चित करण्यात आले होते. या शासन निर्णयातील परिशिष्ट १, २, ३, मध्ये दि. १/७/०३ करिता नमूद करण्यात आलेले दर, संदर्भ क्र. ५ अन्वये सध्या अस्तित्वात होते. पाटबंधारे प्रकल्पातून पाण्याची सोय उपलब्ध करुन देण्यासाठी शासनास जो वार्षिक खर्च येतो, त्यामध्ये सातत्याने वाढ होत आहे. पाटबंधारे प्रकल्पाच्या किमान प्रचालनाचा व देखभाल दुरुस्तीसाठीचा खर्च पाटबंधारे प्रकल्पांच्या पाणीपट्टीतून मिळावा अशा स्वरुपाची विविध वित्त आयोग, सिंचन आयोग, राष्ट्रीय जल धोरण यांच्या शिफारशी व राज्याच्या जलनितीमधील बाबी विचारात घेऊन बिगर सिंचनाच्या दिनांक ०१ सप्टेंबर २००६ पासून निश्चित केलेल्या पाणीपट्टी दरामध्ये त्यानंतरच्या प्रतिवर्षी १ एप्रिलपासून १५ टक्के दरवाढ प्रस्तावित केली आहे.

सिंचन व बिगर सिंचन पाणीपट्टीचे दर वरील क्र. ५ नुसार विहित करण्यात आले होते. सदरचे दर बिगर सिंचनाकरीता दि. ३१ ऑगष्ट २००६ पर्यंत लागू राहणार आहेत. दि. १ सप्टेंबर २००६ पासून बिगर सिंचन पाणीपट्टीचे दर निश्चित करण्याबाबत शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय-**

(१) सिंचन पाणीपट्टीचे सन २००३-०४ मध्ये विहित केलेले दर १ जुलै २००६ च्या पुढेही अस्तित्वात राहतील. बिगर सिंचन पाणीपट्टीचे दर १ सप्टेंबर २००६ पासून सोबतच्या परिशिष्ट १, २, ३ नुसार अस्तित्वात येतील.

(२) मत्स्योत्पादन कार्यक्रमासाठी पाटबंधारे प्रकल्पांच्या कालव्यातून पाणी पुरवठा घनमापन पध्दतीने करण्यात येतो व मत्स्योत्पादन हा कृषि व्यवसायाचाच पूरक भाग असल्याने सदर पाणी पुरवठयाकरिता सुध्दा घनमापन पध्दतीच्या सिंचनासाठी विहित केलेल्या दरानुसार आकारणी करण्यात यावी. अधिसुचित नदीनाले यांच्या पात्रात लागवड केलेल्या डांगरवाडी (खरबुज, कलिंगड वगैरे) या पिकांसाठी संदर्भ क्र. ५ मधील मुद्दा क्र ४ नुसार कार्यवाही करण्यात यावी.

(३) जलाशयातून किंवा कालव्यातून कोणत्याही कारणास्तव पाणी सोडल्यास त्या पाण्याची आकारणी व वसुली करण्यात यावी.

(४) ग्रामपंचायतीने वापरलेल्या पाण्याची वसुली जिल्हा परिषदेने जलसंपदा विभागाकडे जमा करावी. जिल्हा परिषदेने ही रक्कम जलसंपदा विभागाकडे न भरल्यास सदरची रक्कम ग्राम विकास विभागाने शासन स्तरावर जलसंपदा विभागाकडे जमा करावी.

(५) औद्योगिक पाणी वापराकरीता जर उद्योजकांने/संस्थेने पाण्यावर पुनर्प्रक्रिया करुन पुनर्वापर करण्याची यंत्रणा बसवून कमीत कमी २५ टक्के पाणी वापरात बचत केल्यास त्यांना पाणीपट्टीच्या दरात १० टक्के सूट देण्यात यावी.

(६) या शासन निर्णयातील विविध संज्ञांचा अर्थ शासन निर्णय क्र. संकीर्ण २००२/ १४८/ २००२/ सिं.व्य.(धो), दिनांक २८/११/०२ मध्ये नमूद केल्यानुसार राहील.

(७) राज्यातील बर्फ उद्योजकांना बर्फ बनविण्याकरीता पाणी पुरवठा केल्यास त्यांना परिशिष्ट-२ मधील वापराच्या प्रकाराच्या दरानुसार आकारणी करण्यात यावी.

(८) सदर पाणीपट्टीचे दर जाहीर प्रकटनानुसार प्रसिध्द करण्याची कार्यवाही स्थानिक अधिका-याने तात्काळ करावी.

**ब) औद्योंगिक पाणी वापर.**

१) औद्योगिक आकारणीसाठी जलसंपदा विभागाकडून पुरवठा होणा-या पाणीपट्टीचे दर परिशिष्ट क्र. १ व २ मध्ये दर्शविल्याप्रमाणे राहतील.

२) पाणी वापरणा-या संस्थेने अथवा उद्योजकाने अधिसूचित नदीवर धरण स्वखर्चाने बांधले असल्यास किंवा नियमानुसार बिगरसिंचन पाणी आरक्षण मंजूरीच्या प्रमाणात धरणाचा खर्च दिला असल्यास किंवा नदीवर पाणी उचलण्याच्या जागेच्या वरच्या बाजूस कोठेही धरण नसल्यास नदीतून पाणी पुरवठा करतांना आकारावयाच्या पाणीपट्टीचे स्वामित्व शुल्काचे दर परिशिष्ट क्र. १ व २ मधील अ(३) अथवा ब मध्ये नमूद केल्याप्रमाणे राहतील.

३) अधिसूचित नसलेल्या नदीवर औद्योगिक वापरासाठी परवानगी देण्यात आलेल्या पाण्यासाठी देखील पाणीपट्टीचे स्वामित्व शुल्काचे दर परिशिष्ट क्र. १ व २ मध्यें दर्शविल्याप्रमाणे राहतील.

**क) घरगुती पाणी वापर**

१) घरगुती पाणी वापराचे दर परिशिष्ट क्र.३ प्रमाणे राहतील.

२) पाणी वापरणा-या संस्थेने अधिसूचित नदीवर धरण स्वखर्चाने बांधले असल्यास अथवा नियमानुसार पाणीसाठयाच्या प्रमाणात धरणाचा खर्च दिला असल्यास किंवा नदीवर पाणी उचलण्याच्या जागेच्या वरच्या बाजूस कोठेही धरण बांधले नसल्यास अशा नदीतून पाणी पुरवठा करतांना आकारावयाच्या पाणीपट्टीचे स्वामित्व शुल्काचे दर परिशिष्ट क्र.३ मधील अ/-३ अथवा ब नुसार राहतील.

३) अधिसूचित नसलेल्या पिण्याच्या पाण्यासाठी देखील पाणीपट्टीचे स्वामित्व शुल्काचे दर परिशिष्ट क्र. ३ मध्यें दर्शविल्याप्रमाणे राहतील.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३२२/०६/व्यय-१२ दिनांक १६ जून २००६ नुसार प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

( वि. दि. होशिंग )
शासनाचे उप सचिव

प्रत

राज्यपालांचे सचिव,

अध्यक्ष, विधानसभा, विधानमंडळ सचिवालय यांचे सचिव

सभापती, विधान परिषद, विधानमंडळ सचिवालय यांचे सचिव

मुख्यमंत्र्यांचे सचिव,

उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,

मुख्य सचिव,

सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई- ४०० ०३२

वित्त विभाग, मंत्रालय मुंबई- ४०० ०३२

नियोजन विभाग, मंत्रालय मुंबई- ४०० ०३२

महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई- ४०० ०३२

नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई- ४०० ०३२

ग्राम विकास विभाग, मंत्रालय मुंबई- ४०० ०३२

उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय मुंबई- ४०० ०३२

कृषि व पशू संवर्धन, दुग्ध विकास व्यवसाय व मत्स्यव्यवसाय (कृषि) विभाग, मंत्रालय

सहकार व वस्त्रोद्योग विभाग (सहकार), मंत्रालय मुंबई- ४०० ०३२

सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय मुंबई- ४०० ०३२

मंत्रालयातील इतर विभाग,

महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य-१,मुंबई.

महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य-२,नागपूर.

महालेखापाल ( लेखा परिक्षा ), महाराष्ट्र राज्य-१,मुंबई.

महालेखापाल ( लेखा परिक्षा ), महाराष्ट्र राज्य-२, नागपूर.

विभागीय आयुक्त, मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद, नागपूर व अमरावती.

सर्व कार्यकारी संचालक,पाटबंधारे विकास महामंडळे,

सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग/ पाटबंधारे विकास महामंडळे,

सर्व जिल्हाधिकारी/ कृषि संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे

सर्व जिल्हा परिषदाचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

जलसंपदा विभागातील सर्व अधीक्षक अभियंते,/सर्व अधीक्षक अभियंता व प्रशासक,लाक्षेविप्रा,

वरील अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाक्षेवि यांचे अधिपत्याखालील सर्व कार्यकारी अभियंते यांना पाठवावे,

महासंचालक, माहिती व प्रसिध्दी संचालनालय, मुंबई.

सर्व मंत्र्याचे खाजगी सचिव/सर्व राज्यमंत्र्याचे खाजगी सचिव

विरोधी पक्ष नेते विधानसभा यांचे खाजगी सचिव

विरोधी पक्ष नेते विधानपरिषद यांचे खाजगी सचिव

मंत्रालयातील सर्व अधिकारी/कार्यासने, जलसंपदा विभाग, मंत्रालय मुंबई.

संगणक कक्ष, जलसंपदा विभाग, - सदर शासन निर्णय वेबसाईटवर प्रसिध्द करणेसाठी.

शासन निर्णय क्रमांक : पापद २००६/(३९६/०३)/सिं.व्य.(धो.), दिनांक ३१ जुलै,२००६ चे जोडपत्र

## परिशिष्ठ - १

पाण्याचा कच्चा माल म्हणून पेय जलाकरिता वापर होणाऱ्या (उदा. शीतपेय, आसवनी (ब्रुअरीज), मिनरल वॉटर किंवा तत्सम पेय जलाकरिता) औद्यो
विभागाकडून पुरवठा होणाऱ्या पाण्याचे दर (रुपये/१०,००० लिटर)

| अ.क्र. | वापराचा प्रकार | दि.१.७.२००३ व दि. १.७.२००४ चे दर | १.९.२००६ पासून | १.४.२००७ पासून | १.४.२००८ पासून | १.४.२००९ पासून | १.४.२०१० पासून |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| अ) | **औद्योगिक वापर** **नदीवर धरण बांधले असल्यास** | | | | | | |
| १. | जलाशयातून | १४५.०० | १७० | १९० | २२० | २५० | २९० |
| २. | कालव्यातून (प्रवाही अगर उपसा पध्दतीने)/ धरणाखालील नदीतून (प्रवाही अगर उपसा पध्दतीने) मापदंडाप्रमाणे साठवण तलाव नसल्यास | ३६०.०० | ४१० | ४८० | ५५० | ६३० | ७२० |
| ३. | वापरणाऱ्या संस्थेने धरण स्वखर्चाने बांधले असल्यास / पाणी वापराच्या प्रमाणानुसार धरणाच्या बांधकामाचा खर्च दिला असल्यास | ५०.०० | ६० | ७० | ८० | ९० | १०० |
| ब) | **नदीवर पाणी उचलण्याच्या जागेच्या वरच्या बाजूस कोठेही धरण बांधले नसल्यास** नदीतून | ५०.०० | ६० | ७० | ८० | ९० | १०० |

**टीप** :- १) पाण्याचा कच्चा माल म्हणून वापर होणारे उद्योग म्हणजे शीतपेय, आसवनी (ब्रुअरीज), मिनरल वॉटर किंवा तत्सम उद्योग होत.

२) पाणी वापरकर्त्यांनी विहित मापदंडाप्रमाणे (शा.नि. क्र. संकीर्ण १००१/(१५४/०१)/सिं.व्य.(धो.), दि. २१ जानेवारी,२००३) साठवण तलाव बां वरील दरांमध्ये २० टक्के सवलत देण्यात येईल.

३) वरील दर १० रु. च्या पूर्णांकात करण्यात आले आहेत.

शासन निर्णय क्रमांक : पापद २००६/(३९६/०३)/सिं.व्य.(धो.), दिनांक ३१ जुलै,२००६ चे जोडपत्र

## परिशिष्ट - २

पाण्याच्या औद्योगिक वापरासाठी (पेयजल इ. उद्योग वगळून) पाटबंधारे विभागाकडून पुरवठा होणाऱ्या पाण्याचे दर (रुपये/१०,००० 

| अ.क्र | वापराचा प्रकार | दि.१.७.२००३ व दि. १.७.२००४ चे दर | १.९.२००६ पासून | १.४.२००७ पासून | १.४.२००८ पासून | १.[illegible] |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | |
| अ) | **औद्योगिक वापर**<br>**नदीवर धरण बांधले असल्यास** | | | | | |
| १. | जलाशयातून | २९.०० | ३३ | ३८ | ४४ | |
| २. | कालव्यातून (प्रवाही अगर उपसा पध्दतीने)<br>धरणाखालील नदीतून (प्रवाही अगर उपसा पध्दतीने)<br>ब) मापदंडाप्रमाणे साठवण तलाव नसल्यास | ७१.५० | ८२ | ९५ | १०९ | |
| ३. | वापरणाऱ्या संस्थेने धरण स्वखर्चाने बांधले असल्यास / पाणी वापराच्या प्रमाणानुसार धरणाच्या बांधकामाचा खर्च दिला असल्यास | १०.०० | १२ | १३ | १५ | |
| ब) | **नदीवर पाणी उचलण्याच्या जागेच्या वरच्या बाजूस कोठेही धरण बांधले नसल्यास**<br>नदीतून | १०.०० | १२ | १३ | १५ | |

**टीपः** १) औद्योगिक पाणी वापर म्हणजे लहानमोठे सर्व उद्योग, व्यवसाय, लहान मोठ्या सर्व फॅक्टरीज व सर्व कारखाने, रेल्वे, औष्णिक केंद्रे, गिरण (कंडेन्सर), चर्मोद्योग, कौल-वीट भट्टया, मडकी तयार करण्याचा व्यवसाय, कोळसा तयार करण्याचा व बर्फ तयार करण्याचा उद्योग वगैरेंसाठी

२) पाताळ गंगा व उल्हास नदीवरील औद्योगिक वापरासाठीही वरील परिशिष्ट-२ प्रमाणे दर लागू राहतील.

३) पाणी वापरकर्त्यांनी विहित मापदंडाप्रमाणे (शा.नि. क्र. संकीर्ण १००१/(१५४/०१)/सिं.व्य.(धो.), दि. २१ जानेवारी,२००३) साठवण तलाव बांध दरांमध्ये २० टक्के सवलत देण्यात येईल.

शासन निर्णय क्रमांक : पापद २००६/(३९६/०३)/सिं.व्य.(धो.), दिनांक ३१ जुलै,२००६ चे जोडपत्र

## परिशिष्ठ - ३

घरगुती वापरासाठी पाटबंधारे विभागाकडून पुरवठा होणाऱ्या पाण्याचे दर (रुपये/१०,००० लिटर)

| अ.क्र | वापराचा प्रकार | दि.१.७.२००३ व दि. १.७.२००४ चे दर | १.९.२००६ पासून | १.४.२००७ पासून | १.४.२००८ पासून | १ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | |
| अ) १. | **नदीवर धरण बांधले असल्यास**<br>जलाशयातून | १.३० | १.५० | १.७० | २.०० | |
| २. | कालव्यातून (प्रवाही अगर उपसा पध्दतीने)<br>धरणाखालील नदीतून (प्रवाही अगर उपसा पध्दतीने)<br>ब) मापदंडाप्रमाणे साठवण तलाव नसल्यास | ५.०० | ५.८० | ६.६० | ७.६० | |
| ३. | वापरणाऱ्या संस्थेने धरण स्वखर्चाने बांधले असल्यास / पाणी वापराच्या प्रमाणानुसार धरणाच्या बांधकामाचा खर्च दिला असल्यास | १.१५ | १.३० | १.५० | १.७० | |
| ब) | **नदीवर पाणी उचलण्याच्या जागेच्या वरच्या बाजूस कोठेही धरण बांधले नसल्यास**<br>नदीतून | १.१५ | १.३० | १.५० | १.७० | |

**टीपः** १) घरगुती पाणी वापराचे दर हे मोठ्या ग्रामपंचायत, वाड्या, पाडे, वस्त्या, नगर परिषद, महानगरपालिका, कॅन्टोन्मेंट बोर्ड क्षेत्र वगैरेंना लागू संस्थांच्या निवासी वसाहतींना स्वतंत्र पाईपलाईन व स्वयंचलित मोजमापक पाणी वापर संसथेने बसविण्याच्या अटींच्या पूर्ततेच्या अधीन राहून घरगुती पाणी वापराचे दर लागू राहतील. तसेच घरगुती/औद्योगिक वापराकरिता प्रत्येकी स्वतंत्र मोजमाप यंत्रणा नसल्यास त्यांना करार वर्गवारीनिहाय दर आकारणी करण्यात येईल.

२) पाणी वापरकर्त्यांनी विहित मापदंडाप्रमाणे (शा.नि. क्र. संकीर्ण १००१/(१५४/०१)/सिं.व्य.(धो.), दि. २१ जानेवारी,२००३) साठवण तलाव बांध दरांमध्ये २० टक्के सवलत देण्यात येईल.

३) वरील दर १० पैशांच्या पूर्णांकात करण्यात आले आहेत.

(परिशिष्ट ४.१)

सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना निधी अर्थसंकल्पीत करणे,वितरीत करणे व या निधीतील कामांना प्रशासकीय मान्यता देणेबाबतची सुधारीत कार्यपध्दती

महाराष्ट्र शसन
नियोजन विभाग
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
शासन निर्णय क्रमांकः जिवायो १००७/प्र.क्र.३९/का-१४४४
दिनांक : १६ फेब्रुवारी, २००८

**प्रस्तावनाः-** जिल्हा हा नियोजनाचा आधारभूत घटक मानून विकेंद्रीत नियोजनाची प्रक्रिया १९७४-७५ पासून सुरु करण्यात आली. जिल्हा नियोजनासाठी प्रत्येक जिल्हयात "जिल्हा नियोजन समिती " कार्यरत आहे. राज्याच्या योजनांच्या आकारमानाच्या अनुषंगाने जिल्हा योजनेसाठी द्यावयाची रक्कम ठरल्यावर त्या रकमेचे जिल्हानिहाय वाटप संबंधित जिल्ह्यांना करण्यांत येते. त्याप्रमाणे जिल्ह्याचे पालकमंत्री यांचे अध्यक्षतेखाली असलेली जिल्हा नियोजन समिती जिल्हा योजनेची आखणी करते व सदरची योजना मा.मंत्री (नियोजन) यांचेबरोबर चर्चा करून अंतिम केली जाते.

**२. जिल्हा योजनेची सध्याची कार्यप्रणालीः-** जिल्हा योजनेमधून प्रस्तावित योजनेवर निधीचे वाटप प्रशासकीय विभागनिहाय करून सदरची रक्कम संबंधित प्रशासकीय विभागांना कळविण्यांत येते व सदर निधी अर्थसंकल्पीत करून घेणे, निधीचे वाटप जिल्हा स्तरापर्यंत करणे, योजनांना प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देणे व त्याचे समन्वयन, संनियंत्रीत करणे इत्यादी बाबी संबंधित प्रशासकीय विभागामार्फत केल्या जातात.

**३. सध्याच्या कार्यप्रणाली बाबतचा अनुभव :-**

अ) सर्व जिल्ह्यांच्या नियोजन समितीने मान्य केलेला योजनावार निधी प्रशासकीय विभागांना कळविल्यानंतर सदरचा निधी अर्थसंकल्पित करण्यास कालावधी लागतो. काही निधी अर्थसंकल्पीय अधिवेशनात अर्थसंकल्पीत होतो. परंतु काही निधी नंतरच्या अधिवेशनातअर्थसंकल्पित केला जातो.

ब) अर्थसंकल्पित झालेला निधी मंत्रालयीन प्रशासकीय विभाग त्यांच्या राज्यस्तरीय आयुक्तालय/संचालनालय, विभागीय कार्यालये यांचेमार्फत जिल्हा यंत्रणेला वितरीत करतात. या प्रक्रियेस कांही कालावधी लागतो आणि त्यामुळे जिल्हा योजनेची रक्कम जिल्ह्याला मिळण्यास विलंब होतो.

क) जिल्हा योजनेला प्रशासकीय मान्यता देण्याबाबत प्रस्ताव जिल्हा यंत्रणेकडून विभागीय यंत्रणेला, राज्यस्तरीय आयुक्तालय/संचालनालय यांना व त्यानंतर मंत्रालयीन प्रशासकीय विभागाला सादर केला जातो व प्रशासकीय मंत्रालयीन विभागाची मान्यताही त्या

..२

पद्धतीने जिल्हा यंत्रणेपर्यंत पोहोचते. या प्रक्रियेसही कांही कालावधी लागतो.

ड) प्रशासकीय विभागांनी अर्थसंकल्पित तरतूद केल्यानंतर त्यापैकी कोणत्या जिल्ह्यासाठी किती तरतूद आहे याबद्दलची माहिती अर्थसंकल्पात उपलब्ध नसते.

वरील कारणांमुळे जिल्हा योजना राबविण्यामध्ये कांही कालावधी लागतो आणि कांही वेळेस रक्कम पूर्णपणे खर्च होत नाही व एका जिल्ह्याने केलेली तरतूद दुसऱ्या जिल्ह्यात वापरली जाण्याची शक्यता असते किंवा एखादी जिल्हास्तरीय योजनेची रक्कम राज्यस्तरीय योजनेवरसुद्धा खर्ची पडू शकते.

वरील कारणांमुळे सध्याच्या पद्धतीत बदल करून मंजुर निधी लवकरात लवकर जिल्हा योजनेला उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यावर शासनाचा निर्णय होवून तो खालीलप्रमाणे आहे.

**शासन निर्णयः-** सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेचा निधी अर्थसंकल्पीत करुन वितरीत करणे व त्यामधील कामांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबतच्या प्रचलित कार्यपध्दतीमध्ये बदल करुन यापुढे जिल्हा वार्षिक योजनेचा निधी अर्थसंकल्पीत करणे, तरतुदीचे वितरण व प्रशासकीय मान्यता प्रदान करणे, तसेच पुर्नविनियोजन करणे इ. बाबत खालील नमूद केल्याप्रमाणे सुधारीत कार्यपध्दती अवलंबण्यात येईल

**१. <u>जिल्हा योजनेचा आराखडा तयार करणे</u> -**

१.१ नियोजन विभागाच्या आदेशानुसार निर्गमीत केलेल्या जिल्हा वार्षिक योजनेच्या तयार करावयाच्या आराखड्या संदर्भातील वेळापत्रकानुसार कार्यवाहीस सुरवात करावी.

१.२ जिल्हा वार्षिक योजनेचा आराखडा तयार करतांना मानव विकास निर्देशांक उंचावणे, जिल्ह्याच्या मुलभुत गरजा, सामाजिक व भौगोलिक व्याप्ती यांचा विचार करण्यात यावा.

१.३ योजना प्रधान लेखाशिर्षवार दाखविण्यात याव्या.

१.४ चालु योजनांच्या उर्वरीत खर्चावर प्राथम्याने विचार करण्यात यावा.

१.५ आराखड्यात कामे प्रस्तावित करतांना अपूर्ण कामांना लागणा-या निधीची पूर्ण तरतुद केल्यानंतरच नवीन बाबी/कामे प्रस्तावित करावीत.

१.६ जिल्हा आराखड्यात प्रस्तावित केलेल्या नियतव्यय मर्यादेतून अपूर्ण कामांना लागणारा निधी वजा करुन उर्वरीत रकमेच्या दीड पट रकमेच्या मर्यादेतीलच नवीन कामे प्रस्तावित करता येतील.

१.७ जिल्हा वार्षिक योजनेतून घेण्यात येणारी कामे २ वर्षाच्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील.

१.८ "नवीन योजनांच्या" बाबतीत (New Schemes/ New Items) संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी तांत्रिक व प्रशासकीय मान्यता दिली असेल व त्या योजनांना शासनाची मान्यता मिळालेली आहे असे कळविल्यानंतरच या नवीन योजनांसाठी जिल्हा योजनेमध्ये तरतुद प्रस्तावित करावी. सदर नवीन योजनांसाठी विधीमंडळाची मान्यता मिळविण्याची जबाबदारी संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांची राहील.

..३

१.९ नवीन योजनांच्या बाबतीत जर पद निर्मितीचा समावेश असेल तर विहित पद्धतीचा अवलंब करुन पदांना शासनाची मान्यता मिळाल्यानंतरच अशा योजनांचा समावेश जिल्हा योजना आराखड्यात करावा.

१.१० आराखड्यात प्रस्तावित प्रत्येक योजनेच्या खर्चाची बाबवार माहिती देणे आवश्यक राहील.

१.११ आराखड्यात मान्य केलेल्या नियतव्ययात जिल्हा नियोजन समितीच्या मान्यतेशिवाय बदल करता येणार नाही.

१.१२ राज्यस्तरीय बैठकीत जिल्हा वार्षिक योजनेचा अंतिम आराखडा निश्चित करण्यात येईल.

## २. <u>वार्षिक योजनेचा निधी अर्थसंकल्पित करणे-</u>

२.१ सध्या जिल्हा नियोजन समितीने प्रस्तावित केलेल्या तरतुदी एकत्रित करुन तसेच राज्य स्तरावर काही तरतुदी करावयाच्या असल्यास त्यांचा समावेश करुन संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागामार्फत एकत्रित तरतुदी विधीमंडळासमोर अर्थसंकल्पात सादर केल्या जातात व विधीमंडळाची मान्यता मिळाल्यानंतर सदर निधीचे वाटप मंत्रालयीन प्रशासकीय विभागांमार्फत जिल्हयांना केले जाते. या प्रक्रियेत काही कालावधी लागतो व जिल्हा स्तरावर योजना कार्यान्वयीन करण्यासाठी तितका वेळ कमी उपलब्ध होतो.

२.२ नवीन पध्दतीमध्ये जिल्हा नियोजन समितीने मान्य केलेल्या जिल्हा योजनेसाठीची अर्थसंकल्पीय तरतुद नियोजन विभागाच्या अर्थसंकल्पीय प्रकाशनात जिल्हानिहाय स्वतंत्र मागणीखाली विधी मंडळाला सादर केली जाईल. त्या मागणी क्रमांकामध्ये त्या जिल्ह्याच्या विभिन्न प्रधान शिर्ष, उप शिर्ष निहाय तपशिलवार तरतुद दर्शविली जाईल.

२.३ जिल्हावार मागणी क्रमांक खालीलप्रमाणे राहतील :-

| अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | मागणी क्रमांक | अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | मागणी क्रमांक | अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | मागणी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुंबई शहर | ओ-१० | १३ | सातारा | ओ-२२ | २५ | गोंदिया | ओ-३४ |
| २ | मुंबईउपनगर | ओ-११ | १४ | सांगली | ओ-२३ | २६ | चंद्रपूर | ओ-३५ |
| ३ | ठाणे | ओ-१२ | १५ | सोलापूर | ओ-२४ | २७ | गडचिरोली | ओ-३६ |
| ४ | रायगड | ओ-१३ | १६ | कोल्हापूर | ओ-२५ | २८ | औरंगाबाद | ओ-३७ |
| ५ | रत्नागिरी | ओ-१४ | १७ | बुलढाणा | ओ-२६ | २९ | जालना | ओ-३८ |
| ६ | सिंधुदूर्ग | ओ-१५ | १८ | अकोला | ओ-२७ | ३० | बीड | ओ-३९ |
| ७ | नाशिक | ओ-१६ | १९ | वाशिम | ओ-२८ | ३१ | परभणी | ओ-४० |
| ८ | धुळे | ओ-१७ | २० | अमरावती | ओ-२९ | ३२ | हिंगोली | ओ-४१ |
| ९ | नंदूरबार | ओ-१८ | २१ | यवतमाळ | ओ-३० | ३३ | नांदेड | ओ-४२ |
| १० | जळगाव | ओ-१९ | २२ | नागपूर | ओ-३१ | ३४ | उस्मानाबाद | ओ-४३ |
| ११ | अहमदनगर | ओ-२० | २३ | वर्धा | ओ-३२ | ३५ | लातूर | ओ-४४ |
| १२ | पुणे | ओ-२१ | २४ | भंडारा | ओ-३३ | | | |

..४

२.४ सर्व जिल्ह्यांची जिल्हावार मागणी नियोजन विभागाच्या एकाच पुस्तकामध्ये विधी मंडळासमोर मान्यतेसाठी सादर करण्यात येईल. त्यामध्ये प्रधान शिर्षनिहाय महसुली खर्च, भांडवली खर्च व कर्ज यांची विगतवारीसुध्दा दाखविण्यात येईल.

२.५ प्रत्येक प्रशासकीय विभागाच्या राज्यस्तरीय योजना तसेच विशेष घटक योजना व आदिवासी विकास योजना यांच्या तरतुदी दर्शविणारी मागणी संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडून सादर केली जाईल. मात्र प्रत्येक विभागाला त्यांनी विधी मंडळाला सादर केलेल्या मागणीशिवाय सर्वसाधारण जिल्हा योजनांपैकी किती तरतुद प्राप्त होत आहे ही माहिती दर्शविणारा मतदानास आवश्यक नसणारा तक्ता (Statement not requiring voting) विधीमंडळाला माहितीसाठी स्वतंत्रपणे सादर करण्यात येईल.

२.६ जिल्हा योजनांचे रुपांतर जिल्हाधिकारी कार्यालयांनी अर्थसंकल्पीय विवरणपत्रात करावे. तसेच संबंधित कार्यान्वयीन यंत्रणांच्या सल्ल्याने प्रतिमाह खर्चाचा तपशील प्राप्त करुन रोख प्रवाह (cash flow) तयार करावा. अर्थसंकल्पीय प्रकाशनाच्या भाग-तीन परिशिष्ट्यात समाविष्ट करण्यासाठी विहीत नमुन्यात रस्ते, साकव, इमारती व तत्सम बांधकामाची यादी आणि रोखप्रवाहाचे विवरण जिल्हाधिकारी यांनी वार्षिक योजनेच्या अर्थसंकल्पीय विवरणपत्राबरोबर सादर करावे. मंजुर नियतव्ययाच्या मर्यादेत जी बांधकमे त्यावर्षी अथवा अधिकाधिक पुढील वर्षी पूर्ण होणार असतील अशीच बाधकामे यादीत समाविष्ट करावीत.

२.७ जिल्हा योजनेतील केंद्र पुरस्कृत योजनेतील राज्य हिश्श्याची तरतुद जिल्हा योजनेमध्ये करून अर्थसंकल्पीय तरतुदीचे वाटप जिल्हाधिकारी कार्यान्वयीन यंत्रणेला करतील. मात्र ज्या योजनांबाबत केंद्र शासनाच्या हिश्श्याची तरतुद राज्य शासनाच्या खाती जमा (एकत्रीत निधीमध्ये) होते, त्या रकमेची अर्थसंकल्पात तरतुद करून संबंधित प्रशासकीय विभागाकडून प्रचलीत पध्दतीने कार्यान्वयीन यंत्रणेला वाटप केले जाईल. केंद्र पुरस्कृत योजनांच्या बाबतीत ज्या प्रमाणात केंद्र शासनाचा हिस्सा मंत्रालयीन प्रशासकीय विभागांमार्फत प्राप्त होईल त्या प्रमाणात आणि योजनांच्या वित्तीय हिश्श्याच्या प्रमाणात (financing pattern) जिल्हा योजनांचा निधी खर्च करावा. उदा. एका जिल्ह्यासाठी १०० रुपयांची तरतुद करावयाची असेल आणि त्यामध्ये केंद्राचा हिस्सा ७५% व राज्याचा हिस्सा २५% असे असल्यास जिल्ह्याच्या योजनेमध्ये २५ रुपयांची तरतुद करावी. संबंधित प्रशासकीय विभागाने केंद्र शासनाचा हिस्सा म्हणून ६० रूपये वितरीत केल्यास राज्य शासनाचा हिस्सा म्हणून २० रुपये जिल्हाधिकारी यांनी विभागाच्या जिल्हास्तरीय कार्यान्वयीन यंत्रणेस खर्च करण्यास प्राधिकृत करावे.

२.८ जिल्हा योजनांच्या बाबतीत नियोजन विभागाच्या अर्थसंकल्पिय प्रकाशनात जिल्हावार योजना व मागण्या विधीमंडळासमोर मा. मंत्री (नियोजन) यांचेकडून सादर केल्या जातील. जिल्हा योजनांमध्ये समाविष्ट रकमेच्या मागण्यांवरील चर्चेमध्ये सहभागी होणे व उत्तरे देणे व तत्सम विधीमंडळ कार्यनियमावली अंतर्गत इतर कार्यवाही, संबंधित विषयांचे मा. मंत्री महोदय यांचेकडून करण्यात येईल.

२.९ विधी मंडळाने अर्थसंकल्पिय मान्यता दिल्यानंतर संबंधित जिल्ह्यांसाठी असलेल्या एकूण तरतुदीचे वितरण नियोजन विभागाकडून संबंधित जिल्हाधिकारी यांना विहित कार्यपध्दतीनुसार करण्यात येईल.

२.१० जिल्हाधिकारी हे त्या जिल्ह्याच्या जिल्हा योजनेसाठी निधी वाटपासंबंधात नियंत्रक

अधिकारी राहतील. संबंधित जिल्हाधिकारी हे त्याना प्राप्त झालेल्या निधीचे कार्यान्वयीन यंत्रणेला पुनर्वाटप करण्यास सक्षम राहतील.

२.११ जिल्हाधिकारी यांनी नियोजन विभागाकडून निधी प्राप्त झाल्यापासून जास्तीत जास्त एक महिन्याचे आत कार्यान्वयीन यंत्रणांना तात्काळ वाटप करणे आवश्यक राहील. एखाद्या जिल्हाधिका-याने सदरची जबाबदारी वेळीच पार पाडली नाही तर संबंधित विभागीय आयुक्त यांनी संबंधित जिल्हाधिका-याकडून निधी वाटपाचे काम पूर्ण करुन घेणे अनिवार्य राहील.

**३. <u>प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही</u> -**

३.१ परिच्छेद ३.२ मधील प्रकरणे सोडून जिल्हा वार्षिक योजनेतील इतर कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे प्रशासकीय विभागांचे व त्यांच्या क्षेत्रिय यंत्रणांचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी यांना असतील.

३.२ स्थानिक स्वराज्य संस्थांकडील (जिल्हा परिषद, नगर पालिका, महानगरपालिका,नगरपंचायत) योजनांसाठी त्यांना असलेले प्रशासकीय मान्यतेचे अधिकार प्रचलित पद्धतीप्रमाणे कायम राहतील.

३.३ प्रशासकिय मान्यता देण्यासंबंधी संबंधित मंत्रालयीन विभागांकडून जिल्हाधिकारी तसेच स्थानिक स्वराज्य संस्था यांना मार्गदर्शक सूचना, निकष व तपासणी याद्या निर्गमीत करण्यात येतील. त्याप्रमाणे जिल्हाधिकारी व स्थानिक स्वराज्य संस्था यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची कार्यवाही करावी.

३.४ जिल्हा वार्षिक योजनेतील कामे दोन वर्षात पूर्ण होणे अपेक्षित असून त्यामध्ये सुधारीत प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता वाटल्यास मूळ प्रशासकीय मान्यतेपेक्षा ३० टक्के पर्यंतच्या जास्त रकमेच्या प्रस्तावाला सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना असतील व त्यापेक्षा जास्त रकमेची सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याची आवश्यकता वाटल्यास मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या सध्याच्या प्रणालीनुसार कार्यवाही करावी.

**४. तांत्रीक मान्यतेचे व तत्संबधीचे अधिकार:-**

४.१ जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गतच्या कामांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या कार्यान्वयीन यंत्रणेच्या अधिका-यांना सध्या प्रमाणेच असतील.

४.२ तांत्रिक मान्यता देण्यासंदर्भात संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडुन जिल्हास्तरीय अधिका-यांना तांत्रिक मान्यतेच्या दृष्टीने मार्गदर्शक सूचना व तपासणी यादी निर्गमित करण्यात येईल.

**५. <u>निविदा व खरेदी प्रक्रिया</u>** - निविदा मागविणे, स्वीकृत करणे व खरेदी बाबतचे सर्व अधिकार प्रचलित प्रध्दतीनुसार राहतील.

..६

**६. योजनेची अंमलबजावणी, सनियंत्रण, लेखापरिक्षण व विधिमंडळ कामकाज विषयक बाबी हाताळणे**

६.१ कामाची गुणवत्ता राखण्याची जबाबदारी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.

६.२ संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांकडून तांत्रिक गुणवत्तेबाबत संनियंत्रण केले जाईल.

६.३ जिल्हा योजनेच्या अंमलबजावणीवर, खर्चावर व तांत्रिक बाबींवर संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाचे नियंत्रण असेल.

६.४ जिल्हा वार्षिक योजनांच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र, पूर्णत्वाचे दाखले, खर्चाचा ताळमेळ व विनियोजन लेखे इत्यादीबाबतची सर्व कार्यवाही करण्याची जबाबदारी संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाची राहील.

६.५ जिल्हा योजनेतील गैरव्यवहार, लेखा आक्षेप, लोकलेखा समिती, विधिमंडळ कामकाज इत्यादी बाबीसाठी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणा व त्यांचा मंत्रालयीन प्रशासकीय विभाग जबाबदार राहील.

६.६ जिल्हास्तरीय कार्यकारी यंत्रणा, संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना प्रशासकीय मान्यता, प्रत्यक्ष खर्च, भौतिक साध्य याबाबतची माहिती देतील. जिल्हा योजना संबंधी विधानमंडळाला माहिती सादर करणे तसेच विधानमंडळाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे, अर्थसंकल्पीय नियमावलीच्या तरतुदीनुसार विविध बाबीसंबंधी कार्यवाही करण्याची जबाबदारी प्रशासकीय विभागांची राहील.

६.७ जिल्हास्तरीय योजनांचे मासिक खर्चाचे अहवाल दरमहा ५ तारखेपर्यंत जिल्हाधिकारी यांना संबंधित कार्यन्वयीन यंत्रणा सादर करतील.

६.८ जिल्हाधिकारी हे प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपूर्वी वार्षिक योजनेच्या खर्चाचे अहवाल विभागीय आयुक्त व नियोजन विभागास सादर करतील.

**७. जिल्हा योजनेचे पुर्नविनियोजन व सुधारीत अंदाज -**

७.१ जिल्हा योजनेतील मंजूर अर्थसंकल्पित तरतुदीमधील योजना / कार्यक्रमांतर्गत पुर्नविनियोजन करण्याचे अधिकार जिल्हा नियोजन समितीच्या पूर्व मंजुरीने जिल्हाधिकारी यांना असतील.

७.२ पुर्नविनियोजन करतांना जिल्हाधिकारी शासनाने विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करतील.

७.३ जेव्हा आचारसंहिता किंवा अन्य संविधानिक अडचणींमुळे जिल्हा नियोजन समितीची बैठक आयोजित करणे शक्य नसेल अशावेळी महसूल विभागीय आयुक्तांच्या मान्यतेने पुर्नविनियोजन करण्यात येईल परंतू अशा पुर्नविनियोजनाची माहिती जिल्हा नियोजन समितीच्या पुढील बैठकीत सादर करण्यात येईल.

७.४ अर्थसंकल्पीय कार्यप्रणालीप्रमाणे सुधारित अंदाजांचे प्रस्ताव नियोजन विभागाला पाठविल्यानंतर जिल्हाधिकारी यांना पुर्नविनियोजन करता येणार नाही व तसा प्रस्तावही नियोजन विभागाला पाठविता येणार नाही.

७.५ जिल्हा वार्षिक योजनेसाठी निश्चित केलेला नियतव्यय पूर्णपणे अर्थसंकल्पीत करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी व नियोजन विभाग यांची राहील. योजनानिहाय तपशील विहित वेळेत शासनास सादर करण्यास व शासनाकडून वितरीत झालेला निधी संबंधीत कार्यान्वयीन यंत्रणांना वितरीत करण्यास जिल्हाधिकारी जबाबदार राहतील. प्राप्त तपशिलाप्रमाणे निधी अर्थसंकल्पीत करण्याची जबाबदारी नियोजन विभागाची राहील.

७.६ प्राप्त झालेल्या तरतुदीपैकी खर्च पूर्णपणे होईल किंवा कसे याचा अंदाज प्रत्येक कार्यान्वयीन यंत्रणेने घ्यावा आणि त्यांना असे वाटले की निधी पूर्णपणे खर्च होणार नाही व काही रक्कम शिल्लक राहणार आहे तर त्यांनी तसा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांना ५ मार्चपर्यंत मिळेल या बेताने पाठवावा. जिल्हा कार्यान्वयीन यंत्रणेने ५ मार्चपर्यंत संभावित बचत सर्मपित केली नाही व खर्च पूर्णपणे पडला नाही तर त्याची जबाबदारी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.

७.७ जिल्हाधिकारी यांनी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेकडून प्राप्त झालेली बचत/सर्मपित निधी लक्षात घेऊन जिल्हा योजना निधीमधून काही रक्कम समर्पित करावयाची असल्यात सदर आदेश १० मार्चपूर्वी काढणे आवश्यक राहील.जिल्हाधिकारी यांनी काढलेल्या निधी समर्पणाची प्रत नियोजन विभागास १५ मार्च पर्यंत मिळेल याबाबतची खबरदारी जिल्हाधिकरी यांनी घ्यावी. कार्यान्वयीन यंत्रणेकडून निधी ५ मार्चपर्यंत समर्पित झाला असल्यास व जिल्हाधिका-यांनी निधी समर्पणाचे आदेश विहित मुदतीत काढले नाहीत तर जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.

७.८ जिल्हा योजनेसाठी योजनानिहाय तपशील व रकमेची फोड (breakup) नियोजन विभागाला सादर करणे ही जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील. जिल्हाधिकारी यांनी अशी तपशीलवार माहिती सादर केली नाही तर त्याबाबत जिल्हाधिकारी जबाबदार राहतील. जिल्ह्यांमधून योजनानिहाय तपशील प्राप्त झाल्यावर एकत्रित मागणी विधी मंडळाला सादर करणे व विधी मंडळाने मान्य केलेल्या तरतुदीचे जिल्हानिहाय वाटप करणे नियोजन विभागाची जबाबदारी राहील. यासाठी नियोजन विभागातील संबंधित अधिकारी जबाबदार राहतील.

७.९ जिल्हाधिकारी यांना सदरचे काम करणे शक्य व्हावे म्हणून एक लेखाधिकारी वर्ग-२ व एक किंवा दोन संशोधन सहायक यांची पदे मंजूर करण्याचे प्रस्तावित आहे.

८. वरील सुधारीत कार्यपध्दतीचा अवलंब २००८-०९ या आर्थिक वर्षापासून लागू होणार असल्याने सर्व जिल्हाधिकारी यांनी याबाबीची त्वरीत कार्यवाही करावी.

९. हे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक सीआर-६१/०८/व्यय-८, दि. १६.२.२००८ अन्वये प्राप्त सहमतीस अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहेत.

१०. हा शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २००८०२१६१७०४२९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( प्र.अ.महेंद्रकर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति

१. मा. राज्यपालांचे सचिव,

..८

-८-

२. मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव,
३. मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
४. सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५. मा.कार्यकारी अध्यक्ष, राज्य नियोजन मंडळ, नवीन प्रशासकीय भवन, १८ व मजला, मंत्रालयासमोर, मुंबई,
६. महालेखापाल-१(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
७. महालेखापाल-१(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
८. महालेखापाल-१(लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
९. महालेखापाल-१(लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
१०. शासनाचे मुख्य सचिव,
११. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
१२. सदस्य सचिव, उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळ, नवीन प्रशासकीय इमारत,१८वा मजला,मुंबई,
१३. सदस्य सचिव, मराठवाडा वैधानिक विकास मंडळ,नवीन प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय कम्पाऊंड, तळमजला, औरंगाबाद,
१४. सदस्य सचिव, विदर्भ वैधानिक विकास मंडळ,बी-२३/१,साऊथ अंबाझरी मार्ग, अंध विद्यालयाजवळ, नागपूर,
१५. संचालक,लेखा व कोषागारे, महाराष्ट्र शासन, मुंबई,
१६. अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र शासन, मंबई,
१७. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई,
१८. सर्व विभागीय आयुक्त,
१९. मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
२०. सर्व मुख्य अभियंते, जलसंपदा प्रादेशिक विभाग,
२१. सर्व मुख्य अभियंते, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,
२२. सर्व जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती,
२३. सर्व अधीक्षक अभियंते, सार्वजनिक बांधकाम मंडळे,
२४. सर्व अधीक्षक अभियंते, जलसंपदा मंडळे,
२५. नियोजन विभागातील सर्व सह सचिव/उप सचिव.
२६. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा,
२७. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,
२८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२९. सर्व विशेष कार्य अधिकारी (नियोजन), विभागीय आयुक्तांची कार्यालये,
३०. सर्व जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालये,
३१. नियोजन विभागातील सर्व जिल्हा प्रभारी अधिकारी व इतर अधिकारी.
३२. निवड नस्ती का. १४४४.

--------

GR-20040805164415001-1201

(परिशिष्ट ५०१)

**मोजमाप नोंदवहीच्या संदर्भात जिल्हा परिषदेच्या तांत्रीक अधिका-यांनी घ्यावयाची दक्षता**

**महाराष्ट्र शासन**

ग्राम विकास व जलसंधारण विभाग

शासन परिपत्रक क्र. झेडपीए २०००/प्र.क्र.४४ /३३

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. दिनांक २२ / १२ / २०००.

**शासन परिपत्रक:-** जिल्हा परिषद मध्ये राखण्यांत येत असलेल्या मोजमाप नोंदवहीत सध्याच्या पध्दतीनुसार वेगवेगळया कामाच्या नोंदी एकाच मोजमाप वहीत घेण्यात येतात. यामुळे अनेक अडचणी उद्‌भवतात. जिल्हा परिषदेचे बांधकाम, छोटे बंधारे व ग्रामीण पाणीपुरवठा या कामांचा ग्रामीण जनतेचा जवळचा संबंध असतो. त्यामुळे काम ठराविक मुदतीत पुर्ण होणे व देयके कंत्राटदारांना तत्परतेने अदा करणे आवश्यक आहे. कामांत कार्यतत्परता व पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने खालील उपाय योजना सुचविण्यात येत आहेत.

१) एका कामासाठी एक मोजमाप वही ठेवण्यात यावी. काम मोठे असल्यास एक मोजमाप वही संपल्यावर दुसरी वही सुरु करण्यांत यावी. कामानुसार पुस्तकाचा आकार ठरविता यावा.(उदा.२५ पानी,५० पानी, १०० पाने इ.)

२) कोणत्याही परिस्थितीत एकाच मोजमाप वहीत वेगवेगळया कामांच्या नोंदी घेण्यात येऊ नयेत. मोजमाप वहीमधील प्रत्येक नोंदी दिनांकित असाव्यात.

३) मोजमापवही मध्ये शाखा अभियंता / कनिष्ठ अभियंता स्वतः नोंदी घेईल व त्या स्वाक्षरीत करतांना दिनांक नमुद करेल.

४) कामाची नोंद दरमहा त्याच कामाच्या मोजमाप वहीत घेण्यांत येईल. कामाची प्रगती झाली नसेल तर तसे प्रमाणपत्र त्या महिन्यांत संबंधित मोजमाप वहीत नोंदविण्यांत येईल.

५) शाखा अभियंता त्रैमासीक तपासणीसाठी कामाची नोंद घेऊन मोजमाप वही संबंधित उप अभियंताला सादर करील. मोजमाप वही विभागीय कार्यालयाकडे पाठविली असल्यास शाखा अभियंता कामांची यादी सादर करील. उप अभियंता पुढील तपासणीत कामांच्या यादी वरुन मोजमाप वही तपासेल. उप अभियंता त्याचेकडे येणा-या सर्व मोजमाप वहयांची पडताळणी करुन त्यावर स्वाक्षरी करुन दिनांक टाकेल.

६) उप अभियंता मोजमाप पुस्तकावरुन कामांची यादी करुन, कामांची मोजमाप पुस्तके तपासली आहे असे प्रमाण पत्र प्रत्येक तीन महिन्यानंतरच्या पुढील महिन्याच्या सात तारखेला कार्यकारी अभियंता तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर करेल.

७) ज्या कामांची प्रगती झाली असुन मोजमाप वही वर नमुद पध्दती नुसार लिहलेली आहेत अशा कामांचे देयके मोजमाप वही लिहल्यापासुन सात दिवसात तयार करुन प्रदानार्थ सक्षम अधिका-याकडे सादर करण्यांत यावेत.

८) विभागीय/उप विभागीय कार्यालयाकडे प्रदानार्थ देयके आल्यानंतर देयक कालाक्रमे नमुना १२ मध्ये नोंदविण्यात यावीत व नोंदक्रमानुसार अदाईसाठी वित्त विभागाकडे पाठविण्यात यावीत.

९) कार्यकारी अभियंता यांनी त्यांचेकडील क्र.१२ नमुन्यातील नोंदवही दरमहा पाच तारखेला मु.का. अ. यांना सादर करावी. त्यांत कोणत्या क्रमांकापर्यंत देयके प्रदान झाली आहेत हे स्पष्टपणे दाखविण्यांत यावे.

१०) मोजमाप पुस्तकातील शेवटची पाने साहित्य पुरवठ्यासाठी आरक्षित करावीत व त्यामध्ये केलेला पुरवठा व त्याचे देयकाशी केलेले समायोजन नोंदवुन स्वाक्षरीत करण्यांत यावे.

११) मोजमाप पुस्तक हे संबंधित नस्तीसोबत ठेवण्यांत यावे.

१२) निविदा प्रक्रिया संपेपर्यंत नस्ती लिपीकाकडे राहील. मात्र प्रत्यक्षात कामाचे आदेश दिल्यावर नस्ती व मोजमाप पुस्तक कनिष्ठ अभियंताकडे राहील.

१३) काम पुर्ण झाल्यावर पुर्णत्वाचा दाखला मोजमाप पुस्तकात विहित नमुन्यांत नोंद नोंदवुन कनिष्ठ अभियंत्याने नस्ती व मोजमाप पुस्तक विभागास परत करणे आवश्यक राहिल.

१४) मोजमाप वहींचे रजिस्टर ठेवण्यांत यावे.प्राप्त झालेल्या मोजमाप वहया, वितरीत केलेल्या मोजमाप वहया व शिल्लक मोजमाप वहया याची नोंद त्यामध्ये ठेवण्यांत यावी. त्याच प्रमाणे लिहुन पुर्ण झालेल्या मोजमाप वहया व दप्तरी दाखल मोजमाप वहया याची नोंद त्यांत करण्यांत यावी.

१५) मोजमाप वहीचे प्रारंभी एक पान लावावे. त्यावर मोजमापवही उपविभागात आल्या-गेल्याची नोंद घेण्यांत यावी. उपअभियंता दरमहा नोंदी अद्यावत असल्याची खातरजमा करतील.

१६) शाखा अभियंता त्यांची बदली झाल्यावर कार्यभार हस्तांतर करण्यापुर्वी झालेल्या कामांची मोजमापे वहीत नोंदवुन वही उपविभागास परत करेल. तशी नोंद ते त्यांच्या कार्यभार

हस्तांतर टिप्पणीत करतील. बदली झालेल्या शाखा अभियंत्याकडील मोजमाप वही नवीन शाखा अभियंताच्या नावें हस्तांतरीत केली जाईल. यावर उपविभागीय अधिकारी नियंत्रण ठेवतील.

१७) उपविभागीय अधिकारी दरवर्षी १ जुलै रोजी त्यांच्या प्रभागातील सर्व मोजमाप वहयांची मोजणी करतील व त्यांच्या कार्यालयात ठेवण्यांत आलेल्या मोजमाप नोंदवहीमध्ये त्याअर्थाचे प्रमाणपत्र नमुद करतील. मोजमाप वहीच्या सुचीसह त्याची प्रत विभागीय कार्यालयास सादर करतील. सदर सुचीची पडताळणी कार्यकारी अधिकारी, विभागीय कार्यालयात ठेवण्यांत आलेल्या नोंदवहीशी करतील.

वरील सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(जयश्री चौधरी)
उप सचिव.महाराष्ट्र शासन

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद.
सर्व मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हा परिषद.
कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे विभाग,जिल्हा परिषद (सर्व)
कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग,जिल्हा परिषद (सर्व)
मुख्य लेखा परिक्षक,स्थानिक निधी लेखा,कोकण भवन,नवी मुंबई.
उपमुख्य लेखा परिक्षक,स्थानिक निधी लेखा,कोकण भवन,नाशिक,पुणे,नागपूर,औरंगाबाद, अमरावती.
सर्व जिल्हा स्थानिक निधी लेखा अधिकारी,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य,मुंबई,
महालेखापाल (लेखा व परिक्षा) महाराष्ट्र राज्य,मुंबई,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य,नागपूर,
महालेखापाल (लेखा व परिक्षा) महाराष्ट्र राज्य,नागपूर,
सार्वजनिक बांधकाम विभाग (इमा-२),
पाटबंधारे विभाग,
इतर सर्व मंत्रालयीन विभाग,
ग्रामविकास विभागातील सर्व अधिकारी व कार्यासने,
निवड नस्ती.

(परिशिष्ट ६.१)

**जिल्हा परिषदांमधील कामे किंवा विकास योजना यांच्या संबंधित प्रशासकीय मान्यता तसेच तांत्रिक मान्यता तसेच निविदा किंवा कंत्राट स्विकारण्याच्या अधिकारात वाढ करण्याबाबत**

महाराष्ट्र शासन
ग्रामविकास व जलसंधारण विभाग
शासन निर्णय क्रमांक झेडपीए २००८/प्र.क्र ४४४/वित्त-९
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२, दि. १५ जुलै, २००८

**वाचा :-** १) ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र. झेडपीए २०००/प्र.क्र ४०२३/३३ दि. १२ जानेवारी, २००१
२) ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र. झेडपीए १०९९/प्र.क्र २०८९ भाग-२/३३ दिनांक १२ जानेवारी, २००१
३) ग्रामविकास व जलसंधारण विभाग अधिसूचना क्र. झेडपीए २००१/प्र.क्र ४०२३/वित्त-९ दि. १९ मार्च, २००४
४) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. झेडपीए २००८/प्र.क्र ४४४/वित्त-९ दि. २५ जून, २००८

**शासन निर्णय :-**

जिल्हा परिषदांकडे हस्तांतरीत करण्यात आलेल्या विविध योजनांमुळे जिल्हा परिषदांकडील कामाची व्याप्ती ब-याच प्रमाणात वाढलेली आहे. यामुळे जिल्हा परिषदेकडील कामाच्या स्वरुपात वाढ झालेली आहे. त्या अनुषंगाने कालावधीत व किंमतीत वाढ झालेली आहे. तसेच या कालावधीत बांधकामासाठी वापरावयाच्या सिमेंट व स्टीलच्या दरात झालेल्या असाधारण (Abnormal) भाववाढ झाल्यामुळे शासकीय बांधकामांच्या प्रगतीवर विपरित परिणाम होत आहे. यामुळे शासकीय निधी अखर्चित राहणे, शासनाच्या विविध योजना वा कामे अपुर्णावस्थेत राहणे. इत्यादी कारणांमुळे विविध स्तरावरून या विभागाच्या दिनांक १२ जानेवारी, २००१ च्या दोन्ही शासन निर्णयात सुधारणा करण्याबाबत मागणी होत आहे. यामुळे महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील नियम ४ खालील परिशिष्ट दोन मध्ये शासन अधिसूचना ग्रामविकास व जलसंधारण विभाग अधिसूचना क्र. झेडपीए २००१/प्र.क्र ४०२३/वित्त-९, दि. १९ मार्च, २००४ अन्वये करण्यात आलेल्या सुधारणेत **दि. २५ जून, २००८ च्या शासन निर्णयान्वये बदल करण्यात आलेले होते. परंतु सदर शासन निर्णय रद्द करण्यात येत असून** खालील प्रमाणे फक्त **अनावर्तीत खर्चाच्या अधिकाराच्या मर्यादेत सुधारणा** करण्यात येत असून त्यानुसार सुधारीत शासन आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

**महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखा संहिता १९६८ (नियम ४ खालील)परिशिष्ट - दोन**

**जिल्हा परिषद व पंचायत समिती यांच्या अधिकारांची विभागणी करणे**

| अ. क्र.१ | अधिकाराचे स्वरूप | ज्या प्राधिका-या कडे अधिकार सोपविण्यात आले आहे तो प्राधिकारी /प्राधिकरण | **अंदाजित अनावर्ती खर्च** | |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ६ | ७ |
| | | **जिल्हा परिषद** | **न्यूनतम मर्यादा** | **अधिकतम मर्यादा** |
| भाग -१ | कामे किंवा विकास योजना यांच्या संबंधातील प्रशासकीय मान्यता देण्याचा अधिकार | १.उप अभियंता | -- | १,००,०००* |
| | | २.कार्यकारी अभियंता | १,००,००० | ५,००,००० * |
| | | ३.मुख्य कार्यकारी अधिकारी / अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी | ५,००,००० | २०,००,००० * |
| | | ४.अध्यक्ष, स्थायी समितीचा | २०,००,००० | २५,००,००० * |
| | | ५.विषय समितीचा सभापती | २०,००,००० | २३,००,००० * |
| | | ६.विषय समिती | २३,००,००० | ३०,००,००० |
| | | ७.स्थायी समिती | २५,००,००० | ५०,००,००० |
| | | ८.जिल्हा परिषद | संपूर्ण अधिकार | संपूर्ण अधिकार |
| | | **पंचायत समिती** | | |
| | | १.गट विकास अधिकारी | -- | ५,००,००० * |
| | | २.पंचायत समितीचा सभापती | ५,००,००० | १०,००,००० * |
| | | ३.पंचायत समिती | संपूर्ण अधिकार | संपूर्ण अधिकार |
| भाग -२ | कामे किंवा विकास योजनांच्या निविदा किंवा कंत्राट स्विकारण्याचा अधिकार | १.उप अभियंता | | १,००,०००* |
| | | २.कार्यकारी अभियंता | १,००,००० | ५,००,०००* |
| | | ३.मुख्य कार्यकारी अधिकारी / अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी | ५,००,००० | २०,००,०००* |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ४. अध्यक्ष, स्थायी समितीचा | २०,००,००० | २५,००,०००* |
| | | ५. अध्यक्ष,विषय समितीचा | २०,००,००० | २३,००,०००* |
| | | ६.विषय समिती | २३,००,००० | ३०,००,०००* |
| | | ७.स्थायी समिती | २५,००,००० | ५०,००,०००* |
| | | ८.जिल्हा परिषद | संपूर्ण अधिकार | संपूर्ण अधिकार |
| | | **पंचायत समिती** | | |
| | | १.गट विकास अधिकारी | | ५,००,००० |
| | | २.पंचायत समितीचा सभापती | ५,००,००० | १०,००,००० |
| | | ३.पंचायत समिती | संपूर्ण अधिकार | संपूर्ण अधिकार |
| भाग -३ | कामे किंवा विकास योजना यांच्या संबंधातील तांत्रिक मान्यता देण्याचा अधिकार | १.उप अभियंता (मूळ बांधकाम) व दुरुस्त्या | | १,००,००० मूळ बांधकाम/ व दुरुस्त्या |
| | | २.कार्यकारी अभियंता-<br>१)मूळ बांधकामे<br>२) दुरुस्त्या<br><br>३)विद्युत कामे | | २५,००,००० पर्यंत मूळ कामे अर्थसंकल्पिय तरतूदींच्या अधीन राहून पूर्ण अधिकार<br><br>५०,००० |
| | | ३.मुख्य कार्यकारी अधिकारी / अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी | | ५०,००,००० पर्यंत |
| | | ४. जि.प मधील विविध खातेप्रमुख | | ५,००,००० पर्यंत |
| | | ५. गटविकास अधिकारी | | ३,००,००० पर्यंत |

* टिपः- १) या स्तरावर दिलेल्या मान्यतेची माहिती पुढील विषय समितीस/स्थायी समितीस पंचायत समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करणे अनिवार्य राहील.

२) प्रत्येक तिमाही बैठकीत जिल्हा परिषद विभागांनी तिमाहित केलेल्या कार्यवाहीचा आढावा दर्शविणारा अहवाल समितीच्या बैठकीत सादर करावा. अनुदानांची, बांधकामे व योजना यांच्याशी सुसंगती यांची माहिती अहवालात प्रामुख्याने द्यावी.

या अनुषंगाने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता १९६८ मधील परिशिष्ट २ मध्ये यथायोग्य वेळी बदल करण्यांत येईल.

हा शासन निर्णय संगणक संकेतांक क्र. २००८०७१५१२४४५४००१ अन्वये www. maharashtra.gov.in अन्वये शासनाच्या वेब साईटवर उपलब्ध करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(ना.रा. भागवत)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
सर्व जिल्हा परिषदाचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व जिल्हा परिषदाचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
सर्व विभागीय आयुक्त ( विकास शाखा )
मुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा कोकण भवन, नवी मुंबई
उप मुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधी लेखा नवी मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,नागपूर,अमरावती
सर्व जिल्हा लेखा परिक्षक अधिकारी स्थानिक निधी लेखा
महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता ) / ( लेखा व परिक्षा ) महाराष्ट्र-१, मुंबई.
महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता ) / ( लेखा व परिक्षा ) महाराष्ट्र-२, नागपूर.
या विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती, कार्यासन क्रमांक वित्त-९

४

कार्यालय सातारा
प्रेमन
2012
जि./जिल्हाधिकारी

(परिशिष्ट ७.१)

आमदार स्थानिक विकास कार्यक्रम
अभिकरण शुल्क (सेंटेज चार्जेस) व
स्वामित्व धन (रॉयल्टी) माफ करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन निर्णय, क्रमांक - स्थाविका-२०११/प्र.क्र.३६/कार्यासन- १४८२,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक - १३ सप्टेंबर, २०१२.

**प्रस्तावना :-**

१. खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमाच्या नोव्हेंबर, २००५ च्या मार्गदर्शक तत्वांतील [illegible] क्र ४.१८ नुसार "जिल्हाधिकारी व अंमलबजावणी यंत्रणा यांनी या कार्यक्रमांतर्गत करण्यात आलेल्या [illegible] तयारीकरिता तसेच अंमलबजावणी व संनियत्रणाकरिता कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय शुल्क [illegible] चार्जेस, कोणत्याही व्यक्तीचे पगार, वाहतूक भत्ता तसेच प्रशासकीय खर्च आकारु नये" अशा सूचना [illegible] आल्या आहेत.

२. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत करण्यात येणाऱ्या कामांवर सार्वजनिक बांधकाम [illegible]च्या निकषानुसार, आस्थापना खर्च, हत्यारे व संयंत्रे व सेक्रेटरीएट चार्जेस असे एकूण [illegible] [illegible] चार्जेस) आकारण्यात येतो,तर जिल्हा परिषदेने केलेल्या कामांवरील प्रत्यक्ष खर्चाच्या [illegible] [illegible] शुल्क म्हणून आकरण्यात येते. तसेच महसूल व वन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक [illegible]-३३/२००४/प्र.क्र.६३/ख, दि.१९.४.२००६ अन्वये, देण्यात आलेल्या सूचनांनुसार या कार्यक्रमां[illegible] [illegible] येणाऱ्या कामांवरील स्वामित्व धनाची रक्कम आकारण्यात येते.

३. विधीमंडळाच्या सन २०११-१२ तसेच २०१२-१३ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) [illegible]नामध्ये नियोजन विभागाशी संबंधित अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेच्या वेळी "आमदार स्थानिक [illegible] कार्यक्रमांतर्गत घेण्यात येणाऱ्या कामांवर अंदाजपत्रक तयार करताना सार्वजनिक बांधकाम [illegible]माफत आस्थापना खर्च तसेच गौण खनिजांच्या संदर्भातील रॉयल्टीची आकारणी महसूल [illegible] [illegible]कडून केली जाते. यामुळे आमदार निधीची रक्कम प्रस्तावित विकास कामांसाठी खूप कमी [illegible] [illegible] त्यामुळे सदर निधीतून आवश्यक तेवढी जनकल्याणाची कामे हाती घेणे शक्य होत नाही. तरी आमदार [illegible]क विकास कार्यक्रमांतर्गत करण्यात येणाऱ्या कामांसाठी सेंटेज चार्जेस व रॉयल्टीची रक्कम माफ [illegible] यावी" अशी विनंती विविध विधिमंडळ सदस्यांनी सभागृहात केली होती. त्यानुसार [illegible] [illegible]क विकास कार्यक्रमांतर्गत सेंटेज चार्जेस व रॉयल्टी माफ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या [illegible] [illegible]

**शासन निर्णय :-**

याबाबत साकल्याने विचार करण्यात येऊन आमदार स्थानिक विकास कार्यक्रमां[illegible] [illegible] येणा-या कामांवरील सेंटेज चार्जेस व रॉयल्टी माफ करण्याबाबतचा प्रस्ताव [illegible] [illegible]ण्यांत येऊन मंत्रीमंडळाच्या मान्यतेनुसार खालील आदेश निर्गमित करण्यात [illegible]

"आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत करण्यात येणाऱ्या विकास [illegible] [illegible] कार्यान्वयीन यंत्रणांकडून यापुढे कोणत्याही प्रकारचे अभिकरण शुल्क [illegible] [illegible]रण्यात येणार नाही. तथापी, या कार्यक्रमांतर्गत करण्यात येणा-या कामांसाठी स्वामित्व [illegible] [illegible]प्रमाणेच चालू ठेवण्यात यावी."

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या ... २८५/१२/व्यय-८, दि.०६.०९.२०१२ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात ... त्याचा संगणक संकेतांक २०१२०९१३१४५९३१११९०० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(अ.

शासन

प्रत

१ मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३ मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव,
४ मा.उप मुख्यमंत्री (नियोजन) यांचे खाजगी सचिव,
५ मा.राज्यमंत्री (नियोजन) यांचे खाजगी सचिव,
६ सर्व विभागीय आयुक्त,
७ सर्व जिल्हाधिकारी,
८ सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
९ महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र १/२,-मुंबई/नागपूर,
१० महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर,
११ संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१२ अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१३ सर्व उप आयुक्त (नियोजन), विभागीय आयुक्तांची कार्यालये,
१४ सर्व जिल्हा नियोजन अधिकारी,
१५ सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१६ सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई (पत्राने),
१७ वित्त विभाग, व्यय-८, मंत्रालय, मुंबई-३२,
१८ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
१९ ग्रंथपाल,नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
२० बहुजन समाज पार्टी, डी-१, इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१ (५ प्रती),
२१ भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ बॅरेक क्र.१, योगक्षेमसमोर, वसंतराव भागवत चौक, नरीमन पॉईंट, मुंबई-२० (५ प्रती),
२२ भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस व्ही पटेल रोड, मुंबई-४(५ प्रती)
२३ महाराष्ट्र कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई-१३ (५ प्रती),
२४ इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर,मुंबई-२५ (५ प्रती),
२५ नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईन्ट, मुंबई-२१ (५
२६ शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-२८ (५ प्रती),
२७ महाराष्ट्र नवनिर्माण सेना, मातोश्री हाईट, पद्माबाई ठक्कर मार्ग, रुपारेल कॉलेज जवळ, माटुंगा (प), मुंबई-२८ (५ प्रती),
२८ निवड नस्ती, कार्यासन १४८२,नियोजन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२

C:\Documents and Settings\Administrator\Desktop\GAWADE\CR-36 ... change the

सत्यप्रत

कार्यकारी अभियंता
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग
जिल्हा परिषद, सातारा.

(परिशिष्ट ११.१)

प्रपत्र-अ

| अ क्र | परिच्छेद क्र | जि.प./पं.स. कडील विभाग | दोषी आढळून आलेले कर्मचारी संख्या | जि.प.ने केलेली कार्यवाही | सहायक संचालक यांचेकडील प्रस्तावांची संख्या यांच्याकडे मान्यतेसाठी सादर केलेले प्रस्ताव | मा.विभागीय आयुक्त पुणे यांच्याकडे मान्यतेसाठी सादर केलेले प्रस्ताव आयुक्त मान्यता प्रस्तावांची संख्या | आयुक्त् मान्यता प्रस्तावांची संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९ | ३.११७ | जि.प. शिक्षण प्राथ. | | शिक्षण विभागाने लेखापरिक्षणांस दप्तर उपलब्ध करून दिले होते त्यामुळे संवंधीतांवर स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम १९३० मधील कलम ७ अन्वये कारवाई केली नाही. | निरंक | निरंक | निरंक | |
| | ३.११८ | जि.प. शिक्षण प्राथ. | | | | | | |
| | ३.१२२ | जि.प. शिक्षण प्राथ. | | | | | | |
| | ३.२५७ | बांधकाम (उ.)जि.प. | १ | सुनिल पोरे तत्कालीन शा.अ. हे दिनांक ३१.८.२०१६ रोजी स्वेच्छा सेवानिवृत्त झाले असून चौकशीची बाव ही ४ वर्षपूर्वीची असल्याने म.ना.से .(नि.वे.) नियम १९८२ च्या नियम २७(२) नुसार विभागीय चौकशी सुरु करणे शक्य नाही. | बांधकाम विभाग (उ) कडील पत्र क्र. जा.क्र./बांध.उ./लेखा-२/९२४/२०१८ दि.२६/१२/२०१८ अन्वये विभागीय सहसंचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा पुणे यांना कळविलेले आहे. | निरंक | निरंक | |
| | ४.२५० | पं.स.खटाव | २ | १.श्री.बी.एस.बोडरे,शेती अधिकारी यांना नोंदवही न ठेवलेने दोषारोप पत्र बजावण्यात आलेले आहे. २.श्री.एस.एच.गंगावणे सहा. लेखाधिकारी यांना रक्कम उशिरा कपात केलेबाबत दोषारोप पत्र बजावण्यात आलेले आहे. | निरंक | निरंक | निरंक | |

| अ क्र | परिच्छेद क्र | जि.प./पं.स. कडील विभाग | दोषी आढळून आलेले कर्मचारी संख्या | जि.प.ने केलेली कार्यवाही | सहायक संचालक यांचेकडील प्रस्तावांची संख्या यांच्याकडे मान्यतेसाठी सादर केलेले प्रस्ताव | मा.विभागीय आयुक्त पुणे यांच्याकडे मान्यतेसाठी सादर केलेले प्रस्ताव आयुक्त मान्यता प्रस्तावांची संख्या | आयुक्त् मान्यता प्रस्तावांची संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ३.५१९ | पं.स.वाई ग्रापापु | | अनियमितता झालेली नाही व मौजे ग्रा.पं. ठराव क्र.३ .२८.११.२०१३ नुसार सहामहिने मुदत वाढ दिलेली असून दिलेल्या ताराखेच्या आत मक्तेदाराने काम पूर्ण केले आहे. त्यामुळे भाववाढ देण्यात आलेली नाही. | निरंक | निरंक | निरंक | |
| | ३.१०६९ (२९) | ग्रामपंचायत जि.प. | २६ | १. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व जि.से. (शिस्त व अपिल) नियम १९६४ नुसार दप्तर उपलब्ध न करणारे १५ ग्रामसेवक व विलंबाने दप्तर उपलब्ध केलेले ११ ग्रामसेवक आहेत. त्यांना नोटीसा देण्यात आलेल्या असून खुलासा प्राप्त होताच पुढील शिस्तभंगाची कारवाई करणेत येत आहे. २. वित्त विभागा कडील दि.१५ सप्टेंबर, २०१७ च्या शासन परिपत्राकानुसार कार्यवाही होणे अपेक्षित असल्याने ग.वि.अ. यांना पुढील आदेश होईपर्यंत वसूली दि.२४.१२.२०१८ च्या ग्रामपंचायत विभागाकडील आदेशान्वये वसूली थांबविण्यात आलेली आहे. | निरंक | निरंक | | |

| अ क्र | परिच्छेद क्र | जि.प./पं.स. कडील विभाग | दोषी आढळून आलेले कर्मचारी संख्या | जि.प.ने केलेली कार्यवाही | सहायक संचालक यांचेकडील प्रस्तावांची संख्या यांच्याकडे मान्यतेसाठी सादर केलेले प्रस्ताव | मा.विभागीय आयुक्त पुणे यांच्याकडे मान्यतेसाठी सादर केलेले प्रस्ताव आयुक्त मान्यता प्रस्तावांची संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ३.१०६९ (३०) | जि.प. शिक्षण प्राथ. | १ | श्री.पी.व्ही.शेलार क.स. यांनी रक्कम रुपये २५००/- इतका दंड स्वत: चलनाने भरणा केलेला आहे. त्यांचेवर विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे. | | | | |
| | ३.१०६९ (३१) | कृषि विभाग | १ | संबंधित कर्मचारी श्री.एस.एन. कदम, (तत्कालीन विस्तार अधिकारी पं.स. सातारा) यांना म.जि.प.,जि.से. (वर्तणूक) नियम १९६४ नुसार दोषारोप पत्र बजावून चौकशी सूरू केलेली आहे. | निरंक | निरंक | निरंक | |
| | ४.४३७ (२४) | पं.स.फलटण | १ | १.एस.वाय.बोबडे, ग्रामसेवक मयत<br>२.एस.एस.शिंदे, ग्रामसेवक मयत<br>३.श्री.व्ही.आर.कांबळे, ग्रामसेवक यांना महाराष्ट्र जि.प. सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६(२) नुसार खातेनिहाय चौकशी प्रस्तावित करुन त्यांना सेवेतून निलंबित करुन त्यांची एक वेतन वाढ एक वर्षासाठी तात्पुरती बंद करण्यात आलेली आहे व सेवापुस्तकात नोंद घेण्यात आलेली आहे. | | | | |

| अ क्र | परिच्छेद क्र | जि.प./पं.स. कडील विभाग | दोषी आढळून आलेले कर्मचारी संख्या | जि.प.ने केलेली कार्यवाही | सहायक संचालक यांचेकडील प्रस्तावांची संख्या यांच्याकडे मान्यतेसाठी सादर केलेले प्रस्ताव | मा.विभागीय आयुक्त पुणे यांच्याकडे मान्यतेसाठी सादर केलेले प्रस्ताव आयुक्त मान्यता प्रस्तावांची संख्या | आयुक्त् मान्यता प्रस्तावांची संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ४.४३७ (२५) | पं.स.माण | ७ | ग्रामपंचायतीमध्ये लेखापरीक्षणासाठी दप्तर उपलब्ध न करणे व उशीरा उपलब्ध केलेले एकूण २२ ग्रामसेवक जबाबदार असून त्यापैकी ५ मयत, ३ बडतर्फ, ७ सेवानिवृत्त, व सध्या कार्यरत ७ अशी सद्य:स्थिती आहे. ७ ग्रामसेवकापैकी २ ग्रामसेवकावर दंडात्मक कारवाई करणेबाबतचे आदेश प्राप्त झाले होते. परंतू दि. १५ सप्टेंबर २०१७ च्या परिपत्रकानुसार व मु.का. अ. यांचे दि. २४/१२/२०१८ च्या आदेशानुसार सदर २ ग्रामसेवकांची वसूलीबाबतची कारवाई थांबविणेत आलेली आहे. तसेच त्यांची खातेनिहाय चौकशी सुरु केलेली आहे. | | | | |
| | ४.४३७ (२६) | पं.स.खटाव | १ | श्री.के.डी.भोसले,ग्रा.से. दफ्तर उपलब्ध न केलेबाबत दोषारोप पत्र बजावण्यात आले. | | | | |

| अ क्र | परिच्छेद क्र | जि.प./पं.स. कडील विभाग | दोषी आढळून आलेले कर्मचारी संख्या | जि.प.ने केलेली कार्यवाही | सहायक संचालक यांचेकडील प्रस्तावांची संख्या यांच्याकडे मान्यतेसाठी सादर केलेले प्रस्ताव | मा.विभागीय आयुक्त पुणे यांच्याकडे मान्यतेसाठी सादर केलेले प्रस्ताव आयुक्त मान्यता प्रस्तावांची संख्या | आयुक्त् मान्यता प्रस्तावांची संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ४.४३७ (२७) | पं.स.कराड | १३ | पंचायत समिती कराडकडील एकूण १३ पैकी ०९ ग्रामसेवकांकडुन वसूली करणेत आलेली आहे.उर्वरित ४ ग्रामसेवकांची वित्त विभागाकडील दि.१५/०९/२०१७ च्या परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही अपेक्षित असलेने ग.वि.अ.पं. स. कराड यांनी पुढील आदेश होईपर्यंत दि.२४/१२/२०१८ चे आदेशान्वये वसूली थांबविणेत आलेली आहे.(०९ ग्रा.से. कर्मचाऱ्यांची यादी सोबत प्रपत्र ब मध्ये सादर केलेली आहे) | | | | |
| | ४.४३७ (२८) | पं.स.पाटण | १ | सन २०१२-१३ या आर्थिक वर्षातील लेखा परिक्षणात जी प्रमाणके उपलब्ध नव्हती ती सद्या दफ्तरी उपलब्ध आहेत.सदरबाबत श्री.टी.के.वायदंडे ले.अ. हे जबाबदार होते. मात्र ते दि.३१/०५/२०१७ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत.म.ना.से. (नि.वे.) नियम १९८२ च्या नियम २७ (२) (ब) नुसार चौकशीधीन बाब ४ वर्षांच्या पली कडील असलेने कर्तव्य कसूरीबाबत विभागीय चौकशी सूरू करता येत नाही तसेच वेतनवाढ रोखून ठेवणेची शिक्षा बजावता येत नाही. | | | | |

| अ क्र | परिच्छेद क्र | जि.प./पं.स. कडील विभाग | दोषी आढळून आलेले कर्मचारी संख्या | जि.प.ने केलेली कार्यवाही | सहायक संचालक यांचेकडील प्रस्तावांची संख्या यांच्याकडे मान्यतेसाठी सादर केलेले प्रस्ताव | मा.विभागीय आयुक्त पुणे यांच्याकडे मान्यतेसाठी सादर केलेले प्रस्ताव आयुक्त मान्यता प्रस्तावांची संख्या | आयुक्त् मान्यता प्रस्तावांची संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ४.४३७ (२९) | पं.स.पाटण | २३ | एकूण २३ ग्रा.से./ग्रा.वि.अ. जबाबदार असून त्यांचेवर दोषारोप पत्रे बजावण्यात आलेली आहेत. | २३ ग्रा.से./ग्रा.वि.अ. यांचेवर दंड आकारणी करणेसाठी सह संचालक, स्था.नि.ले. यांना शासन परिपत्रक दि.१५.०९.२०१७ अन्वये विभागीय आयुक्तांचे परवानगीने दि. २७.१२.१८ चे पत्रान्वये कळविले आहे. | | | |
| | ४.४३७ (३०) | पं.स.म.श्वर | ३ | १.श्री.जी.डी.घाडगे,ग्रा.से.,यांचे विरुध्द गुन्हा दाखल करून सेवेतून बडतर्फ. २.कै.श्री. पी.ए.भोरे,ग्रा.से. मयत झालेले आहेत. ३.श्री.जे.एन. साळुंखे यांचेविरध्द गुन्हा दाखल करून खातेनिहाय चौकशी सूरू करणेत आलेली आहे. | | | | |
| | ३.८३१ /११ | जि.प.समाज कल्याण | | अ) पूर्ण निविदा ई-टेंडरींग पध्दतीने राबविण्यात आलेली आहे व त्यात अनियमितता झाली नाही. सुरक्षा ठेव ५ टक्के पेक्षा जास्त कपात केली आहे. | | | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ब) सुरक्षा ठेव दि.१०.०३.२०१३ रोजी बँकेत त्याच दिवशी जमा करण्यात आली आहे. तसेच जि.प. अर्थ विभागाच्या जमा किर्द नोंदवहीवरुन खातर जमा करण्यात आलेली आहे. | | | | |

# परिशिष्ट (ब)
## समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

## बुधवार, दिनांक ११ एप्रिल, २०१८

## स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, सातारा

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(४) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(५) श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.

(६) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(७) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

(८) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(९) श्री. भारत भालके, वि.स.स.

(१०) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(११) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(१२) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(१३) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.

(१४) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य :**

(१) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**स्थानिक लोकप्रतिनिधी :**

(१) श्री.शंभुराज देसाई, वि.स.स.

(२) श्री.बाळासाहेब पाटील, वि.स.स.

(३) श्री.मकरंद पाटील, वि.स.स.

(४) श्री.जयकुमार गोरे, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री.विलास आठवले, उप सचिव

(२) श्री.प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री.ह.वि.तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखा संचालनालय, नवी मुंबई :**

श्री.प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा

**जिल्हा परिषद पदाधिकारी :**

(१) श्री.संजीवराजे नाईक-निंबाळकर, अध्यक्ष

(२) श्री.वसंतराव मानकुमरे, उपाध्यक्ष

(३) श्री.राजेश पवार, सभापती, शिक्षण व अर्थ समिती

(४) श्री.मनोज पवार, सभापती, कृषी समिती

(५) श्रीमती वनिता गोरे, सभापती, महिला व बालकल्याण समिती

(६) श्री.शिवाजी सर्वगोड, सभापती, समाजकल्याण समिती

(७) श्रीमती अरुणा शिर्के, सभापती, पंचायत समिती, जावली

(८) श्रीमती रजनी भोसले, सभापती, पंचायत समिती, वाई

(९) श्रीमती रुपाली राजपुरे, सभापती, पंचायत समिती, महाबळेश्वर

(१०) श्री.राजाभाऊ जगदाळे, सभापती, पंचायत समिती, कोरेगांव

(११) श्री.रमेश पाटोळे, सभापती, पंचायत समिती, माण

(१२) श्री.मारुती मोरे, सभापती, पंचायत समिती, खंडाळा

(१३) श्री.मिलिंद कदम, सभापती, पंचायत समिती, सातारा

(१४) श्रीमती शालन माळी, सभापती, पंचायत समिती, कराड

(१५) श्री.संदीप मांडवे, सभापती, पंचायत समिती, खटाव

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय :**

(१) श्री.एन.बी.रिंगणे, उप सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई

(२) श्री.परमेश्वर बाबर, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे :**

(१) श्री.चंद्रकांत गुडेवार, उप आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे

(२) श्री.संभाजी लांगोरे, उप आयुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे

(३) श्री.के.डी.भोसले, संचालक (लेखा)

**जिल्हा परिषद, सातारा :**

(१) डॉ.कैलास शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री.पी.बी. पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री.वि.तु.पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(४) श्री.एन.एल.थाडे, प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं.

(५) श्री.सत्यजित बडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(६) श्री.चंद्रशेखर जगताप, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता) विभाग

(७) श्रीमती पुनिता गुरव, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(८) श्री.महेश पालकर, तत्कालिन शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(९) डॉ.भगवान पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी

(१०) श्री.जे.एम.शेख, महिला व बालविकास अधिकारी

(११) श्री.एस.आर.पाटील, कार्यकारी अभियंता, बांधकाम (इमारत)

(१२) श्री.एस.बी.रोकडे, कार्यकारी अभियंता, बांधकाम (दक्षिण)

(१३) श्री.बी.पी.शिवदास, कार्यकारी अभियंता (प्रभारी), लघुपाटबंधारे विभाग

(१४) श्री.चां.ग.बागळ, कृषि विकास अधिकारी

(१५) डॉ.विनोद पवार, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१६) श्री.देविदास कुलाळ, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(१७) श्री.एस.एस.सप्रे, प्रभारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

(१८) श्री.ए.जी.मगदूम, शिक्षणाधिकारी (निरंतर)

(१९) डॉ.अमिता गावंडे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सातारा

(२०) श्री.अविनाश फडतरे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कराड

(२१) श्रीमती एस.बी.खर्डे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कोरेगांव

(२२) श्री.एस.एम.गायकवाड, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पाटण

(२३) श्री.गोरख शेलार, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माण

(२४) श्री.विजयसिंह जाधव, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, फलटण

(२५) श्री.प्रविण सुरडकर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, खटाव

(२६) श्रीमती दिपा बापट, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, खंडाळा

(२७) श्री.आर.व्ही.सांगळे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वाई

(२८) श्री.सतिश बुध्दे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जावली

(२९) श्री.दिलीप शिंदे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, महाबळेश्वर

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०१२-२०१३ च्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील सातारा जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**गुरुवार, दिनांक १२ एप्रिल, २०१८**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, सातारा**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(४) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(५) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(६) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

(७) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(८) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(९) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(१०) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

(११) श्री. भारत भालके, वि.स.स.

(१२) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१३) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(१४) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(१५) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.

(१६) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(१७) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य :**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय :**

(१) श्री. ना. भा. रिंगणे, उप सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय

(२) श्री. परमेश्वर बाबर, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, मंत्रालय

**जिल्हा परिषद, सातारा :**

(१) डॉ.  कैलास शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. पी. बी. पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. एन. एल. थाडे, प्रकल्प संचालक, डीआरडीए

(४) श्री. चंद्रशेखर जगताप, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)

(५) श्री. जावेद शेख, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बाल कल्याण

(६) श्रीमती पुनिता गुरव, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(७) श्री. देविदास कुलाळ, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(८) श्री. ए. जी. मगदूम, शिक्षणाधिकारी (निरंतर)

(९) डॉ. भगवान पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी

(१०) श्री. एस. आर. पाटील, कार्यकारी अभियंता, बांधकाम (इवद)

(११) श्री. एस. बी. रोकडे, कार्यकारी अभियंता, बांधकाम (दक्षिण)

(१२) श्री. बी. पी. शिवदास, कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग

(१३) डॉ. चां. ग. बागल, कृषि विकास अधिकारी

(१४) डॉ. विनोद पवार, प्रभारी समाजकल्याण अधिकारी

(१५) डॉ. विनोद पवार, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१६) डॉ. अमिता गावडे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सातारा

(१७) श्री. अविनाश फडतरे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कराड

(१८) श्रीमती एस. बी. खर्डे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कोरेगांव

(१९) श्री. एस. एम. गायकवाड, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पाटण

(२०) श्री. गोरख शेलार, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माण

(२१) श्री. विजयसिंह जाधव, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, फलटण

(२२) श्री. प्रविण सुरडकर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, खटाव

(२३) श्रीमती दिपा बापट, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, खंडाळा

(२४) श्री. आर. व्ही. सांगळे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वाई

(२५) श्री. सतिश बुध्दे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जावली

(२६) श्री. दिलीप शिंदे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, महाबळेश्वर

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी तसेच गटविकास अधिकारी यांची सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक-२ संदर्भात सातारा जिल्हा परिषदेच्या पंचायत समितीनिहाय संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**शुक्रवार, दिनांक १३ एप्रिल, २०१८**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, सातारा**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(४) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(५) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(६) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

(७) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(८) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(९) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(१०) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(११) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

(१२) श्री. भारत भालके, वि.स.स.

(१३) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१४) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(१५) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(१६) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.

(१७) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य :**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय :**

(१) श्री. ना. भा. रिंगणे, उप सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई

(२) श्री. परमेश्वर बाबर, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे :**

(१) श्री. संभाजी लांगोरे, उप आयुक्त (आस्थापना)

(२) श्री. विलास जाधव, सहायक आयुक्त (विकास)

(३) श्रीमती सोनाली घुले, सहायक आयुक्त (तपासणी)

(४) श्रीमती रश्मी खांडेकर, सहायक आयुक्त (चौकशी)

**जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा :**

(१) श्री. संजय पाटील, उप जिल्हाधिकारी, सातारा

(२) श्री. रमेश शेंडगे, तहसिलदार, महाबळेश्वर

**जिल्हा परिषद, सातारा**

(१) डॉ. कैलास शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. पी. बी. पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. नितीन थाडे, प्रकल्प संचालक, डीआरडीए

(४) श्री. वि. तु. पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(५) श्री. चंद्रशेखर जगताप, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणीपुरवठा व स्वच्छता) ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

(६) श्री. एस. डी. बडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(७) श्रीमती पुनिता गुरव, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(८) श्री. जावेद शेख, महिला व बाल विकास अधिकारी

(९) श्री. एस. एस. सप्रे, प्रभारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा

(१०) डॉ. भगवान पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी

(११) श्री. पी. डी. कदम, कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना

(१२) श्री. बी. पी. शिवदास, प्रभारी कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग

(१३) डॉ. चां. ग. बागल, कृषि विकास अधिकारी

(१४) डॉ. विनोद पवार, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१५) श्री. डी. बी. कुलाळ, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(१६) श्री. ए. जी. मगदुम, शिक्षणाधिकारी (निरंतर)

(१७) श्रीमती ए. एन, गावडे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सातारा

(१८) श्रीमती एस. बी. खर्डे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कोरेगांव

(१९) श्री. पी. एन. सुराडकर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, खटाव

(२०) श्री. जी. डी. शेलार, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माण

(२१) श्री. व्ही. एल. जाधव, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, फलटण

(२२) श्रीमती डी. एच. बापट, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, खंडाळा

(२३) श्री. आर. व्ही. सांगळे, प्रभारी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वाई

(२४) श्री. डी. पी. शिंदे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, महाबळेश्वर

(२५) श्री. एस. आर. बुध्दे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जावली

(२६) श्री. एस. एम. गायकवाड, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पाटण

(२७) श्री. ए. ए. फडतरे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कराड

(२८) श्री. ए. बी. जोशी, शाखा अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

(२९) श्री. आर. बी. आंचद, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सातारा

(३०) श्री. एस. बी. पाटील, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, कराड

(३१) श्री. पी. एल. गोलांगे, सहायक भूवैज्ञानिक, भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा

(३२) श्री. अ. मो. अंजनकर, उप वनसंरक्षक, वन विभाग, सातारा,

(३३) श्री. तानाजी गायकवाड, सहायक वनसंरक्षक, वन विभाग, सातारा

(३४) डॉ. एस. डी. भोई, शल्य चिकित्सक, जिल्हा सातारा

**<u>संक्षिप्त कार्यवृत्त :</u>**

समितीने सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०१२-१३ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील व सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील सातारा जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक १६ जानेवारी, २०१९**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(४) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.

(५) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई**

श्री. प्रताप मोहिते, संचालक

**मंत्रालयीन विभागीय सचिव :**

(१) श्री. श्यामलाल गोयल, अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

(२) श्री. राजगोपाल देवरा, प्रधान सचिव, वित्त विभाग

(३) श्री. असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग

(४) श्री. दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(५) श्री. रा. वा. पानसे, सचिव (प्र. स. ), जलसंपदा विभाग

(६) श्री. चं. प्र. जोशी, सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग

(७) डॉ. सुवर्णा खरात, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग

(८) श्री. प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(९) श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(१०) श्री. कि. पां. वडते, उप सचिव, महसूल विभाग

(११) श्री. म. रं. शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग

(१२) श्री. अ. अ. कपोले, उप सचिव, जलसंपदा विभाग

(१३) श्री. अ. मा. लुंडबे, अवर सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

(१४) श्रीमती एम निलीमा केरकेट्टा, मुख्य कार्यकारी अधिकारी, खादी व ग्रामद्योग मंडळ

(१५) श्री. परमेश्वर बाबर, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग

**विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे :**

श्री. संभाजी लांगोरे, उप आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे

**जिल्हा परिषद, सातारा :**

(१) डॉ. कैलास शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी,

(२) श्री. संतोष धोने, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. सत्यजित बडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(४) श्री. धर्मेंद्र काळोखे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(५) श्री. एस. एस. शिंदे, कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणीपुरवठा) विभाग

(६) श्री. सी. आर. गजभिये, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(७) श्री. विनायक पवार, कृषि विकास अधिकारी

(८) डॉ. विनोद पवार, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(९) श्री. एच. व्ही. जाधव, उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१०) श्री. अ. आ. नाईक, कार्यकारी अभियंता (लघुपाटबंधारे विभाग)

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २०१२-१३ च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१३-२०१४ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात सातारा जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, प्रधान सचिव, वित्त विभाग, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सचिव (प्र.स.), जलसंपदा विभाग, सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव, महसूल विभाग, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, उप सचिव, जलसंपदा विभाग, अवर सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी, खादी व ग्रामद्योग मंडळ तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, सातारा यांची साक्ष घेतली.

## गुरुवार, दिनांक २०, जून २०१९
## स्थळ : विधान भवन, मुंबई

**उपस्थिती :-**

१) श्री. सुधीर पारवे, वि. स. स.  तथा समिती प्रमुख

२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि. स. स.

३) श्री. चरण वाघमारे, वि. स. स.

४) श्री. रणधीर सावरकर, वि. स. स.

५) ॲड.  राहुल कुल, वि. स. स.

६) डॉ. सुधाकर भालेराव, वि. स. स.

७) श्री. सुधाकर कोहळे, वि. स. स

८) श्री. किशोर पाटील, वि. स. स

९) श्री. तुकाराम काते, वि. स. स.

१०) श्री. भारत भालके, वि. स. स.

११) श्री. प्रविण दरेकर, वि. प. स

१२) श्री. विक्रम काळे, वि. प. स

**विशेष निमंत्रित सदस्य :-**

१) श्री. बाळाराम पाटील, वि. प. स

३) श्री. दत्तात्रय सावंत, वि. प. स.

३) श्री. किशोर दराडे, वि. प. स.

४) श्री. निरंजन डावखरे, वि. प. स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का. )
श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी
श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :-**

समितीने बैठकीत अठ्ठाविसाव्या व एकोणतीसाव्या अहवालाच्या प्रारुपावर विचार करून ते किरकोळ दुरुस्त्यांसह संमत केले.